## श्री भक्तविजय - अध्याय ५५

## श्री संत सद्‌गुरू गणेशनाथ महाराज चरित्र

जय जय अचळा अव्यया अविनाशा ॥ अनामा अरूपा परमपुरुषा ॥ ब्रह्मांडनायका जगन्निवासा ॥ स्वानंदाधीशा श्रीहरि ॥१॥ निजभक्त करिती तुझें स्मरण ॥ तुजलागीं त्यांचें निदिध्यासन ॥ जैसे चातक आणि मेघ जाण ॥ मित्रपणें नांदती ॥२॥ कीं बाळ मातेची करी खंती ॥ तिजलागीं लोभ तैशाच रीती ॥ तेविं प्रेमळ भक्तांची जैसी वृत्ति ॥ होसी रुक्मिणीपति त्यांसारिखा ॥३॥ कीं पौर्णिमेचा चंद्रप्रकाश घन ॥ मनीं उल्लासे सागर देखोन ॥ तेविं निजभक्तांची कीर्ति ऐकोन ॥ तूं जगज्जीवन संतोषसी ॥४॥ भक्तिं वर्णिली तुझी स्तुति ॥ तुजही आवडे त्यांची कीर्ति ॥ म्हणोनि चरित्रें मजहातीं ॥ भक्तविजय ग्रंथीं लिहविलीं ॥५॥ मागील अध्यायाचे अंतीं निश्चित ॥ बोधराजें अविंधास दाविली प्रचीत ॥ मग टाकूनियां धनसंपत ॥ हरिभजनीं प्रीत लाविली ॥६॥ आतां सज्ञान विवेकी अति विरक्त ॥ सद्‌गुरुउपासक गणेशनाथ ॥ त्याचें चरित्र अति अद्‌भुत ॥ ऐका निजभक्त भाविक हो ॥७॥ बालेघांटप्रांतीं जाण ॥ सारसी उज्जनीं नगरें दोन ॥ तेथें जयाचें अधिष्ठान ॥ सप्रेम कीर्तन करीतसे ॥८॥ सैली मुद्रा कानीं असती ॥ वस्त्र कौपीन नेसे प्रीतीं ॥ याविरहित कांहीं उपाधि निश्चिती ॥ नावडे चित्तीं तयाचें ॥९॥ दिवसा राहून अरण्यांत ॥ एकांतीं श्रीहरीचें भजन करित ॥ रात्रीं नगरांत प्रेमभरित ॥ गुणानुवाद वर्णीतसे ॥१०॥ नावडे कवणाचा सन्मान ॥ लौकिक पूजा दांभिक भजन ॥ नावडे वस्त्र संपत्ति धन ॥ मिष्टान्नभोजन नावडे ॥११॥ तंव शिवाजी पंढरीसी ॥ यात्रेस आला एके दिवसीं ॥ ऐकूनि गणेशनाथाचे कीर्तिसी ॥ आला भेटीसी नृपवर ॥१२॥ करूनियां साष्टांग नमन ॥ श्रवण करीत बैसला कीर्तन ॥ गणेशनाथाचें विशाल ज्ञान ॥ कवित्व बोलणें प्रासादिक ॥१३॥ नानापरेंचे दृष्टांत देऊन ॥ अभंग रची जैसे बाण ॥ तेणें श्रोतयांचे श्रवण ॥ सुख पावती अपार ॥१४॥ तंव शयन करावया आपणातें ॥ पलंग करविला नृपनाथें ॥ म्हणे प्रथम दिवसीं गणेशनाथ ॥ निजवावा निश्चित यावरी ॥१५॥ मग कर जोडोनि म्हणे स्वामी ॥ एक रात्र क्रमावी आमुचे आश्रमीं ॥ तल्पक करविला नूतन आम्हीं ॥ म्हणोनि चरणीं लागला ॥१६॥ पाहूनि नृपवराचा आदर ॥ नाथासी संकट पडिलें थोर ॥ जैसा कां हरिणीसी नेऊं म्हणतां व्याघ्र ॥ भयें अंतर कांपे तिचें ॥१७॥ संकट जाणोनि ते वेळ ॥ अवश्य म्हणे वैराग्यशीळ ॥ मग खडे वेंचोनि एक ओंजळ ॥ पदरीं बांधिले तेधवां ॥१८॥ देखोनि नृपवर पुसे तया ॥ कंकर वेंचोनि घेतले कासया ॥ येरू उत्तर देत तया ॥ गणती घ्यावया नामांची ॥१९॥ शिबिकेंत बैसवोन ते आसरीं ॥ राजा घेऊन गेला बिढारीं ॥ सुमनशेज रचोनि वरी ॥ गणेशनाथासी निजविलें ॥२०॥ त्रयोदशगुणी करून विडे ॥ तबकीं ठेविले तया पुढें ॥ समया लावूनि अतिनिवाडें ॥ टाकिले पडदे चहूंकडे ॥२१॥ नानापरींचे परिमळ निश्चिती ॥ उपचार विलासभोग संपत्ति ॥ ठेवूनियां तेथें नृपति ॥ बाहेर आला सत्वर ॥२२॥ तों स्पर्शविषय देखोनि नेत्रीं ॥ अनुताप वाटला सकळ गात्रीं ॥ जैसा कां द्विज अग्निहोत्रीं ॥ यवनमंदिरीं कोंडिला ॥२३॥ कीं व्याघ्र

जितचि धरूनि गाय ॥ आपुले जाळींत घेऊनि जाय ॥ ते जैसी लवकर निघों पाहे धरूनि भय मानसीं ॥२४॥ नातरी काननींहूनि आणिलें हरिण ॥ राजमंदिरीं बांधिलें जाण ॥ मग तें मानसीं इच्छीत पूर्ण ॥ जाईन सुटोन कधीं मी ॥२५॥ कीं घृतांत जिवंत धरोनि मासा ॥ घालितां तळमळ करी जैसा ॥ राजाचा भोगउपचार तैसा गणेशनाथासी वाटला ॥२६॥ कीं नूतन रावा पिंजऱ्यांत घातला ॥ मग चारा पाणी न रुचे त्याला ॥ तेवीं तल्पकावरी विरक्त भला ॥ कंटाळला ते रीतीं ॥२७॥ सांगातें घेतले होते कंकर ॥ ते पसरूनि टाकिले पलंगावर ॥ त्याजवरी निजले घटिका चार ॥ तंव उदयासी दिनकरे पातला ॥२८॥ राया दर्शनासी आला झडकरी ॥ तों खडे आंथरले पलंगावरी ॥ विस्मित होऊनि निजअंतरीं ॥ नमस्कार करी साष्टांग ॥२९॥ नाथासी पुसे जोडोनि कर ॥ तंव ते देंती प्रत्युत्तर ॥ शयन करितां पलंगावर ॥ निद्रा अघोर लागेल कीं ॥३०॥ तुझा हेत व्हावया पूर्ण ॥ खडे पसरूनि केलें शयन ॥ जरी सुख दिधलें जीवाकारण ॥ तरी पुढें दुःख भोगणें तितुकेंचि ॥३१॥ जैसी खरूज खाजवितां पाहीं ॥ परम सुख वाटे ते समयीं ॥ मग खाज निघोनि गेल्या देहीं ॥ सौख्य कांहीं पडेना ॥३२॥ नातरी भोजन करितां गोड वाटे ॥ परी वमन करितां जीव कष्टे ॥ तेवें शयनसुख आधीं गोमटें ॥ मग परिणामीं खोटें देहासी ॥३३॥ कां बचनाग आधीं मधुर लागत ॥ परी खाणार प्राणासी मुकत ॥ तेवीं विषय भोगितां भय सत्य ॥ जाण निश्चित नृपनाथा ॥३४॥ ऐसें ऐकतांचि वचन ॥ अनुताप जाहला रायाकारण ॥ म्हणे आजपासूनि मी पलंगीं शयन ॥ न करीं जाण सर्वथा ॥३५॥ निश्चय करूनि निजमानसीं ॥ तल्पक अर्पिला ब्राह्मणासी ॥ संतसंगाची महिमा ऐसी ॥ ब्रह्मादिकासी अगम्य ॥३६॥ गणेशनाथाची ऐसी स्थित ॥ तीन्ही अवस्था वैराग्यभरित ॥ वस्ती न करीचि ग्रामांत ॥ हिंडे अरण्यांत सर्वदा ॥३७॥ स्वदेशांत कीर्तन होतां जाण ॥ दर्शना येती भाविक जन ॥ नित्य अनुग्रह एकालागून ॥ स्वइच्छेनें देतसे ॥३८॥मस्तकीं हस्त पडतां जाण ॥ शिष्याचें उडे प्रपंचभान ॥ तो संसारधंदा टाकून रानोरान हिंडतसे ॥३९॥ तो खळ अथवा दुराचार ॥ निंदक अथवा सज्ञान नर ॥ परी नाथाचा शिरीं पडलिया कर ॥ अपार वैराग्य होय तया ॥४०॥ ऐसा एक संवत्सर जंव लोटे ॥ तंव शिष्य जाहले तीनशेंसाठ ॥ लंगोटबंद वैराग्य उद्भट ॥ आत्मज्ञान स्पष्ट पावले ॥४१॥ पुरीं पैठणीं लोक बोलती ॥ जे कां याचा उपदेश घेती ॥ त्यांची तत्काळ उडोनि प्रपंचभ्रांती ॥ मागें हिंडती सद्गुरूचे ॥४२॥ एक म्हणती चेटकी दारुण ॥ एक म्हणती घालितो मोहन ॥ एक म्हणती आत्मज्ञान ॥ ठसावलें संपूर्ण तयासी ॥४३॥ एक म्हणती हा स्वयें पांडुरंग ॥ एक म्हणती हें अत्यंत ढोंग ॥ एक म्हणती त्याचा संग ॥ करितां भवभंग होतसे ॥४४॥ एक म्हणती त्याचे दर्शना ॥ इतःपर जाऊं न द्यावें कोणा ॥ एक म्हणती होणार चुकेना ॥ प्राक्तनीं असेल जें काहीं ॥४५॥ एक म्हणती त्याची भेटीं ॥ घेऊन सांगों चार गोष्टी ॥ कीं बहुतांचें जीवांची करूनि साटी ॥ पडली तुटी संसारा ॥४६॥ ऐसें म्हणोनि एके दिवशीं ॥ आले नाथाचें दर्शनासी ॥ तों हे आम्रवृक्षाचे छायेसी ॥ बैसले होते ध्यानस्थ ॥४७॥ मानसपूजा झालिया त्वरित ॥ गणेशनाथ पाहे भोंवत ॥ कीं

शिष्य बोलावूनि येथ ॥ मस्तकीं हस्त ठेवावा ॥४८॥ तंव उभे ठाकूनि ते वेळ ॥ काय बोलती निंदक खळ ॥ तुम्हीं शिष्य करूनि भोळसाळ ॥ आपुल्या मागें लाविले ॥४९॥ बहुतांचे संसारा केली तुटी ॥ म्हणोनि लोक होताती कष्टी ॥ आतां आम्हीं सांगतों एक गोष्टी ॥ तरी त्याचि राहाटीं वर्तावें ॥५०॥ तुम्हीं संत आत्मज्ञानी ॥ दृष्टीसी सारिख्या चारी खाणी ॥ तरी झाडासी उपदेश आजपासोनि ॥ करीत जावा निजकृपें ॥५१॥ अवश्य म्हणोनि तये क्षणीं ॥ तत्काळ कौतुक दाखविलें नयनीं ॥ जें मृत्युलोकीं नानासाधनीं ॥ नये घडोनि सर्वथा ॥५२॥ चूतवृक्ष जुनाट होता तेथ ॥ त्यासी उपदेश देऊनि त्वरित ॥ मस्तकीं ठेवूनियां हस्त ॥ तारक मंत्र सांगितला ॥५३॥ ऐसें दृष्टीस देखोन ॥ काय बोलती ते विलक्षण ॥ मनुष्यांसी अनुग्रह सांगतां जाण ॥ जे प्रपंचभान टाकिती ॥५४॥ हा उपदेश ठसावला वृक्षासी ॥ हें कैसें अनुभवेल आम्हांसी ॥ तरी चमत्कार दाऊनियां निजकृपेसी ॥ संशय निरसीं सकळांचा ॥५५॥ तंव भाकरभाजी याजकारण ॥ नैवेद्यासी आणिली होती कवण ॥ गणेशनाथें ते उचलोन ॥ आपुले करीं घेतली ॥५६॥ उपदेश दीधला ज्या वृक्षाकारण ॥ तयासी काय बोलिला वचन ॥ हा देवाचा प्रसाद मुख पसरून ॥ प्रीतींकरोन भक्षीं कां ॥५७॥ ऐसें बोलतां सद्गुरुनाथ ॥ तंव अद्भुत कौतुक वर्तलें तेथ ॥ झाडाचें खोड अकस्मात ॥ उकललें सर्वांदेखतां ॥५८॥ त्यामाजी भाकर घालितां देख ॥ मिळोनि गेलें पहिल्याचसारिख ॥ देखोनि आश्चर्य करिती लोक ॥ तन्मय सकलिक झाले कीं ॥५९॥ गणेशनाथासी ते वेळ ॥ नमस्कार करिती विचक्षण खळ ॥ म्हणती तुजऐसा भक्त प्रेमळ ॥ सज्ञान निर्मळ नसेचि ॥६०॥ आम्हीं अहंकार धरूनि मना ॥ व्यर्थचि केली तुमची छळणा ॥ ऐशारीतीं बोलोनि वचना ॥ आपुल्या सदना ते गेले ॥६१॥ एके दिवसीं गणेशनाथ ॥ अरण्यामाजी कीर्तन करीत ॥ श्रवणासी आले सज्ञान पंडित ॥ आणि वैष्णवभक्त विवेकी ॥६२॥ वैदिक शास्त्रज्ञ आणि भाविक ॥ अठरा वर्णांचे मिळाले लोक ॥ कीर्तनप्रेमाचें निजसुख ॥ पहावयासी पातले ॥६३॥ टाळ विणे मृदंग वाजत ॥ नामघोषगजर होत ॥ नादें अंबर भरूनि तेथ ॥ कोंदोनि गेलें तेधवां ॥६४॥ तंव वरते करूनि हात ॥ पताका करवी गणेशनाथ ॥ हें देखोनि सज्ञान पंडित ॥ काय बोलत तें ऐका ॥६५॥ तूं तरी भराडी जातीचा हीन ॥ आम्हीं तों ब्राह्मण उंचवर्ण ॥ कीर्तनीं टाळ्या तुझे वचनेंकरून ॥ न पिटूं जाण सर्वथा ॥६६॥ यावरी गणेशनाथ उत्तर देत ॥ म्हणे ताडाचा वृक्ष उंच बहुत ॥ परी त्याची छाया उपयोगीं निश्चित ॥ नाहीं पडत कोणाचे ॥६७॥ तेवीं अठरा वर्णांमाजी निपुण ॥ विप्र तंव वरिष्ठ पूज्यमान ॥ परी कीर्तनाचे उपयोगीं जाण ॥ तुमचे कर न पडती ॥६८॥ तरी आतां स्वस्थ करूनि मन ॥ उगेंचि तुम्हीं करावें श्रवण ॥ टाळिया वाजवितील पाषाण ॥ तुमचे कृपेनें स्वामिया ॥६९॥ ऐसें बोलतां वैराग्यशीळ ॥ तो नवल वर्तलें देखती सकळ ॥ दगडगोटे होते माळ्यावर ॥ तो एकाएकीं उठिले पैं ॥७०॥ जैशा करताळिया वाजती देख ॥ तैसे लागती एकासी एक ॥ ऐसें देखोनियां कौतुक ॥ तटस्थ लोक पाहाती ॥७१॥ म्हणती हें कौतुक अभिनव ॥ दगडांसी कैसा आणिला जीव ॥ गणेशनाथाचा अनुपम भाव ॥ न कळे माव इंद्रादिकां ॥७२॥ मग

चित्तीं अनुताप धरून ॥ टाळ्या वाजविती सकळ ब्राह्मण ॥ गणेशनाथाचें समाधान ॥ जाहलें इतुकेन तेधवां ॥७३॥ तों माध्यान्हीं आला गभस्ती ॥ मग उजळिली मंगळारती ॥ खिरापत घेऊनि निश्चितीं ॥ सदनाप्रती लोक गेले ॥७४॥ आम्हीं अहंकार धरून व्यर्थ केलें त्याचें छळण ॥ ऐशापरी वचनें बोलून ॥ वाखाणिती गणेशनाथा ॥७५॥ गणेशनाथ प्रेमळ भक्त ॥ त्यासी वर देती पंढरीनाथ ॥ उज्जनी आणि सारशांत ॥ यात्रा भरत अद्यापि ॥७६॥ संत महंत वैष्णव प्रेमळ ॥ चमत्कार जागृत असे तें स्थळ ॥ निजभक्तांची कीर्ति चिरकाळ ॥ दीनदयाळ वाढवितो ॥७७॥

## अभंगाची पुनरावृत्ती

श्री संत सद्गुरु गणेशनाथ महाराज यांच्या यापूर्वी प्रकाशित करण्यात आलेल्या अभंग गाथेतील अभंगाची पुनरावृत्ती खालील प्रमाणे

| मूळ अभंग | अभंगाची पुनरावृत्ती |
|---|---|
| 05 | 560 |
| 40 | 291 |
| 49 | 447 |
| 57 | 292 |
| 241 | 472 |
| 242 | 471 |
| 259 | 470 |
| 264 | 468 |
| 269 | 467 |
| 303 | 476 |
| 311 | 483 |
| 328 | 502 |
| 329 | 503 |
| 331 | 504 |
| 332 | 505 |
| 333 | 506 |
| 337 | 478 |
| 355 | 512 |
| 479 | 498 |
| 480 | 501 |

## || श्री संत सद्‌गुरू गणेशनाथ महाराज अभंग गाथा ||

अभंग : १

मनि पाहे जन जनि नको मन : या परी साधन साध्य करी ।१।
तिन्ही लोक पाहे आपल्या माझारी : दृढ बाह्यात्कारी नको ठेउ ।२।
संत साधुजन सद्‌गुरुचे ध्यान : अंतरी जीवन साठवावे ।३।
गणेशनाथ म्हणे ह्रदई पूर्णभाव : आपणासहीत देव अवघा एक ।४।

अभंग : २

संसारी हे आशा कशाचि नसावी : सायुज्यता पाहवी मोक्ष डोळा ।१।
संसारीच्या सुखा गोउ नये मन : तरी तुटे बंधन या जिवाचे ।२।
सर्वही कंटाळा संसाराचा आला : तरी सखा भेटला सद्‌गुरूनाथ ।३।
गणेशनाथ म्हणे जाणोनि विदेही : देवाविण काही पाहू नये ।४।

अभंग : ३

समतुल्य कैसे संत आणि जन : वाल आणि सोने कैसे विके ।१।
संत आणि जना कैसी बरोबरी हिंगण मैलागिरी कोणे पाडे ।२।
कैसी बरोबरि जन आणि संता : विष आणि अमृता कैसे तुके ।३।
गणेशनाथ म्हणे बोलिलो अवघड : पाहतो पायाकडे संताचिया ।४।

अभंग : ४

नाही मज ज्ञान न कळे साधन : तुझा तू आपण तारी मज ।१।
न कळे भक्ती मुक्ती न कळे कैसी प्राप्ती : वानिन तुझी किर्ती तिन्ही लोकी ।२।
आपत्यासि माता मोकलिना पाहता : तैसे सद्‌गुरुनाथा पडिलो व्दारि ।३।
गणेशनाथ म्हणे तुझाचि पोसणा : तारि नारायणा अंतःकाळी ।४।

अभंग : ५

निर्भय निरनशा मुळिचे ते मौन : या नाव साधन निजमोक्षाचे ।१।
कल्पना जयाला मुळिहुनी नाही : देवे दिले तेही न लगे मज ।२।
जिकडे पाहे तिकडे आवघे ब्रह्म एक : अक्षय जे सुख याचि नावे ।३।
गणेशनाथ म्हणे ऐसीया सुखासि : पावे तो जन्मासी न ये कदा ।४।

अभंग : ६

निर्गुण निरंजन निराकार पूर्ण : साधावे साधन काय तेथे ।१।
जीवाचा निर्धार पुरे कोठवर : ब्रह्मा विष्णू रुद्र जेथे नाही ।२।
पृथ्वी आणि आकाश होईल याचा नाश : मानवाचा सोस काय तेथे ।३।
गणेशनाथ म्हणे तुज काय मागावे : किती दिवस राहावे आहे आम्हा ।४।

अभंग : ७

तुमची चालती भूमिका होईन आपण : तरीचि समाधान काही येक ।१।

तुमच्या पाईची पायरेखा होईन मी देखा : तरीच माझा सखा सद्‌गुरूनाथ ।२।
तुझ्या पिकाची पिकदाणी करीन आपले मुख : तरीच पावन सुख काही येक ।३।
गणेशनाथ म्हणे ऐसा होईन जेव्हा : मुख दाविन तेव्हा संताप्रति ।४।

अभंग : ८

विखाचे अमृत केले सद्‌गुरुनाथे : पूर्वीचे जे होते पुण्य काही ।१।
प्रल्हाद विख घेता स्मरे भगवंता : निवारिली व्यथा अमृत झाले ।२।
अमृत सागरी विख काय करी : सुर्यापुढे थोरी अंधाराची ।३।
विकल्प हे विख संकल्प हे सुख : हरली दोन्ही देख येके नामे ।४।
पूर्वीचा हा सूर्य पश्चिमे उगवे जेव्हा : विख बाधिल तेव्हा तुझ्या दासा ।५।
गणेशनाथ म्हणे तु आसता देही : विघ्ने करिती काइ तुझ्या दासा ।६।

अभंग : ९

पाणियाची गार क्षणामाजि विरे : तैसा हा संसार जायिल अंती ।१।
उदकाचा तरंग फुटुनी येक रंग : तैसा आहे संग या देहाचा ।२।
अरे माझ्या मना सांडी देह आस : करि का निजध्यास रघुनाथाचा ।३।
गणेशनाथ म्हणे नाही तेथे राहाणे : म्हणुनि धरिले चरण गुरूनाथाचे ।४।

अभंग : १०

मानवाची छाया नको आम्हावरि : जाला आत्मा तरि करू काय ।१।
सकल देव एक ऐसा माझा भाव : जालाशि तु देव करू काय ।२।
मुंगी आणि गज असती बरोबरी : जालाशि तु थोरि करू काय ।३।
जनाचिये संगे काय फल आहे : पडला ह्या देह करू काय ।४।
गणेशनाथ म्हणे गुरुनाथ तु माय : समदृष्टी पाहे सर्वावरि ।५।

अभंग : ११

सर्व माझे माझे वाहातसे वोझे : कळले तुझे गुज पंढरीनाथा ।१।
काया सर्व माया व्यर्थ जायिल वाया : म्हणुनि तुझ्या पाया शरण आलो ।२।
ऐसा हा संसार झाला भूमी भार : नाम निरंतर ध्यात असे ।३।
गणेशनाथ म्हणे आलिया संसारी : घेयीन धणिवरि नाम तुझे ।४।

अभंग : १२

पूर्विचे संचित सद्‌गुरूचा हस्त : तरिच झाले प्राप्त निजसुख ।१।
अनंत जन्माच्या संचिताच्या रेखा : जोडलासे सखा सद्‌गुरूनाथ ।२।
अनंत जन्माच्या पुण्याच्या कोडी : तरिच झाली जोडी सद्‌गुरूची ।३।
चौऱ्यांशी फिरता कष्ट झाले आता : म्हणुनि सद्‌गुरूनाथा शरण आलो ।४।
गणेशनाथ म्हणे तुझ्याने पावन : शरण आलो दीन उध्दरावे ।५।

अभंग : १३

सुखाचे उद्गार तुचि बोलविशि : तुजविण कोणाशी सांगो देवा ।१।
श्रोता आणि वक्ता तुचि सद्गुरूनाथा : सांगो तुझी कथा तुजपाशी ।२।
तुझीये सत्तेने चाले सर्व जन : तुझा तू आपण सद्गुरूनाथ ।३।
तुझीयानि बळे राहती तिन्ही ताळे : तू सकळाचे मुळ सद्गुरूनाथा ।४।
गणेशनाथ म्हणे सांगो तूज काय : हा अखंड चित्ती राहे सद्गुरूनाथा ।५।

अभंग : १४

आपुले पंगती बैसविले मज : करूणा आली तूज सद्गुरूनाथा ।१।
तुझे निज नाव चरणी दिल्हा ठाव : तुजवीन देव अनिक नाही ।२।
मासाचा हा गोळा उध्दरिला गोपाळा : न कळे तुझी लीला मायबापा ।३।
काय माझे वोझे पडले होते तुज : अंतरिचे गुज सांगितले ।४।
गणेशनाथ म्हणे सद्गुरू कृपाला : वेळोवेळा डोळा पाहिन रूप ।५।

अभंग : १५

आलिया जन्माशी तुचि जोडलाशी : लाभ हा आम्हाशी थोर झाला ।१।
तुझीये भक्तीचे बहुत आहे सुख : हारपले दु:ख जन्मांतरीचे ।२।
तुझे नाम गाता हर्ष वाटे चित्ता : धन्य सद्गुरूनाथा मायबापा ।३।
गणेशनाथ म्हणे तुझे भक्तिची आवडी : कनि झाडफेडी तुझे पायी ।४।

अभंग : १६

जेथे नाही भक्ति तेथे कैची शांती : तयाची संगती नको देवा ।१।
जेथे नाही भावो तेथे कैचा देवो : तैसा आम्हा ठावो नको देवा ।२।
जेथे नाही दया तेथे कैची माया : परतोनि त्या ठाया जावो नये ।३।
जेथे नाही योग त्याचा काय संग : असावे नि:संग तुझे पाइ ।४।
गणेशनाथ म्हणे अखंड तुझा संग : हेचि तुज मागे सद्गुरूनाथा ।५।

अभंग : १७

कनकाची पृथ्वी परिसाचे पर्वत : चिंतामणी अगणित गणना नाही ।१।
सद्गुरूची कृपा पूर्ण जयावरी : रिद्धी सिद्धी घरी कामधेनु ।२।
लक्ष्मी आज्ञाधर कुबेर भांडार : जयाचा आधार हरिहर ।३।
तोचि चित्ती धरी निश्चयेशी भाव : गणेशनाथ देव आदिअंती ।४।

अभंग : १८

सद्गुरू तो येक न कळे ज्याशी देख : त्याशी ब्रह्म सुख काय ठावे ।१।
येकाचे हातीची सर्वही पैदास : विचारीना त्यास दोष आहे ।२।
पुरुष केले देवे स्त्रिया का देवीने : ऐसे ज्याचे ज्ञान भेदयुक्त ।३।
गणेशनाथ म्हणे इतरा न कळे : गुरू जो अढळ तोचि तारी ।४।

अभंग : १९

सद्गुरूची कृपा सेवेवीण नोहे : भावेवीण नोहे कैसा भेटे ।१।
सत्वेविण शांती भक्तीविण मुक्ति : प्रारब्धाविण प्राप्ती कैचे सुख ।२।
कष्टेविण फल ज्ञानेविन मूळ : सद्गुरूविण न कळे मार्ग काही ।३।
धर्मेविण वर्म प्रेमेविण परब्रम्ह : निजध्यासेविण धाम कैसे पावे ।४।
तनू मन प्राण सद्गुरूचे पाइ : गणेशनाथ नाही जन्म मरण ।५।

अभंग : २०

न कळे मज मंत्र न कळे मज यंत्र : न कळे मज पवित्र कैसे रहावे ।१।
न कळे मज संत न कळे मज महंत : न कळे मज चित्त शुध्द कैसे ।२।
न कळे मज भक्ति न कळे मज मुक्ति : न कळे मज प्राप्ती कैसी आहे ।३।
न कळे मज भाव न कळे मज देव : न कळे मज ठाव आत्मत्वाचा ।४।
गणेशनाथ म्हणे न कळे मज काही : परता तू काही जाउ नको ।५।

अभंग : २१

नलगे थोरपण नलगे तुझा मान : अधराचे जाण घेउ नये ।१।
नलगे आम्हा साध्य नलगे ते साधन : तुजविण जाण नलगे काही ।२।
नलगे आम्हा जप नलगे आम्हा तप : नलगे ते स्वरूप तुजविण ।३।
गणेशनाथ म्हणे नलगे आम्हा काही : चित्त तुझे पाइ अढळ करी ।४।

अभंग : २२

पुंडलिके भक्ते थोर केली सेवा : आवडला देवा पंढरीच्या ।१।
सुपुत्रे श्रावणे पुजिली मातापिता : त्याला निजपंथा पाववीले ।२।
निजभक्ते श्रियाळे केलासे निर्धार : तो जगी साचार केला तुवा ।३।
भक्ते रुक्मांगदे थोर सत्व केले : त्याचे नगर नेले वैकुंठाशी ।४।
भक्ते मलिकार्जुने वाहियेला देहो : अपुले पदी ठावो दिल्हा त्यासी ।५।
ऐसे भक्ति सुख काही आम्ही लाहो : लागवेगी जावो मोक्षपदा ।६।
गणेशनाथ म्हणे तैसे व्हावे भक्त : काया वाचा चित्त अर्पूनिया ।७।

अभंग : २३

जेथे असे भक्ति तेथे असे शांति : ते जाणावी प्राप्ती निजमोक्षाची ।१।
जेथे आसे भाव तेथे आसे देव : तो जाणावा ठाव निजमोक्षाचा ।२।
जेथे आसे माया तेथे आसे दया : ते जाणावी सखया भूतकृपा ।३।
जेथे आसे ध्यान तेथे आसे पुण्य : ते जाणावी खूण निजमोक्षाची ।४।
गणेशनाथ म्हणे सद्गुरूचे चरण : तेथेचि पावन निजसुख ।५।

अभंग : २४

अमूळ आकुळ अचळ अढळ : ते ब्रम्ह निष्कळ सद्गुरूनाथ ।१।
अमर आगोचर अनक्षर अपार : ते ब्रम्ह साचार सद्गुरूनाथ ।२।

असाक्ष आलक्ष अक्षय अविनाश : ते ब्रम्ह गोरक्ष सद्‌गुरू माझा ।३।
आनंद आनादी अभेद आगाध : तोचि ब्रम्हानंद सद्‌गुरूनाथ ।४।
अनाथ अज्ञान शरण आलो दीन : गणेशनाथ म्हणे सद्‌गुरूनाथा ।५।

अभंग : २५

देवाचा जो देव भावाचा जो भाव : तोचि माझा ठाव सद्‌गुरूनाथ ।१।
देखणियाचे देखणे मनाचे निजमन : ते माझे जिवन सद्‌गुरूनाथ ।२।
ज्ञानाचे जे ज्ञान ध्यानाचे निजध्यान : तो माझा सज्जन सद्‌गुरूनाथ ।३।
मुळाचे जे मूळ फळाचे निजफळ : ते ब्रह्म निष्कळ सद्‌गुरू माझा ।४।
वस्तूची जे वस्त हिताचे निजहीत : ते माझे स्वहीत सद्‌गुरूनाथ ।५।
गणेशनाथ म्हणे नाम तुझे सार : तुजवीण थोर अनिक नाही ।६।

अभंग : २६

गुरूनाथाचे नाम तेचि माझे सुख : हारपले दु:ख जन्मांतरीचे ।१।
गुरूनाथाचे नाम तोची माझा ठेवा : जन्मोजन्मी घ्यावा आवडी वाचे ।२।
गुरूनाथाचे नाम ते माझे ठेवणे : जालोसे पावन तुझ्या नामे ।३।
गुरूनाथाचे नाम ते माझी शिदोरी : जेउ धाये वरि जन्मोजन्मी ।४।
गणेशनाथ म्हणे सद्‌गुरूची कृपा : तरिची मार्ग सोपा सापडला ।५।

अभंग : २७

संसारी आसता जरी देव जोडे : तरी का होते वेडे संत साधु ।१।
संसारी आसता जरी देव भेटता : तरी शुक देव का जाता तपालागि ।२।
करिता गृहाश्रम जरी जोडे परब्रह्म : तरी का आश्रम त्याजिले त्यानी ।३।
यातीचे आचारे जरी सापडे सार : तरी का निराकार जाले साधू ।४।
गणेशनाथ म्हणे सर्वस्व सांडुन : आलो तुज शरण सद्‌गुरूनाथा ।५।

अभंग : २८

त्रिगुण त्र्यंबक नाम हे नाशिक : जिवी धरिल्या देख पापे जाती ।१।
ज्ञानगंगा द्‌वारी नित्य स्नान करी : तो नये संसारी परतोनिया ।२।
चुकवी चौऱ्याऐंशी सद्‌गुरू आपनापाशी : अनिक तीर्थाशि काय चाड ।३।
तीर्थाचे अधिष्ठान सद्‌गुरू निधान : पुजीलिया जाण जन्म नाही ।४।
गणेशनाथ म्हणे गोरक्ष गोदावरी : पुनरपी संसारी येवो नेदी ।५।

अभंग : २९

पाहता त्या उदका याति नाही कुळ : सर्वामध्ये मीळे जैसे तैसे ।१।
तैशापरी भक्त अभेद होवोनि : जन्म मरण दोन्ही नाही तया ।२।
रात्रि दिवस चाले न घेय विसावा : तरिच मुळिच्या ठाया पावतसि ।३।
गणेशनाथ म्हणे ऐसे परी ध्यान : तरिच ब्रह्मपूर्ण होय साधू ।४।

अभंग : ३०

नित्य मुक्त पाही आत्मा तो निर्गुण : तोचि तो आपण होऊनी राहे ।१।
ऐशी आत्म्याची भेटी घेता या नरदेही : पाप-पुण्य तेही जळूनी जाय।२।
आत्माची होवोनि आत्म्याशि मिळे : मोहचि आढळे अरूप जैसा ।३।
गणेशनाथ म्हणे ऐसा होता आत्मबोध : हरपे भेदाभेद मुळीहूनी।४।

अभंग : ३१

अर्ध घडीमाजि जाती तिन्ही लोक : मानवाचा शोक काय तेथे ।१।
या पृथ्वीचे राज्य इंद्राचे आसन : न लगता क्षण जाती अंती ।२।
पवन आणि पाणी एके वेळे जाती : आम्ही तुम्ही किती आहो येथे ।३।
गणेशनाथ म्हणे अंती आहे जाणे : साधावे साधन परलोक ।४।

अभंग : ३२

जिवीच्या जिवना सांगे भक्ती खुणा : तेणे माझ्या मना समाधान ।१।
निर्धारेशी भक्ती कैशी तेचि गती : सांगे मजप्रति सद्गुरूनाथा ।२।
कैसा तो विश्वास कैसा निजध्यास : सांगे मजप्रति सद्गुरुनाथा ।३।
जीवनमुक्त सोहळा सांगे त्याची कळा : हृदइ जिव्हाळा सांगे कैसा ।४।
आत्मनिवेदन सांगे त्याची खूण : कैसे ते पावन प्रेमसुख ।५।
गणेशनाथ म्हणे सद्गुरूची भक्ती : संतांची संगती हेचि सुख ।६।

अभंग : ३३

भूमीका खाणोनि करी कूप विहीर : दुःखाचे उत्तर न बोलेची ।१।
उदकी करिती शौच टाकीतील चुळी : कोणा सवे कळी करील ते ।२।
बैसोनिया छाये खावोनिया फळे : करिता निर्मूळ न बोलेचि ।३।
गणेशनाथ म्हणे तैशापरी संत : असोनि जनात उद्धरीती ।४।

अभंग : ३४

काय आता देशी काळाचिये हाती : कोणा माझी येती काकुळती ।१।
तुझी माझी भाक सांभाळी पहिली : सांड कैशी केली मायबापा ।२।
तुझी आशा देवा जन्मोजन्मी केली : का सोय सांडीली येकायेकी ।३।
गणेशनाथ म्हणे काय करू आता : पावे सद्गुरूनाथा ऐशे काळी ।४।

अभंग : ३५

वचनाचा निर्धार धरिला जिवी  थोर : करिशी उद्धार म्हणोनिया।१।
बिरूदावली तुझी गर्जती पुराणे : शरण आलो दीन तारी देवा ।२।
शरण आलियाशी झणी मोकलिशी : सांभाळी वचनाशी आपुलिया ।३।
प्रेमभावे तुझी करिन संतसेवा : गणेशनाथ ठेवा सापडला ।४।

अभंग : ३६

कोठेवरि आता करावी हे चिंता : होणार सर्वथा न चुकेचि ।१।
तेत्तिस कोटी देव आणि दाही अवतार : न सुटे होणार काही गती ।२।
दुःखाचा नरदेह धरुनी आपण : सोडविता कोण आहे बळी ।३।
देवाहुनी माझे संचित सबळ : गणेशनाथ मूळ न कळेचि ।४।

अभंग : ३७

बोलविशी मज आपुली गुणकिर्ती : सद्भाव हा चित्ती देवोनीया ।१।
देवोनिया जिवन लावी अनुसंधान : वागेश्वरी पूर्ण अमृताची ।२।
देह अचेतन आत्मा तो निर्गुण : कर्ता तो आपण सूत्रधारी ।३।
कर्ता आणि करविता सर्व तुझी सत्ता : गणेशनाथ आता कैचा येथे ।४।

अभंग : ३८

नामेविन बोलता काय आहे फळ : मृगडोही जळ आढळेना ।१।
भुसाचे कांडणी नातुडेचि कण : गारा घेता रत्ने नव्हती जैशी ।२।
पुत्र आणि जाया धन कण माया : साच नव्हे छाया आकाशाची ।३।
सद्गुरू तारक भेटला उदार : गणेशनाथ थोर आनंदला ।४।

अभंग : ३९

कांडीताची कोंडा न निघे तांदूळ : शेरा कैचे फळ अमृताचे ।१।
कनेराच्या फुला सुगंध तो नाही : कसबाचे गाई जीणे कैचे ।२।
रुइचे हे दूध नयेचि भोजना : धनलोभ्याच्या धना वेच कैचा ।३।
तैसे हे निरफळ भक्तीवीण जिणे : गणेशनाथ म्हणे न ये कामा ।४।

अभंग : ४०

नाशिवंत देह जाणोनि आपण : हरिरुपी मिळोन लीन व्हावे ।१।
चंदनासारिखा झिजे ज्याचा देह : तोचि साधू होय जगद्वंद्य ।२।
परमार्थ परोपकार अखंड आवडे : तोचि योगी चढे ब्रह्मगिरी ।३।
गणेशनाथ म्हणे भावे तुझी सेवा : तरीचि या जिवा सोडवण।४।

अभंग : ४१

भाव धरी जया खांबी नारायण : तारिले पाषाण उदकावरि ।१।
पाषाणाची मुर्ती द्दढभावे भक्ती : नामदेवा हाती दुध प्याला ।२।
महिषा हाती वेद बोलविले च्यारी : निजभक्ताचे करी सर्वकाज ।३।
मुख्य या संसारी सद्भाव हा तारी : गणेशनाथ थोरि काय जाणे ।४।

अभंग : ४२

देह जावो राहो न सांडावा भावो : जिवाचा तो देवो सांघाती की ।१।
ऐसे देह किती नाही त्या गणती : न सांडावी भक्ती गुरुनाथाची ।२।
नाशिवंत जिने ऐसे हे जाणून : साधावे साधन हरीच्या रूपे ।३।

गणेशनाथ म्हणे सर्व जाईना का आता : न सोडी सर्वथा पाय तुझे ।४।

अभंग : ४३

सत्यभावे जाता सद्‌गुरुचे मार्गी : कल्पतरू हा संगी कामधेनू ।१।
परिस चिंतामणी राशी जैसे खडे : न पाहु त्याकडे परतोनिया ।२।
स्वर्ग मोक्षसुख करोनि पायरी : चढो ब्रह्मगिरी लागवेगी ।३।
अमरावती अमर अक्षय जे सुख : सांडोनिया देख सेवा मागु ।४।
गणेशनाथ म्हणे या देवाची भेटी : सांडोनि शेवटी भक्ती करू ।५।

अभंग : ४४

अमुची भावभक्ती तुझ्या मना न ये : करावे ते काय सांगे देवा ।१।
भजन-पूजन ध्यान न ये तुझ्या मना : सांगे नारायण काय करू।२।
अवघे तुझे हाती हे वेद बोलती : का गा काकुळती न ये तुज ।३।
गणेशनाथ म्हणे न व्हावे कठीण : पूर्वीचे वचन सांभाळी देवा ।४।

अभंग : ४५

गुरुभक्तीचा वाटा मुळीचा माझा आहे : तरीची तुझी सोय सापडली।१।
भावे आलो शरण प्राणाशी वेचेन : परी वाटा घेईन गुरुभक्तीचा ।२।
निर्धारेशी भक्ती घडो तुझी काही : हेचि माझे जिवी आवडी थोर ।३।
गणेशनाथ म्हणे बोलोनिया काय : कर्तार तो आहे वेगळाची ।४।

अभंग : ४६

परलोकीचे सुख पावावया वेगी : व्हावे ते निःसंगी सर्वापरी।१।
मेरूचिये परी अढळ ध्यान करी : निःशेष अंतरी पाहे देव ।२।
मन बुद्‌धी प्राण इंद्रिये ते नेमी : एकनिष्ठ रामी रामसुख ।३।
आत्मसुखे सुखी होवोनि आपण : गणेशनाथ देणे सद्‌गुरुचे ।४।

अभंग : ४७

नानाविध भजन करिता देवाचे : परि नव्हे जीवाचे उद्‌धरण।१।
अनिक तीर्थव्रते करिता दंडना : परी नारायणा नव्हे भेटी ।२।
जप तप यज्ञ धर्म-कर्म नेम : तरी न कळे वर्म स्वहिताचे ।३।
करिता चौऱ्यांशी साधनाच्या राशी : परी त्या देवाशी नव्हे भेटी ।४।
हेचि देई देवा पूर्ण संत सेवा : गणेशनाथ दैवा पार नाही ।५।

अभंग : ४८

शब्दाचे दूधमांडे जरी येती भोजना : अभ्यासिल्या ज्ञाना तरिच फळ ।१।
मुंगीचे धडकेने जरी फुटे आकाश : तरी मिळे सायासे ब्रह्म हाती ।२।
मशकाचे वाढी मेरू हाले फुडी : जिवाचीये जोडी ब्रह्म जोडे ।३।
जळाची मासोळी सूर्याला जे भेटे : वारियाची खोट दृष्टी दिसे ।४।

चंद्राचे चांदणे जरी येते पालवी: गणेशनाथ तेवि मिथ्या माया ।५।

अभंग : ४९

देवाविना आम्हा कोणी नाही आता : आदि अंती पाहता हेचि दिसे ।१।
सर्वस्वे परदेशी आलो तुजपाशी : सांभाळी बिरुदाशि वागवीता ।२।
किती सोसू आता या मनाचे जाच : करवितोशि साच निंदा थोर ।३।
देखोनिया जन झालो सत्वहिन : गणेशनाथ मन सहजार्पिले ।४।

अभंग : ५०

नाही आम्हा कोणी पाहता त्रिभुवनी : म्हणोनिया धनी देव केला ।१।
दुःखाचे डोंगर उल्लंघिले थोर : शेवटी आधार केला तुझा ।२।
तुजकारणे देवा कंठी उरला जीव : जाणशी तु भाव अंतरीचा ।३।
गणेशनाथ म्हणे पाहोनी संसार : तुझी आशा थोर केली देवा ।४।

अभंग : ५१

संगती कोणाची नसावी संसारी : येकायेकी करी शुद्ध योगी ।१।
ऐशा या प्रकृती नको ते संगती : येणे अधोगती घडे जीवा ।२।
कल्पना कामना वासना हे टाकी : तेव्हा होय भेटी रोकडीची ।३।
सद्गुरूची कृपा येकायेकपण : गणेशनाथ भिन्न उरो नेदी ।४।

अभंग : ५२

अर्थासाठी कथा सांगती पुराणे : जळो त्यांचे जिने लोभावरी ।१।
अलंकार भूषणे आवडे हे जन : तया नाही जाणे देवलोका ।२।
सत्य भाव भक्ती विश्वास हा चित्ती : तेचि उध्दरती कुळासहित ।३।
गणेशनाथ म्हणे सांडोनिया भ्रांति : साठवावा चित्ती अवघा देव ।४।

अभंग : ५३

प्रपंची असता म्हणवी मी निजदास : तयाचा विश्वास धरिता दोष ।१।
स्त्रिया पुत्र धन सर्वव्यापक मन : म्हणवी मी शरण तेचि पाप ।२।
न करी संत सेवा गुरूचे पूजन : मिरवी संतपण महापाप ।३।
गणेशनाथ म्हणे तया कैची मुक्ती : रवरव भोगिती गर्भवास ।४।

अभंग : ५४

संसारी देवाचा न धरी विश्वास : तो जाणावा वंश रावणाचा ।१।
सर्व आहे ठावे न करी भावभक्ती : तया अधोगती बोलिजेत ।२।
सांगे सर्वा ज्ञान न करी अन्नदान : नव्हे उद्धरण कोणे काळी ।३।
गणेशनाथ म्हणे बोले तैसा चाले : तेचि योगी झाले सर्वसाक्षी ।४।

अभंग : ५५

सूर्याचा प्रकाश सर्व सृष्टीवरी : अंध तो अंधारी सर्वकाळ ।१।

स्वर्ग मृत्यु पाताळ अवघे पूर्ण जळ : चातका न मिळे मेघेवीण ।२।
तैसा नारायण आहे सर्वा ठाई : अभाग्यशी नाही तिन्ही लोकी ।३।
गणेशनाथ म्हणे गुरुकृपा अंजन : पायाळाशी धन जैसे दिसे ।४।

अभंग : ५६

पूर्वीचा पायाळ प्रेमाचे अंजन : सापडले धन आत्मसुख ।१।
संचित सुभूमी कृपेची जीवनी : नामरत्न खाणी सापडली ।२।
मन महिषाची बळी देऊनी वैराग्य : भक्ती ज्ञान सांग करी सेवा ।३।
समता ब्रह्म एक सद्‌गुरूचे पदी : गणेशनाथ बोधी पूर्णबोध ।४।

अभंग : ५७

स्वये आत्माराम आपणामध्ये आहे : भक्तीविण नोहे कृपावंत ।१।
नवखंड पृथ्वी पाहता या नरदेही : सर्व तीर्थ पाही आपणामाजी ।२।
कार्य हेचि क्षेत्र तेतीस कोटी देव : नांदताति पाहे अल्पस्थिती ।३।
गणेशनाथ म्हणे सद्‌गुरू कृपाळा : जीवा दावी सोहळा ब्रह्मसुख ।४।

अभंग : ५८

पहा ते पांडव अखंड वनवासी : परी त्या देवासी विसरेना ।१।
सुदामा ब्राह्मण आपदे पीडला : नाही विसरला नारायणा ।२।
प्रल्हादाशी पिता करीतसे जाचणी : परी चिंती मनी नारायण ।३।
गणेशनाथ म्हणे तुझा न पडावा विसर : दुःखाचे डोंगर पडले जरी ।४।

अभंग : ५९

हिरयाची पारखी घणेविण न कळे : चंदन परिमळ सहाणेसंगे ।१।
दाता तो दुःखकाळी देव अंतकाळी : सोने जैसे धुळी अधिक ढाल ।२।
निर्वाणी सांघाती कळे सत्व अंती : चंद्र जैसा रात्री पौर्णिमेचा ।३।
क्षत्री खर्गधार भक्त तो निर्धार : गणेशनाथ धीर तैशेपरी ।४।

अभंग : ६०

जैसी का पद्‌मिनी रूपे दिसे सुंदर : कवळीता जिव्हार जळुनी जाय ।१।
विषय काम विख दुःखमूळ महादुःख : रवरव आणि शोक गर्भवास ।२।
मुळ आधि कल्पना स्त्रिया पुत्र धना : भुलला तो यातना परम पावे ।३।
सद्‌गुरु समर्था करूणा आली जरी : गणेशनाथ तरी उद्‌धरिला ।४।

अभंग : ६१

सद्‌गुरूच्या भक्ता भय नाही चिंता : जालासे रक्षीता जन्मोजन्मी ।१।
अगणित अपार भक्त उद्‌धरिले : शरणागत केले चिरंजीव ।२।
बिरूदावळि हे साच गर्जती पुराणी : नामासटी प्राणी उद्‌धरीतो ।३।
प्रतापे आगळा निजमोक्षाचा दानी : गणेशनाथ चरणी ऐक्यरूप ।४।

अभंग : ६२

जे झाले निर्माण तेच पापपुण्य : आयुष्य भविष्य जाण तेचि झाले ।१।
संचित क्रियमान प्रारब्धाची गती : न चुकेचि अंती काही केल्या ।२।
देह आयुष्य सरे संचित जीवा उरे : गर्भवास फेरे थोर दु:ख ।३।
होणारसारिखे सहज होत आहे : गणेशनाथ भय नाही आता ।४।

अभंग : ६३

किती दिवस देवा धरू आता धीर : चालला संसार हातोहाती ।१।
पळ पळ वेळ लेखीतसे काळ : त्यावरी अढळ कामक्रोध ।२।
दश इंद्रिये मन धावे सैरावैरा : पावे करूणाकरा मायबापा ।३।
पातकाच्या राशि लागल्या गगनाशी : गणेशनाथ भेटी कैसा देशी ।४।

अभंग : ६४

मरणाचिया भेणे रिघता कपाटी : तेथेही शेवटी न चूकेचि ।१।
काळ चुकवावया थोर तप राशि : परि त्या ईश्वराशि अकरा जन्म ।२।
ब्रह्मा विष्णु रुद्र आणि दाह अवतार : मृत्यू ऋषीश्वर विचारीना ।३।
जन्म मृत्यू दु:ख चुकविले येणे : गणेशनाथ देणे सद्‌गुरूचे ।४।

अभंग : ६५

काय भिऊ आता शरीराकारणे : जीवाशी ते मरण नाही कदा ।१।
शरीराचे ठाइ आहे सर्व भोग : जन्म मृत्यू रोग आशापाश ।२।
नरदेह निर्माण सुखदु:ख दोन : चुकवावया जाण समर्थ येथे ।३।
सद्‌गुरूच्या मुखी करोणी निवाडा : गणेशनाथ वेडा भोळा भाव ।४।

अभंग : ६६

पितांबरधारी चतुर्भुज सावळा : आठवि वेळोवेळा रूप तुझे ।१।
जीवनकळा मन मोहियेले माये : बोलताचि न ये गुह्य गोष्टी ।२।
तन्मय झाले चित्त वृत्ति वेधली : सोय ते सांडिली सज्जनाची ।३।
देखोनि हा प्रपंच गोउ नये मन : गणेशनाथ जाणे देवलोका ।४।

अभंग : ६७

साधू सनकादीक मिळती अपार : भक्तीचा पडिभार थोर जेथे ।१।
मिळती भाविक किर्तन महाद्‌वारि : नामाच्या गजरी वाजे टाळी ।२।
शांती लेणे आंगी प्राप्ती मुक्तीदशा : पूर्ण दाही दिशा ब्रह्म पाहे ।३।
सद्‌गुरू तो एक पाहता भक्तिसुखे : गणेशनाथ दु:ख विसरला ।४।

अभंग : ६८

ओळखीवाचोनि कोण जाणे काय : देव कैसा आहे कैशेपरी ।१।
दया कैसा धर्म क्रिया कैसा नेम : न कळेचि वर्म कृपेविण ।२।

कैसा साधू संत योगी भक्त जन : आपण आहे कोण न कळे काही ।३।
सद्गुरू समर्थ दावी ऐशी खुण : गणेशनाथ तेणे पार होय ।४।

अभंग : ६९

ताहन भूक शोक भय दु:ख चिंता : शरीर आसता सर्व काही ।१।
कल्पना वासना माया मोह सबळ : नाठवे गोपाळ येके वेले ।२।
भ्रम भ्रांति भूलि जीवाला पडली : मग सोय सांडीली स्वहिताची ।३।
कृपावंत गुरू जरी होय उदार : गणेशनाथ पार तरिची पावे ।४।

अभंग : ७०

सद्गुरू माऊली जाणे जीवन कळा : भक्ताचा कळवळा थोर तुज ।१।
त्रिविध तापत्रय ममता अग्नि पाहे : जळालो काढी माये कृपालेशे ।२।
अनन्य शरण विरक्ती भक्तिपूर्ण : कै आता पाहीन संतसेवा ।३।
जीवाचे हे आर्त पूर्ण सद्गुरूनाथ : गणेशनाथ पंथ तरिची पावे ।४।

अभंग : ७१

साटवावा देव हृदई धरूनि भाव : अनिक ते वाव संसारीक ।१।
भावेवीण भक्ति विरक्तीविण प्राप्ती : निर्धारेविण गती कैशी होय ।२।
स्त्रिया पुत्र धन काया माया मन : वेचिलिया पूर्ण प्राप्ती नाही ।३।
प्राप्तीशी निश्चय सद्गुरू कृपा पाहे : गणेशनाथ होय चरणांकित ।४।

अभंग : ७२

सत्कथा सद्बुधि घडो संतसेवा : तरि माझ्या दैवा पार नाही ।१।
सद्गुरू क्रियाधर्म निष्ठा आणि नेम : घ्यावे तुझे नाम अखंड वाचे ।२।
सम बुध्दीचे वैराग्य ऐक्यरूपे योग : देइ ऐसा संग सदोदित ।३।
ऐशियाचे पाइ होइन पायरेखा : गणेशनाथ ऐका सद्गुरू पाइ ।४।

अभंग : ७३

दश इंद्रिये मन नावरे सर्वथा : स्वहीताची वार्ता बोलो नये ।१।
विकल्प विकार कल्पना हे थोर : तेणे हा ईश्वर दुरावला ।२।
भ्रम आणि भ्रांती पडलीया जीवा : न कळेची ठेवा पूर्वदत्त ।३।
तुजवीण मज कोण आहे आता : गणेशनाथ चिंता विसरला ।४।

अभंग : ७४

भाव आणि भक्ति प्रेम दे गा देवा : घडो संतसेवा जन्मोजन्मी ।१।
माता आणि पिता देव ब्राह्मण पूजन : करीन कीर्तन महाद्वारी ।२।
समता बुध्दि दया घडो सर्व धर्म : गुरूनाथाशि नेम येकनिष्ठ ।३।
ईच्छेचा तु दाता हे दे गा समर्था : गणेशनाथ चित्ता समाधान ।४।

अभंग : ७५

धन वित्त माया न लगे मज काही : ठाव तुझे पायी देगा देवा ।१।
संसारी परदेशी कोणी नाही आम्हाशी : दुःखाचिया राशी थोर झाल्या ।२।
फार हा संसार पतन आघोर : चौऱ्यांशीचे फेरे किती घ्यावे ।३।
म्हणोनिया तुज येतो काकुलती : राहे माझे चित्ती अखंडित ।४।
अजुन तरी तुज करूणा कैशी न ये : गणेशनाथ पाहे कृपादृष्टी ।५।

अभंग : ७६

प्रपंचाचे सुख बहुत झाले थोर : पडलासे विसर तुझा देवा ।१।
देह अभिमाने विषय आचरणे : तेणे नारायण दुरावला ।२।
काम क्रोध मोह अहंकाराच्या कोटी : तेणे नव्हे भेटी काही केल्या ।३।
पापाचे पर्वत झाले गा बहुत : गणेशनाथ हित तुझे पायी ।४।

अभंग : ७७

मान तेची हान भूषण ते दूषण : साधन ते बंधन सहज होय ।१।
एक ते अनेक सुख तेची दुःख : हरिख तोचि शोक जन्मवरी ।२।
दुर्जे तेचि ओझे प्रीति तेचि लाज : संग तोचि सहज शत्रु जैसा ।३।
निसंग निश्चळ निश्चय निभ्रांत : गणेशनाथ हित तरीच होय ।४।

अभंग : ७८

दुःखाचे शरीर विकल्पे भरले : यावरी घडले देहकर्म ।१।
आयुष्य पळ पळ लेखीतसे काळ : भ्रांतीचे पडळ आणि याशि ।२।
स्त्रिया पुत्र धन शोक दुःख वाया : व्यर्थ जाती काया भक्तीविण ।३।
यालागि शरण आलो होऊनी दीन : गणेशनाथ ध्यान पूर्ण तुझे ।४।

अभंग : ७९

गलित पत्र जैसे त्याला सत्ता नाही : तैसा देह पाही वर्ततसे ।१।
मृत्तिका पाषाण जडत्वे संपूर्ण : चालविता आपण सत्ताधारी ।२।
चंद्र सूर्य तारा करिती येरझारा : सत्ताधारी खरा नारायण ।३।
चित्तवृत्ती सर्व तुझीये सत्तेने : गणेशनाथ दीन काय तेथे ।४।

अभंग : ८०

पिंड आणि ब्रह्मांड तत्वाचे शोधन : नकळे ब्रह्मज्ञान आत्मसुख ।१।
आसन मुद्राध्यान प्राण पंचक मन : कल्पना त्रिगुण मावळती ।२।
नकळे सारासार प्रणवाचा विचार : अध्यात्मक थोर गुह्यज्ञान ।३।
गुरूनाथाचे पायी समता निष्ठा एक : गणेशनाथ सुख ऐशापरी ।४।

अभंग : ८१

कोण जाणे काय संतांचा विचार : स्वयेचि ईश्वर सगुणरूप ।१।
परत्रीचे तारू निरशीती संसारू : निरूपम श्रीगुरु देतो मोक्ष ।२।

भक्ति प्रेम नाम देवोनि तारीती : कैवल्य दाविती स्वये डोळा ।३।
अनन्य शरण भावे लोटांगण : गणेशनाथ दीन उध्दारावे ।४।

अभंग : ८२

सद्‍गुरूची कृपा निरूपम निर्धन : नाममात्रे जन उध्दरीतो ।१।
माता पिता तूची जिवाचा जिवलग : दविलासे मार्ग संतसेवा ।२।
निरसोनिया भ्रांती पदी दिला ठाव : केला असे वाव संसार ।३।
काय उतराइ होउ तुज आता : गणेशनाथ माथा चरणावरी ।४।

अभंग : ८३

ब्रह्मविध झाला सर्वगत भाव : अचलपदी ठाव ऐक्यरूप ।१।
समता झाली दृष्टि विरवित वैराग्य : कैवल्यपदा योग्य सहज होय ।२।
निर्विकल्प पाही निरंजन निर्गुण : मन तेही उन्मन जेथे होय ।३।
स्वय ज्योतीरूप प्रकाश अपार : गणेशनाथ नुरे दुजे जेथे ।४।

अभंग : ८४

काय करू कोठे  स्थिर नव्हे मन : निखळ भक्ति ध्यान न घडे तुझे ।१।
निर्भय निर्विघ्न नाही ऐसा ठाव : सुखे तुझे नाव गाऊ गीती ।२।
मनाचे विकार अनंत अपार : दुःखाचे डोंगर पडती वरी ।३।
अक्षय अविनाश अढळपद देता : गणेशनाथ चिंता नाही कोठे ।४।

अभंग : ८५

या जीवाकारणे करिती नाना यत्न : परि जन्म-मरण न चुकेचि ।१।
दुःखमूळ आघोर पाहाता हे शरीर : जाणोनिया नर न करी हित ।२।
रात्रि दिवस करी संसार सोसणी : न विचारी मनी स्वहितसुख ।३।
ऐशापरी आयुष्य गेले दोन्ही दिवस : गणेशनाथा आस सद्‍गुरूची ।४।

अभंग : ८६

देखताचि मान सुखी होय मन : अपमानी प्राण जाउ सके ।१।
होता सर्व सूख थोर मानी हरिख : पळभरि दुःख सोसवेना ।२।
इंद्रियाची संपत्ती लाभ मानी चित्ती : सोसिता विपत्ती येकलाचि ।३।
दुःख सुख दोन्ही जेथे हारपती : गणेशनाथ प्राप्ति सद्‍गुरु पाइ ।४।

अभंग : ८७

भाव तैसा देव भक्ती जैसी प्राप्ति : विवेक विश्रांती जैसी तया ।१।
जुगतीविण जोग ज्ञानेविण वैराग्य : संचिताविण संग कैसा होय ।२।
प्रेमेविण प्रिती विरक्तीविण मुक्ती : निर्धारेविण गति कैशी होय ।३।
सद्‍गुरूविण सत्य प्राप्ती कैशी होय : गणेशनाथ पाहे पूर्ण कृपा ।४।

अभंग : ८८

सत्य भाव मनी बोबड्या वचनी : नाचतो सांडोनि सर्व लाज ।१।
उभे रोमांचित पसरोनि बाहे : हरिखे गुण गाय राघवाचे ।२।
विदेही विश्वास कीर्तनी निजध्यास : सांडोनिया आस सर्वस्वाची ।३।
देवावीण आम्हा नाठवे सर्वथा : गणेशनाथ आता थोर भाग्य ।४।

अभंग : ८९

सन्मार्गे चालता भय नाही आता : दु:खाची ते वार्ता बोलो नये ।१।
सर्व सुख माया विरोनिया जाय : येकायेकी पाहे जीवनमुक्ति ।२।
चित्तवृत्ति मन निग्रह निव्रति : तरिच होय प्राप्ति ब्रह्मसुख ।३।
सद्‌गुरू करुणाकर जरी होय उदार : गणेशनाथ पार तरिच पावे ।४।

अभंग : ९०

अमृत संजीवनी रिध्दी सिध्दी दासी : तो जाला आम्हासि मायबाप ।१।
कल्पतरूचे वन कामधेनू मन : चिंतामणी पूर्ण सर्वसूख ।२।
सकळही संसार ब्रह्मा विष्णू रुद्र : ध्याती निरंतर नाम ज्याचे ।३।
त्याशी आम्ही पूर्ण केला असे नेम : गणेशनाथ नाम ऐक्य जेथे ।४।

अभंग : ९१

पूर्व भाग्य माझे सत्य फळा आले : तरि चित्त वोळले तुझे पाइ ।१।
नाशिवंत संसार जाला भूमीभार : दु:खाचे डोंगर चुकविले ।२।
माया मोह जाळे तोडीले सकळ : दाता तो कृपाळ उपमा नाही ।३।
सिंधु सागरी विरोनिया जाय : तैसे जाले पाहे गणेशनाथा ।४।

अभंग : ९२

शास्त्रे आणि पुराणे सांगती ते खूण : भाव भक्तीविण मोक्ष नाही ।१।
संत साधु भक्त गेले ज्या पंथे : तेची हो निश्चीत करणे आम्हा ।२।
अनन्य शरण दया धर्म सार : हा सुगम विचार सर्वत्राशि ।३।
काया वाचे मने जरि वेचे सद्‌भावी : गणेशनाथ जीवी समाधान ।४।

अभंग : ९३

देवकृपा जेव्हा होतसे वांकडी : दु:खाचिया कोडी प्राप्त होती ।१।
दासाचा कळवळा तूज नाही गोपाळा : मरण बरवे डोळा देखवेना ।२।
काय करू देह आयुष्य न सरे : संचित अनिवार न ढळेचि ।३।
प्राण तुजवरि देववेना मज : गणेशनाथ सहज सत्वहीन ।४।

अभंग : ९४

अंतकाळी मज तारीशी भरवसा : म्हणोनिया आशा थोर केली ।१।
थोराथोरा भक्ता पावला संकटी । विश्वास हा पोटी धरिला भाव ।२।
अंध पांगुळ पाहता मोकलीना माता : तु जनिता सर्वांचा की ।३।

बेईमाना भाक दिसशील हीन : गणेशनाथ दीन म्हणोनिया ।४।

अभंग : ९५

अनाथाचा नाथ पतीताला तारी : बिरदे तयावरि शरण न ये ।१।
च्यारि सहा आठरा बोलताति सर्व : शरणागता देव मोकलीना ।२।
द्रौपदी प्रल्हाद पांडव रुक्मांगद : अपार गोविंदे तारियेले ।३।
तो आम्ही निर्धार चित्ती धरिला थोर : गणेशनाथ धीर जन्मावरी ।४।

अभंग : ९६

दृष्टीशी अंधार जालासे बधीर : तरी माझा विसर पडला देवा ।१।
कोठे भक्ति भावा भुललाशि देवा : नायकशी धावा पतीताचा ।२।
एकाएकी कैसा झालाशि निष्ठूर : देखोनिया थोर पापराशी ।३।
बेइमाना भाक सांभाळी पहिली : गणेशनाथ केली साटी जिवे ।४।

अभंग : ९७

नरदेही साधन समता भावभक्ति : निजध्यास आणि प्राप्ति संतसेवा ।१।
प्रेम शांती दया शरण निर्धारेशि : विरक्त उदासी सर्वकाळ ।२।
काया वाचा मन निवेदुनि प्राणे : गुह्यज्ञान पूर्ण सर्वसाक्षी ।३।
गुरूपदी निष्कळ परब्रह्म पाहे : गणेशनाथ राहे ऐक्यरूपे ।४।

अभंग : ९८

सुख दु:ख दोन्ही देहाच्या संगती : ने चूकेची अंती काही केल्या ।१।
जरा मरण व्याधि शोक मोह दु:ख : संबंधी हे देख शरीराचे ।२।
शरीराचे संगे भय चिंता रोग : यावरी उपसर्ग कामक्रोध ।३।
पापा नाही पार दोषाचे गिरिवर : गणेशनाथ भार तुझे दारी ।४।

अभंग : ९९

कोण सुख आहे नरदेही आसता : अग्नि शेजे पाहाता निद्रा कैची ।१।
विषय विख आहार व्याघ्राचा शेजार : विंचा विवरी नर सुखी कैचा ।२।
सागर परिक्षार सूर्य परि उग्र : गोड परि संसार थोर दु:ख ।३।
गणेशनाथ म्हणे मोकलीले देवे : न पडेचि ठावे वर्म काही ।४।

अभंग : १००

तैशा झाल्या देवा दु:खाचिया राशी : बरव्या वनवासी केल्या पिडा ।१।
बरे झाले हित मोडियेला ठाव : बरे रूप नाव हारविले ।२।
सर्वापरी मज केलेसे उदास : सांडविली आस लोकिकाची ।३।
तीर्थ व्रते जाली देहाशी दंडणा : गणेशनाथ मना समाधान ।४।

अभंग : १०१

प्राचिनासारिखे वर्ततासे देह : राहिले उपाय साधनाचे ।१।

जन्मो जन्मीचे जैसे ज्या सुकृत : तैसे होय प्राप्त फळ तया ।२।
नश्वर हा देह पुण्य कोठे आहे : विचारिता न ये निश्चयाशी ।३।
कोण जाणे काय देव कैसा आहे : गणेशनाथा सोय सद्‌गुरूची ।४।

अभंग : १०२

न सुटेचि कैंव्हा देहाचा अभिमान : वेचोनिया जीणे नरका जाती ।१।
मोलाचे आयुष्य प्राप्तीचा नरदेह : व्यर्थ जातो पाहे भजनेविण ।२।
मी कोण आपण नेणती हे खूण : स्त्रिया पुत्र धन म्हणे माझे ।३।
या दु:खापासून करी सोडवण : गणेशनाथ दीन म्हणोनिया ।४।

अभंग : १०३

नेत्राशि दाखवी जिव्हेशि चाखवी : जिवाशि जिववी जीवेपणे ।१।
पायाशि चालवी हाताशि हालवी : वैखरी बोलवी नानापरि ।२।
मेरूहूनि अढळ पवनाहुनि चपळ : खेळोनिया खेळ वेगळा तो ।३।
अरूप अविनाश अलक्ष निर्गुण : गणेशनाथ दीन काय जाणे ।४।

अभंग : १०४

दुजियाचा संग नको देवा आता : नयनी हरले पाहता सामावेना ।१।
मंथोनि नवनित झाले असे घृत : सर्वाशि अलिप्त जयापरि ।२।
बुध्दीशि न कळे मनाशि नातळे : ध्यानाशि वेगळे अलक्षपणे ।३।
निरशुन्य निरंजन नाव रूपातीत : ऐसे गणेशनाथ काय जाणे ।४।

अभंग : १०५

आदीचा येकला अंतिही येकला : नाही परि भूलला मायाजाळी ।१।
येकही अनेक अनेकाचा येक : येकापरते सुख अणिक नाही ।२।
अवघ्या पृथ्वीस जैसा सूर्य एक : तैसा आत्मा देख देहामाजि ।३।
येकायेकी येक येकनिष्ठ मन : गणेशनाथ ध्यान येकविध ।४।

अभंग : १०६

मनास ही सत्ता तुझी सर्व देवा : माझा कोण केवा जाळु याशि ।१।
काय करू आता न चालेचि कांही : पडलो तुझे पाइ अंध जैसा ।२।
अनंत जन्माचा पतित पापराशी : जालो मी भूमीशि थोर भार ।३।
यालागि शरण सर्वभावे तूज : गणेशनाथ गुज राखे आता ।४।

अभंग : १०७

लाविले सन्मार्गी ठाव दिला पाइ : पुढती जन्म नाही ऐसे केले ।१।
आपणाहूनि मन जाउ नेदी कोठे : जरि जाले मोटे हरिहर ।२।
जाळुनि सर्व भ्रांती एकनिष्ठ केले : कैवल्य दाविले याचि डोळा ।३।
आता उतराई होउ तुज काइ : गणेशनाथ पाही पद रज ।४।

अभंग : १०८

अनेका परीची करिता साधने : परि हा अभिमान न ढळेची ।१।
दान धर्म पुण्य याग कुळाचार : परि नव्हे साचार समबुध्दी ।२।
तीर्थे व्रते जप तपाचिया कोटी : भावेविन भेटी कैशी होय ।३।
गणेशनाथ म्हणे भक्ति नाही केली : परि करूणा आली सद्‌गुरूला ।४।

अभंग : १०९

शोक करूनि काय तुजला करुणा न ये : होणार ते होय सहजगती ।१।
सहजची संपत्ती सहजची विपत्ती : सहज होत जाती जन्म मरणे ।२।
सहजाचा हा खेळ जालासे सकळ : सहज माया मूळ कैचे येथे ।३।
सहज सद्‌गुरूनाथ झाला कृपावंत : गणेशनाथ हित सहज जाले ।४।

अभंग : ११०

उन्मळे चित्त प्रेम दाटे डोळा : हृदइ जिव्हाळा मुखी नाम ।१।
उभे रोमांचित नेत्री अश्रूपात : कंठ सद्‌गदीत आठविता ।२।
गाता आणि नाचता डोले छंदे टाळी : कीर्तन समेळी गोपाळाच्या ।३।
गरूडध्वज पताका मृदंग आणि टाळ : वैष्णव सकळ भक्तिसुख ।४।
करिती जयजयकार देव तेत्तिस कोटी : विमानाच्या दाटी पाहावया ।५।
पुष्पाचा वर्षाव करिती नामघोष : यानी सर्व वास लाजविला ।६।
गणेशनाथ म्हणे सत्य भक्तिभावे : बांधला हा देव जाउ नेदु ।७।

अभंग : १११

पाहु नको आता वाट अनिकाची : करी तु जीवाची सोडवण ।१।
नाना रंग संग सांडी लोकीकाचा : सोयरा जीवाचा पाहे वेगी ।२।
त्रिविध हे जन त्रिविध बोलणे : स्वहित होय जेणे तेचि करि ।३।
प्राप्तीचा नरदेह स्वये भेटे देव : गणेशनाथ भाव तैसा धरि ।४।

अभंग : ११२

दु:खाचे डोंगर पडती अंगावर : तरि हा निर्धार सोडू नये ।१।
घालिता कर्वती भेऊ नये चित्ति : करावे निश्चिती देवकाज ।२।
संकल्पिला देह संसारी वेचु नये : ऐसे सत्य आहे परमार्थीका ।३।
हे निरार्थक जावे देवकाजी वेचावे : गणेशनाथ भावे सहजार्पण ।४।

अभंग : ११३

द्रौपदीचे लाजे वस्त्राचे डोंगर : धाले ऋषीश्वर भाजी पाने ।१।
काढिले उच्छिष्ट राखले विवरी : निजभक्ताचे करी सर्वही काज ।२।
यावरि सारथी अर्जुनाचा जाला : अहंकारी मारिला दुर्योधन ।३।
अश्वमेध याग सिध्दी पावविला : धर्म सोडविला पुरोहित ।४।

सूर्य नारायणा दिवसा लोपविले : मारूती जिंकले रथासाटी ।५।
हनुमंताशि भेटी शीघ्र जाला देव : जाला राम सीता लक्ष्मण ।६।
तैसा नारायण नाम कीर्तीसाटी : गणेशनाथ भेटी रोकडीची ।७।

अभंग : ११४

येकाची ते इच्छा गायत्री पुजावी : येकानी मारावी समूळेशी ।१।
येकाची ते इच्छा शिवाल्ये घडावी : येकानी पाडावी समूळेशी ।२।
येकाची ते इच्छा अपुले सर्व द्यावे : येकाने ते घ्यावे दुसऱ्याचे।३।
ऐसे त्याशी कैंव्हा देवे सांगितले : गणेशनाथ केले स्वभावे ते ।४।

अभंग : ११५

बहुत सायाशि आलो या जन्माशी : भेटी सद्गुरूशि थोर भाग्य ।१।
नरदेहाकारणे बहुत केले पुण्य : होते दर्शन म्हणोनिया । २।
सम सद्गुरू भक्ति घडे संतसेवा : तरिच होय जीवा उध्दरण ।३।
गणेशनाथ म्हणे ऐसे न करीता : स्वहिताची वार्ता बोलो नये ।४।

अभंग : ११६

जव जव देखे मान तव तव भुले मन : तेचि त्या बंधन होय अंती ।१।
देही सर्व सूख जव लागे गोड : तया नाही चाड निजमोक्षाची ।२।
संसाराचा वारा लागता शरीरा : तेणे होय फेरा चौऱ्यांशिचा ।३।
गणेशनाथ करी या वेगळे : मज नाही बळ येकही अंगी ।४।

अभंग : ११७

नको देवा आता दुजियाची संगती : जेणे दु:खप्राप्ति गर्भवास ।१।
मनाचे विकार अनंत अपार : न चुके येरझार पुनरावृत्ती ।२।
चुकवी जन्मदु:ख सद्गुरू तो येक : पाहातांचि सुख जाले थोर ।३।
गणेशनाथ म्हणे सद्गुरू उदारा : पुनरपी संसारा नको घालु ।४।

अभंग : ११८

माया भ्रम भुली जिवाशी पडली : मग सोय सांडिली मुळीची ते ।१।
जववरि सुख आहे तववरि भुलला राहे : अंत:काळी काये करिल देव ।२।
सम परोपकारी सद्भाव शरिरी : तो न ये संसारी परतोनिया ।३।
गणेशनाथ म्हणे भावे करिता ध्यान : जन्म दु:खापासून सोडविल ।४।

अभंग : ११९

नरदेहा येऊन भावभक्ति हीन : उदकात आसुन कोरडे ते ।१।
सद्भाव आणि भक्ति न करी सेवावृत्ति : जाणे अधोगती म्हणोनिया ।२।
नावडे कीर्तन संतसंग सारा : तयाशि आघोर कुंभीपाक ।३।
गणेशनाथ म्हणे ऐसे अनाचारि : जाले भूमीवरी थोर भार ।४।

अभंग : १२०

आशा या संसारी कोणाची नसावी : जीवनमुक्ति पाहावी कैशी डोळा ।१।
देहीच्या सुखाला गोउ नये मन : ब्रह्मसुख पूर्ण पाहणे ज्याशि ।२।
निरंजन सुख पाहे सदाकाळ : तो होय अढळ ध्रुव जैसा ।३।
गणेशनाथ म्हणे करावे साधन : चुके जन्ममरण ऐसे काही । ४।

अभंग : १२१

विषधरा जैसे पाजिले अमृत : उन्मत्ताशि प्राप्त ब्रह्म कैचे ।१।
वृंदावना कैची गोड मधुरता : पिशियाशि सत्कथा कार्य करि ।२।
पाषाणा श्रृंगार मेघ खडकावर : खरावरि भार चंदनाचा ।३।
गणेशनाथ म्हणे तैसा प्रेमभाव : संचिताविण वाव संग नोहे ।४।

अभंग : १२२

कागाशि न कळे संत आणि सज्जन : विष्टेवरि मन सदाकाळ ।१।
निंदकाचे चित्त सदा निंदेवरी : रात्रि दिवस करी श्वान जैसे ।२।
अखंड चावटी करी तोंडपिठी : स्वहिताची गोष्टी नायकेचे ।३।
गणेशनाथ म्हणे ऐशीया उपाये : न चालचि पाहे कल्पवरी ।४।

अभंग : १२३

साही दर्शनाचा पाहु जाता अंत : तरि नव्हे प्राप्त ब्रह्मसुख ।१।
च्याऱ्ही वेद शास्त्रे पुराण अभ्यास : परि नाही विश्वास येके ठाइ ।२।
विकल्पिया नाही धैर्य आणि निर्धार : त्याची वेरझार कैशी चुके ।३।
गणेशनाथ म्हणे सद्‌गुरूची भक्ति : केलिया पावती ब्रह्मसुख ।४।

अभंग : १२४

मनाचे मंथन करी नारायण : अनिकही प्रयत्न न चले काही ।१।
जीवाचे ते बळ न चालेचि काही : नाशिवंत देह ठाइचेचि ।२।
कृपाळु होवोनि जरि तु उध्दरीशि : तरिच आलियाशि सुफळ जीणे ।३।
गणेशनाथ म्हणे नाही मज बळ : देवा तु कृपाळ म्हणोनिया ।४।

अभंग : १२५

तुझी बिरूदावळी तिन्ही लोका आगळी : नाम घेता जाळी सर्वही दोष ।१।
हरिखे नाम घेता हरे सर्व चिंता : मुक्ति सायुज्यता प्राप्त होय ।२।
करिता नाम कीर्ति हृदइ दाटे मूर्ति : पावन त्रिजगती तेणे होय ।३।
गणेशनाथ म्हणे ऐसा तु समर्थ : आपुले पद देतो निजभक्ताशि ।४।

अभंग : १२६

सम सर्वभाव पाहे येक देव : समाधीचा ठाव तोची होय ।१।
चतुष्ट्य साधान योगाची धारणा : तोचि योगी जाणा योग साधी ।२।

वसुधा जैसी स्थिर न करी काही मात : तैसे हे बा संत उपमा नाही ।३।
गणेशनाथ म्हणे नाही दुजेपण : ऐक्यरूप पाहणे मुक्त सदा ।४।

अभंग : १२७

अनंत जन्मवरि केली जन्म साटी : मनुष्य जन्मी भेटी सद्गुरूची ।१।
जप तप व्रते तीर्थ क्षेत्रे बहुते : यज्ञ अवघे ते दानकर्म ।२।
साधने अभ्यास मंत्र यंत्र ध्यास : तुजसाटी क्लेश बहुत केले ।३।
भक्ति आणि वैराग्य ज्ञान ध्यान सांग : अनुतापे अनुरागे भजन केले ।४।
गणेशनाथ म्हणे गुरूनाथा उदारा : तु आम्हा सोयरा जोडलासी ।५।

अभंग : १२८

थिल्लर काय जाणे सागराचा अंत : मुंगीशि अग्नीत रीघ कैचा ।१।
श्वान काय जाणे मेरुचे प्रमाण : कोसल्याशि गगन न कळे जीवी ।२।
अंध काय जाणे कैसा तो दिनमान : पाषाणा पर्जन्य न कळे जीवी ।३।
देहवंत जीव काय जाणति देव : गणेशनाथ नाव काय तेथे ।४।

अभंग : १२९

आलिया संसारी देखिली पंढरी : कीर्ति माहाद्वारि वानु तुझी ।१।
पताकांचे भार नामाचा गजर : देखिल्या संसार सुफळ झाला ।२।
साधु आणि संतांच्या धन्य झाल्या भेटी : सापडली लूटी निजमोक्षाची ।३।
गणेशनाथ म्हणे धन्य पंढरिनाथा : क्षणभरी परता जाउ नको ।४।

अभंग : १३०

नश्वर देहाचा धरोनि भरवसा : विसरले कैसा नारायण ।१।
पुत्र कलत्र धन विषयावरी मन : तेणे जन्म घेणे नाना योनी ।२।
ऐशेपरी जीव भुले बहू सुखा : पावताति दु:खा जन्मवरी ।३।
निमिषभरी तुझा न पडावा विसर : गणेशनाथ थोर लाभ झाला ।४।

अभंग : १३१

मरणाचा विसर पडलासे थोर : सर्वही संसार म्हणती माझा ।१।
देव तीर्थ ध्यान न करीत कदा : रात्रि दिवस धंदा प्रपंचाचा ।२।
क्षणभरि जीवा नाहीची विसावा : नाठविती देवा कोणेकाळी ।३।
याकारणे शरण आलो सद्गुरूनाथा : गणेशनाथ पंथा पाववीशी ।४।

अभंग : १३२

बाळपण गेले खेळताचि वाया : तरूणपणी माया लावियली ।१।
स्त्रिया पुत्र धन सुखावरि मन : नाठवे साधन स्वहिताचे ।२।
वृद्धपणी पडे शोक मोह चिंता : मनुष्य जन्म व्यर्थ गमविला ।३।
गणेशनाथ म्हणे येवोनि जन्माशि : करी पूर्वजाशि उधरण ।४।

अभंग : १३३

व्यापियले चित्त नाठवेचि काही : दाही दिशा पाही अवघा देव ।१।

पडली प्रेमभूलि शुध्दी बुध्दी गेली : सोय ती सांडिली सज्जनाची ।२।

न बोले कोणाशी लेखीना सर्वथा : रातले गुरूनाथा चित्त माझे ।३।

गणेशनाथ काही अबोल न बोले : म्हणे आम्ही जालो देवपिसे ।४।

अभंग : १३४

जालिया आतित क्रोध नाही गेला : तेणे गमविला नरदेह ।१।

सांडोनि संसार सकळाहुनि विरहित : ठेउ नये चित्त जनावरि ।२।

सर्वही साधन ओळखावे दर्शन : तया नाव जाण पूर्ण योगी ।३।

गणेशनाथ म्हणे सर्व पाहे एक : त्याहुनिया सुख अनिक नाही ।४।

अभंग : १३५

सर्व आत्मा येक ऐसा धरिता भाव : संसार हा वाव सहज होये ।१।

कळोनि जयाने केला अंधकार : जाला भूमीभार तोचि येक ।२।

सर्वही देवाचा न कळे विचार : वैराग्य ना घर जाले त्यासि ।३।

गणेशनाथ म्हणे आत्मा कळे ज्यासि : आपुल्या जीवासि समाधान ।४।

अभंग : १३६

काही साधकांचि करिता नये निंदा : करावे ते सदा दंडवत ।१।

काही त्या संतासि सांगो नये वाद : रिता जाय बोध आत्मत्वाचा ।२।

न करावे ते कदा योगियांसि बळ : केलिया समूळ नर्का जाणे ।३।

गणेशनाथ म्हणे करावे वंदन : पाहु नये गुण दोष तयांचा ।४।

अभंग : १३७

माझिया मनाचा नकळे मज अंत : काय सांगो मात अनिकांचि ।१।

शुध्द नाही मन काय करू साधन : कैसे उध्दरण करिसी देवा ।२।

पातकाच्या रासी आलो मी जन्मासी : कैसे उध्दरिसी सद्गुरूनाथा ।३।

अगणित माझ्या दोषा नाही गणणा : भार नारायणा जालो तुज ।४।

गणेशनाथ म्हणे यैसा मी पातकी : कीर्ति तिन्ही लोकि करिन तुझी ।५।

अभंग : १३८

बहुत आहे दोषी आलो तुजपासी : देवा तु तारिसि म्हणोनिया ।१।

माझीया पातका भुमिका डळमळली : देवा त्वाही केली सांडी कैसी ।२।

बहुत भरवसा केला आहे तुझा : मुळीचा तु माझा मायबाप ।३।

गणेशनाथ म्हणे आता मज तारि : पडलो आधारी तुझ्या देवा ।४।

अभंग : १३९

माझेविशी देवा तुजला कळवळा : भाव माझा भोळा न कळे काही ।१।

भावभक्तिविण न कळे तुझे ध्यान : पतित पावन तुचि येक ।२।
तुजविण देवा उध्दरिना कोन्ही : जालो तुझा रूणी जन्मोजन्मी ।३।
गणेशनाथ म्हणे सर्व तूज वाहिले : नाही ते देखिले तुजविणे ।४।

अभंग : १४०

करावे साधन नैश्‍वर्य हा देहे : साचार ते काय आहे येथे ।१।
येक वेळे अंत पृथ्वीचा कळे : संचित सबळ न कळे कदा ।२।
काय ते साचार आहे तिन्ही लोकी : पाहता होती सुखी सर्व जिव ।३।
गणेशनाथ म्हणे कोण्हेही विचारे : साराचेही सार तेचि करी ।४।

अभंग : १४१

चुकवि जन्मदु:ख ऐसा कोण थोर : न कळे विचार कोणे काळी ।१।
जे ब्रह्मलिखीत चुकवि कोण येथ : आगळि ते मात देवाहुनि ।२।
कोण चुकविल कर्माचे बंधन : यालागी ते पुण्य शुध्द करा ।३।
कोण सोडविल काळाचे हातिचे : निवारिल साचे जन्मदु:ख ।४।
गणेशनाथ म्हणे सद्‌गुरूवाचुन : दु:ख निवारण कोण करी ।५।

अभंग : १४२

आसावे संसारी कोन्हाचे पाठिसी : काळ साहे त्यासि न चले सत्ता ।१।
अनन्ये मातेने केला प्रतिपाळ : ते काय सकळ आठविती ।२।
तैसे परि देव विश्‍वाचा तारक । आठवावा देख वेळोवेळा ।३।
गणेशनाथ म्हणे देवा काय केले : काय ते सोसिले या संसारी ।४।

अभंग : १४३

किती या संसारी सोसावि आपदा : आठवण कदा करू नेदी ।१।
पर्वती जरी झाला मेघाचा वर्षाव : तान्हेलिया पाहा न मिळे पाणी ।२।
तैसे देहेबळे राहो किती दिवस : सांडोनिया सोस शरण आलो ।३।
गणेशनाथ म्हणे ऐसे करी काही : आसोनिया देही अलिप्त जैसा ।४।

अभंग : १४४

न पाहवी कदा अनिकांचि वाट : ज्याला घेणे भेट या देवाची ।१।
गोउ नये कदा सुखावरी मन : ज्याला आहे जाणे मोक्षपदा ।२।
मातापिता बंधु सर्वस्वे हे माया : सांडोनि सखया ध्यान करी ।३।
जेणे होय काही दु:ख निवारण : ते करू साधन सत्य आता ।४।
गणेशनाथ म्हणे सुखाचा शेजार : सद्‌गुरू उदार झाला सखा ।५।

अभंग : १४५

आसता संसारी भूलला नाही कदा : त्या नाही आपदा जन्मदु:ख ।१।
चालवितो सदा प्रपंच वेव्हार : देवाचा विसर पडे कदा ।२।

न भूले जनात धर्मावरी चित्त : तोची उध्दरित पुर्वजासी ।३।
गणेशनाथ म्हणे आसता संसारी : सखा केला हरी सत्य त्याने ।४।

अभंग : १४६

आसोनि लोकांत मन ठेवी येकांत : त्याहुनिया संत अनिक नाही ।१।
संतांचे संगती लावोनिया मन : ते जाती घेउन देवलोका ।२।
संत संगतीचा महिमा तो अपार : ज्याचेनि संसार सुफळ होये ।३।
गणेशनाथ म्हणे जन्मासी येऊन : कृपाळू हे पूर्ण झाले संत ।४।

अभंग : १४७

देवे दिल्हे तेही घेउ नये कदा : जाणे ब्रह्मपदा आहे ज्यासी ।१।
संसारीचे सुख देवोनिया गोवि : तैसा तो लाघवि न कळे कोण्हा ।२।
ऐसे मायाजाळी गोविले सकळ : न कळेचि कळ ब्रह्मादिका ।३।
गणेशनाथ म्हणे गोविले का येथे : नाही दुजे जेथे दावि मज ।४।

अभंग : १४८

बहुत ज्ञान ध्यान वानावे ते काये : जेणे सार्थक होये तेचि करू ।१।
वडिलांचि संपत्ती वानावि ते किती : आपणासी गती कोण आहे ।२।
वानु नये कदा अनिकाचे भाग्य : जेणे मोक्ष मार्ग तेचि करू ।३।
गणेशनाथ म्हणे वडिलाचे नाव : जतन करावे येईल कामा ।४।

अभंग : १४९

सागरात केला बाणांचा वर्षाव : विशम तो भाव न धरी कदा ।१।
आकाशाची बहुत केली जरी निंदा : विषाद ते कदा न मानिची ।२।
पृथ्वीसि काही बहुत बोलता : विषाद सर्वथा न धरिची ।३।
गणेशनाथ म्हणे ऐसा धरि धीर : तोचि उतारे पार भवसिंधूचा ।४।

अभंग : १५०

आत्मा स्वत:सिध्द तो असता देही : कल्पना हे काही करू नये ।१।
भीन्न या प्रकृती बहुत झाल्या जरी : आत्म्यासि हारि येईल काये ।२।
अमृताचा बिंदु विखाचे सागरी : तत्पर तो करी आपणा ऐसे ।३।
गणेशनाथ म्हणे सद्‌गुरू तो दाता : क्षण न लागता उध्दारी जीवा ।४।

अभंग : १५१

आलिया संसारी साटविले नाम : सकळही धर्म देव केला ।१।
आमुचे सर्व काही या देवाचे नाव : अनिक आम्हासवे न ये काही ।२।
संचित सिदोरि जीवाचे पदरि : जाताचि शरिरी उभी टाके ।३।
गणेशनाथ म्हणे नामाविण नाही : तारक ते पाही तिन्ही लोकी ।४।

अभंग : १५२

मनुष्यजन्मी आम्हा कळलि हे वार्ता : परी आहे सत्ता या देवाची ।१।
जन्मोजन्मी देवा कळले नाही काही : आचरतो तेही शुध्द पुण्य ।२।
झालीया शेवटी कळली हे गोष्टी : म्हणुनि दिल्ही मिठी तुझ्यापाई ।३।
गणेशनाथ म्हणे चिंता नाही आम्हा : देयी तुझा प्रेमा भक्तिसुख ।४।

अभंग : १५३

सर्वत्र हे जीव पाहाता समता : मनुष्य देही सत्ता कासियाची ।१।
सर्व देही पाहता येकचि जिव्हाळा : नरदेह आगळा कैसा होये ।२।
ऐसा हा नरदेहे कैसीयाने सार : जरी करि विचार निज मोक्षाचा ।३।
गणेशनाथ म्हणे सद्गुरू समर्था : तुज आहे चिंता सर्वस्वाचि ।४।

अभंग : १५४

चित्रिची बाहुलि काय ते बोलति : तैसीचि हे गति ओ प्राण्या ।१।
बुद्धिबळाचा खेळ कोण जिती हार : तैसा हा संसार आहे आता ।२।
बहुरूपी तो वेश धरिता अनेक : पाहाता तो एक दुसरा नाही ।३।
गणेशनाथ म्हणे सर्व तुझी सत्ता : मज नाही चिंता काशियाची ।४।

अभंग : १५५

थोर आहे याति न करी समभक्ति : त्यासी पुनरावृत्ति न चुके अंति ।१।
ज्ञानाचा आभिमान आसता संपूर्ण : न चुके जन्ममरण काही केल्या ।२।
जाणोनिया निंदा संताची करिता : तरी अधपाता जाणे होये ।३।
या कारणे सर्वा करावे वंदन : गणेशनाथ पुण्य बोलताहे ।४।

अभंग : १५६

ज्याला दिल्हे देवे तेणे सुखे घ्यावे : अनिकानि करावे काय त्याचे ।१।
अनिकाच्या भाग्याचा करू नये हेवा : येकाभावे देवा आठवावे ।२।
कोणासी ते देवे दैवे नाही दिल्हे : विघ्न त्यासि केले सत्वहिन ।३।
गणेशनाथ म्हणे दिल्हे घेउ नये : तोचि योगी पाहे निष्कळंक ।४।

अभंग : १५७

योग्याने दुसऱ्याची न करावी संगती : जाता निजपंथी विलंब नाही ।१।
साधूने अनिकाची पाहु नये वाट : येकायेकि धीट होउनि जावे ।२।
साधूने कोण्हाचा न धरावा आधार : सर्व टाकी भार देवावरी ।३।
गणेशनाथ म्हणे सद्गुरूनाथ दाता : नाही मज चिंता कासीयाचि ।४।

अभंग : १५८

जन आणि विजन क्षणामाजि जाती : यालागी संगती केला देव ।१।
जाईल पवन पाणी न राहती येथे कोन्ही : यालागी मिळणी मिळो तुझ्या ।२।
गेले थोर थोर देवर्षि किन्नर : मानवी किंकर काय येथे ।३।

गणेशनाथ म्हणे नाही आम्हा राहाणे : परि साधु साधन देवलोक ।४।

अभंग : १५९

हस्ति आणि व्याघ्र जाणति ते सुख : परपिडेचे दु:ख न कळे त्यासी ।१।
पराव्याचि निंदा हे थोर आपदा : सुटाका नाही कदा नरक कुंडी ।२।
ज्याचे पाप पुण्य तो भोगी पतन : आपुले का मन बाटवावे ।३।
आधि जीवि पाहावे आपुले कर्म धर्म : गणेशनाथ वर्म तुझे पाई ।४।

अभंग : १६०

म्हणविता साधु न करिता साधान : तेणे व्यर्थ जीणे गमाविले ।१।
म्हणविता संत शांत नाही चित्त : त्याचे जाणा व्यर्थ सर्व काही ।२।
म्हणविता सिद्ध नाही ब्रह्मबोध : ते जाणा उपाध सर्वकाही ।३।
गणेशनाथ म्हणे निर्विकल्प होय : तोचि योगी राहे सदा सुखी ।४।

अभंग : १६१

कोण्हे काळी पाहता शुद्ध नाही मन : देव म्हणोनिया पाषाण पूजताती ।१।
ज्यासी नाही लक्ष त्यासी नाही साक्ष : देव म्हणुनि वृक्ष पूजताति ।२।
कोणे काळी पुण्याची जोड : पूजिताती हाडे मनुष्याची ।३।
गणेशनाथ म्हणे नाना रिती ध्यान : गुरु भक्ती वाचून साध्य नाही ।४।

अभंग : १६२

जाणे शुद्ध वर्म शुद्ध तो वैष्णव : नाही वैरभाव कदाकाळी ।१।
सम ज्याचा भाव तो जाणावा स्मार्त : नाहीतरी दंभयुक्त मतवादी ।२।
संपूर्ण विर्कि जाणे ब्रह्मसुख : तोचि पुराणिक उध्दरी जीवा ।३।
गणेशनाथ म्हणे ऐसे जे असती : तेचि उतरती पैलपार ।४।

अभंग : १६३

मृत्तिकेचा देह अंती माती होय : साधन ते काय सत्य त्याचे ।१।
देह नाशिवंत सांगती समस्त : कासियाचे हित करील प्राणी ।२।
काम क्रोध दंभ अहंकार अभिमान : काय ते साधन तयापुढे ।३।
गणेशनाथ म्हणे देहे काय साचे : करिल जन्माचे उध्दरण ।४।

अभंग : १६४

जन्म आणि मरण करिते हे कोण : कोण्हासि बंधन कोणे ठाई ।१।
कोणे ठाई आहे दु:ख आणि सुख : कोण्ही केले देख कोणासाठी ।२।
कोणे ठाई आहे देव आणि भक्त : कोण उध्दरित कासियासी ।३।
गणेशनाथ म्हणे नैश्वर आकार : तेथे निराकार कोण सांगे ।४।

अभंग : १६५

किंवा दयावा प्राण लावावा गळफास : तेव्हा या देवास येईल कळु ।१।

प्राण तो शोकावा नाना दुःखजिवा : वनवास का घ्यावा जन्मावरी ।२।
शिर उतरावे आपुलिया हाते : तेव्हा म्हणसि भक्त सत्य माझा ।३।
गणेशनाथ म्हणे हे आता उरले : येथोनिया झाले मनुष्य जन्म ।४।

अभंग : १६६

जैसा जन्म झाला तो तुझ वाहीला : करुणा या देवाला कैसी न ये ।१।
या जन्मापासोनि केले तुझे ध्यान : प्रपंची आपण झालो नाही ।२।
देखीले कि देवा दुःखाचे डोंगर : कोठवरि धीर धरू देवा ।३।
गणेशनाथ म्हणे बहुत दिवस झाले : नेत्रहे सीणले वाट पाहाता ।४।

अभंग : १६७

दुर्लभ हा नरदेहे होउनिया काये : येके वेळे पाहे कृपादृष्टी ।१।
तुझिया चरणाची थोर केली आस : करिया जीवास उद्धरण ।२।
पळपळ आयुष्य गेले रात्रदिवस : मात या देवास कोण सांगे ।३।
गणेशनाथ म्हणे तुज सांगो किती आता : जन्मासि मागुता नको घालु ।४।

अभंग : १६८

केंव्हा आता देह होईल विसर्जन : किंवा समाधान नाम घेता ।१।
व्यर्थ झाला देह करावे ते काय : न कळेचि सोय ब्रह्मसुख ।२।
भूमीभार झालो न भेटता देव : कैसा तो निर्वाही होईल अंती ।३।
गणेशनाथ म्हणे सोसिता आपदा : करुणा गोविंदा येईल तुझी ।४।

अभंग : १६९

जिवाचा सज्जन आहे येथे कोण : गोउ नये मन कदा काळी ।१।
जयासाठी पाहे गोवियेले मन : ते गेले सोडून अंतकाळी ।२।
नाशिवंतासाठी लागो नये पाठी : ज्याला घेणे भेटी या देवाची ।३।
नाशिवंत देह जाणोनि आपण : व्हावे सावधान भजनयुक्त ।४।
गणेशनाथ म्हणे जाईल नरदेहे : म्हणोनिया पाहे भक्तिसुख ।५।

अभंग : १७०

वृक्ष आणि पर्वत तेही जाती अंती : आम्ही तुम्ही किती आहो येथे ।१।
जाती सर्व लोक गेले ब्रह्मादिक : काय करूनि शोक संसाराचा ।२।
आपण आधी जाती सर्वही अवयव : देवाचा तो देव उरला अंती ।३।
गणेशनाथ म्हणे बोलावे ते काय : आम्हा ही आहे जाणे अंती ।४।

अभंग : १७१

अधिरा माझ्या मना सांडी सर्व चिंता : गुरुनाथ असता शिरावरी ।१।
भिऊ आता कोण्हा संसारी आसता : देवाविन सत्ता आहे कोण्हा ।२।
तुझीये सत्तेने सर्वकाही होये : म्हणोनिया नये चिंता करू ।३।

एकदा मरावे ऐसे आहे ठावे : गणेशनाथ जिवे सांडी करी ।४।

अभंग : १७२

या जीवाकारणे साधिती साधने : अंती येणे जाणे न चुकेचि ।१।
देहाचे संगती सुख दुःख प्राप्ती : नव्हेचि विश्रांती कोणेकाळी ।२।
शोक मोह चिंता याती कुळ धर्म : ऐसा करिता श्रम आयुष्य गेले ।३।
गणेशनाथ म्हणे ऐसा गेला काळ : या जन्माचे मूळ कैसे पाहू ।४।

अभंग : १७३

तुजविणे देवा आम्हा कोण आहे : कृपादृष्टी पाहे मायबापा ।१।
पाहता तिन्ही लोक तुझा तूची एक : नाही जन्मदुःख ऐसे केले ।२।
मनासी वळावे प्रेमदान द्यावे : एकदा उध्दरावे या दीनासी ।३।
गणेशनाथ म्हणे कृपाळू तू माये : करुणा तुज न ये अजुनी कैसी ।४।

अभंग : १७४

मनासहि सत्ता आहे देवा तुझी : लाज राखे माझी ऐसे काळी ।१।
कनक आणि कामिनी सोडवी या पासोनी : कीर्ति तुझी जनि वर्णिन देवा ।२।
कदा काळी नको मन सुखावरी : तुझ्याणे संसारी आहे देवा ।३।
गणेशनाथ म्हणे तारी कृपावंता : जन्मासी मागुता नको घालु ।४।

अभंग : १७५

ऐसे कैचे बळ मनाला आवरू : कल्पनेला मारू मुळीहुनि ।१।
काम क्रोध जाळु आज्ञा तुझी पाळु : देहाचे निर्मुळ करू आधी ।२।
काय सामर्थ्यता आहे माझे अंगी : गीळु तुजलागी न लगे वेळ ।३।
गणेशनाथ म्हणे ऐसी कोण सत्ता : करू सद्‌गुरूनाथा तुजवरी ।४।

अभंग : १७६

देवा तुझी सत्ता आहे सर्वा ठाई : पदरिचे काही नाही केले ।१।
कर्ता आणि हर्ता तुची गा समर्था : तारी शरणांगता मायबापा ।२।
कमाईचा हिन पडिलो तुझे व्दारी : तुजविण संसारी कोण्ही नाही ।३।
गणेशनाथ म्हणे तुझीया आधीन : केले पाप पुण्य नको पाहु ।४।

अभंग : १७७

भक्ताचे वैभव न जाये सर्वथा : मग काय रघुनाथा ब्रिद तुझे ।१।
मागिलीया संता देव मोकलिता : देवाची ते वार्ता करी ते कोण ।२।
अधिरा माझ्या मना भेउ नको आता : करू आता सत्ता देवावरी ।३।
गणेशनाथ म्हणे ऐसा हा निर्धार : देव आहे साचार मानी जिव ।४।

अभंग : १७८

काय पाहसी मना दुजियाची वाट : होउनिया धिट निर्धार धरी ।१।

अक्षय अढळ ऐसा धरी धीर : मिथ्या हा संसार जाणोनिया ।२।
पृथ्वी सारिखे होवोनी गहन : त्याहीहुनि मन थोर करी ।३।
गणेशनाथ म्हणे ऐसा धरू भाव : समुळी हा देव गिळुनी राहु ।४।

अभंग : १७९

तिन्ही लोकी आता तुची एक दाता : हारपली चिंता सर्व माझी ।१।
नामे आजामेळा उध्दारिला गोपाळा : भक्ताचा कळवळा थोर तुज ।२।
राजा जन्मेजय वाल्या कोळी पाहे : नाम मात्रे जाये देवलोका ।३।
गौतमा कारणे गंगा पाठविलि : शिळा उध्दरिली नाममात्रे ।४।
गणेशानाथ म्हणे तैसे उध्दरावे : ब्रिद ते करावे साच देवा ।५।

अभंग : १८०

संतांचे संगती भोजन पंगती : वचन त्याचे चित्ती ध्यात आसे ।१।
तिर्थाचे वंदन करिता सत् किर्तन : तेणे होय पूर्ण मनोरथ ।२।
सदा त्यांची सेवा करिता चाकरी : जीव पावे थोरी ब्रह्मभाग्य ।३।
गणेशनाथ म्हणे संताचिया नावे : उध्दरिती जीव दर्शन मात्रे ।४।

अभंग : १८१

यातीच्या आचारा भझले सर्व देखा : विसरले सखा येक देव ।१।
देवाकडे कोण्ही न पाहे परतोनी : मिथ्या माया मोहनी पडली वरी ।२।
देहाचा संबंध न सुटे कोण्हासी : म्हणोनी जिवासी आधोगती ।३।
गणेशनाथ म्हणे देहाचा संबंध : तोडोनिया भेद रूप पाहावे ।४।

अभंग : १८२

देहाचा संबंध केव्हा तु तोडिसी : तेव्हा या मनासी समाधान ।१।
केव्हा माझे जिणे होईल विसर्जन : तुटेल बंधन प्रपंचाचे ।२।
जड हा नरदेह किती वागवावा : कृपा करी देवा सोडवणे ।३।
गणेशनाथ म्हणे कैसा हा शेवट : करिसिल वाट पाहतो तुझी ।४।

अभंग : १८३

होउनी संतजन सोन्यावरी मन : नव्हे उध्दरण कोणेकाळी ।१।
करिता वैराग्य स्त्रियासी तो संग : नव्हे तेची अंग साधनाचे ।२।
म्हणविता योगी दंभ करी जगी : नाही त्याचे अंगी पूर्ण दशा ।३।
गणेशनाथ म्हणे येकायेकी मन : होउनि आपण खेळो सुखे ।४।

अभंग : १८४

तुची माता पिता जिवलग संसारी : जन्माचि शिदोरी पाय तुझे ।१।
देवाजीवाचोनी अनिक नाही मनी : हित जनि वनी तुझे पायी ।२।
आवघे देवरूप पाहोनी अंतरी : चढावी पायरी कैलासाची ।३।

गणेशनाथ म्हणे ब्रह्मिचे जे सुख : नाम घेती देख राघवाचे ।४।

अभंग : १८५

तिन्ही लोकी पाहता सुख कोठे आहे : येक वेळ होये भेटी तुझी ।१।
आलिया जन्माचे सुफळ होय तेव्हां : सद्भाव हा जिवा उपजता ।२।
अमृताचे दृष्टी येके वेळे पाहावे : दीना उध्दारावे मायबापा ।३।
गणेशनाथ म्हणे न करी तु उशिर : वाव हा संसार करी देवा ।४।

अभंग : १८६

देवा तुज करणे आहे करी ते लवलाहे : पाहणे मज आहे हेचि देवा ।१।
न करावा उशिर चालिला संसार : जरी होय निर्धार काही येक ।२।
सुवर्णपुटी देता आधिक होय ढाळ : न लगता पळ तैसे करी ।३।
गणेशनाथ म्हणे रणी जैसा सुर : तैसाची निर्धार पाहे आता ।४।

अभंग : १८७

बहुत देवस देवा देखियेले सुख : मग घ्यावे दु:ख कोण माझे ।१।
निर्धार त्वा माझा पाहीयेला नाही : भरवसा तो काई तुझा देवा ।२।
तुझा तुझे काजी वेचवेना देहे : वाचुनिया काय फळ त्याचे ।३।
करवत कर मरी घेउ तुजसाटी : गणेशनाथ आस तेव्हा तुझी ।४।

अभंग : १८८

जाउ दे मीपण जाउ दे हा मान : जळो देह जिणे भलतेपरी ।१।
आधी काय होतो वैभव याती थोर : मा आता किंकर होउ देवा ।२।
देही देसि दु:ख आणि करिसी विपत्ती : सद्भाव हा चित्ती आसो ध्यावा ।३।
फजिती आणि निंदा करिसी या जनि : गणेशनाथ मनि समाधान ।४।

अभंग : १८९

राम कृष्ण हरी मुकुंदा मुरारी : तू आम्हा संसारी जिवलग ।१।
गोपाळ गोविंद नारायण नाम : उच्चारिता जन्म मरण नाही ।२।
केशव माधव विठ्ठल म्हणता : वेळ न लगता तारी जीवा ।३।
गणेशनाथ म्हणे तारक तुझे नाम : जळती कर्माकर्मे उच्चारिता ।४।

अभंग : १९०

अंबऋषी प्रल्हाद उध्दव रुक्मांगद : बळी भिष्म नारद भाई माझे ।१।
व्यास पुंडलिक वामदेव शुक : हणुमंत हे देख भाई माझे ।२।
निवृत्ती सोपान ज्ञानेश्वर चांगया : जिवलग माझीया नामदेवा ।३।
परसा भागवत विसोबा खेचर : मुक्ताई कबीर भाई माझे ।४।
जगमैत्र नागा एका जनार्दन : कृष्णदास जाण भाई माझे ।५।
मिरा रोहिदास आणि गोरा कुंभार : नरहरी सोनार भाई माझे ।६।

सावता सालया अनिक मृत्यंजया : रामानंदा वोव्या गाऊ गीति ।७।
सुदामा श्रीयाळ अनिक मलिकार्जुन : विदुर आपण भाई माझे ।८।
भक्त चोखामेळा जिवाचा जिव्हाळा : अंतरिचा कळवळा सांगे तुम्हा ।९।
सर्व संत महंता केले दंडवत : सेवक गणेशनाथ उध्दरावा ।१०।

अभंग : १९१

गंगा भागिरथी यमुना सरस्वती : स्नाने केल्या जाती सर्व दोष ।१।
व्दारका प्रयाग गया आणि काशी : स्नाने पातकासी ठाव नाही ।२।
नर्मदा गंडकी भीमा हे पुराणी : जीव उध्दरणी केली देवे ।३।
कृष्णा हे कावेरी तुंगभद्रा जानि : स्नाने केल्या प्राणी उध्दरती ।४।
गणेशनाथ म्हणे सद्‌गुरूचे चरणी : तिथे पायवणी मागो येती ।५।

अभंग : १९२

अंजनावाचोनी सापडेना धन : गुरूकृपेविण नये कामा ।१।
प्रेमाचे अंजन शुध्द होये मन : स्वरूप साधन तेणे होये ।२।
मनोमळ फिटे तरिच देव भेटे : जप तप कष्ट वाया जाण ।३।
गणेशनाथ म्हणे झाला बहु सिण : राहीन धरून चरण तुझे ।४।

अभंग : १९३

देह आभिमान नाही मुळीहुन : वैराग्य संपूर्ण याचि नावे ।१।
न मिळेचि कदा कल्पनेचे मेळी : तोची योगी जाळी सर्व ताप ।२।
जिवाची जिवदशा नाही ज्या पुरुषा : सांडोनिया आशा सर्वस्वाची ।३।
गणेशनाथ म्हणे योगीया तो पूर्ण : सबाह्य आपण होऊनी राहे ।४।

अभंग : १९४

जन आणि वन जयासी समान : हेची जाणा चिन्ह योगीयाचे ।१।
जाणोनी सर्वासी न बोले कोण्हासी : तोची पुण्यरासी योगीराज ।२।
सर्वथा कोणाचे दुखविना चित्त : तोची संत मूर्त ईश्वरची ।३।
गणेशनाथ म्हणे काय मी किंकर : संताचा हा पार काय बोलु ।४।

अभंग : १९५

स्वर्ग मृत्यु पाताळ पाहता तिन्ही लोक : येक आहे सुख सर्वाघटी ।१।
येक पाहता देव अनिक दुसरा नाही : भेद भाव तेही सांडिताची ।२।
येकमय सुख प्राप्त जया झाले : तयाचे चुकले जन्मदु:ख ।३।
गणेशनाथ म्हणे येकी येक व्हावे : तरिच ते पाहावे सुख डोळा ।४।

अभंग : १९६

समस्त गोपाळा तु जीवा जिव्हाळा : मिळालासे मेळा आनंदाचा ।१।
नव लक्ष गोधने चारितो आपण : गोपाळ वचन बोलती काई ।२।

बैसोनि गाई कळंबाचे छाई : कृष्णे खेळ काय आरंभिला ।३।
गणेशनाथ म्हणे खेळोनिया खेळ : ब्रह्मादिका न कळे कळ तुझी ।४।

अभंग : १९७

आम्हा हा निर्मळ निश्चळ निर्गुण : तयासि बंधन म्हणता दोष ।१।
विंभाग झाल्यावर देहे हा अमर : चौऱ्याऐंशीचे फेरे कोण भोगी ।२।
आकर्ते शरिर कर्मे कोठे उरे : यालागी साचार पाहे आधी ।३।
गणेशनाथ म्हणे बंधन ते नाही : सद्‌गुरूचे पाई ऐसे झाले ।४।

अभंग : १९८

स्वहित सुखाचा करावा विचार : जेणे होय उध्दार आलियाचा ।१।
आलिया नरदेही स्वहित करू काही : अखंडीत राही चित्ती माझ्या ।२।
मुळी तुज मज आहे तो संबंध : नाही भिन्न भेद कदा काळी ।३।
गणेशनाथ म्हणे भाक ते सांभाळी : तुझ्या चरणाजवळी ठाव द्‌यावा ।४।

अभंग : १९९

नको करू मना शोक आणि चिंता : राहे त्या रघुनाथा आठवोनि ।१।
सदा समाधान स्थिर करी मन : आज्ञा ते प्रमाण श्रीगुरूची ।२।
शोक मोह दु:ख विसरोनी जावे : करिल तेची पाहवे नारायण ।३।
गणेशनाथ म्हणे तुजची आधिन : अनिक साधन न कळे काही ।४।

अभंग : २००

पूर्व संस्कार न कळे तो विचार : करावा निर्धार कोठवरी ।१।
साह्य होय देव तैसाची सद्‌भाव : न कल्पिता पाहा हो प्राप्त होये ।२।
गिरी नखावरी शिळा ते सागरी : तिन्ही लोक उदरी साटवले ।३।
गणेशनाथ म्हणे कर्ता तु आपण : वायाविण शिण करूनि काय ।४।

अभंग : २०१

सुखाचे संगती बहुत जन होती : दु:ख ते निश्चिती न घे कोण्ही ।१।
दु:खाचा तो वाटा मानलासे श्रेष्टा : वैकुंठीच्या वाटा वाहात्या केल्या ।२।
आकारले तितुके आवघे नाशिवंत : मानु नये सत्य काही केल्या ।३।
गणेशनाथ म्हणे सांगावे कोणासी : आपुल्या मनासी समाधान ।४।

अभंग : २०२

पाणी जैसे जाये येक सर्वा वृक्षा : स्वाद त्याचे देखा वेगळाले ।१।
वसुधा दिसे येक परी नाना वर्ण : तैसा नारायण सुत्रधारी ।२।
वृक्ष जैसा एक आनंत ज्याच्या शाखा : तैसाची हा देखाइ लोकत्रई ।३।
गणेशनाथ म्हणे सद्‌गुरू तो येक : निजभाग्य सुख पाविजे ते ।४।

अभंग : २०३

समस्त गुंतले आपुल्या कामा : तेथे कैचा प्रेमा राघवाचा ।१।
सर्वही जानती आपुलाला स्वार्थ : भुलला तो परमार्थ विचारिना ।२।
देहेबळे कैसा झाला से सबळ : थोर मायाजाळे भुलविले ।३।
गणेशनाथ म्हणे लेवोनी अंजन : अवघा नारायण पाहे डोळा ।४।

अभंग : २०४

बोलावे ते काये अवघा सद्‌गुरू पाहे : जन्म मरण जाये स्मरण मात्रे ।१।
सद्‌गुरू कृपाळ तारक तिन्ही लोकी : प्राणी येकायेकी उध्दरती ।२।
देवा तुज वर्णिता समाधान चित्ता : प्रपांचाची वार्ता नाही जेथे ।३।
कर जोडोनी रंक तुज विनवित : गणेशनाथ म्हणे गुण तुझे ।४।

अभंग : २०५

करिता साधन ते होये बंधन : कोणे काळी मन शुध्द नव्हे ।१।
करू जाता तप अभिमानाचे रूप : त्रिविध ते ताप निवती कैसे ।२।
नित्यानित्य करिता विवेक संपूर्ण : तेणे आभिमान वाढत आहे ।३।
गणेशनाथ म्हणे विसरोनिया गेलो : मारोनी राहिलो मरण तेही ।४।

अभंग : २०६

जिताची मरावे योगीयाचे चिन्ह : या परते साधन अनिक नाही ।१।
मुक्तीचा तो सोहळा जिता पाहावे डोळा : मंत्र यंत्र कळा न लगे तेथे ।२।
पर्वतासारिखे करिता अभ्यास : जन्म मरण कैसे चुके तेणे ।३।
गणेशनाथ म्हणे साधनाच्या कोटी: तरी नव्हे भेटी परमार्थाची ।४।

अभंग : २०७

आकाशासारिख्या सांगे ज्ञानगोष्टी : परी नव्हे भेटी स्वरूपासी ।१।
धनावारी लोभ क्रोध आणि क्षोभ : कदा नव्हे लाभ परमार्थाचा ।२।
मीची एक थोर ऐसा जो अहंकार : तो नव्हे विचार स्वहिताचा ।३।
नाम ते विकुन मिळविती धन : तेची त्या बंधन झाले अंती ।४।
गणेशनाथ म्हणे ऐसीयाचे ज्ञाने : तेणे उध्दरण कैसे होये ।५।

अभंग : २०८

कनक आणि कांता निषिध सर्वथा : न जळे आहंता काही केल्या ।१।
पाहे सर्वकाळी कन्या पुत्र न्याहळी : आतित आल्या कळी करितसे ।२।
धरूनिया भेद सदा सांगे वाद : तया ब्रह्मबोध कदा नव्हे ।३।
गणेशनाथ म्हणे प्रेमभाव चित्ती : तेची उध्दारा गती आहे जिवा ।४।

अभंग : २०९

म्हणविता संत न करी समसेवा : तरी नव्हे जिवा उध्दरण ।१।
जैसे ते उदक न म्हणे लहाण थोर : तैसाची विचार समभक्तिचा ।२।

सम करी दृष्टी सद्भाव हा पोटी : तरिच होय भेटी स्वरूपाची ।३।
सांडुनी सन्मान आवडे दीनपण : दीन उध्दरण तोची येक ।४।
गणेशनाथ म्हणे पाहीजे भूषण : तोवरी आज्ञान गेले नाही ।५।

अभंग : २१०

कोणे रिती भाव कैसा आहे देव : कैसा तो उपाव होय जीवा ।१।
कोणे ठाई जीवा आहे उध्दरण : पाप अथवा पुण्य कोण जाणे ।२।
कैसी भक्ति मुक्ती कैसी आहे शांती : श्रेष्टाचियें हाती येईल काय ।३।
गणेशनाथ म्हणे करूनिया दावी : त्याचे पायजिवी आठवितो ।४।

अभंग : २११

न सुटेचि आशा निंदा आभिमान : तोवरि साधन न कळे काय ।१।
वस्त्रे आणि भुषणे पाहीजे मिष्टान्न : ब्रह्मसुख पूर्ण कैचे त्यासी ।२।
प्रतिष्टा महिमान वाढवी आपण : गुंतला तो जाण मायाजाळी ।३।
गणेशनाथ म्हणे नि:संग निराळा : तोचि जाणे कळा स्वरूपाची ।४।

अभंग : २१२

विदेही होउनि सदा गाये गुण : देवाची समान सत्य आहे ।१।
सर्वाघटी दया विषम नाही जया : तोचिरे सखया निजसाधु ।२।
सर्व नेम धर्म सद्गुरूचे पाई : निवांत त्या ठाई आढल होये ।३।
गणेशनाथ म्हणे तोची जाना संत : आनिकांची मात बोलो नये ।४।

अभंग : २१३

पाहता शिवरूप निवति त्रिविध ताप : कृपाळु तु बाप माये माझी ।१।
आहुनि आम्हाला व्रत नाही काही : शिवरूप ध्याई अखंडीत ।२।
आमुचे कुळदैवत तो हा सद्गुरूनाथ : सर्व मनोरथ पूर्ण करी ।३।
गणेशनाथ म्हणे त्राहे सद्गुरूनाथा : चित्ताचा जाणता तुची येक ।४।

अभंग : २१४

रघुनाथाचे ध्यान करिता मनोभावे : तेणे उध्दरावे पूर्वजासी ।१।
अंतरापासोनी आठवावा देव : संसार हा वाव करूनिया ।२।
संतांचि हे सेवा करी जिवे भावे : सुखाचा हा जीव त्याग करी ।३।
गणेशनाथ म्हणे आवघा पाहे देव : तरिच हे जीव उध्दरती ।४।

अभंग : २१५

गणिका कुटिणी वाहिली विमानी : नाममात्रे जनी उध्दरिली ।१।
सजणा तो कसाई आणि सेना न्हावि : नाममात्रे पाही उध्दरिले ।२।
पापाचे पर्वत जरी झाले अगणित : नाममात्रे होत भस्मभुत ।३।
टाकियेला भार देवा तुजवरी : गणेशनाथा उध्दारी यापरी तु ।४।

अभंग : २१६

सुकृतावाचोनी न घडे तो प्रयत्ने : हातीचे हे रत्न निघुनि जाये ।१।
आसेल पुर्व ठेवा तरिच घडे सेवा : सद्भाव या जीवा तरिच होये ।२।
जयाचे संचिती त्यासी घडे भक्ति : तेणे उध्दारा गती पाविजेत ।३।
गणेशनाथ म्हणे पूर्विचे संचित : तरिच सद्गुरूनाथ कृपा करी ।४।

अभंग : २१७

संत साधु जन आणि ब्राह्मण : नावडे रावण तोची होये ।१।
देवाचिये मार्गी सत्य नाही भाव : तो जाणावा दानव मुळीचाची ।२।
दुष्टबुध्दी द्वैत संतांचे हेळण : त्याहुनी दुर्योधन अनिक नाही ।३।
गणेशनाथ म्हणे सर्वही देवाचे : स्वभाव तयाचे बोलीजेत ।४।

अभंग : २१८

व्याघ्र विचारिना गोहत्या ब्राह्मण : म्हणोनिया जाण पशु याती ।१।
मी कोण हे ज्ञान न कळे हस्तिसी : म्हणोनिया त्यासी म्हणती पशु ।२।
ऐसे हे जाणोनिया संताला छळती : आधोगती जाती नर्कपाता ।३।
गणेशनाथ म्हणे भाव भक्तिविणे : जळो त्याचे जिणे संसारी ।४।

अभंग : २१९

गंगा हे सागरी मिळता नाही वेळ : तैसे तुज माझी सकळ मिळणे होये ।१।
अनंत ब्रह्मांडे जयाचिये पोटी : तेथे माझी गोष्टी काय देवा ।२।
येक वेळ पाहता समुद्राचा अंत : परी तु दीनानाथ न कळेसी ।३।
गणेशनाथ म्हणे असेल पुण्य सबळ : उध्दरिता वेळ न करावी ।४।

अभंग : २२०

रंक राज यातीपासी नित्य असे : परी काय त्यास प्राप्त साजे ।१।
पाहता त्या सूर्याची जन भेटी घेती : परी काय होती सूर्यरूप ।२।
तिर्थवास काशी सर्व तिर्था जाती : परी काय होती तिर्थरूप ।३।
गणेशनाथ म्हणे संताचे संगती : मानवचि होती देवा ऐसे ।४।

अभंग : २२१

अद्वैतात्म सुख साध्य ज्या नरासी : न कल्पिता त्यासी मोक्ष होये ।१।
आवघा एक देव ऐसा ज्याचा भाव : सर्व सुख फावे सहज त्यासी ।२।
आकाशासारिखे मन ज्याचे थोर : तो पहा अवतार ईश्वराचा ।३।
गणेशनाथ म्हणे दुजे जेथे नाही : तेची सुख पाही सदोदित ।४।

अभंग : २२२

पृथ्वीचे ठाई नाही दुजेपण : लोह आणि सोने सारिखेची ।१।
गंगेसी ते स्नान करिती ब्राह्मण : महारासी टाकुन देईल काये ।२।

सुर्याचिये ठाई दुजा भाव नाही : सर्वावरी पाडी उजियेड ।३।
गणेशनाथ म्हणे पाहता समदृष्टी : तरीच होये भेटी राघवाची ।४।

अभंग : २२३

भुकेले न म्हणे वोले आणि कोरडे : पाहे अग्निपुढे नुरे काही ।१।
तान्हेलिया उदक मिळो जैसे तैसे : लोभीया भलतैसे मिळो धन ।२।
कामातुरा न कळे शुध्द आणि अशुध्द : रोगिया औषध मिळे जेवि ।३।
गणेशनाथ म्हणे तैसि समभक्ति : तरिच होय प्राप्त ब्रह्मसुख ।४।

अभंग : २२४

सावकाश आता बैसो येके ठाई : आत्मसुख तेही पाहो कैसे ।१।
समस्ता मिळणी होये एक ठाई : सागराते पाही सरिता जैस्या । २।
समस्त मिळोनी होती ऐक्य रूप : पाहताती स्वरूप या देवाचे ।३।
गणेशनाथ म्हणे पाहता ब्रह्मसुख : हारपले दु:ख संसाराचे ।४।

अभंग : २२५

शुकरासि नावडे सत्कथा सद्बुध्दी : हिंडता चाऱ्ही बिदी सुख त्यासी ।१।
म्हैशासि नावडे दया आणि धर्म : वोथरता प्रेमसुख त्यासी ।२।
श्वान विचारिना पाप आणि पुण्य : भुंकतसे जाण भल्या बुऱ्या ।३।
गणेशनाथ म्हणे तेही आत्माराम : न कळता वर्म तैसा झाले ।४।

अभंग : २२६

संसार म्हणजे मैदाची हे वस्ती : म्हणोनी त्यागीती साधुसंत ।१।
जवरी केला नाही संसाराचा त्याग : तोवरी कैचा संग राघवाचा । २।
अरे माझ्या जीवा व्हावे त्वा उदास : न करावी आस लोकिकाची ।३।
गणेशनाथ म्हणे तुजवाचुनी काही : आवडत नाही अनिक जीवा ।४।

अभंग : २२७

दु:खाचा डोंगर पाहता हा संसार : करावा विचार स्वहिताचा ।१
आपुले अंतरि आपण विचारावे : सांगितले देवे तेचि करू ।२।
अंतरिचे सुख अंतरी जाणावे : कळो ते नेदावे दुजियासी ।३।
गणेशनाथ म्हणे जेणे होये सुख : नाम सर्व दु:ख निवारिल ।४।

अभंग : २२८

रघुनाथाचे ध्यान करावे संपूर्ण : जन्म दु:खापासून सोडविल ।१।
चौऱ्यांशीचा फेरा चुके येरझारा : न कळे सोयरा सद्‌गुरूनाथ ।२।
साधु सनकादिक तारियेले जेणे : तयाचे चरण आठवावे ।३।
गणेशनाथ म्हणे करिन आठवण : मग न ये परतोन संसारी ।४।

अभंग : २२९

मनोभावे तुझे करिता चिंतन : होय उध्दरण या जीवाचे ।१।
मन बुध्दी चित्त तुझीया चरणी : पाहता जनी वनी दुसरे नाही ।२।
व्यापुनि आवघे करूणी निराळा : रूप पाहे डोळा सदोदीत ।३।
गणेशनाथ म्हणे तु माझे जिवन : जन्माचे खंडन करी देवा ।४।

अभंग : २३०

इंद्राची संपत्ती असोनिया काये : जवरि नाही सोय स्वहिताची ।१।
जन आणि वन आहे तत्समान : देवाविण कोण तारी आम्हा ।२।
तुची माता पिता कृपाळु तू दाता : तुजविण सर्वथा नाही कोण्ही ।३।
गणेशनाथ म्हणे चरणावरी माथा : तारी गा समर्था शरण आलो ।४।

अभंग : २३१

सर्व दान पुण्य सद्‌गुरूचे चरण : अनिक साधन न कळे काही ।१।
भाव आणि देव सद्‌गुरूचे नाव : न कळे कैसा ठाव देसी पाई ।२।
भक्ति मुक्ति शांति न कळे कैसी प्राप्ती : तुझे नाम चित्ती धरिले देवा ।३।
ज्ञान ना वैराग्य संपतीस भाग्य : गणेशनाथ सांग न कळे काही ।४।

अभंग : २३२

आसे जे संचित न चुके कल्पांती : आता काकुलती येउनि काये ।१।
ब्रह्माचे वचन चुकवि येथे कोण : न चालेची प्रयत्न काही केल्या ।२।
पाहता नरदेहे नाशिवंत आहे : जाणोनिया काये करू शोक ।३।
गणेशनाथ म्हणे भिऊनिया काये : न सांडावी सोये मुळीची ते ।४।

अभंग : २३३

दु:खाचे पर्वत पडले अंगावरी : नाव हे निर्धारी सोडु नये ।१।
नैश्वर संसार होता विटंबना : जवळुनि नारायणा नको जाऊ ।२।
विपत्ती आपदा सोसिली बहुत : आझुणी पाहता अंत उचित नोहे ।३।
गणेशनाथ म्हणे पार नाही दु:खा : म्हणुनि केला सखा नारायण ।४।

अभंग : २३४

सुर्यासी न कळे माझाची प्रकाश : चंदना सुवास न कळे काही ।१।
उदकासी न कळे मी सर्वासी जिवन : पृथ्वी हे पाषाण काय मोजी ।२।
तैसेपरी न कळे देही आत्माराम : म्हणोनी दु:ख जन्म भोगिताती ।३।
गणेशनाथ म्हणे सद्‌गुरू प्रसादे : आत्माराम सिध्द सर्व देही ।४।

अभंग : २३५

सुर्याचिये गावी कैची सितळता : हिमांचळा जाता उष्ण नाही ।१।
मृगजळी पहाता जळ ना उतार : तैसा हा संसार पाहे मना ।२।
विचवांचे पेवि प्राणीसुख पावे : व्याघ्रग्रही राहावे कवणे सुखे ।३।

काम क्रोध दंभ अहंकार आभिमान : नरदेहे येणे व्यर्थ केला ।४।
गणेशनाथ म्हणे देही यैसीयापासुन : करी सोडवण सद्गुरूनाथा ।५।

अभंग : २३६

नरदेह पावन बोलती पुराणे : सांगा घडे ध्यान या देवाचे ।१।
नाशिवंत आहे येथे हित काये : कृपाळु जरी होये नारायण ।२।
सुक्तिमाजी पाहे मुक्ताफळ आहे : जाहलियाचे काय फळ त्यासी ।३।
गणेशनाथ म्हणे देही आत्माराम : भाग्येविन वर्म न कळे त्याचे ।४।

अभंग : २३७

काये येईल सवे तेची आम्ही घ्यावे : आलिया करावे काय येथे ।१।
काय येथे पाहवे कोठे स्थिर राहावे : न पडेची ठावे मूळ याचे ।२।
नरदेह हा काय? देव कोठे आहे? : न कळेची सोय आत्मयाचि ।३।
गणेशनाथ म्हणे मी कोण न कळे : कैचे माया मूळ सर्व कैचे ।४।

अभंग : २३८

जगी धन्य ऐसे काय पुण्य गाठी : येक वेळे भेटी होता तुझी ।१।
ऐसी मज काय घडली सेवा भक्त : पाहती साधु संत कृपादृष्टी ।२।
ऐसा मज कैचा निर्धारेसी भाव : चित्ती राहे देव सदोदित ।३।
जप तप ध्यान नाही शुध्द मन : गणेशनाथ दीन म्हणोनी तारी ।४।

अभंग : २३९

गणिका तारिली शिळा उध्दरिली : कृपाळु माऊली अनाथाचि ।१।
उदकी पाषाण प्रतापे तारिले : पतित उध्दरिले येक्यानामे ।२।
अनेक पतित उध्दरिले देवे : तैसे मज तारावे सद्गुरूनाथा ।३।
गणेशनाथ म्हणे शरण आलो तुज : गुण दोष माझे पाहु नको ।४।

अभंग : २४०

या जन्माचे दु:ख सांगु कोन्हापासी : कृपाळु तु होसी म्हणोनिया ।१।
बाळपणी दु:ख अपार देखिले : तरूणपणि केले महादोष ।२।
ऐसेपरी देवा गेला हा संसार : धरावा तो धीर कोठवरी ।३।
गणेशनाथ म्हणे करूणा कैसी न ये : सांभाळी वो माये पूर्व भाक ।४।

अभंग : २४१

तुझिया आधारे राहिलो संसारी : बोलणे ते करी साच देवा ।१।
ऐसीया पतिताचा करावा उध्दार : ब्रिद ते साचार तेव्हा होये ।२।
आनंत जन्माचा बहुत आहे दोषी : म्हणोनि तुजपासी शरण आलो ।३।
गणेशनाथ म्हणे ऐसा हा संसार : केलासे आधार तुझा देवा ।४।

अभंग : २४२

जिकडे जावे तिकडे संचित सांगती : मिथ्या या शोकांते करूनी काये ।१।
संचितासारखे होत असे मन : यासी काय प्रयत्न चाले आता ।२।
जन्मो जन्मिचे असेल पुण्य बळ : कल्पांती न ढळे काही केल्या ।३।
गणेशनाथ म्हणे आसेल पूर्वदत्त : तरीच पावेन पंथ निजमोक्षाचा ।४।

अभंग : २४३

देवे दिल्हे तेही न जाय सर्वथा : निश्चय हा चित्ता दृढ धरी ।१।
मेघेविण डंबर आलेसे बहुत : परि ते नाशवंत अंत:काळी ।२।
चित्रिचे संभार राजा राणी कुमर : परी त्याचा आधार धरील कोण ।३।
गणेशनाथ म्हणे तैसा हा संसार : मानिता साचार काय हित ।४।

अभंग : २४४

साच कोण मानि गारूड्याची विध्या : भोगी तो आपदा अंत:काळी ।१।
साच कोण मानि चित्रीचे बाहुले : अथवा त्याचे केले पाप पुण्य ।२।
साच कोण मानि स्वप्निचे सौभाग्य : दु:ख भोग काय साच ।३।
गणेशनाथ म्हणे तैसेपरी जन्म : जन्म कर्म नेम कोणे ठाई ।४।

अभंग : २४५

कोण्हीकडे गेला देव हा कृपाळ : संत हे दयाळ कोठे गेले ।१।
कोण्हीकडे गेला दया आणि धर्म : सत्य आणि नेम कोठे गेले ।२।
कोठे उरली आता या देवाची भाक : जीवा ब्रह्मसुख केंव्हा दावी ।३।
गणेशनाथ म्हणे ब्रह्मीचे जे जीव : त्यांसी त्यांचा ठाव कैसा नेदी ।४।

अभंग : २४६

सरितेचे जळ जाईल सागरा : वोघ तो माघारा न ये कदा ।१।
चंद्र आणि सूर्य जाती निजधामा : मानवाची सिमा काय तेथे ।२।
तैसा हा नरदेह जाईल तो अंती : म्हणोनिया भावभक्ति साधी नरा ।३।
गणेशनाथ म्हणे सद्‌गुरू दयाळा : प्रेमाचा जिव्हाळा देई मज ।४।

अभंग : २४७

मनुष्य देही भेटी न होता देवाची : चौऱ्यांशी जीवाची कैसी चुके ।१।
याकारणे आलो मनुष्य जन्मा आता : त्याचे गुण गाता सुख होये ।२।
नरदेहा आलिया करू देवकाज : सांडोनिया लाज सज्जनाची ।३।
गणेशनाथ म्हणे यापरी संसार : करावा उध्दार पूर्वजांचा ।४।

अभंग : २४८

संसार येउनि करू जिवे साटी : परी घेउ भेटी तुझी देवा ।१।
कायेची कुरवंडी करू तुजवरी : नेमाची हे खरी करू आता ।२।
करू भावे भक्ति निर्धार निश्चिये : गिळु तुज पाहे न लगे वेळ ।३।

गणेशनाथ म्हणे हेची आहे मनी : तुज मज जनी करू नाव ।४।

अभंग : २४९

दाउ तिन्ही लोकी तुझी माझी ख्याती : समस्तही पाहती भक्तिसुख ।१।
देव भक्तपण येईल ते कळु : तिन्ही लोकी गिळु न लगे वेळ ।२।
ब्रिदावळी खरी करू आता मात : पाहो आदि अंत कैसा देव ।३।
परमार्थाच्या वाटा वाहत्या करू आता : देवा तुझी सत्ता बोलवित ।४।
गणेशनाथ म्हणे हा शब्द जिवाचा : सत्य हे त्रिवाचा साच करू ।५।

अभंग : २५०

मागिलीया भक्तांजवळी होता देव : भरवसा पाहो तुची आम्हा ।१।
पतंगाचे परी टाकु आता उडी : उभारू ते गुढी देवलोकी ।२।
साच करू आता पूर्विचे वचन : जाणसी तु खुण अंतरिची ।३।
गणेशनाथ म्हणे करू हा निर्धार : आलिया संसार सुफळ होये ।४।

अभंग : २५१

धनासाटी द्यावी धनाची ते बळी : तुजसाटी समुळी वेचु देहे ।१।
काया आणि वाचा वाहोनिया मन : परी तोडु बंधन प्रपंचाचे ।२।
संत साधु जन पाहती हा निर्धार : ऐसा विचार करू आता ।३।
गणेशनाथ म्हणे सर्व तुझी सत्ता : यालागी बोलता भय नाही ।४।

अभंग : २५२

व्याघ्राचिये पोटी जन्मले जे बाळ : भेईना सकळ देखोनिया ।१।
तैसे तुझे दास निर्भय निरंतर : देखोनी साचार तुझे सुख ।२।
या देहाकारणे किती दिवस भ्यावे : काय आम्ही राहावे कल्पावरी ।३।
गणेशनाथ म्हणे तुझीयानी बळे : निर्भय अढळ करू ध्यान ।४।

अभंग : २५३

जिवीचे चिंतीले पुरवितो हा देव : पुराणी निर्वाह सत्य ऐसा ।१।
तिन्ही लोक तुझ्या नामे उध्दरले : अगणित तारिले भक्तराज ।२।
तैसाची तु आम्हा तारिसी भरवसा : पाहता दाही दिशा तुझे रूप ।३।
गणेशनाथ म्हणे ब्रिद ज्याचे पाई : तो आम्हासी काही मोकलिना ।४।

अभंग : २५४

माझा सद्‌गुरूनाथ तिन्ही लोकी समर्थ : अनिकांची मात न करी कदा ।१।
गुरूनाथावाचोनि अनिक देव नाही : सदोदीत पाही रूप डोळा ।२।
वरिष्ट मुकूटमणि पुजक देवाचा : तोची झाला माझा मायबाप ।३।
गणेशनाथ म्हणे गुरूनाथासी नेम : सर्व धर्म वर्म तुची माझा ।४।

अभंग : २५५

सद्गुरूवाचोनि अनिक साधान : तेणे नव्हे जाण निजमोक्ष ।१।
तेत्तिस कोटी देव झाले मोक्ष दाते : प्राणी उध्दरिते घरोघरी ।२।
मोक्ष जरी असता देवाचिये हाती : आपुलि आपण गति करूनी घेते ।३।
तिन्ही लोकी नाही सद्गुरूविणे थोर : गणेशनाथ खरे वचन बोले ।४।

अभंग : २५६

गुरूभक्तिवाचुनी तरला नाही कोण्ही : संत साधु मुनि बोलताती ।१।
सद्गुरूवाचुनी वदे ज्याची वाणि : अभक्त तो प्राणी पाहु नये ।२।
देवाचा जो देव तोची सद्गुरूराव : त्याहुनिया ठाव अनिक नाही ।३।
गणेशनाथ म्हणे सद्गुरू तारक : उध्दरती लोक ज्याच्या नामे ।४।

अभंग : २५७

गुरूनाथावाचोनि अनिक घेता नाव : तया न मिळे ठाव तिन्ही लोकी ।१।
गुरूनाथावाचोनी करिता भावभक्ति : तरी अध:पाति पडे जीव ।२।
गुरूनाथावाचोनि अनिक करिता ध्यान : पूर्ण नरक पतन घडो देहा ।३।
गणेशनाथ म्हणे हाची केला नेम : सद्गुरू परब्रह्म पाहो डोळा ।४।

अभंग : २५८

देव काजी वेचु आता सर्व देहे : जेणे किर्ती होये तिन्ही लोकी ।१।
संतांचे वचन साच करू आता : तुझे गुण गाता निर्धारेसी ।२।
सद्गुरूची आज्ञा तेची सत्य पाळु : करिल सांभाळु तोची आम्हा ।३।
गणेशनाथ म्हणे ऐसा आहे नेम : सांगे निज वर्म जिविचे काही ।४।

अभंग : २५९

संतासी (भक्तासी) बोलता सुख झाले चित्ता : तेथे(जेथे) नाही वार्ता प्रपंचाची ।१।
ज्याचे नाम किर्ती पुराणे बोलती (वानिती) : निमिष्यार्धे देती मोक्षपद ।२।
संतांचा हा पार देवा आगोचर : काय मी किंकर वानु त्यांसी ।३।
गणेशनाथ म्हणे तेची आम्हा गती : जन्मासी मागुती येणे नाही ।४।

अभंग : २६०

गीता भागवत शास्त्रे आणि पुराणे : करिता साधणे जन्म गेला ।१।
वेद आणि श्रुति काशा सप्तसती : उपनिषधे किती आभ्यासावी ।२।
मंत्र आणि यंत्र वेदोक्त विधान : न जळे आभिमान काही केल्या ।३।
योग यागादीक आसन ध्यान मुद्रा : न चुकेची फेरा चौऱ्यांशीचा ।४।
धिट आणि पाठ संगित चोखट : तेणे कैसी वाट सापडेल ।५।
गणेशनाथ म्हणे सद्गुरूची दया : अनिक सखया न लगे काही ।६।

अभंग : २६१

नाही मज आभ्यास संगित गायन : अखंड निजध्यान हेची सार ।१।

राग आणि रंग न ये मज सांग : करितो सेवा चांग स्वहितासाटी ।२।
न ये मज काही कवित्व तर्कबंध : होउनी निर्दंद नाम गाउ ।३।
गणेशनाथ म्हणे न लगे मज काही : पडिलो तुझे पाई सद्‌गुरूनाथा ।४।

अभंग : २६२

माझे मज देता नवल काय आता : का गा न ये चित्ता तुझ्या देवा ।१।
जिवाची मी रासी दाखवी आम्हासी : जेणे या जन्मासी येणे नाही ।२।
मुळीचा तो ठाव पाहु येके वेळे : करू भक्ति बळ तुजसी देवा ।३।
गणेशनाथ म्हणे धरवेना धीर : चालिला संसार हातोहाती ।४।

अभंग : २६३

जिवाची मी रासी तुझ्या पायापासी : जाणोनि नेणसी कैसा देवा ।१।
झालो देहधारी उतरलो संसारी : अन्याय पै शिरी हाची देवा ।२।
मिथ्या हा संसार का आम्हा लाविला : आसोनि जीवाला न देसी तु ।३।
गणेशनाथ म्हणे ब्रिद करी साचे : आघात जिवाचे चुकवी देवा ।४।

अभंग : २६४

न कळे भावभक्ति न कळे ब्रह्मज्ञान : परी आलो शरण तुज देवा ।१।
आयुष्य आहे थोडे न साधे अवघड : परी आहे चाड तुझी देवा ।२।
मिथ्या हा संसार का आम्हा दिला(लाविला) : सद्‌गुरू कृपाळा मायबापा (तोडी वेगी) ।३।
मन हे चंचळ न राहेची स्थिर : यापरी संसार गेला देवा ।४।
गणेशनाथ म्हणे कृपा उपजे तुज : तरिच सर्व काज सिध्दी होय ।५।

अभंग : २६५

देहाचेनि बळे नाठवेची देव : ऐसा कैचा भाव थोर मज ।१।
जिवाचे ते कृत्य जवरी आहे देही : तवरी हित नाही काही केल्या ।२।
काम आणि क्रोध अहंकार आभिमान : तेणेचि पतन भोगीजेत ।३।
गणेशनाथ म्हणे उध्दारावे मज : न विसंबे तूज ऐसे करी ।४।

अभंग : २६६

सुखाचिया ठाया जात असे मन : मग होये बंधन जन्म दु:ख ।१।
संसार हे पेठ सर्व काही आहे : जेणे लाभ होये तेची घ्यावे ।२।
भुलु नको मना देहीच्या सुखासी : जाब त्या देवासी देसी काये ।३।
गणेशनाथ म्हणे जेणे होये हित : तेची खरी मात करू आम्ही ।४।

अभंग : २६७

देवाविण येथे कोण आहे थोर : दु:खाचे डोंगर निवारिल ।१।
जन्माचे हे दु:ख निवारिल कोण : पाहे विचारूण न करी वेळ ।२।
किती या देवासी काकुळती यावे : होणार ते पाहवे ऐसे कैसे ।३।

गणेशनाथ म्हणे होणार ते होये : करुनिया काये मिथ्या शोक ।४।

अभंग : २६८

मुळिचे संचित न कळे नेणो काये : केव्हा तुझे पाये पाहीन डोळा ।१।
जन्मो आणि जन्मी केली नाही सेवा : काय रुसु देवा तुजवरी ।२।
न कळे मज संचित काये आहे माझे : जन्म दु:ख वोझे उतरावे ।३।
गणेशनाथ म्हणे जे होण्यासारिखे : सुख आणि दु:ख तुझे हाती ।४।

अभंग : २६९

पाहता तिन्ही लोकी साच काय आहे : अंती सर्व जाये नासोनिया ।१।
जाईल पवन पाणी आकाश मेदीनी : न उरेचिना कोण्ही अंत:काळी ।२।
जाती चंद्र सूर्य आणि सप्त सागर : नाशिवंत संसार(शरिर) काय तेथे ।३।
गणेशनाथ म्हणे जाणे आहे आम्हा : देई तुझे प्रेम सदोदित ।४।

अभंग : २७०

आकारिक सर्व नाशिवंत आहे : जाणोनिया होय सावधान ।१।
नाशिवंत देहे प्रसिध्द तो आहे : याचे केले काये साच ऐसे ।२।
आकाशीचे अभ्र पाहता आकार : नव्हे ते साचार कदा काळी ।३।
गणेशनाथ म्हणे ऐसे हे जाणोन : धरियेले चरण तुझे देवा ।४।

अभंग : २७१

संसारिचे सुख जया लागे गोड : तया नाही चाड निजमोक्षाची ।१।
कामा भेणे कदा नव्हे त्या अराणुक : त्याची कैसी चुके येरझार ।२।
अणुमात्र जरी कोठे गोवियेले मन : त्यासी जन्म घेणे होय तेथे ।३।
गणेशनाथ म्हणे कल्पना सांडुन : गाउ तुझे गुण प्रेमभावे ।४।

अभंग : २७२

चरणी चालवेण सर्व तीर्थ काशी : तरिच आलियासी फळ आहे ।१।
हाते दया धर्म घडे संत सेवा : तरिच होये जीवा उध्दरण ।२।
मुखी नामघोष सत्य बोले वाच्या : आलिया जन्माचा थोर लाभ ।३।
नेत्री देवरूप पाहोनी आवघे : गणेशनाथ मागे हेचि दान ।४।

अभंग : २७३

नको द्रव्य दारा आभिमानाचा वारा : करिता येरझारा दु:ख मोटे ।१।
नको कन्या पुत्र धन आणि संपत्ती : परी राहो चित्ती नारायण ।२।
नको दाउ आम्हा संसाराचे सुख : भक्ति प्रेम येक द्यावे आम्हा ।३।
गणेशनाथ म्हणे आलिया जन्मा : आस नसावी सर्व जीवा ।४।

अभंग : २७४

ज्याला जाणे आहे अक्षयपदासी : त्याने निजध्यासी अखंड राहवे ।१।

सद्‌गुरू ज्ञानपूर्ण जया नरा होये : जन्म मरण पाहे कैचे त्यासी ।२।
सर्वाघटी पुर्ण पाहे नारायण : सम सेवा ज्ञान त्याची नावे ।३।
गणेशनाथ म्हणे प्रेमसुखे धाला : तोची योगी झाला सर्वसाक्षी ।४।

अभंग : २७५

नरदेही साधन भक्तिविण नाही : भक्त गेले पाही येणे पंथे ।१।
भक्तिवीण सर्व साधन वाया : न पावेची ठाया कोणे काळी ।२।
उदकाविण तरू नव्हेची विस्तार : भक्तिविण ओमकार फळे कैसा ।३।
गणेशनाथ म्हणे करिता भाव भक्ति : तरिच होये प्राप्ती निजसुख ।४।

अभंग : २७६

भक्तिसुख येक जाणे पुंडलिक : पाहती तिन्ही लोक न कळे त्यासी ।१।
अंबऋषी  प्रल्हाद उध्दव रुक्मांगद : जाणती ते भेद निजभक्तिचा ।२।
पाहता गुरूभक्ती तिन्ही लोकी थोर : त्यामागे अपार संत गेले ।३।
गणेशनाथ म्हणे तैसा धरिता भाव : आपणची देव स्वये होये ।४।

अभंग : २७७

जयासी आवडे आरण्याचा वास : तो जाणावा दास नग्न जैसा ।१।
सांडी सर्व संग उपाधिवेगळा : सदोदीत डोळा पाहे देव ।२।
लोकिकाचा संग कदाही नावडे : तोची योगी चढे ब्रह्मगिरी ।३।
गणेशनाथ म्हणे जाणोनिया त्याग : तोची सत्यमार्ग निजमोक्षाचा ।४।

अभंग : २७८

मुळीचा जो दास त्या लागे सायास : सरिता सागरास जैसी जाये ।१।
चंद्र सूर्य दोन्ही कोण उजळीले : चिरंजिव केले कोण्हे आता ।२।
हिरा रत्न ज्योती न मिळेची कदा : पदिचा तो पदा जात असे ।३।
गणेशनाथ म्हणे मुळीचा जो भक्त : तोची पावेल पंथ निजमोक्षाचा ।४।

अभंग : २७९

तुझीये सत्तेने बोलतो वचन : गिळु त्रिभुवन तुजसहीत ।१।
खरी करु आता तुझी ब्रिदावळी : तिन्ही लोकाआगळी भक्ति दाउ ।२।
तुज मज साक्षी साधु संत जन : दीन उध्दरणे म्हणोनिया ।३।
गणेशनाथ म्हणे प्रसिध्दची आहे : देवा भक्ता ठाये येक अंती ।४।

अभंग : २८०

पर्वती आसावे कासियाकारणे : निरंतर ध्यान न घडे ज्यासी ।१।
अन्ने उदकेविण न चाले हा देहे : साधन ते काये घडे जीवा ।२।
देहाची हे आशा सोडी येकेवेळा : तोचि पाहे डोळा नारायण ।३।
गणेशनाथ म्हणे करी का निर्धार : तरिच उध्दार होये जीवा ।४।

अभंग : २८१

अन्न आणि उदक पाहिजे जिवासी : मग देवाची कैसी भेटी होये ।१।
जंवरी आहे देहे तंवरी साधन काये : जरी कृपा होये या देवाची ।२।
काम क्रोध देही कल्पना आसता : स्वहिताची वार्ता बोलो नये ।३।
गणेशनाथ म्हणे देव कृपा करी : तरिच संसारी थोर लाभ ।४।

अभंग : २८२

आरण्यी बैसोनी काय काम केले : आयुष्य वेचले भक्तिविणे ।१।
येथे भक्तिविण व्यर्थ ते साधन : समुळी हे मन नावरता ।२।
नरदेहे निधान जाणोनि आपण : भक्तिभावे पूर्ण जावे पंथा ।३।
गणेशनाथ म्हणे ऐसे न घडता : सुखाची ते वार्ता बोलो नये ।४।

अभंग : २८३

पर्वती वृक्षासी उदक कोण घाली : श्वापदाची केली चिंता कोणी ।१।
काय खाती तया भुजंगाची पिली : कोसल्याचि केली चिंता कोणी ।२।
कुर्मिचिया बाळा कैचे पयपान : स्वये नारायण पाळी जीव ।३।
गणेशनाथ म्हणे सर्वासी पाळिता : त्याला आमुची चिंता आसेल काही ।४।

अभंग : २८४

आधी केले अन्न मग ते सर्व जन : ऐसे हे जाणुन चिंता टाकी ।१।
बालक जव उदरी तव दुध बाहेरी : ऐसा सुत्रधारी न कळे कोण्हा ।२।
चकोर चातक न घे भुमिजळ : तयासी कृपाळ पाळी सदा ।३।
गणेशनाथ म्हणे समर्थ तु दाता : ऐकोनिया चिंता विसरलो ।४।

अभंग : २८५

देवाचे सत्तेने चाले सर्व जन : मन आणि उन्मन तोची करी ।१।
सत्ताधारी देव पुराणी निर्वाह : भाव आणि अभाव तोची करी ।२।
न कळे मज काही तुज आहे ठावे : पतित उध्दरावे येके वेळे ।३।
गणेशनाथ म्हणे जीव तुज आधिन : सांभाळी वचण आपुले देवा ।४।

अभंग : २८६

देवा तुझे पाई भय काही नाही : विश्वास हा जिवी थोर तुझा ।१।
भक्ताचा कळवळा तुज गा कृपाळा : हृद्यावेगळा नको होउ ।२।
नरदेहे धरिला तुझ्या भक्तीसाटी : होते तुझी भेटी म्हणोनिया ।३।
गणेशनाथ म्हणे वचणाचा निर्धार : पैल पार पावविसी ।४।

अभंग : २८७

देवाकडे पाहता दुसरे नाही आता : जन्मासी मागुता येउ नये ।१।
अंतर बाहीर आवघा हरिहर : पाहोनी संसार उलंघावा ।२।

आवघा आहे देव ऐसा धरिता भाव : परब्रह्मिचा ठाव तोची एक ।३।
गणेशनाथ म्हणे जाणोनिया गुज : शरण आलो तुज सद्‌गुरूनाथा ।४।

अभंग : २८८

विश्वरूपी पाहता तुची येक देव : ऐसा कैचा भाव लक्षु तुज ।१।
तुजसी ओलखी ऐसे काय पुण्य : समुळी हे मन मावळता ।२।
तुजसी मिळोनी येके वेळे होये : सरिता जैसी जाये सागरासी ।३।
गणेशनाथ म्हणे पाहोनिया एक : प्रसाद हा देख सद्‌गुरूचा ।४।

अभंग : २८९

लवण जैसे जळी मिळोनिया जाये : तैसाची हा पाहे ब्रह्मबोध ।१।
जैसे अलंकार होती सोनियाचे : जीव ब्रह्मिचे तैस्यापरी ।२।
जैसे मृत्तिकेचे होती सर्व घट : तैसाची पालट या देहासी ।३।
गणेशनाथ म्हणे येकरूप पाहे : तरिच कृपा होय सद्‌गुरूची ।४।

अभंग : २९०

नित्य करिता ध्यान धरिता धारणा : तेणे बोध मना कैसा होये ।१।
वेदाचे अध्यन शास्त्र श्रुतिचे पठण : तेणे हा अभिमान कैसा जाये ।२।
जप आणि तप निष्टा आणि निर्धार : गुरूभक्ती साचार घडे जरी ।३।
तरिच लिन व्हावे सुफळ होये जिणे : गणेशनाथ म्हणे भेटी होता ।४।

अभंग : २९१

येके वेळे देह विसर्जन व्हावे : तेंव्हा ते बैसावे देवलोकी ।१।
येके वेळे देह पशूतेचि बरी : बहुत उपकारी वेचते की ।२।
परोपकारी देह कष्ठ तो चंदन : निववी सकल जन तैसे व्हावे ।३।
गणेशनाथ म्हणे व्हावे परोपकारी : नाहीतरी संसारी येवो नये ।४।

अभंग : २९२

देहे बळे भुली का आम्हा घातली : पापे पुण्ये केली कोणी देवा ।१।
आसोनि अंतरी करितोसी चोरी : का वाया संसारी गोवियेले ।२।
आसोनि मिराशी न देसी आम्हासी : तुझे तुजपासी सांगो देवा ।३।
गणेशनाथ म्हणे पाहोनिया आद : न धरावा भेद कोणे काळी ।४।

अभंग : २९३

सोडी आता देवा तुझी ब्रिदावळी : नाही तरी पायाजवळी ठाव द्यावा ।१।
सत्य ते वचण असत्य न करावे : दीन उध्दरावे भलतेपरी ।२।
साच ते करावे पुर्विचे बोलणे : पतित पावन ऐसे नाम ।३।
गणेशनाथ म्हणे तो आम्हा निर्धार : उतरिसी पार म्हणोनिया ।४।

अभंग : २९४

नरदेहा येऊन झालो तुज आधिन : पाहु नको गुण दोष काही ।१।
आनंत अपार केली तुजवरी सत्ता : जाणोनिया कृपावंता शरण आलो ।२।
देहे नाशिवंत कर्म काय सत्य : निर्धार हे मात परिसावि ।३।
गणेशनाथ म्हणे नैश्वर संसार : जाणोनि आधार केला तुझा ।४।

अभंग : २९५

जन्म दु:ख देवा खंडोनिया टाकी : करिन तिन्ही लोकी किर्ती तुझी ।१।
चौऱ्याऐंशीचे फेरे चुकवी येरझार : द्यावे ते साचार भजन तुझे ।२।
संतांची संगती द्यावी तुझी प्रिती : निर्मळ हा चित्ती भाव द्यावा ।३।
गणेशनाथ म्हणे तुझ्या दर्शणे : नको पाहु गुण दोष काही ।४।

अभंग : २९६

पृथ्वीचिया याती कोण जाणे काय : सोवळा तो ठाये कैसा झाला ।१।
कोण जाणे तया उदकाचे कुळ : ज्यापासुनि सकळ पैदा झाले ।२।
पाहा वारियासी कोण गोत्र आहे : आतळोनी जाये सर्वत्रांसी ।३।
पाहता अग्निचे कुळ गोत्र कोण : ब्रह्म कर्म जेणे शुध्द होये ।४।
गणेशनाथ म्हणे येकी होय येक : तोची ब्रह्मसुख जाणा साधू ।५।

अभंग : २९७

या मनाची जाती सांगे आम्हाप्रती : तोची ब्रह्ममूर्ती जाणा साधू ।१।
पाहा आत्माराम कोणे हे यातिचा : न कळेचि त्याचा अंतपार ।२।
वैश्य शुद्र क्षेत्री ब्राह्मण जेथे होती : त्याला नाही याती कुळ काही ।३।
गणेशनाथ म्हणे सद्‌गुरूची कृपा : तरिच ब्रह्मरूपा होईल भेटी ।४।

अभंग : २९८

देवा पै मागणे द्यावे रंकपण : जेणे माझे मन शुध्द होये ।१।
अत्यंत मज देवा द्यावी दुर्बळता : आठव गुरूनाथा होईल तुझा ।२।
पतिताहुणी पतित करी मज दीन : तरी तुझे भजन घडेल काही ।३।
गणेशनाथ म्हणे दु:ख आम्हा द्यावे : परि चित्ती राहावे सद्‌गुरूनाथा ।४।

अभंग : २९९

तुजविणे देवा आम्हा कोण्ही नाही : चित्त तुझे पाई ठेवियेले ।१।
संसारा येउनी थोर तुझी आस : न करावी निरास माय बापा ।२।
आम्हा अनाथासी उध्दरिल कोण : देवा तुजवाचुन कोण्ही नाही ।३।
रात्री आणि दिवस करितो चिंतन : करावे पावन पतितासी ।४।
गणेशनाथ म्हणे तुची माझा दाता : संसाराची वार्ता विसरलो ।५।

अभंग : ३००

देवाचिये घरी काही नाही उणे : आधिर माझे मन अविश्वासी ।१।

कल्पतरूचे तळी काय दुर्बळता : तैसा माझा दाता सद्गुरूनाथ ।२।
देवासी मागणे हेची लाजिरवाणे : काय आम्हा राहणे या संसारी ।३।
दो दिवसाकारणे काय दाउ मन : आदि अंती जाण तुझा तुची ।४।
गणेशनाथ म्हणे सद्गुरू समर्थ : तोची मनोरथ पुरविल ।५।

अभंग : ३०१

गुरूनाथावाचोनी सखा नाही कोण्ही : पाहता त्रिभुवनी तुची एक ।१।
तुची माझी माता सखया सद्गुरूनाथा : चरणावरी माथा ठेवियेला ।२।
तु माझा संसार सखा जोडलासी : शरण अनिकांसी जाउ नेदी ।३।
तुझीये कृपेने काही नाही उणे : करितो तुझे ध्यान रात्री आणि दिवस ।४।
गणेशनाथ म्हणे तुचि माझा सखा : निवारिला धोका प्रपंचाचा ।५।

अभंग : ३०२

देवाचे घरिचे जालो असे श्वान : म्हणोनी नाही उणे कांही मज ।१।
देवाचिये घरी भरलेसे भांडार : जपु निरंतर नाम त्याचे ।२।
देवाचिये घरी आहे सर्व काही : म्हणुनि चित्त पाई ठेवियेले ।३।
देवाचे जे घर ते माझे साचार(सार) : नाही लहाण थोर निवडी तेथे ।४।
गणेशनाथ म्हणे त्रिभुवनीचा धनी : तोची माझे मनी बैसलासे ।५।

अभंग : ३०३

जयाची करणी तयाला सुफळ : आभक्ता गोपाळ काय करी ।१।
दृष्टीचा देखणा न करावा अंधार : साराचे हे सार पाहवे वेगी ।२।
मद्यपान करिता नाही त्या सुचना : आप पर जाणा विचारिणा ।३।
तैसे देहेबळे विचारिणा काही : पाप पुण्य तेही न कळेची ।४।
गणेशनाथ म्हणे स्वहित विचार : जाणोनि अंधार न करावा ।५।

अभंग : ३०४

भले नव्हे काही अग्निसी खेळता : सर्पा क्षेम देता भले नव्हे ।१।
हाटकिता शूर जिवासी उदार : करिता विचार भले नोहे ।२।
वोखटे बोलणे बोलो नये कदा : होतसे आपदा या जिवासी ।३।
विंचुवाचे सेजे सुखे निद्रा करी : पडता आघोरी सुख नव्हे ।४।
तैसा हा संसार जाणोनि आसार : सज्ञान जे नर सावध होती ।५।
गणेशनाथ म्हणे पुरे आता जिणे : चरणी राहीन अखंडीत ।६।

अभंग : ३०५

काय ते करावे आम्हा थोर थोर : न करिती विचार स्वहिताचा ।१।
वनांतरी शीळ पडली सबळ : काय तिचे फळ असोनिया ।२।
काय ते करावी बाभळिची झाडे : परी काय गोड होतील ते ।३।

तैसा जाणा नर जेथे नाही दया : ते तुज पंढरिराया न भेटती ।४।
गणेशनाथ म्हणे भाव भक्तिविण : जळो त्याचे जिणे संसारिक ।५।

अभंग : ३०६

काय आम्हा चाड आहे दुसऱ्याची : आपल्या जिवाची सोडवण ।१।
अनिकांची वाट पाहु नये कदा : भजनी पै सदा दृढ राहवे ।२।
अपणिया आपण जाणोनिया राहावे : सांगितले देवे तेची करी ।३।
अखंडीत दृष्टी करित उफराटी : ऐक्य तेची भेटी होईल तेव्हा ।४।
गणेशनाथ म्हणे आपणा मिळणी : आप पर दोन्ही बुडविली ।५।

अभंग : ३०७

चित्त हे चंचळ न राहेची स्थीर : नाम तुझे सार घेउ नेदी ।१।
मनाचे विकार उठती अपार : धैर्य आणि निर्धार धरू नेदी ।२।
निर्धारावाचोनी काही नव्हे जाण : निजमोक्षाची खुण तेणे बळे ।३।
सांडोनी अहंकार निजध्यास निरंतर : उतरावया पार हेची बापा ।४।
गणेशनाथ म्हणे मन जेथे विरे : तेची ते साचार तिन्ही लोकी ।५।

अभंग : ३०८

हिरीयाची खाणी सापडली ज्यासी : त्याचिया सुखासी पार नाही ।१।
काय काढीजेल समुद्राचे पाणी : तैसे नाम धणी न पुरेची ।२।
उगवता रवी प्रकाशा काय उणे : तैसे नाम रत्न घेता हाती ।३।
पाहाता तयासी न करवे मोल : सार्थक होईल या जिवासी ।४।
गणेशनाथ म्हणे भाग्ये सापडले : पूर्विचे फळले पुण्य बापा ।५।

अभंग : ३०९

जालिये दशेची दशा तेची केली : जाणता गोपाळ आपण तो ।१।
मीही झालो ऐसी बोलता महंती : लाज माझे चित्ति वाटे देवा ।२।
पूर्ण झालो ऐसे न कळेची मना : कर्ता नारायणा तुची एक ।३।
न कळे काही आम्हा तुझा तु जाणता : काय सद्‌गुरूनाथा बोलो तुज ।४।
गणेशनाथ म्हणे न कळे मज काही : चित्त तुझे पाई ठेवियेले ।५।

अभंग : ३१०

श्रेष्ट जे साधन न कळे आम्हासी : जे दिल्हे संतांसी तुवा देवा ।१।
कैसे हे वैराग्य साधन हे सांग : कठीन हा मार्ग कैसा देवा ।२।
कैसी भक्तिसिमा तेची द्‌यावी आम्हा : कैसे तुझे प्रेम आहे देवा ।३।
गणेशनाथ म्हणे दावी हे नव्हाळी : तोडु जन्मावळी तेणेबळे(तेणे बापा) ।४।

अभंग : ३११

नरदेही आयुष्य थोडी आहे मर्यादा : साधन गोविंदा कैसे करू ।१।

मनाचिया वोढी अनिवारू थोर : कैसा पैलपार पावविसी ।२।
संख्या नाही देवा माझीया जन्मासी : सखा भेटलासी सद्गुरूनाथ ।३।
गणेशनाथ म्हणे आता येक करी : अखंड अंतरी राहे देवा ।४।

अभंग : ३१२

किती जन्म मरण सोसावे या जिवे : सांगतसे भावे तुजपासी ।१।
चौऱ्यांशी फिरता कष्ट झाले जीवा : म्हणोनि तुझा धावा केला देवा ।२।
चुकवावी चौऱ्यांशिसी नको गर्भवासी : भक्ति निजध्यासी ठेवी मज ।३।
गणेशनाथ म्हणे टाकियेला भार : देवा तुजवर जन्मोजन्मी ।४।

अभंग : ३१३

सद्गुरू चरणाचा जयासी विश्वास : ते जाती पदास निजमोक्षाच्या ।१।
निर्गुणाचे गुण सद्भावे वर्णिता : मुक्ति सायुज्यता पाया लागे ।२।
सद्गुरूची सेवा करिता मनोभावे : चिरंजीव व्हावे तेणेबळे ।३।
गणेशनाथ म्हणे सद्गुरूसी नेम : हेची थोर वर्म सापडले ।४।

अभंग : ३१४

जिवी जिवन कळा जाणसी गोपाळा : भक्ताचा कळवळा तुज देवा ।१।
भवाचा हा सिंधु उतरिसी पार : हाची गा निर्धार आहे देवा ।२।
कठीन हा मार्ग कैसा उल्लंघावा : आधार तो देवा केला तुझा ।३।
गणेशनाथ म्हणे आता भय नाही : केला तुझे पाई अढळ ठाव ।४।

अभंग : ३१५

नामाविण साधन अनिक थोर नाही : नाम घेता पाही स्वये होये ।१।
नाम घेती तया न लगती सायास : सहज त्या देवास भेटी होये ।२।
ऐसे तुझे नाम जिवाचा विश्राम : नामे सर्व धर्म सहज घडे ।३।
गणेशनाथ म्हणे नाम मी गायिन : अंतरी पाहीन रूप तुझे ।४।

अभंग : ३१६

समर्थासी काही बोलवेना पाही : म्हणोनिया पायी ठेविला माथा ।१।
समर्थ भेटला काय त्या मागावे : जन्माचे सांगावे जन्म दु:ख ।२।
तुझी भेटी होता हरली सर्व चिंता : जेथे नाही वार्ता प्रपंचाची ।३।
गणेशनाथ म्हणे तुची सर्व साक्ष : सद्गुरू गोरक्ष कृपावंता ।४।

अभंग : ३१७

मनाचे विकार अनेक उठती : भावे भजन प्रिती घडो नेदी ।१।
चंचल हे मन न राहे एक क्षण : मग कैचे साधन परमार्थाचे ।२।
विकारीक देहे ठावे तुज आहे : जाणोनिया काये पाहसी भाव ।३।
गणेशनाथ म्हणे नाही भजन बळ : होई तु कृपाळ जाणोनिया ।४।

अभंग : ३१८

तिर्थी केले स्नान पाहे त्याची खुण : समुळी हे मन मावळले ।१।
तिर्थी खुण जाणे मावले कल्पना : भेटी नारायणा रोकडीची ।२।
काम क्रोध दंभ मावळे अहंकार : जिवाचे हे नुरे जिवपण ।३।
तरिच तिर्थी जावे तिर्थरूप व्हावे : सद्‌गुरूचे घ्यावे नाम एक ।४।
गणेशनाथ म्हणे सर्व तिर्थ खाणी : सद्‌गुरूचे चरणी सापडली ।५।

अभंग : ३१९

सद्‌गुरूची भक्ति सत्य धरा चित्ती : सायुज्यता मुक्ती तेची बापा । १।
सद्‌गुरूचे भजन तेची मुळीची खुण : अनिक साधन न कळे काही ।२।
सद्‌गुरूचे नाम तेची वर्म : हृदई धरूनी प्रेम ध्यात असे ।३।
सद्‌गुरूची सेवा तोची पूर्व ठेवा : नावडेची जिवा अनिक काही ।४।
माझा सद्‌गुरूनाथ तोची पूर्वदत्त : म्हणे गणेशनाथ नाम तुझे ।५।

अभंग : ३२०

निरंतर निवास सर्वस्वे उदास : त्याचिया पायास नमन माझे ।१।
गुरूनाथा वाचोनी दुसरे नाही मनी : तयाचे चरणी चित्त माझे ।२।
सद्‌गुरूवाचोनि नाही जया आस : त्याचिया पायास दंडवत ।३।
गणेशनाथ म्हणे ऐसा सत्य भाव : तुची माझा ठाव सद्‌गुरूनाथा ।४।

अभंग : ३२१

सत्य तुझे पाये मिराशी माझी खरी : जाणावी अंतरी सद्‌गुरूनाथा ।१।
लक्ष चौऱ्यांशी पिढ्या पायापासी : हे खुण जाणसी तुची एक ।२।
जन्मोजन्मिचा तुची माता पिता : तारी मज अनाथा शरण आलो ।३।
भूललो चुकलो भक्तिहिन झालो : जाणोनिया आलो मुळीच्या ठाया ।४।
गणेशनाथ म्हणे सर्व तुला ठावे : काय म्या बोलावे सद्‌गुरूनाथा ।५।

अभंग : ३२२

आत्मा अमर ऐसे ठावे अवघ्या जना : तरी का जन्म मरण भ्यावे बापा ।१।
मरणविण कोण्ही संताविण न तरे : ऐसे आहे खरे मुळीचेचि ।२।
आशा हे आन्नाची तव अडसरी मुळीची : तरी काय देहाची काकुळती ।३।
होणार न चुके ऐसे बोलती लोक : तरी का जन्म दु:ख वागवावे ।४।
गणेशनाथ म्हणे गुरूनाथ आसता : आम्हा काय चिंता या देहाची ।५।

अभंग : ३२३

सद्‌गुरूचे बोले तुमचे चरणी मिठी : आहे पोटासाठी तुमचे घरी ।१।
भाव तो भिकोबा संत तो संतोबा : आता एक प्रभा अंतोबाई ।२।
तुम्ही पाच जण सद्‌गुरू समान : वाहतसे आण आत्म्याची ।३।

नाना अलंकार आटीजेती मुशी : तैसे समरसी ऐक्य झाले ।४।
गणेशनाथ म्हणे सत्य ऐसा भाव : मूळ मिराशी ठावो तुमचे पायी ।५।

अभंग : ३२४

देवा तुझे चित्ती आहे ते करावे : परी एक ऐकावे वचन माझे ।१।
निजध्यास आणि भक्ति खंडना नको काही : चित्त तुझे पाई अढल करी ।२।
बहुत दिवस देवा तुज मागितले : नको पाहु केले पापपुण्य ।३।
देवा तु उदार तिन्ही लोकी साचार : चरण निरंतर ध्यावे तुझे ।४।
गणेशनाथ म्हणे हे तुज मागणे : अनिक सांगेन हितगुज ।५।

अभंग : ३२५

दुर्जनाचे चित्त दुष्टबुध्दीवरी : धर्म तो अंतरी विचारिना ।१।
वेडे भोळे भक्त अखंड द्वेषीत : पापाचे संचित जोड करी ।२।
आपणा भक्ति न घडे अनिकाची नावडे : दृष्टी पापाकडे सदा घाली ।३।
गणेशनाथ म्हणे ऐसीयाचे पाव : धोऊनिया प्यावे आत्मा म्हणोनी ।४।

अभंग : ३२६

माझी करूणा आली वैष्णवा ब्राह्मणा : तेणे नारायणा पाचारिले ।१।
ब्राह्मणांचे शब्दे कृपाळु तु हरी : हा भाव अंतरी सत्य माझा ।२।
ब्राह्मणाचे शब्दे ब्रह्मिची ओळखी : हेची सोय निकी सापडली ।३।
गणेशनाथ म्हणे वैष्णवा ब्राह्मणा : भजे त्याच्या खुणा पाहोनिया ।४।

अभंग : ३२७

धन्य हे पंढरी संतांचे माहेर : जिवाचा निर्धार सद्गुरूनाथ ।१।
परमार्थ सोयरा जोडलासे सखा : तोडीलासे धोका संसारिचा ।२।
संसाराचे संगे(अंगे) गोविले हे मन : अंती घडे जाणे नरककुंडा ।३।
गणेशनाथ म्हणे धन्य सद्गुरूनाथा : चरणी ठेविला माथा जन्मोजन्मी ।४।

अभंग : ३२८

देखिले तुझे पाय अनिक मागु काय : दाखविली सोय स्वानंदाची ।१।
देखिले तुझे मुख झाले सर्व सुख : हारपले दु:ख दुजेपण ।२।
झाली तुझी भेटी  हर्ष माझे पोटी : जन्ममरण गोष्टी दुरावल्या ।३।
गणेशनाथ म्हणे तुझ्याने पावन : पुन्हा नाही येणे गर्भवासा ।४।

अभंग : ३२९

सद्गुरूची भक्ति घडे ज्या नरासी : त्याचिया पुण्यासी पार नाही ।१।
सद्गुरूची कृपा पूर्ण जया वरी : तो एक संसारी धन्य बापा ।२।
सद्गुरूची सेवा घडली ज्या जिवा : जाणावा तो ठेवा प्रेम सुख ।३।
सद्गुरूची भक्ति जया होये प्राप्ती : नाही पुनरावृती गर्भवास ।४।

गणेशनाथ म्हणे तुझीये कृपेने : आता नाही येणे गर्भवासा ।५।

अभंग : ३३०

संसारी असता बहुत शिण झाला : भेटी दे विठ्ठला मायबापा । १।
संसार दुर्घट बहुत झाले कष्ट : लक्षीतसे वाट सद्गुरूनाथा ।२।
बहुत दिवसा भेटी अर्त माझे पोटी : सांगो गुजगोष्टी निजसुखाच्या ।३।
गणेशनाथ म्हणे तुझेनी पावन : नसे आता मन अन्य ठाई ।४।

अभंग : ३३१

पंढरीचे तारू आले या नगरासी : तारिल सकळांसी सद्गुरूनाथ ।१।
तुझिये कृपेने तरले सकळ : आठवा गोपाळ वेळोवेळा ।२।
आशाबंदी जिव आशा पूर्ण केली : गुरूनाथ माऊली आनाथाची ।३।
तुझीयेची घरी इच्छिले ते फळ : आहेसी कृपाळ सद्गुरूनाथ ।४।
गणेशनाथ म्हणे तुजविण नाही चाड : नाम तुझे गोड सद्गुरूनाथा ।५।

अभंग : ३३२

बहुत जन्माअंती झाली तुझी प्राप्ती : तुची माझ्या चित्ती सद्गुरूनाथा ।१।
चौऱ्यांशी फिरता कष्ट झाले आता : म्हणुनी सद्गुरूनाथा शरण आलो ।२।
बहु जन्मा शेवटी झाली तुझी भेटी : पातकांच्या कोटी जळुनी गेल्या ।३।
भेटीचि ती खुण नाही येणे जाणे : ऐसे तुझे देणे सद्गुरूनाथा ।४।
गणेशनाथ म्हणे समर्थ तु दाता : जन्मासी मागुता येवो नेदी ।५।

अभंग : ३३३

ब्रह्मज्ञानी म्हणती आमुची मिराशी : आपण कोण ऐसी सुचना नाही ।१।
म्हणती आमुचा गाव म्हणती आमुचा ठाव : म्हणती आमुचे नाव बहु थोर ।२।
म्हणती आमुचा मान म्हणती आमुचे धन : ऐसीया पावन होईल कोण ।३।
म्हणती माझी याती म्हणती माझे कुळ : सांडोनी सकळ जाणे अंती ।४।
गणेशनाथ म्हणे माझ्या सद्गुरूनाथा : नको गा सर्वथा दुजे दाउ ।५।

अभंग : ३३४

तुचि माझे मूळ तुचि याती कुळ : निजमोक्षाचे फळ तुचि माझा ।१।
तुचि माझा गाव तुचि माझा ठाव : तुचि माझे नाव सद्गुरूनाथा ।२।
तु तु म्हणता देव जिव उध्दरिती : मी मी म्हणता जाती अधोगती ।३।
तुचि माझा धनी तुचि जनिवनि : तुजविणे त्रिभूवनी दुसरा नाही ।४।
गणेशनाथ म्हणे समर्थ तु दाता : जन्मासी मागुता येवो नेदी ।५।

अभंग : ३३५

कैचा हा संसार जाईल कोठवर : मिथ्या भरोभर प्रपंचाचि ।१।
कैचा हा प्रपंच कैचे उंच निच : आहे ते ठाईचे नाम तुझे ।२।

कैची हेची काया कैची सर्व माया : अखंड सखया नाम तुझे ।३।
कैचे हेचि जन कैचे हे मीपण : अखंड नारायण म्हणता वाचे ।४।
गणेशनाथ म्हणे भावे आहे शरण : घेतले धरणे तुझे पाई ।५।

अभंग : ३३६

तु माझ्या संगती तुची आदी अंती : तुचि माझे चित्ती सद्‌गुरूनाथा ।१।
तुचि माझे मनी तुची माझे ध्यानी : तुचि जनिवनी सद्‌गुरूनाथा ।२।
तु माझ्या अंतरी तु माझ्या बाहेरी : तुझ्यानि संसारी पुण्यित झालो ।३।
गणेशनाथ म्हणे तु माझा जिवलग : सत्य तुझा संग सद्‌गुरूनाथा (गुरूदेवा) ।४।

अभंग : ३३७

म्हणता देव देव जाईना का जीव : हाची सत्य भाव तुज सांगे ।१।
म्हणता नारायण जाईना का प्राण : सत्य हे वचन तुच सांगे ।२।
करिता तुझी भक्ति सत्य आदिअंती : आहे माझे चित्ती हेची पाहणे ।३।
चिंतिता तुझे पाये पडेना का देहे : पाहणे मज आहे हेचि देवा ।४।
गणेशनाथ म्हणे चरणाचा निर्धार : तेणे उतरे पार भवसिंधुचा ।५।

अभंग : ३३८

गाईचिया वाडा वाघ जेवि बैसे : दुध ब्रह्मरस न कळे त्यासी ।१।
मारोनिया गाये उदरालागी खाये : अमृताची सोये न कळे त्यासी ।२।
गाईचे गोटणी तेथे तुझे राहणे : सांडुनी मीपण अमृत सेवी ।३।
गाई ब्राह्मणाचा जो दास गुरूचा : त्याचीया शब्दाचा विश्वास मज ।४।
गाई आणि ब्राह्मण जयाला पुजन : त्यांचे मी चरण अखंड ध्याई ।५।
गाई आणि वाघ येके माईची लेकुरे : सद्‌गुरू मुखे खरे करूनी घ्यावे ।६।
गणेशनाथ म्हणे सत्य तुझे नाम : पावलो विश्राम नामे तुझ्या ।७।

अभंग : ३३९

अखंड येक देई नाम तुझे चित्ती : नको गा संगती अभक्ताची ।१।
अभक्ती अहंकार आसता दारूण : तेथे काही पुण्य होउ नेदी ।२।
जेथे नाही पुण्य तेथे काय राहणे : लागवेगी जाणे आपुल्या ठाया ।३।
गणेशनाथ म्हणे हे तुज मागणे : कृपा आसो देणे सद्‌गुरूनाथा ।४।

अभंग : ३४०

सर्व तुझे जिव तुजची समान : मागतसे दान भक्ति तुझी ।१।
स्वप्नी आणि दृष्टि तुझेची स्वरूप : तुची मायबाप जोडलासी ।२।
तुझे भेटीसाठी झालो देहधारी : जाणावे अंतरी सद्‌गुरूनाथा ।३।
गणेशनाथ म्हणे आलिया संसारा : जोडला सोयरा सद्‌गुरूनाथ ।४।

अभंग : ३४१

तुजविण घेता अनेकाचे नाव : तरी न मिले ठाव तिन्ही लोकी ।१।
तुजविण पाहता अनेकाचे रूप : त्याहुनी पाप अनिक नाही ।२।
तुजविण करिता अनिकाचे चिंतन : त्रिशुध्दी पतन घडे त्यासी ।३।
तुजविण करिता अनिकाची भक्ति : तरी सर्व शक्ती विरूनी जावो ।४।
गणेशनाथ म्हणे हा माझा विश्वास : अखंड निजध्यास करितो तुझा ।५।

अभंग : ३४२

गुरूनाथावाचोनि अनिक काही चित्ती : रवरवाचे अंती पडो देहे ।१।
नाथा तुजविणे जरी बोले वचन : तरिच माझी जाण जिव्हा झडो ।२।
तुजवाचुनी जरी अनेक ध्याये मनी : तयासी धरणी नेदी ठाव ।३।
गुरूनाथा नामाचा सत्य आम्हा विश्वास : तुझा तु जाणसी पंढरीनाथा ।४।
गणेशनाथ म्हणे सत्य सद्‌गुरूनाथा : म्हणोनि तुज आता शरण आलो ।५।

अभंग : ३४३

दिधलिया दान मागुते घेवो नये : ऐसे सत्य आहे गुरू वाक्य ।१।
संकल्पिले दान मागुती नये घेता : ऐसे बोले गीता भागवत ।२।
ध्रुवासी अढळपद आपुले दिधले : नाही त्वा घेतले परतोनिया ।३।
हानुमंतासी ठाव आपुले पदी दिल्हा : नाही त्वा घेतला परतोनिया ।४।
ज्या ज्या तुम्ही दिल्हे नाही त्वा घेतले : नको पाहु केले पापपुण्य ।५।
गणेशनाथ म्हणे केली तुझी आस : अखंड निजध्यास करितो तुझा ।६।

अभंग : ३४४

का ग माझे देहे न पडे सर्वथा : आझुणी सद्‌गुरूनाथा करुणा न ये ।१।
सेवक म्हणोनि न घडे तुझी सेवा : तरी प्राण द्यावा तुझे पायी ।२।
सर्व माझा भार पडला तुजवर : तुझ्याने संसार गोड झाला ।३।
गणेशनाथ म्हणे तुझ्या भक्तिची आवड : नाही मज चाड संसारची ।४।

अभंग : ३४५

आम्ही नव्हो अतित आम्ही नव्हो मायातित : सकळाहुनी पतित नाव माझे ।१।
आम्ही नव्हो साधू आम्ही नव्हो भोंदू : अखंड ब्रह्मानंदु गुरूनाथाचा ।२।
आम्ही नव्हो जोगी आम्ही नव्हो योगी : अखंडीत संगी गुरूनाथाच्या ।३।
आम्ही नव्हो संत आम्ही नव्हो महंत : अखंडीत चित्त तुझे पाई ।४।
गणेशनाथ म्हणे तु माझे जिवन : तुजविण सज्जन अनिक नाही ।५।

अभंग : ३४६

गाढवा घोडियाचे बांधियेले पाये : पळताती पाहे म्हणोनिया ।१।
गाई वासुरासी लावियेले दावे : चुकली भक्तिभाव म्हणोनिया ।२।
आपेटी पाड्यासी घातलिसे जोड : अवघड वोढ म्हणोनिया ।३।

येकमेका जिवाचे गेले आसती कान : करिताती अपमान म्हणोनिया ।४।
येकमेका जिवाचे गेले आसती हात : नाही घडली भक्ति म्हणोनिया ।५।
येकमेका जिवाचे गेले आसती डोळे : घेतलेसे भोळे म्हणोनिया ।५।
ऐसे हे गा जन भूलले या सुखा : पावताती दु:खा म्हणोनिया ।६।
गणेशनाथ म्हणे या दु:खाकारणे : घेतले धरणे पायी तुझ्या ।७।

अभंग : ३४७

गाव आणि ठाव मिराशी जोडावी : म्हणविता गोसावी लाज नाही ।१।
स्त्रिया पुत्र धन सर्वस्वे आसावी : म्हणविता गोसावी लाज नाही ।२।
गाई घोडे म्हसी सर्वस्वे पाळावी : म्हणविता गोसावी लाज नाही ।३।
गणेशनाथ म्हणे जालोसे निर्लज : सर्व सुख सहज तुची माझे ।४।

अभंग : ३४८

देही देव आहे न कळे करू काय : म्हणोनि तुझे पाय धरिले जिवी ।१।
देही देव आहे न कळे त्याची माव : ऐसा कैचा भाव धरू त्यासी ।२।
देहीची आसोनी न कळे त्याची खुण : तुझा तु आपण सर्वा ठाई ।३।
गणेशनाथ म्हणे पुरोनी उरला : तोची आम्हा झाला मोक्ष दाता ।४।

अभंग : ३४९

ऐकुनी तुझी मात जालोसे पतित : तुजविण माझे हित करिल कोण ।१।
सांडोनी लोकिक नाम जपे एक : घेऊ निजसुख जन्मोजन्मी ।२।
सांडोनि आभिमान जालो आसे दीन : तुजविण कोण तारी मज ।३।
गणेशनाथ म्हणे तुज सांगु देवा : माझा पूर्व ठेवा तुची एक ।४।

अभंग : ३५०

बोलता चालता दिवस गेले आता : भक्ति सद्‌गुरूनाथा न घडे मज ।१।
येवोनि संसारी झालो भुमीभार : मिथ्या हा संसार गमाविला ।२।
माप लागले संसारा वेगी पावे करुणाकरा : तु माझा सोयरा जिवलग ।३।
गणेशनाथ म्हणे बहुत दिवस झाले : सांभाळी पहीले वचन तुझे ।४।

अभंग : ३५१

मृत्तिकेचा घट मृत्तिकेवरी मांडीला : अंतरी भरला आत्माराम ।१।
माया हेची माळा आयुष्याचा दोरा : धन्य तु कर्तारा तुझे हाती ।२।
आठराही पुराणे तेची अठरा धान्ये : प्रेमाचे जिवन आहे त्यासी ।३।
दया हे दसरा सत्य तुम्ही करा : तेणे चुके फेरा चौऱ्यांशीचा ।४।
भक्ति हे भगवती अखंड आवडे चित्ती : ते पाहे भेटती देवासवे ।५।
नवविधा भक्ति तेची नवरात्र : करिता पवित्र होती जीव ।६।
अखंड निजध्यास पाहे ज्ञानदिप : तेची गा स्वरूप सद्‌गुरूचे ।७।

गणेशनाथ म्हणे यापरी शरण : गुरूकृपे पावन अक्षयपद ।८।

अभंग : ३५२

विंगळाचे शेजे निवांत केवि निजे : संसारी निजगुज केवि साधे ।१।
मातिची ही नाव उदकी केवि तरे : संसारी निजसार केवि साधे ।२।
वाघाचिये घरी गाईची ही वस्ती : वाचावया गति कैची तेथे ।३।
सिंहाचिया वाडा गजाचि मिराशी : वाचावया त्यासी ठाव कैचा ।४।
गणेशनाथ म्हणे सद्‌गुरू तारक : जनि वनि देख सर्वा ठाई ।५।

अभंग : ३५३

झाकिलिया डोळे सर्व अंध:कार : उघडिल्या सार ब्रह्मरूप ।१।
अमृतसागरी प्राशन न करी : काये वानु थोरी पातकाची ।२।
कल्पतरूचे तळी बसळी दातखिळी : कल्पनेचे मेळी पडिला आसे ।३।
आलिया जन्मासी न भजे देवासी : ते जाणा मिराशी नरक कुंडी ।४।
गणेशनाथ म्हणे तैसे नको देवा : घडो तुझी सेवा जन्मोजन्मी ।५।

अभंग : ३५४

येथे(तेथे) नाही जन आवघा नारायण (जनि जनार्धन) :
या भावे पावन परमपद(ब्रह्मपद) ।१।
येथे नाही लोक आवघे हरिसुख : हरपले दु:ख या जन्माचे ।२।
येथे नाही दुजे सांडी सर्व लाज : भक्तिभावे सहज शरन जावे ।३।
गणेशनाथ म्हणे नाही मी आपण : आवघा नारायण विस्तारला ।४।

अभंग : ३५५

प्रेम प्रितीकरूनि नाम मी गाईन : अंतरी पाहीन रूप तुझे ।१।
सर्वात आससी हित माझे करिसी : म्हणोनि चरणासी दृढ मिठी ।२।
अंतरी पाहता तुची सद्‌गुरूनाथा : चरणावरी माथा ठेवियेला ।३।
गणेशनाथ म्हणे आवडी माझे चित्ती : देई तुझी भक्ति जन्मोजन्मी ।४।

अभंग : ३५६

आलिया संसारी आत्महित करी : जन्मा नाही उरी ऐसे केले ।१।
तुझीया प्रसादे पावलो या सुखा : तुजविण सखा अनिक नाही ।२।
समर्थ म्हणोनि शरण तुज आलो : भक्तिलागी झालो देहधारी ।३।
गणेशनाथ म्हणे भक्ति तुझी देई : न मागेची काही अनिक तुज ।४।

अभंग : ३५७

देवा नारायणा आले तुझ्या मना : जिवीच्या जीवना सद्‌गुरूनाथा ।१।
सर्व माझी माया तोडिली सखया : तारी देवराया शरण आलो ।२।
प्रपंचाचे जाळे तोडिले गोपाळे : केलेसे मोकळे तिन्ही लोकी ।३।

पाहियेले मन केलेसे निधान : तुज जरी सांडीन आण तुझी ।४।
गणेशनाथ म्हणे तोडीले बंधन : अंति नाही येणे गर्भवासा ।५।

अभंग : ३५८

धर्म बुडविला तरिच पाऊस गेला : सांगावे कोणाला काय आता ।१।
न करी अन्नदान न पिके भूमी जाण : करावे गा कोण्हे काय यासी ।२।
विसरले हरि म्हणोनि आलि मरि : आता कोण तारी या जीवासी ।३।
असत्य घेती लोक म्हणोनि राजीक : कोण देईल सुख या जिवासी ।४।
गणेशनाथ म्हणे नाही केली सेवा : तरिच गा देवा करुणा न ये ।५।

अभंग : ३५९

वृक्ष उन्मळता छाया कैची उरे : तैसा निराकार आकारेसि ।१।
देहे पात होता आत्मा कैचा उरे : तैसा निराकार आकारेशी ।२।
नसता उदक कैचा हा विस्तार : तैसा निराकार आकारेसि ।३।
गणेशनाथ म्हणे समता तुझे भक्त : नाव रूप मात कैची तुज ।४।

अभंग : ३६०

संसारिचे सुख दाखविसी आम्हा : परि तुझ्या नामा न विसंबे ।१।
संसारिचे सुख दाउ नको देवा : सद्भाव या जिवा देई तुझा ।२।
संसारिचे सुख दाउ नको दृष्टि : अंतरी गा भेटी देई तुझी ।३।
देवा तुझे सुख दावी येके वेळा : प्रेमाचा जिव्हाळा देई तुझा ।४।
गणेशनाथ म्हणे पाहता तुझे रूप : हरती त्रिविध ताप तेणे माझे ।५।

अभंग : ३६१

पुत्रासी बंधन पितीया गती कोण : तैसा नारायण निजभक्तासी ।१।
लोभीयाचे धन हारपल्या जाण : तैसा नारायण निजभक्तासी ।२।
तान्हेळीया जीवन न मिळता जाण : तैसा नारायण निजभक्तासी ।३।
गणेशनाथ म्हणे भक्ता गर्भवास : तव या देवास सुटका नव्हे ।४।

अभंग : ३६२

समर्थाचे श्वान गांजु शके कोण : देखताची प्राण घेउ पाहे ।१।
येकुलता येक पुत्र राजियाचा : गांजिता तयाचा प्राण घेती ।२।
राजयाची नारी पदरी कोण धरी : वाचावया उरि कैची त्यासी ।३।
गणेशनाथ म्हणे तैसे तुझ्या भक्ता : कोण करी सत्ता आम्हावरी ।४।

अभंग : ३६३

पर्वताचा भार काय झाला भूमीवर : कि बहु उदका सागर कंटळला ।१।
बहु पुत्रा जननी टाकु सके वनि : कि या जना दिनमणी कंटाळला ।२।
वृक्ष विस्ताराचा काय होय भार : कि लोभीया श्रृंगार जड होये ।३।

गणेशनाथ म्हणे जैसा तु आम्हासी : झणी मोकलिसी सद्गुरूनाथा ।४।

अभंग : ३६४

पाप आणि पुण्य केले आसे कोणे : दे का निवडोन सद्गुरूनाथा ।१।
आवघे तुझे हाती पुराणे बोलती : तरी का पाविजेती नरकपात ।२।
सर्वस्व देवाचे ऐसे आहे साचे : आम्ही पदरिचे काय केले ।३।
स्वर्ग नरक भोग तुची भोगविसी : तुझे हे कवणासी सांगो देवा ।४।
गणेशनाथ म्हणे तुजेची आधीन : वांछीले ते जाण करी बापा ।५।

अभंग : ३६५

देवाचिये घरी काय आहे उणे : करिता तो आपण अंगे होये ।१।
बहुरूपियाचे सोंग आपण झाले : सत्तेनेची चाले तयाचिया ।२।
तैसा हा संसार तुझीये सत्तेने : तुझा तु आपण सत्ताधारी ।३।
गणेशनाथ म्हणे आम्हा नाही चिंता : समर्थ तु दाता सद्गुरूनाथ ।४।

अभंग : ३६६

पाहता वैराग्य हिरीयाचे आगर : काय त्यात सार निवडावे ।१।
तैसा हा संसार तुजपासोनी देवा : सद्भाव या जिवा काय उणे ।२।
जिवाचे निधान नाम तुझे जाण : होईल सोडवन येके वेळे ।३।
गणेशनाथ म्हणे येता काकुलती : राहे माझे चित्ती सद्गुरूनाथा ।४।

अभंग : ३६७

पुण्य फळा आले दर्शन तुझे झाले : या जन्माचे गेले पाप देवा ।१।
तुजसी भेटता हरली सर्व चिंता : संसाराचि वार्ता विसरलो ।२।
करिता तुझी भक्ति हर्ष माझे चित्ती : मुळीचि संपत्ती सापडली ।३।
जन्मोजन्मी देवा वानु तुझी किर्ती : अनिक काही चित्ती नावडेची ।४।
गणेशनाथ म्हणे चरणी द्यावा ठाव : हाची माझा भाव जाणसी तु ।५।

अभंग : ३६८

तुझे गुण गाता हर्ष माझ्या चित्ता : तुजविणे सर्वथा अनिक नाही ।१।
प्रेमाचा जिव्हाळा तेची प्रेमकळा : हृद्यावेगळा न करी तूज ।२।
जीवा आदि अंती तुझा तु सांगती : कवणा काकुलती येईल माझी ।३।
गणेशनाथ म्हणे चित्त तुझे पायी : तुजवीन नाही अनिक बापा ।४।

अभंग : ३६९

या दु:खापासोनी कोण सोडविल : कृपाळू होईल देव जरी ।१।
देहीचे हे दु:ख बहुत झाले देख : तुजविणे सुख देईल कोण ।२।
जन्म मरण दु:ख बहुत सोसिले : जिवित्व विकीले तुझे नामे ।३।
मारी अथवा तारी तुझीये आधारी : तुजविण संसारी अनिक नाही ।४।

गणेशनाथ म्हणे तुज आलो शरण : चुकवी जन्म मरण मायबापा ।५।

अभंग : ३७०

सुर्यापासोनी किर्णे मृतिके पासुनी सुवर्ण : तैसे तुजपासुन सर्वही जीव ।१।
अलंकार सुवर्णाचा की तरंग उदकाचा : तैसा जीव देवाचा संदेह नाही ।२।
मेघापासुनी जळ की वृक्षापासुनी फळ : तैसे तुजपासुनी मूळ सकळांचे ।३।
गणेशनाथ म्हणे तुजपासोनि देवा : उध्दरी या जीवा शरण आलो ।४।

अभंग : ३७१

लोकिकी बोलता काय हित आता : तुझे गुण गाता सुख होये ।१।
जनाचे संगती कैसी होईल गती : तुझे नाम चित्ती धरिले देवा ।२।
लोकिकाचा संग दु:खाचा तो भोग : भक्ति आणि वैराग्य देई मज ।३।
गणेशनाथ म्हणे नि:संग करावे : चित्ती तुवा राहवे रात्री दिवस ।४।

अभंग : ३७२

काकुलती येतो मागतो गा तुज : जाणसी तु गुज हृदईचे ।१।
भाव आणि भक्ति देई गा श्रीपती : ऐकावी विनंती येके वेळे ।२।
ज्ञान आणि वैराग्य देई हे सौभाग्य : अनिक तुजा संग अखंडीत ।३।
गणेशनाथ म्हणे तुझीये संगती : पावेन विश्रांती जन्मोजन्मी ।४।

अभंग : ३७३

बहुत सायासी आलो तुजपासी : सांभाळी वचनासी आपुल्या देवा ।१।
माता आणि पिता बंधु आणि जन : सर्वस्वे सांडोन शरन आलो ।२।
सांडोनिया लाज जालोसे निर्लज्ज : वंदितसे सहज सर्व जीवा ।३।
देखताची जन घाली लोटांगण : देवा तुजकारणे सद्‌गुरूनाथा ।४।
गणेशनाथ म्हणे आता तरी मज : अंतरिचे गुज सांगे देवा ।५।

अभंग : ३७४

नाम हेची ध्यान नाम हे धारण : नाम दान पुण्य हेची माझे ।१।
नाम हेची वेद नाम हेची सिध्द : नाम हेची भेद स्वरूपाचा ।२।
आलिया संसारी म्हणा का रे नाम : तेणे निजधाम प्राप्त होये ।३।
नाम हेची जप नाम हेची तप : नाम हे स्वरूप पाहे डोळा ।४।
नाम हेची भक्ति नाम हेची मुक्ती : नामे निज शांती पाविजेत ।५।
नाम हेची धर्म नाम हेची नेम : नाम हे परब्रह्म सत्य बापा ।६।
नाम हेची बोध नाम हेची शब्द : नाम आनादी सिध्द सत्य बापा ।७।
नाम हेची धन नाम हेची मन : नामेची पावन होईजेत ।८।
नामची आकार नाम निराकार : नामे पैलपार पाविजेत ।९।
नाम हेची गुरू नाम हेची तारू : नाम हे साचारू धरिले जीवी ।१०।

नाम हेची आत्मा नाम हा परमात्मा : नाम निजधामा पाववित े ।११।
नाम हे सगुण नाम हे निर्गुण : नामे सर्व जन उध्दरती ।१२।
गणेशनाथ म्हणे नाम जेथे नाही : तेथे आपण काय बोलावया ।१३।

अभंग : ३७५

देवा तुज कारणे सांडिला संसार : करिसी उध्दार म्हणोनिया ।१।
सांडोनिया जन सांडोनि आभिमान : आलो तुज शरण सद्गुरूनाथा ।२।
सांडोनि लोकिक सांडोनि सर्वसुख : करी नाम घोष रात्री दिवस ।३।
गणेशनाथ म्हणे सर्वस्वे उदास : अखंड निजध्यास करितो तुझा ।४।

अभंग : ३७६

पुढे गेले थोर नाही त्या गणती : आम्हा तेची गती आहे बापा ।१।
किती आहे नेणो आयुष्य मर्यादा : आठवावे सदा हरिचे नाम ।२।
या कारणे आम्ही आलो या संसारी : जोडला सोयरा सद्गुरूनाथ ।३।
आलिया जन्माचे सार्थक होये जेणे : तुझे नाम केणे भरियेले ।४।
गणेशनाथ म्हणे तुझ्याने पावन : करी उध्दरण सद्गुरूनाथा ।५।

अभंग : ३७७

आता माझे चित्त गोउ नको कोठे : मागणे गा मोटे हेची तुज ।१।
विषयाचे घात घालु नको वरी : मागणे संसारी हेची तुज ।२।
आता गोउ नको आपुल्या दासासी : मुळीची मिराशी तुझे पायी ।३।
संसारापासोनी करी सोडवण : तोडी हे बंधन कल्पनेचे ।४।
गणेशनाथ म्हणे ब्रिद तुझे खरे : करी बा उध्दार पतिताचा ।५।

अभंग : ३७८

विचारूनी बोलता काळ जातो आता : माझी सर्व चिंता तुज बापा ।१।
क्षणो क्षणा तुझा न पडावा विसर : तुझी प्रिती थोर देई मज ।२।
प्रितीचा पडीभार झाला असे थोर : साराचे निजसार नाम तुझे ।३।
प्रेमाचे हे दान दे मजलागुन : मोक्षाचे साधन तुझे नाम ।४।
गणेशनाथ म्हणे देई तुझे ध्यान : तेणेची पावन करी बापा ।५।

अभंग : ३७९

धनाची हे जोडी जरी तु जोडीसी : तरी धनवंतासी काय उणे ।१।
आभिमाने जोडी नव्हेची देवाची : म्हणोनि जिवाची साटी केली ।२।
शास्त्रे हे पुराणे करिता आभ्यासन : परी भक्तिविण नव्हे भेटी ।३।
सर्व माझा भार टाकीला तुजवरी : आता नाही उरी ठेवियेली ।४।
गणेशनाथ म्हणे किती पाहसी अंत : काया वाचा चित्त तुझे पायी ।५।

अभंग : ३८०

देवाविण तुज तरी नाही म्हणावे : ब्रिद हे सोडावे पावन ऐसे ।१।
दीन उध्दरण करावे हे कोणे : दे का निवडोन पंढरीनाथा ।२।
मरण आथवा जिणे दोहीमधुनी येक : तेथोनिया सुख झाले देवा ।३।
तुजसी मागणे हे तो लाजीरवाणे : कठिण तुझे मन कळले देवा ।४।
गणेशनाथ म्हणे अंतरी निवांत : आहे सर्व हित तुझे पायी ।५।

अभंग : ३८१

प्रपंची आसता आम्हा नाही सत्ता : तुजविण बोलता लाज वाटे ।१।
काही दान पुण्य घडले नाही ध्यान : करी उध्दरण काय बोलु ।२।
केली नाही भक्ति धरिली नाही शांती : कैसी तुझी प्राप्ती होये देवा ।३।
भावभक्तिविण नव्हे उध्दरण : देव तो सज्जन कैसा होये ।४।
गणेशनाथ म्हणे सद्गुरू तारक : शरणांगता देख उध्दरितो ।५।

अभंग : ३८२

कृपाळु म्हणोनि ऐकिले हे मात : म्हणोनि माझे चित्त उदासले ।१।
शरणांगता देव झणी मोकलिसी : तेव्हा त्या ब्रिदासी येईल बोल ।२।
पतिता तारिन ऐसे बोलसी आपण : साक्षी गा पुराणे आहेत बापा ।३।
घातले जन्मासी तुची उध्दरसी : निश्चय मनासी हाची बापा ।४।
उध्दरिना कोण्ही गुरूनाथावाचोनी : पाहता त्रिभूवनी हेची दिसे ।५।
जिवा उध्दरण नवल याचे कोण : नव्हेसी पिसुन मायबापा ।६।
गणेशनाथ म्हणे नाही भिन्न भेद : तुज मज संवाद मुळिचाची ।७।

अभंग : ३८३

विख आणि अमृत केलेसे देवाने : विष घेता मरण येते बापा ।१।
अमृत प्यालिया अमर होती जीव : या आर्था संदेह नाही बापा ।२।
ऐसे हे जाणोनी वेगी सावध व्हावे : शरण येका भावे नारायणा ।३।
देवासी शरण ऐसे भाग्य कोण : करी निवारण जन्म दु:ख ।४।
गणेशनाथ म्हणे शरण आलो तुज : अंतरिचे गुज तुजपासी ।५।

अभंग : ३८४

चौऱ्यांशीचे जीव अनंत अपार : परी नाही विचार निजमोक्षाचा ।१।
विषयाचे सुखे भूलले हे लोक : निवारिल दु:ख कोण त्यांचे ।२।
देवा विसरणे हाची दोष जाण : धिग्य जाले जीणे संसारिक ।३।
आठवावा देव धरूनी एक भाव : संसार हा वाव होये जेणे ।४।
गणेशनाथ म्हणे काय हा संसार : तुजविण थोर अनिक नाही ।५।

अभंग : ३८५

पूर्विचा जो अंश तरी घडो निजध्यास : मिळणी देवास तरिच होये ।१।

पुण्याचे सुकृत साचले बहुत : तरिच सद्गुरूनाथ कृपा करी ।२।
शुध्द ज्यांचे पुण्य शुध्द ज्यांचे मन : तरिच दर्शन होये त्यासी ।३।
पूर्विचा जो भक्त तोची करिल हित : पावता निजपंथ विलंब नाही ।४।
गणेशनाथ म्हणे पुर्विचे हे पुण्य : तरिच तु सज्जन जोडलासी ।५।

अभंग : ३८६

संताच्या पादुका धरिल्या डोईवरी : जाणसी ते करी पंढरीराया ।१।
संतांचे उचिष्ट साटविले पोटी : नाम धरिले कंठी तुझे देवा ।२।
संतांचे जे तिर्थ तेची माझे हित : सेविता पतित उध्दरती ।३।
आता दंडवत समस्त जनासी : सांगावी देवासी करुणा माझी ।४।
गणेशनाथ म्हणे येतो काकुळती : दया  भाव चित्ती आसो द्यावा ।५।

अभंग : ३८७

येक देव पाहता समाधान चित्ता : अनिक ते वार्ता स्वप्नी नेणो ।१।
आत्माराम एक आहे सर्वा ठाई : दंडवत पाई केशवाचे ।२।
झाले येकपण सद्गुरू कृपेने : काये मी अज्ञान बोलु आता ।३।
काय आता बोलु नेणता हे गोष्टी : जेणे उपजे पोटी कृपा तुज ।४।
गणेशनाथ म्हणे तुझी कृपा थोर : उतरावया पार तुची एक ।५।

अभंग : ३८८

येक तुझे नाम धरिले जिवी : अनिक ठेवा ठेवी न कळे मज ।१।
सत्य गुरूवाक्य सांगितले कानी : विश्वास हा मनी तोची बापा ।२।
तुजवाचुनी देवा न कळे सर्वथा : चित्ताचा जाणता तुची एक ।३।
तुजवाचोनि देवा पाहियेले नाही : आहे सर्व काही तुज ठावे ।४।
गणेशनाथ म्हणे न कळे मज काही : तुची बाप माय सद्गुरूनाथा ।५।

अभंग : ३८९

पाहा तो प्रल्हाद नामाविणे नेणे : त्यासी काय उणे झाले होते ।१।
पाहा पुंडलिक करी चरण सेवा : अनिक त्याच्या जीवा नावडेची ।२।
पाहा तो नारद गाये हरिगुण : त्यासी नारायण कृपा करी ।३।
ऐसे तुझे नाम तिन्ही लोकी तारक : उच्चारिता देख सुख झाले ।४।
गणेशनाथ म्हणे तुझे नाम गाता : नाही भय चिंता संसाराची ।५।

अभंग : ३९०

देवाविण कोण्ही अनिक नाही मना : विचार अनुमान नको करू ।१।
ज्यापासोनी झाल्या पाहे च्यार्‍ही खाणी : नका करू वाणी नाम घेता ।२।
सर्वस्वे जिवाला पाळिता पोसिता : आठवा त्या आनंता वेळोवेळा ।३।
आठविता देव उध्दरती जीव : आदि अंती ठाव तोची एक ।४।

गणेशनाथ म्हणे करुणेची उत्तरे : करी आता खरे पंढरीनाथा ।५।

अभंग : ३९१

या जन्मा येउनी घडले नाही ध्यान : काही दान पुण्य केले नाही ।१।
हिन माझी याती पाहता हे कुळ : दाता तु कृपाळ पंढरीनाथा ।२।
पूर्वीचे सुकृत कळली नाही मात : कळेल तैसे हित करी माझे ।३।
आधि काय होतो कळले नाही मज : जाणसी तु गुज अंतरीचे ।४।
गणेशनाथ म्हणे काय सांगु देवा : पूर्वदत्त ठेवा तुची माझा ।५।

अभंग : ३९२

वेदशास्त्र श्रुती जयाला वानिती : त्याच्या पायाप्रती लोटांगण ।१।
संसार हा सिंधु मंथोनी मन्मथ : माजी जिवन मुक्त श्रीगुरूचे ।२।
चंद्र सूर्य पवन तुझीये सत्तेने : नाम नारायण बोलविता ।३।
गायीन गुण किर्ती संताचे संगती : गणेशनाथ भक्ति पूर्ण करी ।४।

अभंग : ३९३

तुझे गुह्यज्ञान नेणे मी आज्ञान : शरण आलो दीन उध्दारावे ।१।
सर्वापरी हिन शुध्द नाही याती : न कळे भावभक्ती निर्धारेसी ।२।
यावरी विकल्प विषय आचरण : एकनिष्ठा न घडे काही ।३।
संत सेवा पूर्ण सद्गुरूची कृपा : गणेशनाथ सोपा मार्ग झाला ।४।

अभंग : ३९४

धन्य हा सद्गुरू सोडवी अहंकार : निरशी हा संसार नाममात्रे ।१।
ज्याचेनी उपदेशे जळे सर्व माया : तया श्री गुरूराया उपमा नाही ।२।
विरक्ती निवृती शांती आत्मस्थिती : सायुज्यता प्राप्ती ब्रह्मसुख ।३।
शोक मोह चिंता विकल्प जाळणे : आत्मज्ञाने ज्ञान पूर्ण करी ।४।
ऐस्या सद्गुरूनाथा नव्हे उत्तिर्णता : गणेशनाथ सरता ऐक्य केला ।५।

अभंग : ३९५

म्हणविता भक्त लाजेना चित्त : प्रपंची हो व्याप्त सर्वापरी ।१।
गाव नाव ठाव म्हणे माझे थोर : स्त्रिया पुत्र फार आवडे धन ।२।
टिळे माळा टोपी कुंडले झळाळ : यावरी गोंधळ गायनाचा ।३।
गणेशनाथ म्हणे समता भक्ति : तववरी फजिती आवघे सोंग ।४।

अभंग : ३९६

राग स्वर अर्थ आरंभी किर्तन : धनालागी मन ठेवोनिया ।१।
वस्त्रे अलंकार पाहिजे भूषणे : धनवंता सन्मान प्रिये ज्यासी ।२।
यावरी लोकिक मीची एक थोर : मग आवघे किंकर म्हणती संत ।३।
गणेशनाथ म्हणे न कळे आवघा देव : तवरी त्याचा वाव संसारिक ।४।

अभंग : ३९७

जनासवे आम्हा नाही प्रयोजन : आपुले आपण करू हित ।१।
मुंगी आणि गज राजा रंक सहज : समचरण गुज सर्व मानी ।२।
येकला आपण आदि अंती पाहता : अनिकांची वार्ता बोलो नये ।३।
निष्कळ परब्रह्म निर्गुण निरामय : गणेशनाथ सोय स्वरूपाची ।४।

अभंग : ३९८

येकलाची अंती येता आणि जाता : आदि अंती पाहता दुसरा नाही ।१।
जाणोनिया संग त्यागी सर्वस्वाचा : सोयरा जिवाचा पाहे वेगी ।२।
निष्काम निवृती भजन करी भक्ति : दया सर्वाभूती पाहे देव ।३।
ऐसिया उपाये वैकुंठासी जावे : गणेशनाथ नाव काय तेथे ।४।

अभंग : ३९९

योगी वितरागी विवेकी वैरागी : आवडे संतसंगी समसेवा ।१।
विश्वास विचार विदेही विरक्त : त्याहीवरी भक्ती निर्धारेसी ।२।
आवघा देव एक जाणे आत्मसुख : याहीवरी चोख भजनशील ।३।
गणेशनाथ म्हणे ऐसे जाणे वर्म : स्वये परब्रह्म तोची होये ।४।

अभंग : ४००

प्राप्तीचे लक्षण सांगे नारायण : अनन्यशरण समसेवा ।१।
सर्वाभूती देव जाणोनी आपण : करी लोटांगण प्रेम भावे ।२।
माता पिता गुरू देव आणि ब्राह्मण : आवडे किर्तण संतपुजा ।३।
उदकाचिये परी सर्व उपकारी : एकनिष्ठ करी निजध्यास ।४।
रिध्दी सिध्दी मुक्ती नावडेची चित्ती : गणेशनाथ प्राप्ती सद्‌गुरू पायी ।५।

अभंग : ४०१

सागरा आवडी नाही सरितेची : मर्यादा देवाची उलंघिना ।१।
अग्निचिये माथा जे जे कांही पडे : ते ते आपणांकडे जाळी जैसे ।२।
भूमिका सर्वांसी कंटाळते काय : परोपकारी पाहे मेघ जैसा ।३।
ब्रह्मज्ञान खुण सांगता नरासी : गणेशनाथा रासी पुण्याचिया ।४।

अभंग : ४०२

लहाण थोर देहे वैभव विषम : परी आत्माराम सर्वांघटी ।१।
परी भूमी सारिखे होत असे पीक : घटी जळ देख नून्य पुर्ण ।२।
तैसी प्रकृती अनंत जिव्हाला : पाहता भेद झाला गर्भवास ।३।
म्हणोनिगा सर्व देवरूप पाहे : गणेशनाथ राहे सद्‌गुरूपायी ।४।

अभंग : ४०३

जेथे ज्याचा भाव तोची त्याला देव : म्हणता नाथ काय लाभ ।१।

काय जाणो कोन्हा भजने होती भेटी : वेदशास्त्र गोष्टी नाही प्राप्ती ।२।
बीज एक तरू विस्तार अपार : जाणती निर्धार गुरू पुत्र ।३।
मंथोनि नवनित काढी निज सार : गणेशनाथ वर सद्‌गुरूचा ।४।

अभंग : ४०४

बहुत दिवस झाले सांगा सद्‌गुरूनाथा : विनवितो समर्था संत जना ।१।
परदेसी पतित पापी पडिलो पाही : मोकलिता काही उचित नोहे ।२।
अनंत जन्मी देवा केली चरणसेवा : मनुष्य देही देवा भेटी तुझी ।३।
भिकबळे तुझा केलासे आवाका : गणेशनाथ येका येक तुची ।४।

अभंग : ४०५

ज्याची ब्रिदावळी तिन्ही लोकी आगळी : बरा केला बळी द्‌वारपाळ ।१।
वेद शास्त्र श्रुती जयाला वानिती : तो सांगे गीता पांडवांसाठी ।२।
जिवाचे जिवन योगीयांची शोभा : बरा केला उभा पुंडलिके ।३।
अष्टोत्तरशे तीर्था जन्म जया पाई : तोची वळी गाई गवळ्यांच्या ।४।
भावबोधे देवा जिवे करू साटी : गणेशनाथ भेटी अखंडीत ।५।

अभंग : ४०६

गुरूपदी आम्हा अक्षय मिराशी : समुळ पायासी गाव कोस ।१।
निरंजनी माया तेची माळवद : सिंहासनी बोध बैसावया ।२।
गगणाचा चांदवा तारांग फुलवरा : चंद्र सुर्य खरादी वटिकर ।३।
मेघ वाहे पाणी वायु करे भक्ती : गणेशनाथ प्राप्ती सद्‌गुरू कृपा ।४।

अभंग : ४०७

काया कांती नगर मन हेची मंदिर : वासना निरंतर निरंजनी ।१।
आकल्पीत आहार प्रेम जिवन पाणी : निद्रा निरसुनी निद्रा केली ।२।
प्राण पाच ग्रहस्त पवन पुण्य पारी : अक्षय चवर धरी आत्माराम ।३।
नव दारवटे अनिक गुप्त वाट : गणेशनाथ भेट गुरूपाई ।४।

अभंग : ४०८

केळी आणि बोरी गाई आणि व्याघ्र : भजन आणि संसार तैसे परी ।१।
साहाण आणि चंदन तृण आणि अग्नि : साधू आणि जनी तैसेपरी ।२।
अमृत आणि विख सुख आणि दु:ख : संत आणि लोक तैसेपरी ।३।
द्‌वैत दुर्जनाचा सांडोनिया संग : गणेशनाथ मार्ग सद्‌गुरूचा ।४।

अभंग : ४०९

येकनिष्ठ भाव नाम येक देव : येकी येक पाहे सर्व काही ।१।
हणुमंतासी राम अनुसये पतिधर्म : नंदिसी जैसा नेम ईश्वरासी ।२।
जैसा तो दिनकर आवघ्या जना येक : तैसा आत्मा देख देहामाजी ।३।

येक हे अनेक अनेकाचे येक : गणेशनाथ सुख सद्‌गुरू पाई ।४।

अभंग : ४१०

निंदा आणि स्तुती मानी येक्यारिती : सुख दु:ख चित्ती न धरी काही ।१।
लाभ आणि हानी बरे वाईट दोन्ही : सम सर्व मनी सहज सुखे ।२।
न मानी लहानथोर थोडे अथवा फार : राजा रंक सारे सम मानी ।३।
जनी अथवा वनी परि येक धरणी : वनफळे मिष्टान्नी स्वाद येक ।४।
गणेशनाथ म्हणे यापरी विज्ञान : नर नारायण स्वये तेची ।५।

अभंग : ४११

सागराचे पाळी वृक्षाचिये तळी : गोपाळाची मेळी खेळतसे ।१।
गाईचे गोठणी शिवालय स्मशानी : निरंजन वनी वास करी ।२।
पर्वती येकांती व्रंदावनी प्रिती : संताचे संगती अखंड राहे ।३।
निष्काम निवृत्ती सद्‌गुरूची भक्ती : गणेशनाथ प्राप्ती सहज सुख ।४।

अभंग : ४१२

आता काय देवा मोकलीसि मज : सांभाळावी लाज स्वरूपाची ।१।
अन्यायी अपराधी तुज शरणागत : पावावया पंथ यथाविधी ।२।
करुणाकरा स्वामी तारी मज अनाथा : सर्वांशिरी सत्ता तुझी चाले ।३।
धर्म कर्म नेम समर्पिले पायी : गणेशनाथ नाही उरलो आता ।४।

अभंग : ४१३

पावन नरदेह होवोनिया काये : न सापडे सोय स्वरूपाची ।१।
दश इंद्रिये मन नावरे सर्वथा : ब्रह्मसुख वार्ता बोलो नये ।२।
जवरी झाला नाही येकनिष्ठ भाव : तवरी सर्व वाव संसारिक ।३।
तैसा मज आता नको करू भक्ता : गणेशनाथ माथा चरणावरी ।४।

अभंग : ४१४

चालवी तु माझे येकविध व्रत : मन बुध्दी चित्त आवरोनी ।१।
काम क्रोध मोह सांडावा अहंकार : धैर्य आणि निर्धार दृढ देई ।२।
निशीदीनी ध्यास भक्ति आणि विश्वास : सांडावी हे आस सर्वस्वाची ।३।
तुजविण मज नाही आदि अंती : गणेशनाथ चित्ती राहे सुख ।४।

अभंग : ४१५

अंतरी आदेश आम्हा अनुभवे : आदीनाथ देवे आज्ञा केली ।१।
अद्वैत वैराग्य ठसावले ब्रह्म : अमृत ऐसे नाम गाउ गिती ।२।
शब्दे सत्य पुजा षोडश उपचारी : आष्टभाव अंतरी आठवोनी ।३।
त्राहे त्राहे प्रेमे केले लोटांगण : गणेशनाथ पूर्ण पदरी राहे ।४।

अभंग : ४१६

देहे सुखाकारणे नाही केली सेवा : जाणोनिया देवा देसी काय ।१।
सर्व सुख माझे पूर्ण तुझे पाई : स्वप्नी दृष्टि नाही तुजविण ।२।
सर्वसाक्षी पाही देवाविण नाही : देही आणि विदेही सुत्रधारी ।३।
व्यापक आत्मा जाणसी निर्धारी : गणेशनाथ पार पाववी तू ।४।

अभंग : ४१७

जप तप अवघड न कळे साधन : दया धर्म पुण्य न घडे काही ।१।
न सुटे देहसुख न मरे हे माया : केले तितुके वाया सर्व जाये ।२।
येके भावे देव न कळे सर्वथा : माघे पुढे आता तोची झाला ।३।
लागलिया शक्ती झालो निष्काम : गणेशनाथ नेम गुरूपाई ।४।

अभंग : ४१८

आमुचा रामराम समस्त संतांसी : आलिया ज्न्मासी सुफळ जिणे ।१।
तुम्हाविण आम्हा नाही त्रिभुवनी : बाळका जननी जयापरी ।२।
विश्वासे सद्भावे करी सेवावृत्ती : जिवा जिवन मुक्ती परब्रह्म ।३।
कृपादृष्टि तुम्ही आवलोकावि पूर्ण : गणेशनाथ दीन म्हणोनिया ।४।

अभंग : ४१९

नरदेहे सार्थक करणे आहे ज्यासी : तेणेची भक्तिसी दृढ राहावे ।१।
मुळारंभी आधी पाहीजे विरक्ती : दया सर्वाभूती लोटांगण ।२।
यावरी येकनिष्टा सद्भावे विश्वास : किर्तन निजध्यास अखंड करी ।३।
सद्गुरूची सेवा संतांचे पुजन : गणेशनाथ मन मावळले ।४।

अभंग : ४२०

प्रबंध छंद बंद विचार विनोद : करिता गोविंद न भेटेची ।१।
अनेक गायन आणि शास्त्र पठण : स्वर स्छळ मान करिता कोटी ।२।
आसन मुद्रा दावि धारणेविण भाव : न भेटेची देव काही केल्या ।३।
गणेशनाथ म्हणे गुरूभक्तिवाचून : प्राप्त नव्हे जाण ब्रह्मसुख ।४।

अभंग : ४२१

निष्काम निवृती सद्भाव हा चित्ती : संतसेवा प्रिती आवडे जया ।१।
करिताची होती ब्रह्म परिपूर्ण : ऐसे हे साधन साधा काही ।२।
वायाविण शीण न करावा काही : संत पंथे जाई न करी वेळ ।३।
संताचिये घरी करिन झाडफेडी : गणेशनाथ गोडी हेची थोर ।४।

अभंग : ४२२

तान्हीयाचे थोर रूदन करावे : माता तैसे मोहे स्तनी लावी ।१।
पल्लव झाकोनी दिसो नेदी कोण्हा : आवडते मनापासोनिया ।२।
तान्ह आणि भुक सुख आणि दु:ख : माऊलिविण येक देखे कोण ।३।

माय जाणे जिवन विसंबेना कदा : गणेशनाथ सदा वोसंडला ।४।

अभंग : ४२३

माझी भुक ताहन तुजविण जाणे कोण : साक्षी नारायण अंतरिचा ।१।

तान्हिया बाळासी मायेवाचुनि नाही : तैसा झाला पाही आम्हा दीना ।२।

आदि अंती तूची जनित जननी : कळवळोनी स्तनि लावी जैसी ।३।

अंतरीचा कळवळा माऊलिच जाणे : गणेशनाथ तान्हे क्षुधावत ।४।

अभंग : ४२४

आपुल्या ते बळे तृण उचलेना : रंका नारायणा अढळपद ।१।

कर्ता नारायण मानवाचा धुरू : मश्यकाचा मेरू क्षणामाजि ।२।

राईचा पर्वत रजगज होत : रंका राज्य देत सद्‌गुरूनाथ ।३।

गणेशनाथ म्हणे भाव भक्ती बळे : दाता तो कृपाळ कळला मज ।४।

अभंग : ४२५

आष्टांगे लोटांगण केले प्रेमभावे : सद्‌गुरूनाथा यावे घरा माझ्या ।१।

अंतःकरण तुज केलेसे आसन : सेजेसी सुमने निद्रा करी ।२।

प्राणाचा प्रसाद मनाचा विडा : देवोनिया गडा देव केला ।३।

तनू मन चित्त आर्पुनी येकांती : गणेशनाथ भक्ति ऐसे परी ।४।

अभंग : ४२६

अन्यायी अपराधी तुझा तुज ठावा : काय पाहसी देवा गुण दोष ।१।

ठाईचे नैश्वर कैचा मनि निर्धार : देही दोष अपार गणना नाही ।२।

पातकाच्या रासी कंटाळली भुमी : शरण आलो स्वामी तारी आता ।३।

ऐसा मी अपराधी पडिलो तुझे द्‌वारी : गणेशनाथ उरी उरो नेदी ।४।

अभंग : ४२७

देहिच्या सुखाला होउ देते मन : कैचा नारायण येईल वाचे ।१।

देहवंत जीव काय याचा भाव : कोण्या पुण्य देव देईल भेटी ।२।

अर्ध घटिकाभर स्थिर नव्हे चित्त : स्वहिताचि मात बोलो नये ।३।

शांती क्षमा दया निर्धार सद्‌भाव : गणेशनाथ ठाव तोची जाणे ।४।

अभंग : ४२८

सद्‌भावे विश्वासे करा नामघोष : पुढती जन्मास येणे नाही ।१।

सांडोनी आभिमान करिन संतसेवा : तेणे होय जिवा सोडवण ।२।

सोडियेली आस सर्वस्वे सुखाची : धरिली मोक्षाची निट वाट ।३।

गणेशनाथ म्हणे देवा तुजकारणे : सेवियेले वन सदाकाळी ।४।

अभंग : ४२९

सांभाळी आपुल्या स्वरूपाची लाज : करिता तुझे काज भय नाही ।१।

साच करी आता आपुली ब्रिदावळी : किर्ती भुमंडळी करिन तुझी ।२।
नाथ परंपरा करावी साचार : वेचिन शरिर तुझे काजी ।३।
गणेशनाथ म्हणे मज आहे भरवसा : भक्ती हेची आशा पूर्ण करी ।४।

अभंग : ४३०

दृढ भक्तिभाव द्वारपाळ देव : दाहा जन्म पाहो आपण सोसी ।१।
उचिष्टे हो काढी धुत आसे घोडी : नेसती लुगडी स्त्रये झाला ।२।
कुब्जा आणि विदुर सुदामाचे नगर : देवा हे उपकार काये वानु ।३।
अपार अनंत तारियेले भक्त : गणेशनाथ मात काय तेथे ।४।

अभंग : ४३१

देवे काय द्यावे म्या काय मागावे : आपण आहे राहवे किती दिवस ।१।
बरे ना वोखटे देहातित झाले : काय बापा येईल जीवासवे ।२।
जिवाची सिदोरी ते घ्यावी संसारी : पंथ आहे दुरी जाणोनिया ।३।
नाशिवंतासाटी गुंतू नको आता : गणेशनाथ पाहता कैचा तेथे ।४।

अभंग : ४३२

विसरलो आता या जन्माचा ठाव : पूर्वी होता जिव कोणे ठाई ।१।
कोण याचि याती कोण याचे कुळगोत्र : न कळेची विचार काही केल्या ।२।
पाहे मूळ भुमी कोण आम्ही तुम्ही : गुंतू नको नेमी प्रपंचाच्या ।३।
गणेशनाथ म्हणे मी कोण आपण : दुजा आहे कोण न कळे मज ।४।

अभंग : ४३३

वाराणसी यात्रा जे जन्माची साटी : तैसी आहे गोष्टी सद्भावाची ।१।
सोडावा संकल्प सर्वस्वाचा आधी : तरिच ब्रह्मपदी ठाव होये ।२।
देव काजी आता वेचो सर्व माया : जावे मुळीच्या ठाया लागेवेगी ।३।
गणेशनाथ म्हणे नरदेह पावन : सांग भक्ती ध्यान घडे जरी ।४।

अभंग : ४३४

काम धाम नेम नाठवे सर्वथा : पाहवे या अनंता ऐसे वाटे ।१।
संसार माहेर नावडती दोन्ही : प्रपंच पुरूष मनी बैसलासे ।२।
सुहृदाची लाज सोडीली निर्धारी : बैसलो शेजारी राघवाच्या ।३।
लोकिकाचा थुंका पडो तोंडावरी : गणेशनाथ नाही ऐसे झाले ।४।

अभंग : ४३५

मोहियेले मन लावियेला चाळा : आठविता गोपाळा सुख झाले ।१।
चित्त वृत्ती माझी चोरियेली जेणे : जळो आता जिणे नाही मज ।२।
काय फुंकीयेले न कळे माझे कानी : नाठवती दोन्ही आप पर ।३।
न येवो सांगता बोलता न ये काही : गणेशनाथ नाही ऐसे झाले ।४।

अभंग : ४३६

भेटी झाली तेंव्हा सुदीन दिवाली : सप्रेमे वोवाळी गुरूनाथासी ।१।

संत महंत गोत मिळाले बहुत : उन्मळले चित्त सद्भावेसी ।२।

भक्तिचा पडिभार परमार्थी साचार : ते आम्हा माहेर विश्रांतिसी ।३।

देव माता पिता देखोनी हरली चिंता : गणेशनाथा आता जन्म नाही ।४।

अभंग : ४३७

हृदय कमळी देवे साटविले : तेणे सुख झाले थोर देवा ।१।

संपुष्ट कमळी साटविले नाणे : पुढती नाही येणे जन्म जाहले ।२।

सुक्तिचे संपुटी स्वातिचे उदक : राहीलिया देख मुक्ताफळ ।३।

तैसा सदा मुक्त तुझीया प्रसादे : गणेशनाथ भेद काय जाणे ।४।

अभंग : ४३८

नको दुजीयाची आस करू मना : आठवी नारायणा प्रेमभावे ।१।

अनिकाचे भाग्य नाठवि सर्वथा : आपुल्या सावचित्ता पाहोनिया ।२।

संचिताकडे पाहवे सर्व विसरावे : जरी दिल्हे देवे न घ्यावे ते ।३।

संसारिचे सुख विसरोनी जावे : गणेशनाथ राहवे कोठवरी ।४।

अभंग : ४३९

बहुत दिवस झाले राहणे कोठवरी : नाही या संसारी टाकी वेगी ।१।

दो दिवसाचे जिणे बोलती पुराणे : साधावे साधन परम तत्व ।२।

नरदेहे हा रत्न जातो भक्तिविण : म्हणोनिया शीण वाटे थोर ।३।

अनन्य शरण आलो काकुलती : गणेशनाथ प्रिती पात्र तुझे ।४।

अभंग : ४४०

निर्दैवांसी जैसा सापडे परिस : कल्पतरू वायस काय जाणे ।१।

कागासी अमृत नुपदेशिया संत : परि त्या गुह्यार्थ सांगु नये ।२।

पशूसी सन्मान अंधा दिनमान : कोढिया चंदन नावडेची ।३।

दारिद्रीया धन न जीरे अपार : करंट्या ईश्वर काय करी ।४।

गणेशनाथ म्हणे ठाईच निवांत : सद्गुरू समर्थ तिन्ही लोकी ।५।

अभंग : ४४१

अदृष्टाचे पुढे कोठवरी पळावे : पुढे पुढे धावे कल्पावरी ।१।

गिरी आणि विवरी पाताळी सागरी : देवाहुनी थोरी संचिताची ।२।

याकारणे टाकी शोक भय चिंता : राहे त्या अनंता आठवोनि ।३।

गणेशनाथ म्हणे ठाईच निवांत : सद्गुरू समर्थ तिन्ही लोकी ।४।

अभंग : ४४२

लाज सांडोनिया झालो निलाजीरा : परी केला सोयरा नारायण ।१।

जालोसे पिसाट केली जिवे साट : परि निजवाट निजमोक्षाची ।२।
मनुष्यपण गेले न म्हणावे भले : परी चित्त बैसले तुझे पाई ।३।
उडालिसे शुध्दी न कळे काही बुध्दी : गणेशनाथा सिध्दी स्वरूपाची ।४।

अभंग : ४४३

अखंड करी ध्यान सत्य बोले वाचा : अंश तो देवाचा सत्य होये ।१।
दया धर्म शम सद्‌गुरूचे नाम : करिता स्वये ब्रह्म होती जिव ।२।
संत आणि महंत पूजी सावचित्त : होउनी पतित शेष मागे ।३।
गणेशनाथ म्हणे श्रध्दा आणि प्रिती : प्राणी ते पावती निजधाम ।४।

अभंग : ४४४

अंध पंगु वृक्ष फळाची नाही आस : तैसा हा उदार सर्वापरी ।१।
उदक या जनासी लाविना उपकार : वारा वस्ती धर न करी कोठे ।२।
पृथ्वी न म्हणे थोर जाला आसे भार : योगिया संसार तैसे परी ।३।
तैसा योगीराज न धरिची माया : गणेशनाथ वाया भूमीभार ।४।

अभंग : ४४५

अंध पांगुळ दु:खी मातेसिची भार : तैसा हा विचार जाला देवा ।१।
गेला हा नरदेहे सेवेविण व्यर्थ : कैसे हे संचित न कळे मज ।२।
पाप आथवा पुण्य ओळखावे चिन्ह : धर्म कर्म नेम आचरती ।३।
अंतरापासोनी आवडे संतसेवा : गणेशनाथ देवा हेची मागे ।४।

अभंग : ४४६

अखंड ध्यान दिप वोंकार वोवाळी : देहे हे दिवाळी सदोदित ।१।
संकल्प तरूचे छाये ताहन ना भुक : ईच्छिले ते सुख पूर्ण होये ।२।
माता पिता बंधु गुरूनाथ माहेर : सेखी पैलपार पावविता ।३।
सद्‌भाव हा भाऊ भक्ति माझी बहिणी : गणेशनाथ जनी उध्दरिला ।४।

अभंग : ४४७

श्रध्दा प्रेम भक्ति भूत दया प्रिती : भाव सहन शांती समुद्र जैसा ।१।
विरक्ती निवृत्ती धृती आत्मस्थिती : बुध्दी हे सुमती वसुधा जेवी ।२।
मनन ज्ञान ध्यान श्रवण किर्तन : सर्वस्वे साधन सूर्य जैसा ।३।
गणेशनाथ म्हणे व्यापक आणि उदार : प्राणी तो अवतार ईश्वराचा ।४।

अभंग : ४४८

आगणित साधन तपा नाही पार : परी न कळे विचार संचिताचा ।१।
मेरू तैसे क्लेश योगाचे सायास : परि संचितास काय करी ।२।
अष्टोत्तरसे तिर्थ सर्व धर्म व्रते : परी हे संचित कोण जाणे ।३।
गणेशनाथ म्हणे संचित सांगती : न चुके कल्पांती काही केल्या ।४।

अभंग : ४४९

देव कर्ता होये राईचा पर्वत : पशु याती होत इंद्राऐसे ।१।
देईल देव तरि पाषाणासी वाचा : पांगुळ पवनाचा वेग करी ।२।
विष होय अमृत रंका राज्य प्राप्त : अग्नित समस्त भस्म होये ।३।
मश्यकाचा मेरू चकोराचा चंद्रु : पवन जैसा धुरू करूनी दावी ।४।
गणेशनाथ म्हणे न कळे हे वर्म : जीव करी ब्रह्म सद्‌गुरूनाथ ।५।

अभंग : ४५०

करिल कोण आता खापराचे सोने : गोठा चिंतामणी कैसा होये ।१।
कैसे होये आता गारेचे सुरत्न : वृदावन पक्वान नव्हे जैसे ।२।
कैसे होये आहे आता वानराचा नर : तळोली सागर कोण करी ।३।
गणेशनाथ म्हणे मुळिचा दरिद्री : त्यासी काय करी देव आता ।४।

अभंग : ४५१

बहु दु:ख देखता भिऊ नको आता : सन्मार्गि चालता चिंता टाकी ।१।
नैश्वर्य हा देहे चिंता याची काय : स्वहित जेणे होये तेची करी ।२।
होणारसारिखे होईल ते अंती : भक्ति भाव चित्ती धरी देव ।३।
निर्मुळ हा देह तव सुख दु:ख आहे : करूनिया काय मिथ्या शोक ।४।
गणेशनाथ म्हणे ऐसे हे जाणोन : भक्तिभावे पूर्ण जावे पंथा ।५।

अभंग : ४५२

नवखंड पृथ्वी ब्रह्माविष्णू रूद्र : गेले ते आवतार सर्व काही ।१।
कौरव पांडव देव आणि दानव : ऋषि महानुभाव तेही गेले ।२।
गण आणि गंधर्व चक्रवर्ति मानव : किती येक देव तेही गेले ।३।
गणेशनाथ म्हणे गुरूभक्ती हे सार : त्यामागे अपार संत गेले ।४।

अभंग : ४५३

आपुले आपुले ठाई म्हणविताती थोर : स्वहिताचा विचार कोण करी ।१।
सर्व देही आत्मा भरोनी उरला : जाणत्याला जाला लाभ थोर ।२।
सांडुनी अहंकार सम होये दृष्टि : तरिच होये भेटी रोकडिची ।३।
गणेशनाथ म्हणे सद्‌गुरूचे पाई : उरो दिले नाही दुजेपण ।४।

अभंग : ४५४

राग रंग रूप संगीत गायन : तेणे उध्दरण कैसे होये ।१।
नाम विकोनिया मेळविती धन : तेची त्या बंधन जन्मोजन्मी ।२।
बांधोनी  पाषाण जळी तरला कोण : तैसे ते दुर्गुण सर्व काही ।३।
गणेशनाथ म्हणे निर्गुण निरामय : त्याचे गुण काय वानि जीव ।४।

अभंग : ४५५

ज्याला जाणे आहे निजमोक्षाच्या गावा : तेणे अहंभावा भूलु नये ।१।
देही सर्व सुख जालेसे संपूर्ण : जेणे उध्दरण कैसे होये ।२।
सर्व अळंकार पूर्ण मनोहर : संताचा विचार वेगळाची ।३।
गणेशनाथ म्हणे उगमासी जो पाहे : तोची योगी राहे अक्षय पदी ।४।

अभंग : ४५६

ज्या कारणे तप वनासी ते जावे : ते तव आहे सवे अंगलग ।१।
कठिण जे साधन या प्राणाचि साटी : आहे ते शेवटी न चुकेची ।२।
पूर्विचे अक्षर कोण करी दूर : राहिले विचार साधनाचे ।३।
गणेशनाथ म्हणे गुरूनाथ समर्थ : जिवा उध्दरीत स्मरणमात्रे ।४।

अभंग : ४५७

माळा आणि मेखळा चंदनाचा टिळा : सद्‌भाव वेगळा सर्वाहुनी ।१।
विभूती भूषण डोळे झाकुनी ध्यान : सर्वही साधन परोपरी ।२।
मंत्र तंत्र कळा सत्कर्मे आगळा : जिवन्मुक्त सोहळा वेगळाची ।३।
पर्वतासारिखा करिता आभ्यास : सहश्रनाम घोष जन्मवरी ।४।
गणेशनाथ म्हणे गुरूकृपेवाचोनि : नव्हे उध्दरण जन्मवरी ।५।

अभंग : ४५८

वेदांत सिध्दांत देखणे देखले : याहोनी उरले वेगळेचि ।१।
तिर्थ व्रते क्षेत्रे साध्य हे साधन : परी जिवाचे जिवन वेगलेची ।२।
देव आणि भक्त आणि सर्व मत : याहोनी स्वहित वेगळेची ।३।
गणेशनाथ म्हणे हरिहरा न कळे : सद्‌गुरू कृपाळ दाखवितो ।४।

अभंग : ४५९

अर्ध घडी जीवा नाहीची विश्राम : तरी न कळे वर्म आपुले काही ।१।
आपण कोण आहे करितो ते काये : न सापडे ठाव प्रारब्धाचा ।२।
जरी नाही जीवा ब्रह्मिची ओळखी : तवरी जन्म दु:ख कष्ट भोगी ।३।
गणेशनाथ म्हणे ऐसीया उपाये : सद्‌गुरूविणे पाहे नाही कोठे ।४।

अभंग : ४६०

नरदेहा येउनी जालोसे पाषाण : उदकात आसोनी कोरडाची ।१।
ताडवृक्ष जैसा सर्वांगी तळाला : छायेविण गेला व्यर्थ तैसा ।२।
शास्त्रे आणि पुराणे जाणे आत्मज्ञान : परि भक्तिविण भूमिभार ।३।
गणेशनाथ म्हणे तैसे नको जिणे : भावे भक्ती पूर्ण घडो तुझी ।४।

अभंग : ४६१

प्राप्तीचा नरदेहे जातो हातोहाती : म्हणुनि वाटे खंती थोर जीवा ।१।
सद्‌भाव आणि भक्ति हाची भाव चित्ती : जीवाचा संगती तुची देवा ।२।

चंदनाचेपरी व्हावे परोपकारी : परतोनी संसारी येवो नये ।३।

गणेशनाथ म्हणे सुफळ हा संसार : गुरू भक्ति निर्धार घडे जरी ।४।

अभंग : ४६२

नेत्रानी ही पृथ्वी देखिली बहुत : कोणे परि हित होईल देवा ।१।

श्रवणी तुझी मात ऐकली बहुत : शब्दी वृत्ती चित्त लावियेले ।२।

साधन स्मरण बहुत केले ध्यान : कोठे नारायण लक्षा न ये ।३।

गणेशनाथ म्हणे केली आटा आटी : मोकलु शेवटी नको देवा ।४।

अभंग : ४६३

चौऱ्यांशीचे जीव भुलले या सुखा : विसरले सखा नारायण ।१।

पुत्र आणि धन संपती संपूर्ण : नाशिवंत जाणोनी वेगळा तो ।२।

सर्वस्वे उदार जाणोनिया नर : तो करी उध्दार पूर्वजांचा ।३।

गणेशनाथ म्हणे नाशिवंतासाटी : न पडावी तुटी निजमोक्षाची ।४।

अभंग : ४६४

पुष्पाचा परिमळ धरू जाता नाही : तैसा आत्मा पाही देहामाजी ।१।

गुळी जैसी गोडी रूपातीत आहे : तैसा आत्मा पाहे देहामाजी ।२।

सूर्याचा प्रकाश पूर्ण दाही दिशा : धरू जाता जैसा सापडेना ।३।

गणेशनाथ म्हणे तैसा आत्माराम : गुरूनाथाने वर्म दाखविले ।४।

अभंग : ४६५

आता आम्हा देवे काय आहे द्यावे : काकुलती यावे कशासाटी ।१।

कशासाटी अन्न मागु तुजपासी : संसारी आम्हासी राहणे नाही ।२।

आपण कोण आहे देव देईल काये : अंती सर्व जाये हारपोनिया ।३।

गणेशनाथ म्हणे नाशिवंत देहे : दिल्हे घेउ नये या देवाचे ।४।

अभंग : ४६६

समत्वे हे चित्त शांत आणि भक्त : तो जाणावा संत ब्रह्ममूर्ती ।१।

मोक्षाचे साधन आणि तत्वाचा बोधु : तो जाणावा साधु सत्य ऐसा ।२।

नाही विषमता न करी भेदाभेद : जाणावा तो सिध्द स्वरूप जैसा ।३।

गणेशनाथ म्हणे तया दंडवत : मी काय पतित वानु त्यासी ।४।

अभंग : ४६७

वृक्षानि ते दु:ख सांगावे कोण्हासी : काय श्वापदासी पांघुरण ।१।

पक्षियाचे गावी काय आहे धन : जिवनासी जीवन कोण पाजी ।२।

सर्व ही जिवाची चिंता त्या देवास : आपण निजध्यास न सोडावा ।३।

गणेशनाथ म्हणे जालोसे निश्चित : ठेवियेले चित्त तुझे पाई ।४।

अभंग : ४६८

म्हैशापुढे जरि ठेविले अमृत फळ : न घे तो विटाळ मानि त्याचा ।१।
दरिद्रीया हाती दिधला परिस : नाही त्या विश्वास कदाकाळी ।२।
आभाग्याचे हाती दिधला चिंतामणी : मानुनी पाषाण टाकियेला ।३।
करंट्या दिधली कामधेनु गाये : द्यावे ईने काये म्हणोनि दवडी ।४।
सर्व पूर्ण करी पाहे कल्पतरू : तैसा हा सदगुरू मोक्षदाता ।५।
गणेशनाथ म्हणे सद्गुरू समर्था : जिवाते करित देव ऐसे ।६।

अभंग : ४६९

आरे माझ्या मना सांडी आभिमान : सद्गुरूच्या चरणा लक्ष लावी ।१।
आरे माझ्या मना सांडी देह बळ : होई तो निश्चळ सद्गुरू पायी ।२।
होवोनिया रंक नाम जपे येक : नाही जन्म दु:ख जाण बापा ।३।
गणेशनाथ म्हणे तुज काय मागणे : द्यावे भक्तिज्ञान सद्गुरूनाथा ।४।

अभंग : ४७०

माझे मज देहिचा नाही भरवसा : अनिकांची आशा करूनी काये ।१।
आपुले घरिचा अग्नी घेऊ नये ओटी : जाळिल शेवटी कर्मा-कर्मे ।२।
पाहती माझे डोळे माझे मज न कळे : आणिकांचे मूळ काय सांगो ।३।
चालती हात पाये ऐसे सत्य काय : अनिकांची सोय काय सांगु ।४।
भजनी दृढ मन आहे आथवा नाही : आणिकांचे पाही सांगु काये ।५।
गणेशनाथ म्हणे नाही आपुले मूळ : सद्गुरू कृपाळ तिन्ही लोकी ।६।

अभंग : ४७१

तुझे भेटीकारणे आलो मी दुरून : तुजविण सज्जन अनिक नाही ।१।
या मनाची आवडी तुझिया भजनाची : तु माऊली आमुची सद्गुरूनाथा ।२।
येवोनी नरदेही भजन घडो कांही : चित्त तुझे पाई लागो माझे ।३।
माझा सद्गुरूनाथ तिन्ही लोकी समर्थ : म्हणोनी चरणी चित्त ठेवियेले ।४।
गणेशनाथ म्हणे प्रीतिचे बोलणे : आवडीने गाईन नाम तुझे ।५।

अभंग : ४७२

तुजविणे संग नको अनिकांचा : काया मने वाचा तुझे पायी ।१।
सकळही मिळती जीवाचे संगती : अंत:काळी जाती सोडोनिया ।२।
जिवासवे नये बोलो त्यासी काये : म्हणोनि तुझे पाये धरिले जिवी ।३।
तुजकारणे देवा सेविला येकांत : तुची माझे हित पंढरीनाथा ।४।
तुजविणे कोण जाणे ताहनभुक : तुची माझा येक मायबाप ।५।
गणेशनाथ म्हणे अखंड तुझे ध्यान : तुझियाने पावेन परमपद ।६।

अभंग : ४७३

घडली मज थोर साधकांची निंदा : तरिच आपदा शरीरासी ।१।

तुझिये सेवेसी पडलेसे अंतर : ब्रह्म शब्द थोर केला पाही ।२।
भक्ती ना वैराग्य केला आभिमान : सद्भावे शरण न घडे सेवा ।३।
याचिलागी तुज करुणा न ये माझी : गणेशनाथ सहजी सहजसुखे ।४।

अभंग : ४७४

माता पितियाची घडली नाही सेवा : तरिच केशवा करुणा न ये ।१।
कांही सद्‌गुरूचे नाही घडले भजन : म्हणोनि शरण आलो तुज ।२।
देवा ब्राह्मणांची घडली नाही भक्ति म्हणुनि तुझे चित्ती करुणा न ये ।३।
काय या जिवाचे दुखविले मन : म्हणोनि तुझे भजन न घडे देवा ।४।
काय जन्मांतरिचे बहुत आहेत दोष : म्हणुनि निजध्यास न घडे तुझा ।५।
गणेशनाथ म्हणे जरी जालो अनाथ : तुजविण माझे हित करिल कोण ।६।

अभंग : ४७५

पाहता सर्व जिव परि येक देव : या आर्थी संदेह नाही काही ।१।
नि:संगाचा संग लाधला आम्हासी : न कळे या जनासी काय सांगु ।२।
कर्तियाची खुण नेणे इतर जन : पडलेसे मौन भ्रांती देखा ।३।
आपुली आपणा सूचना नाही जेथे : संसाराची तेथे वार्ता नाही ।४।
आता आम्हा भय नाही या जनाचे : गुरूनाथ कृपेचे पाघरूण ।५।
गुरूनाथाचे नामी रातले हे मन : तेची आम्हा पूर्ण सुख जाले ।६।
गणेशनाथ म्हणे गुरूनाथा सज्जना : पाहे नारायणा कृपा दृष्टि ।७।

अभंग : ४७६

सर्वस्वे संपूर्ण सर्व जाला जरी : योगीयासि थोरी न करावि ।१।
योगीयांसी थोर न बोलावे वचन : भक्तिचे निर्वाण तेची बापा ।२।
योगियांसी काही न करावे बळ : जन्माचे निर्फळ तेणे होये ।३।
आहे ते करावे भावे शरण जावे : परि न बोलावे योगीयांसी ।४।
गणेशनाथ म्हणे योगी तोची जाण : गुरूनाथाचे ध्यान धरूनी चित्ती ।५।

अभंग : ४७७

अनंत जन्माचे घडले होते दोष : म्हणोनि नि:शेष शरण आलो ।१।
येणे जन्मे काही घडले नाही पुण्य : म्हणोनी आलो शरण सद्‌गुरूनाथा ।२।
कृपाळु होवोनी सद्भक्ता तारिसी : अभक्ता टाकिसी कवणावरी ।३।
ईच्छेचा तु दाता ऐसे बोले गीता : म्हणोनी चरणी माथा ठेवितसे ।४।
ऐसी येक भक्ति घडे बा का काही बाही : ठाव तुझे पाई असो द्‌यावा ।५।
गणेशनाथ म्हणे भक्ति घडो कांही : देहा अंत नाही करि बापा ।६।

अभंग : ४७८

सर्व सत्य तुझे असत्य काही नाही : विचारूनी पाही गुरूमुखे ।१।

सद्गुरूचे पाई संदेह काही नाही : विचारूनी पाही मना माजी ।२।
सद्गुरूचे कृपे सर्व खरे जाले : तेणे दुरावले लटिके ते ।३।
सद्गुरूचे कृपे आपण खरा जाला : सर्व खरे त्याला संदेह नाही ।४।
सद्गुरूचा शब्द तोची असे सत्य : म्हणोनी पतित शरण आलो ।५।
गणेशनाथ म्हणे गुरूनाथ तु सत्य : म्हणोनि चरणी चित्त ठेवियेले ।६।

अभंग : ४७९

पहिली माझी वोवी गाईन सद्गुरूनाथा : तुझेनी सरता तिन्ही लोकी ।१।
दुसरी माझी वोवी गाईन मातापिता : त्याचेनी तत्वता पिंड जाला ।२।
तिसरी माझी वोवी गाईन साधु जन : त्यांचेनी पावन तिन्ही लोक ।३।
चवथी माझी वोवी समस्त जनासी : मग माझ्या मनासी समाधान ।४।
पाचवी माझी वोवी पाऊले गुरूची : रेखा संचिताची तुमचेनी ।५।
साहवी माझी वोवी तु माझे संचित : तुझेनि सर्व हित जाले माझे ।६।
सातवी माझी वोवी सत्य तुझे नाम : पावलो विश्राम तुझे पाई ।७।
आठवी माझी वोवी अष्टांग हा योग : अखंडीत संग गुरूनाथाचा ।८।
नववी माझी वोवी नवविधा भक्ती : परी राहो चित्ती नाम तुझे ।९।
गणेशनाथ म्हणे तु माझे माहेर : उतरावया पार भवसिंधुचा ।१०।

अभंग : ४८०

माझ्या संचिताची रेखा आहे तुजपासी : तु माझ्या साह्यासी तिन्ही लोकी ।१।
ऐसे हे जाणोनी तुज शरण आलो : पावन मी जाहलो तुझे नामी ।२।
तुझे नाम घेता हरली माझी चिंता : मुक्ती सायुज्यता रोकडिची ।३।
गणेशनाथ म्हणे माझ्या सद्गुरूनाथा : म्हणोनी चरणी माथा ठेवियेला ।४।

अभंग : ४८१

परमार्थाची पेठ आलो त्या बाजारा : केला असे खरा सद्गुरूनाथ ।१।
संसार हे गोणी आहे जड भारी : शुध्द विकरा करि संत संगे ।२।
अविध्या पायली विकल्प माप करी : लाभ नेला चोरी तिघी जनी ।३।
या लाभाची खुण जाणती ते संत : वरकड म्हणत छंद पाहे ।४।
छंद पाहे म्हणता हेची गा दुषण : अधोगती जाणे घडे त्यासी ।५।
गणेशनाथ म्हणे येवोनी संसारा : जोडला सोयरा सद्गुरूनाथ ।६।

अभंग : ४८२

परस्त्रीया त्या जाण मातेसमान : अभिलाषीता जाण नरक प्राप्ती ।१।
परद्रव्य जाण गायित्रीचे मास : अभिलाषीता त्यास श्वान जन्म ।२।
पर अपमानी तो आत्मघातकी : त्यासी तिन्ही लोकी ठाव नाही ।३।
येके वेळ सिर उतरोनी द्यावे : परी न बोलावे निंदा कर्म ।४।

गणेशनाथ म्हणे ते माझे सज्जन : तुजची समान सद्‌गुरूनाथा ।५।

अभंग : ४८३

पाप बहुत झाले अपराध थोर : म्हणोनि दारोदार हिंडतसे ।१।
चालतात सदा इंद्रिये व्यापार : नाही क्षणभर उशिर त्यासी ।२।
हातिचा हा धर्म न सांडी सर्वथा : मुखी नाम घेता उशिर नाही ।३।
अभिलाषाची दृष्टि पाहतसे सदा : करितसे निंदा साधकांची ।४।
गणेशनाथ म्हणे ऐसा घडला ध्यास : केली तुझी आस सद्‌गुरूनाथा ।५।

अभंग : ४८४

संतांचा जो शेष लाधला आम्हासी : परतोनि जन्मासी येणे नाही ।१।
संताचे जे रज तेची आत्मगुज : सांडोनिया लाज मागतसे ।२।
संतांचा जो संग तोची पूर्ण योग : ऐसे होये सांग तुजपासी ।३।
गणेशनाथ म्हणे सद्‌गुरूचे द्वारी : जालोसे पायरी सत्य बापा ।४।

अभंग : ४८५

विश्वि विश्वनाथ सत्य ऐसी मात : ऐसे काही चित्त न धरी सोये ।१।
तुझे नाम गाता हरूष वाटे चित्ता : कृपावंत दाता म्हणोनिया ।२।
मुखी नाम किर्ती हृदई प्रेम प्रिती : घडो तुझी भक्ती जन्मोजन्मी ।३।
सद्‌गुरूची सेवा सद्‌भाव या जिवा : सापडला ठेवा पूर्वदत्त ।४।
गणेशनाथ म्हणे त्राहे सद्‌गुरूनाथा : क्षणभरी परता जाउ नको ।५।

अभंग : ४८६

जन्मवरी कष्ट सोसिले बहुत : लक्षितसे वाट सद्‌गुरूनाथा ।१।
किती येरझारा चौऱ्यांशीचा फेरा : चुकवि करूणाकरा सद्‌गुरूनाथा ।२।
अनंत जन्माच्या पुण्याच्या राशी : तरिच पायापासी दिधला ठाव ।३।
गणेशनाथ म्हणे अखंड चित्ती राहे : अनिक मागो काय तुजपासी ।४।

अभंग : ४८७

नव मासवरी सामविले पोटी तरिच झाली भेटी सद्‌गुरूची ।१।
पाजोनिया मुखी अमृताच्या धारा : जोडला सोयरा सद्‌गुरूनाथ ।२।
तुझीयाने पाहे देखिले बाळपण : उतराई कशाने होउ तुज ।३।
तु माय माऊली कृपेची साउली : तुझ्याने देखिली सर्व सोये ।४।
गणेशनाथ म्हणे तुची माझी माता : त्राहे सद्‌गुरूनाथा शरण आलो ।५।

अभंग : ४८८

बळियाचे आम्ही जालो बळवंता : अनिकाची वार्ता धरूनी काये ।१।
सत्य पतिव्रता ऐसा आमुचा धर्म : गुरूनाथासी नेम पूर्ण केला ।२।
सकळिक देव सन्मुख तत्वता : न पाहे सर्वथा अनिकाकडे ।३।

गुरूनाथावाचोनी अनिक नाही कोण : अंतरिचे जाणे सद्‌गुरूनाथ ।४।
गणेशनाथ म्हणे अनिक नाही ध्यान : सत्य हे वचन सांगो काये ।५।

अभंग : ४८९

ज्याच्या वाट्या आले तेणे सुख द्यावे : परी न बोलावे अनिकासी ।१।
माझ्या वाट्या माझा सद्‌गुरूनाथ आला : अनिक जनाला चाड नाही ।२।
तुमचा आमचा मुळी जाला आसे भाग : न धरावा राग मनामाजी ।३।
गणेशनाथ म्हणे सत्य ऐसे खरे : तुजविण दुसरे अनिक नाही ।४।

अभंग : ४९०

गुरूनाथाचा उपकार अगणित जाला थोर : काय मी किंकर उतराई ।१।
गुरूनाथाला काय होऊ मी उतराई : स्वानंदाची सोई दाखविली ।२।
पाऊला पाऊली वोडविले अंग : सत्य तुझा संग सद्‌गुरूनाथा ।३।
शिर उतरोनी ठेविले तुजपुढे : सद्‌गुरू माघे पुढे सांभाळिता ।४।
गणेशनाथ म्हणे काय मी उत्तिर्ण : अखंड नारायण म्हणतो वाचे ।५।

अभंग : ४९१

परमार्थाचे पेठे वसता जाला हाट : केणे हे चोखट नाम तुझे ।१।
सत्याचि हे ढाल झळके त्रिभूवनि : संचितावाचोनी न ये हाता ।२।
प्रारब्ध हे पाल देवोनिया वरी : शुध्द विकरा करि हरिचे नाम ।३।
सद्‌गुरू आसता वाणी सर्व केणियाची धणी : संत या सज्जनी खरिद केली ।४।
राम नाम सार जेचि घेती नर : उतरती पार भवसिंधुचा ।५।
नाम हेची केणी आवडी घेती प्राणी : न येती परतोनि संसारासी ।६।
गणेशनाथ म्हणे सहज जाले येणे : धन्य हे दर्शन सद्‌गुरूनाथा ।७।

अभंग : ४९२

पालटोनि वेश मनी सर्वस्वाची आस : ब्रह्म सुख त्यास काय होये ।१।
वरी देउनिया रंग मनि विषयाचा संग : त्यासी पूर्ण योग काय होये ।२।
करूनी आभ्यास सांगती जनास : भूकेलिया ग्रास न घालिती ।३।
वाचोनी ज्ञान देवी अनिकाला गोवी : आत्मा येक जिवी विचारिना ।४।
गणेशनाथ म्हणे समभावे भक्ति : तरिच पाविजेती ब्रह्मपद ।५।

अभंग : ४९३

आम्हासवे तुम्ही येउ नका कोन्ही : कल्पना हे मनी जव आहे ।१।
कोन्ही नका येउ आमुचे संगती : जव आहे चित्ती सर्वसुख ।२।
येउनी आम्हासवे कराल गा काये : तुम्हा आहे भये लोकीकाचे ।३।
आम्हासवे तुमचे नाही कामकाज : तुम्हा आहे लाज लोकिकाची ।४।
गणेशनाथ म्हणे जीवाचा उदार : तोची पैल पार उतरेल ।५।

अभंग : ४९४

पांगुळ चढे ब्रह्मगिरी : मुखे वेद बोले च्याऱ्ही :
ऐसी गुरूनाथाची थोरी तिन्ही लोकी ।१।
थोटे करी चरण सेवा : मन विषयाहुनी निके ठेवा :
मोक्षपद त्या निजिवा ऐसा सद्‌गुरू कृपाळ ।२।
आंधलिया स्वरूप दावी नयनी : बहिरे पुराण ऐके श्रवणी :
ऐसी सद्‌गुरूची करणी तिन्ही लोकी ।३।
देहेविण चाले पंथ : ऐसा सद्‌गुरू समर्थ :
म्हणे गणेशनाथ करणी न कळे ।४।

अभंग : ४९५

स्वहिताचा विचार आल्या करि नर : पूर्वजा उध्दार केला त्याने ।१।
आपुला आपण उध्दार करावा : मातापिता न्यावा देवलोका ।२।
गोत्रजासहित  करी उध्दरण : म्हणता नारायण येके वेळे ।३।
स्वहित सुखाचा करी जो विचार : जैसा दिनकर उगवला ।४।
गणेशनाथ म्हणे दुजा नाही भाव : सद्‌गुरूचरणी ठाव मागितला ।५।

अभंग : ४९६

पूर्वीचे ठेवणे सापडले आम्हा : सद्‌गुरूच्या नामा परते नाही ।१।
जिवाचिया बळी देवोनिया त्यासी : वाटा अनिकासी नाही तेथे ।२।
काया कुरवंडी करूनिया सांडी : वैकुंठी ते मांडी निजठाणे ।३।
सद्‌गुरू कृपेने वैकुंठी मिराशी : त्याचिया पुण्यासी पार नाही ।४।
गणेशनाथ म्हणे जितांची मरावे : सार्थक करावे या जीवाचे ।५।

अभंग : ४९७

आझुणी येवरी ठेविले संसारी : करूणा तुज हरि न ये कैसी ।१।
किती दिवस आम्ही कंठावे परदेशी : करूणा देवा कैसी आझुणी न ये ।२।
कोणाचे आधारे कंठावा संसार : उतरावया पार तुचि एक ।३।
माता पिता बंधु अनिक बहिणी : गेली ते टाकुनी अंत:काळी ।४।
गणेशनाथ म्हणे तुजसिंच गाठी : पडली सेवटी आहे देवा ।५।

अभंग : ४९८

नाशिवंत देहे कळो आले मज : जाणसी ते गुज अंतरिचे ।१।
नाशिवंत देह काय देव जोडे : बोलणे अवघड बोलतसे ।२।
नरदेहावाचोनी नव्हेची मिळणी : पाप पुण्य दोन्ही न कळेची ।३।
पावन नरदेहे देवासी आधार : देहापरते सार अनिक नाही ।४।
गणेशनाथ म्हणे नरदेह पावन : जोडला सज्जन सद्‌गुरूनाथ ।५।

अभंग : ४९९

त्रिलोक्याचा राजा पाहा तो ईश्वर : अखंड वनांतर सेवियेले ।१।
पाहा रघुनाथ सांडोनिया देश : अखंड वनवास सेवियेला ।२।
पाहा ते पांडव अखंड वनवासी : परि त्या देवासी विसंबेना ।३।
अनिक इतरांचा कोण तेथे पाड : वैराग्य अवघड ऐसे आहे ।४।
गणेशनाथ म्हणे वैराग्यावाचुन : नव्हे उध्दरण कोणे काळी ।५।

अभंग : ५००

पाहा तो वान्नर होवोनी वनचर : सेवेसी अंतर पडो नेदी ।१।
पाहे विषधर अंगे सेवा करी : अखंड तयावरी नारायण ।२।
नंदिकेश्वर पाहे जन्म पशु योनी : मान्यता देवोनी आवघी त्यासी ।४।
गणेशनाथ म्हणे तैसी भक्ती द्यावी : अनिक काही जिवी नावडेची ।५।

अभंग : ५०१

आपुली मर्यादा राखोनी सागर : सूर्य जाता स्थिर नव्हे बापा ।१।
बहुत होईल काये मेरूवरी भार : अढळपदी ध्रुव चंचळ नोव्हे ।२।
तैसे तुझे दास निर्भय निरंतर : भक्तिचा निर्धार थोर बापा ।३।
गणेशनाथ म्हणे कर्ता तो आपण : वाया आम्ही शिण वागवितो ।४।

अभंग : ५०२

संसारिच्या सुखा भुलले हे जीव : कोण्हे काळी देव नाठविती ।१।
स्त्रिया, धन-पुत्र आणि सोने : सर्वस्वे हे मन गोवियेले ।२।
माता आणि पिता बंधु आणि बहिणी : गोवियेले यानी नाना परी ।३।
गणेशनाथ म्हणे ऐसे मायाजाळ : तोडुनी सकळ ब्रह्म होये ।४।

अभंग : ५०३

ब्राह्मणाचे पाय सर्व तिर्थरूप : देखताची पाप सर्व जाये ।१।
ब्राह्मणाचे रूप तेची ब्रह्म देख : हरती सर्व शोक दर्शन मात्रे ।२।
ऐसे जे ब्राह्मण आधिक देवाहुन : भेटताची जाण सर्व सिध्दी ।३।
गणेशनाथ म्हणे करिती ब्रह्मध्यान : पाहाताची मन मावळले ।४।

अभंग : ५०४

म्हणविता दास आणि जनाचा संग : काय त्यासी सांग घडो पाहे ।१।
करिता दास्यत्व न धरी जो लाज : सर्व त्याचे काज सिध्द होये ।२।
सद्गुरूची सेवा करिती मनोभावे : सांडी करी जीवे संसाराची ।३।
गणेशनाथ म्हणे देवावरी चित्त : न धरावी भ्रांत तिन्ही लोकी ।४।

अभंग : ५०५

सर्वस्वे भूमिका आधी करी शुध्द : होता ब्रह्मबोध तरिच लाभ ।१।

जववरी जाले नाही शुध्द मन : तोवरी साधन गेले वाया ।२।
तनु मन धन वेधोनिया गेले : आलियाचे जाले हित तेथे ।३।
गणेशनाथ म्हणे सुखाची हे घडी : जाली पुण्य जोडी थोर आम्हा ।४।

अभंग : ५०६

जनाचे भेटिचा लाभ काय आहे : देईल आम्हा काये मोक्षपद ।१।
जनी जनार्दन बोलती पुराणे : त्यांचिया दर्शने होईल काये ।२।
नेत्रानी देखती सर्व तिन्ही लोक : या देवाचे सुख आहे कोठे ।३।
गणेशनाथ म्हणे नाही मज विश्वास : काय करू त्यास सांगे देवा ।४।

अभंग : ५०७

अनिक तिर्थ व्रत हिंडलो बहुत : तुजविणे हित नाही कोठे ।१।
वेदशास्त्रे पुराणे बहुत केले श्रवण : कोठे नाही मन मावळले ।२।
संत साधु जरि भेटले ते मज : त्यानी जन्म सहज निवारिला ।३।
गणेशनाथ म्हणे सद्‌गुरूनिधाने : नाही येणे जाणे ऐसे केले ।४।

अभंग : ५०८

घरोघरी संत आहेती बहुत : तया दंडवत सर्वभावे ।१।
तृण वृक्षावल्लि लोटांगण घाली : सांडोनिया भूली स्वहित करी ।२।
मृकुट मुंगी श्वान दाविले आपण : तरिच आत्मज्ञान साच होये ।३।
गणेशनाथ म्हणे म्हणविता आत्मिक : सर्व पाहे येक तोची धन्य ।४।

अभंग : ५०९

सर्वा घटी पूर्ण पाहे आत्मा येक : त्या नाव आत्मिक सत्य होये ।१।
शांती आणि दया सद्‌भावे पवित्र : तोची गुरू पुत्र कुळ तारी ।२।
परोपकारी गुरूसेवा विश्वास : उध्दारी जिवास तोची येक ।३।
गणेशनाथ म्हणे तया नाव शिष्य : उरो नेदी दोष द्‌वैत काही ।४।

अभंग : ५१०

सर्व साधुजन सद्‌गुरूसमान : ऐसे जो साधन साध्य करी ।१।
कोणे काळी पाहता न धरी विषम : तोची आत्माराम पूर्ण होये ।२।
सज्जन दुर्जन देवा ऐसे जाण : या नाव आपण भक्तराज ।३।
गणेशनाथ म्हणे ऐसा जो विरक्त : तया होये मुक्त सायुज्यता ।४।

अभंग : ५११

भावे करिता भक्ती भलतिया देवाची : तो करी जीवाची सोडवण ।१।
हर प्रकारे सेवा देवाची करावी : परी ते सोडावी भेदवार्ता ।२।
भलतिया मार्गी भजन आसावे : भजनी नाम घ्यावे विश्वासेसी ।३।
गणेशनाथ म्हणे देवा तुझे : नव्हे काही माझे पदरिचे ।४।

अभंग : ५१२

अगणित तुझे गुण त्या नाही गणती : तेथे रंक किती वानु शके ।१।
च्याऱ्ही मुखे ब्रह्मा बोले च्याऱ्ही वेद : परी तुझा भेद न कळेची ।२।
सहस्त्रमुखे शेष करिता निजध्यास : लागुनी पायास शय्या जाला ।३।
गणेशनाथ म्हणे काय मी किंकर : कैचा मज निर्धार गुण गाता ।४।

अभंग : ५१३

अगणित तप ध्यान ईश्वराचे जाण : न पुरेची जाण तुजपासी ।१।
चवदा कल्प पाहता मार्कंडेय ऋषि : न पावे पायासी काही केल्या ।२।
अनिक ऋषेश्वर जाले थोर थोर : जप तपे किंकर होउनी ठेले ।३।
गणेशनाथ म्हणे उपमा न ये देता : तारी गा समर्था शरण आलो ।४।

अभंग : ५१४

पृथ्वी हे आसन आकाश पाघुरण : त्याहोनिया मन थोर करी ।१।
निद्रा निराकार पवन करी आहार : याहुनिया थोर मन करी ।२।
भुकेलिया जाण भूक आधी खावी : तान्हेलिया प्यावी सर्व ताहन ।३।
गणेशनाथ म्हणे गिळुनी सर्व लोक : सुखी होय सुख पाहे डोळा ।४।

अभंग : ५१५

कोण जाणे तया अन्नाचिया जाती : काय म्हणोनी घेती सर्व जीव ।१।
उदकाचे मूळ काय याती कुळ : सेविती सकळ म्हणोनिया ।२।
कोण जाणे तया ईश्वराचे गोत : नामे उध्दरित सर्व जीव ।३।
गणेशनाथ म्हणे ऐसिया सुखासी मिळे : तो या जन्मासी न ये कदा ।४।

अभंग : ५१६

साधु संत जन कृपाळु सज्जन : आठविता मन मावळले ।१।
साधु संत जन कृपेने पाहिले : तरिच आठवले नाम तुझे ।२।
अमृताचे दृष्टि पाहती मजकडे : फिटे ते साकडे जन्मदुःख ।३।
गणेशनाथ म्हणे तुम्हा दंडवत : पावेन हा पंथ तुमचेनी ।४।

अभंग : ५१७

पापाचे डोंगर पडती क्षणामाजी : जरी देवाकाजी देहे वेचे ।१।
अनंत जन्माचे गणना नाही पाप : पाहता तुझे रूप जळुनी जाती ।२।
अनंत माझी पापे भूमी कंटाळली : तुवा कैसी केली सांडी देवा ।३।
गणेशनाथ म्हणे तारी कृपानिधी : तोडी हे उपाधी उध्दरी मज ।४।

अभंग : ५१८

मृतिकेचा घट विषये भरला : तैसा देहे जाला विषय संगे ।१।
सर्पाच्या पेवात घालु नये हात : व्याघ्रासवे मात सांगु नये ।२।

तैसा हा नरदेहे पापाने व्यापिला : अनिक संग केला संसाराचा ।३।
गणेशनाथ म्हणे नरदेहा आलिया : तारि गुरूराया शरण आलो ।४।

अभंग : ५१९

नावरे हे मन फिरवी दाही दिशा : तुजविण जगदिशा सांगु कोण्हा ।१।
कल्पना हे कल्पी कदा नव्हे शांत : आझुणी का अंत पाहसि माझा ।२।
पाच हे विषये कदा नावरति : सांगो कोण्हा प्रती तुजवाचोनी ।३।
गणेशनाथ म्हणे जाणसी जीवाचे : मज बळ कैचे पुण्याचे ।४।

अभंग : ५२०

जप आणि तप काहिची न कळे : जैसे हे आंधळे पडिलो द्वारी ।१।
आंधळे ते निघे कोणाचिये पाठी : तुझे हाती काठी दिधली देवा ।२।
जन्माचा पांगुळ अंधळ्याचा आधार : तैसा तुजवर भार माझा ।३।
गणेशनाथ म्हणे निर्वाणी अपंग : केला तुझा संग म्हणोनिया ।४।

अभंग : ५२१

नंदियाचे परी हिंडे घरोघरी : तैसा पोट भरी तुझे नामे ।१।
पोट भरावया खेळतो बहुरूप : पुण्य आथवा पाप न कळे त्यासी ।२।
पोट भरावया धरिला वेश : बोला या ब्रिदास येवो नेदी ।३।
गणेशनाथ म्हणे ब्रिद साच करी : तरिच संसारी होईल फळ ।४।

अभंग : ५२२

संसारी कमाई केली नाही काही : स्नान संध्या तेही न कळे मज ।१।
केले नाही काही मोक्षाचे साधन : व्रते आणि दान न कळे मज ।२।
नाही घडले मज जप आणि तप : पुण्य अथवा पाप कोण जाणे ।३।
गणेशनाथ म्हणे न कळे पाप-पुण्य : तुझीये सत्तेने सर्व काही ।४।

अभंग : ५२३

हातोहाती करू आता भाव भक्ती : देवलोकाप्रती जाणे आम्हा ।१।
रात्री आणि दिवस केला तुझा सोस : विसावा मनास दिधला नाही ।२।
कोण्ही नाही येथे जीवाचा सांगती : सांगो तुजप्रती गुज काही ।३।
गणेशनाथ म्हणे लागवेगे जाऊ : आपुलेची पाहु निजसुख ।४।

अभंग : ५२४

सद्भाव आणि भक्ति नावडे जयासी : तोची पापरासी दैत्यवंशी ।१।
ज्ञान आणि वैराग्य न करि संतसेवा : अधपतन जीवा बोलिजे ते ।२।
शांती क्षमा दया कदाही न करी : तो एक संसारी भुमीभार ।३।
गणेशनाथ म्हणे ऐसे न करिता : मुक्ती सायुज्यता कैसी होये ।४।

अभंग : ५२५

अन्य हे सर्वदा मेरू ऐसे पुण्य : ते न ये समान तुझे नामी ।१।
कनकाचे पर्वत तपे आणि व्रते : ते न ये समत्ते नामतुल्य ।२।
जप आणि होम अग्नीत यागकर्मे : नामातुल्य धर्म न ये काही ।३।
पृथ्वीसारिखे अश्वमेध दान : नव्हेची समान नामतुल्य ।४।
गणेशनाथ म्हणे माझा सद्‌गुरूनाथ : नामे उध्दरित सर्व जीवा ।५।

अभंग : ५२६

येवोनि भेटावे आता या दीनासी : प्राण हा कंठेसी उरला देवा ।१।
आयुष्य आहे थोडे भेटीची आवड : पूर्ण करी कोड या जिवाचे ।२।
साध्य हे साधन न कळे मज काही : भेटीची ते सोई आहे मनी ।३।
गणेशनाथ म्हणे अखंड तुझी भेटी : नको पाडु तुटी कदाकाळी ।४।

अभंग : ५२७

मनाचे उजडे लावोनिया दिप : आपुले स्वरूप पाहे आधी ।१।
आपणामध्ये पाही अनंत ब्रह्मांडे : वरकड वितंड सांडी वेगी ।२।
पाहता आकार आवघा नाशिवंत : तेही पाहता हित होईल कैसे ।३।
गणेशनाथ म्हणे पाहता साचार : जेणे होये उध्दार आलियाचा ।४।

अभंग : ५२८

संतानी बोलावे कासिया कारणे : काय प्रयोजन आहे त्यांसी ।१।
परोपकारासाटी सांगती वचन : उध्दरिती जन नाममात्रे ।२।
जैसे का अमृत घेता अमर होती : तैस्या संत मूर्ती परोपकारी ।३।
कृपाळु होवोनी तारिती जनासी : येर काय त्यांसी देईल जन ।४।
गणेशनाथ म्हणे नाईकती जन : भोगिता पतन येईल कळु ।५।

अभंग : ५२९

होईनात कष्ट नाही तेची करी : म्हणोनिया भिकारी जालो तुझा ।१।
स्त्रिया घरबार सकळही संसार : जाला होता भार थोर देवा ।२।
पोटासाटी देवा जालोसे पोसणा : न कळे नारायणा अनिक काही ।३।
गणेशनाथ म्हणे जालोसे निर्बळी : पूर्विची सांभाळी भाक देवा ।४।

अभंग : ५३०

योगियाने आधी लाज हारवावी : मग ते साधावी निर्भयेता ।१।
सांडोनिया आशा सर्वस्वे उदास : अखंड निजध्यास तोची साधु ।२।
संसारिचे सुख मानी जैसे विक : येकाहून अनिक न पाहे तो ।३।
न मानी लोकिक नाही देहेभान : स्वरूप ही आपण गिळुनी जाये ।४।
गणेशनाथ म्हणे योगीयाचे चिन्ह : समूळ हे मन मावळले ।५।

अभंग : ५३१

जनि जनार्दन आहे तो संपूर्ण : करावे दुरुन  दंडवत ।१।
जग ईश्वराचे सर्वही देवाचे : संगती जीवाची नव्हती येथे ।२।
अग्नी सर्प सिंह केले आसती देवे : परि न भेटावे कवळोनिया ।३।
गणेशनाथ म्हणे जीव हेची देव : दुरूनी करावे दंडवत ।४।

अभंग : ५३२

कोण्हाचे आधारे कंठावा संसार : कोण पैल पार पावविल  ।१।
गाता तुझे गुण त्रिविध हे जन : आनिवार मन नावरेची ।२।
याती आणि कुळ सत्य नाही वाच्या : सत्यभाव कैचा उध्दरी जीवा ।३।
काय करू ध्यान शुध्द नाही मन : पाहता त्रिभुवन नाही कोठे ।४।
गणेशनाथ म्हणे करी उध्दरण : नाही तरी मरण देई देवा ।५।

अभंग : ५३३

धालियापणांचे संतांचे उद्गार : तेथे मी किंकर काय बोलु ।१।
संतांबरोबरी कैसी होईल सरी : केली नाही पुरी भावभक्ती ।२।
काय बळ उभा राहू संतांपुढे : केले नाही गाढे भजन कांही ।३।
गणेशनाथ म्हणे संतावचे बोलता : लाज वाटे चित्ता थोर देवा ।४।

अभंग : ५३४

सोळा सहस्त्र नारी आपण ब्रह्मच्यारी : या तपाची थोरी कोण जाणे ।१।
साटी खंड्या बोने घेवोनी साचार : पाहता निराहार कैसा जाला ।२।
नवखंड पृथ्वी सर्वही साकार : करूनी निराकार कैसा जाला ।३।
गणेशनाथ म्हणे अकर्तव्यपण : सांगे त्याची खुण कैसी देवा ।४।

अभंग : ५३५

किती याचा भार घेऊ डोईवरी : आलिया संसारी काय हित ।१।
ज्याचे खावे अन्न त्यासी द्यावे पुण्य : करावे साधन कशासाटी ।२।
निराहार निर्धार करावे जपतप : तरिच स्वरूप प्राप्त होये ।३।
गणेशनाथ म्हणे तुझीया आधारी : सखा या संसारी केला देव ।४।

अभंग : ५३६

देवाविण आम्ही पाहिले ते नाही : केले काम तेही देवाचेच  ।१।
देवाविणे आम्हा कोण्ही नाही दिल्हे : नाही ते घेतले अनिकांचे ।२।
देव देता घेता वेदांत हे वार्ता : मनासही सत्ता या देवाची ।३।
गणेशनाथ म्हणे केले देवकाज : देवाविण दुजे अनिक नाही ।४।

अभंग : ५३७

नेत्रानी पाहिले सर्व देवरूप : पुण्य अथवा पाप देवे केले ।१।
जिव्हेने घेतली सर्व रसगोडी : धर्म कर्म जोडी देवाचिच ।२।

दु:ख सुखभोग देवेची घेतला : अक्षय लाभ जाला देवाचा तो ।३।
गणेशनाथ म्हणे सर्वही देवाचे : पाप पुण्य कैचे अलिप्त जैसा ।४।

अभंग : ५३८

देवाविण कोण करिल उपकार : धिर आणि निर्धार तुची देसी ।१।
निकट निर्भय निरंतर ध्यान : देवाविण कोण देईल आम्हा ।२।
भावभक्ती निर्वाह करिल येक देव : फेडिता संदेह तोची येक ।३।
गणेशनाथ म्हणे सर्व ब्रह्मरूप : होउनी देवरूप देव पहावा ।४।

अभंग : ५३९

मनाच्या उजेडे पाहु चहुकडे : बोलणे अवघड काय बोलो ।१।
जिवी जीव आटे देवी देव भेटे : येणे जाणे खुंटे तेथोनिया ।२।
मन मुख मनासी सुखही सुखासी : ठाईचे ठायांगी विसरावे ।३।
गणेशनाथ म्हणे आर्पितो आपण : उरले नाही जाण बोलावया ।४।

अभंग : ५४०

ब्रह्मसुख लाभ जया नरा झाला : विसरोनि गेला आपणासी ।१।
आपपर दोन्ही नाठवे जयासी : नावरूप त्यासी नाठवेची ।२।
उरो नेदी कदा सर्वथा आपण : जनवन मन विसरला ।३।
गणेशनाथ म्हणे आरूप आक्षई : उरो दिल्हे नाही बोलणे ते ।४।

अभंग : ५४१

देवाचे भजन दुराविता जाण : कैसे उध्दरन होईल बापा ।१।
न करिता हे भक्ति कैसी होईल गती : जिवासी विश्रांती कोठे आहे ।२।
न धरिता भाव कैसा भेटे देव : मोक्षपदी ठाव कैसा होये ।३।
गणेशनाथ म्हणे भोळिया या भावे : देवासी भेटावे येके वेळे ।४।

अभंग : ५४२

सद्‍गुरूची भक्ति संतांची संगती : तरिच पाविजेती प्रेमसुख ।१।
मन हे उन्मन विरक्त आपण : तरिच जन्ममरण चुके बापा ।२।
सर्वही समान नाही जीवपण : ते जाणा लक्षण समाधिचे ।३।
नाही भीन्नभेद आत्मत्वि  आल्हाद : तो जाणावा बोध स्वरूपाचा ।४।
गणेशनाथ म्हणे सद्‍गुरूची कृपा : तरिच मार्ग सोपा सापडला ।५।

अभंग : ५४३

पृथ्वी हेची पात्र त्रिवेणी हे तिर्थ : वंदिता पुण्यित जाले जीव ।१।
कैलासी आसता संताचे पंगती : नाही पुनरावृत्ती गर्भवास ।२।
पुण्य हेची पुजा तुज योगीराजा : मुळीचा तु माझा मायबाप ।३।
प्रेम हा प्रसाद आत्मत्वाचा बोध : तुटला संबंध प्रपंचाचा ।४।

गणेशनाथ म्हणे जन्मा नाही येणे : सद्गुरूचे देणे ऐसे केले ।५।

अभंग : ५४४

सद्गुरू उदार कृपेचा सागर : तुझ्याने संसार गोड जाला ।१।
सुफळ जाले जीणे सद्गुरूभक्तिने : पुन्हा नाही येणे गर्भवासा ।२।
गुरूभक्तीवाचोनी सुख कोठे नाही : विचारोनी पाही हृद्यामाजी ।३।
करिता तुझी भक्ती नाही पुनरावृत्ती : सायुज्यता मुक्ती प्राप्त होये ।४।
गणेशनाथ म्हणे भक्ती तुझी देई : न मागेची काही अनिक तुज ।५।

अभंग : ५४५

जिवाचा सज्जन येक नारायण : तुझेनी पावेन परम सुख ।१।
मायेचे माहेर अनंत अपार : उतरावया पार भवसिंधुचा ।२।
संसाराचे सुख हेची परम दु:ख : तारक गा येक नाम तुझे ।३।
नामापरते काही न कळे सर्वथा : चित्ताचा जानता तुची येक ।४।
गणेशनाथ म्हणे माझ्या सद्गुरूनाथा : तुजविणे सर्वथा अनिक नाही ।५।

अभंग : ५४६

ताडाचा जो वृक्ष बहुत जाला थोर : परी उपकार करिल काये ।१।
रत्नाचा उजेड प्रकाश चहुकडे : परि काय गोड होईल बापा ।२।
पाहा तो परिस लोह सोने करी : समरस उपकारी होईल काये ।३।
गणेशनाथ म्हणे तैसे काय जीणे : अनन्य शरण तुझे पाई ।४।

अभंग : ५४७

शुध्द पाहे सुवर्ण आटिल्यावाचून : नव्हेची भूषणे अलंकार ।१।
मैलागिरी चंदन उगाळिल्याविण : सुगंधता जाण न कळे त्याची ।२।
मळले हे वस्त्र आपटिल्याविण : न निघेची जाण डाग त्याचा ।३।
गणेशनाथ म्हणे आधि दु:ख घ्यावे : मग सुखे जावे सुखपदा ।४।

अभंग : ५४८

आवघे सामाविले म्हणुनि समुद्र जाला : कोण म्हणे त्याला समुद्र ऐसे ।१।
सर्वही साहिले म्हणुनि सीता जाली : कोण म्हणे बोली सीता ऐसी ।२।
सर्वस्वे उदार म्हणुनि सत्वधिर : उतरता पार संदेह नाही ।३।
गणेशनाथ म्हणे गगनाहुनी आवकाश : घेउ सावकाश प्रेमसुख ।४।

अभंग : ५४९

पृथ्वीचे ठाई बहुत पाषाण : तरी चिंतामणी होतील काये ।१।
पृथ्वीचे ठाई बहुत वृक्ष आहे : परि होईल काये कल्पतरू ।२।
आकाशाच्या ठाई तारंगणांचे भार : परि काय ध्रुव होईल बापा ।३।
विश्वजना ठाई बहुत मत आहे : परि होतील काये साधु संत ।४।

गणेशनाथ म्हणे तुझी कृपा आहे : तरी होईल काये प्रेमभक्त ।५।

अभंग : ५५०

घरोघरी गाणी जाली रे मटकाणी : परी वैष्णवा वाचोनी प्रेम नाही ।१।
घरोघरी गाऊन सांगती पुराणे : गुरूभक्तीवाचून प्रेम नाही ।२।
घरोघरी कथा सांगती त्या वार्ता : गुरूभक्तीची सत्ता वेगळी ते ।३।
गणेशनाथ म्हणे सत्य गुरूभक्ती : अनिक काही चित्ती नावडेची । ४।

अभंग : ५५१

गुरूनाथावाचोनी अनिक चित्ती मनी : तयाची जननी विडनी वांज ।१।
नको देवा आता सर्वस्वाचा संग : जालोसे नि:संग तुझे नामी ।२।
काम क्रोध दंभ अहंकार आभिमान : आलो यांच्या भेणे तुजपासी ।३।
आता येक करी विनंती अवधारी : कल्पना बाहेरी घाली देवा ।४।
गणेशनाथ म्हणे चरणी द्यावा ठाव : हाची माझा भाव तुझे संगे ।५।

अभंग : ५५२

सर्वही साधन जिवासी बंधन : गुरूभक्तीवाचून मोक्ष नाही ।१।
सर्वा श्रेष्ट शिर गुरूभक्ती येक सार : उतरावया पार भवसिंधुचा ।२।
सर्व साधनाचे माथा गुरूभक्तीची सत्ता : मुक्ती सायुज्यता वोळगती ।३।
गुरूभक्तीमुळे तरती तिन्ही ताळे : सर्वा श्रेष्ट मुळ तुची येक ।४।
गणेशनाथ म्हणे भैरवनाथ गुरू : उतरावया पारू भवसिंधूचा ।५।

अभंग : ५५३

माझ्या वडिलांची मिराशी तुझ्या पायापासी : लिखित मजपासी आहे देवा ।१।
लिखिताप्रमाणे मज चालवणे : आहेसी सर्व जाण पंढरीनाथा ।२।
दुर्बळ माझे कुळ ठाउके सकळ : घडी घडी सांभाळ करि माझा ।३।
गणेशनाथ म्हणे मुळी आसता : आजुणी सद्‌गुरूनाथा करुणा न ये ।४।

अभंग : ५५४

संतांचा महिमा कोण जाणे सिमा : सिणला तो ब्रह्मा बोले वाणी ।१।
संतांचा हा पार नेणती आवतार : म्हणती अपार कोण जाणे ।२।
संतांची ही कळ पाहता आकळ : खेळोनिया खेळ वेगळाची ।३।
तेथे मी किंकर काय वानु थोरी : पाहता नाही उरी संसाराची ।४।
गणेशनाथ म्हणे धन्य भेटी झाली : कल्पना निमाली तुमचेनी ।५।

**संत सद्‌गुरू गणेशनाथ महाराजांचे भारुडे, गवळणी, हिंदी पदे आणि आरत्या**

५५५

बारासोळा मिळोणी । घेऊनी दधि धृत लोणी ।

मथुरे चालल्या गौळणी । गोपाळ मनी ॥१॥
गोरस भरूणी दृढी। आयुष्याची तातडी ।
स्वानुभवे प्रेमाची गोडी । पाहे निजात्म जोडी ॥२॥
बैसोनिया हाटवंटी । न सांगो इतर गोष्टी ।
गोपाळी पडली दृढ मिठी । न सुटेचि गाठी ॥३॥
कृष्णरुपी वेधले मन । नाठवेची निशिदीन।
विसरल्या परतोनी जाणे । पाहताची खूण ॥४॥
मन हा मागतो दान । न सोडीची जीव-प्राण ।
गणेशनाथ हो अज्ञान । सहजार्पण ॥५॥

५५६

मन हे मोहिले माय । नवल सांगावे काय ॥धृ॥
समस्त गौळणी मिळुणी म्हणती । सांग यशोदे कृष्णाप्रति । सोसावे किती मन हे ॥१॥
कवाड मोडुनी शिके तोडुनी । नवनीत खातो मडके फोडूणी ॥ मन हे ॥२॥
प्रकृती माझा काढुनी पालव । हरीतो माझी लाज सर्व ॥ मन हे ॥३॥
धरू जाता न कळे खूण । काय करू गेलो किकभ्याने । गणेशनाथ म्हणे दीन मन हे ॥४॥

५५७

तुझे रुप नारायणा । सुंदर आठवे मना ॥धृ॥
निज गुज सुखाची मूर्ती । मुनिजन मानस विश्रांती ।
हरी हा बैसला चित्ती । प्रेमे वोसंडे प्रीती ॥१॥
गोपी गोवळ सकळ । चाळा दाउनिया खेळ ।
सर्वही खेळुनी वेगळा । नाटक न कळे गोपाळा ॥२॥
सोळा सहस्त्रवर नारी । आपण पूर्ण ब्रह्मचारी ।
भोग भोगुनी सकळ । अलिप्त राहे अंतरी ॥३॥
धरितो नर नारी सोंगे । भव रूप दावी अनेक।
चित्त वृत्ति चोरली । नाठवे आणिकही योग ॥४॥
निर्गुण ब्रह्मीचा खेळ । स्वये गोरक्ष गोपाळ ।
गणेशनाथ लडिवाळ । मागे मुखिचा मुखकवळ ॥५॥

५५८

सुंदर वर्णावा काय । पाहता रूप मनोहर होय ॥धृ॥
निर्गुण ज्याला नाही । नाव रूप ते कायी ।
स्वये परब्रह्म पाहि । तेची सर्वत्रा ठाई ॥१॥
चरणी तीर्थाची खाणी । लोक जन्मले तिन्ही ।
तळवे टाचा सुकुमार । घोटे भाग नीलवर्ण ।

पद्मे दिसती झळाळ । जैश्या अरुणाच्या किरणी ॥२॥
वाक्या तोडर गर्जती । रुण-झुण  दशनाद ध्वनी ।
असुर अगणित मर्दीले । उपमा नाही त्रिभुवनी ।
ब्रिदे शरणागत तारी । म्हणवी निज मोक्षदानी ॥३॥
पोटऱ्या सरळा शोभती । गुल्फ धैर्याची वस्ती ।
जानुशि  जान्हवी प्राप्ती । जग हे उदर विख्याती ।
नाभि सुंदर जे थोरी । ब्रह्माकारली मूर्ति  ॥४॥
अनंत ब्रम्हांड कोटी । जन्मली सकळ ही सृष्टि ।
त्रिगुण त्रिमुर्ती देव । विधाता ईश्वर हा पोटी ।
करूनी अकर्ता सर्व । न कळे अगम्य हे गोष्टी ॥५॥
ब्रम्हपद मेखळा । अनेक रत्नाच्या किळा ।
हृदयी अमृत जिव्हाळा । चंदन उटी घे सावळा ।
चतुर्भुज आगळा । कौस्तुभ वैजयंती माळा ॥६॥
सुरेख शोभे मुखकमळ । बत्तीस रत्नांची ढाळ ।
ओठ पोवळ्याच्या वेली । रंगे सुरंग तांबुळ ।
जिव्हा वेदाची जननी । शब्दे नि:शब्द वोळली ॥७॥
नासिक सुरेख सरळ । नयनी विशाल ते ज्वार ।
रेखित भोंवया भाळ । मस्तक वरिष्ठ मंडळ ।
श्रवणी श्रवण कुंडले । मुक्ते अमुक्त ढाळ ॥८॥
लल्लाटी केसर मळवट। अक्षता मध्यभागी नीट ।
अलक्ष लक्षवेना किरीट । मुक्ताफळाची दाट ।
अनेक सूर्यप्रकाश । तैसा झळाळ मुकुट ॥९॥
लावण्य निज सुखमूर्ती । च्यारी आयुधे हाती ।
दैत्य दानव मर्दिले । भक्ता तारक त्रिजगती ।
निर्गुण साकार ब्रह्म । गणेशनाथाचे चित्ती।
गुरुविण दुसरे अनु नाही । साष्टांग लोटांगण प्रीती ॥१०॥
सुंदर वर्णावा काय । पाहता रूप मनोहर होय॥धृ

५५९

सये दाखवा दाखवा हरी डोळा वो । जो का जीवा जीवन गोपाळा वो ॥
चित्त चोरीले लाविला छंद चाळा वो । तयाकारणे शोकल्या सर्व कळा वो ॥धृ॥
चतुर्भुज सावळा वनमाळा वो । ज्याचे कासे काशिला सोनसळा वो ॥
भाळी केशर टिळा पिवळा वो । उटी साजिरी वैजयंती माळा वो ॥१॥
कर्णी मुक्त कुंडले झळाळ वो । मुखी रंगले सुरंग तांबूल वो ॥

माथा बिरगुंठी शोभती कुरळ वो । तया पहावया भुकेले माझे डोळे वो ॥२॥
भ्रांति पडदा काढोनी वेगी टाका वो । लवकरी भेटवा गोरक्ष प्राणसखा वो ॥
जन्म खंडले अपार नाही लेखा वो । गणेशनाथ लाधला आत्मसुखा वो ॥३॥

५६०

प्रेम पिसे लागले मज माय वो । तनु मन व्यापिले सांगू काय वो॥
पूर्ण भाग्ये सापडली तुझी सोय वो । वेगी दाखवा दाखवा कृष्णपाय वो ॥धृ॥
सहज वृत्ती चालता मार्गी भुले वो । काही नाठवे स्मरण भलते बोले वो ॥
जन विजन स्वरूपमय जाले वो । बहुता जन्मीचे सुकृत फळा आले वो ॥१॥
पाहणे पाहता तरळले माझे डोळे वो । सर्व व्यापक काशीया नातळे वो ॥
चपळ पवनाहुनी अक्षय अढळ वो । पूर्ण कृपेविन न कळे त्याची कळ वो ॥२॥
शोके कंठी उरला असे प्राण वो । जीवन कळा पाटल्या जळो जिने वो ।
याचे भेटी कारणे थोर शीण वो । गणेशनाथा गोरक्षी दृढ ध्यान वो॥३॥
प्रेमपिसे लागले मज माय वो॥

५६१

तुमच्या पाया पडते साजणी वो । वेगी गोपाळ आना समजाऊनी वो ॥
तया कारणे सांडली बाई दोन्ही वो । जया कारणे अवयव अलंकार वो ।
भक्ती निराधार करुनी श्रृंगार वो ॥
कैसा अजुनी न ये चितचोर वो । निमिष अर्ध न धरवे धीर  वो ॥१॥
माझे जिविचे जाणता सर्व गुज । शुद्ध अंतर मंदिरी केली शेज वो ।
सांडूनी वैभव जातीचे थोर लाज वो । देवावाचोनी नावडे काही दुजे  वो ॥२॥
बोध आर्त धरोनी हाची पोटी । सांगे अंतरंग निज सुख गोष्टी वो ॥
ब्रह्मानंद पावन उठाउठी वो ॥ गणेशनाथा रोकडी तुझी भेटी वो ॥३॥

५६२

कामना धरुनिया काम । विसरले आत्माराम ॥
जो का परब्रम्ह निजधाम । मुळीचे वर्म  ॥१॥
पाहुनिया उगमाशी । विसरलो सर्वस्वाशी ॥
अक्षयपद वो मिराशी । निजलाभ त्याशी ॥२॥
सावकाश करी ध्यास । समभक्ति नाम घोष ॥
ते पावती वो पंथास । निजमोक्ष त्यास  ॥३॥
सद्भावे प्रेमप्रीती । भूतदया निज शांती ॥
गणेशनाथ वो । एकांती सद्गुरुमूर्ती ॥४॥

५६३

सावध सावध सावध मना। स्वरूपी होय ॥

लागे वेगे पाहे तू तव । मुळीचा ठाय ॥धृ॥
रक्तबिंदू पवन मिळूनी। केला आकार ॥
त्रिगुणात्मक शरीर चैतन्य । फुटला ओंकार ॥
सप्तही धातू पाच तत्वे । सहती संसार ॥१॥
अस्थी नाडी त्वचा मास। रोमन बहुवस॥
कल्पनेचे संगे सर्वही । ज्याला समरस ॥
भोगिता चौऱ्यांशी लक्ष । जन्म गर्भवास ॥२॥
आहार निद्रा मैथुन हे तव । देहाचे जीवन ॥
जरा मरण व्याधी शोक । दुःख हे पूर्ण ॥
यमाची यातना तेथूनी । सोडवी कोण ॥
यालागि सद्गुरु सेवी । सांडूनी अभिमान ॥३॥
नश्वर हा संसार जाणुनी । करावे स्वहित ॥
भक्ती मुक्ती शांती । संत गेले ज्या पंथे ॥
त्याची मार्गे जाणे आम्हा । म्हणे गणेशनाथ ॥
संत सोहळा पाहूनी डोळा । विदेही विरक्त ॥४॥
सावध सावध सावध मना ०॥

५६४

आशा बंदी जीव याला । न सुटे माया ॥ भक्ति भावेविना व्यर्थ । जन्म हे काया ॥
कृपाळा स्वामीया तारी । श्री गुरुराया ॥ तुजविना आणिक साधन। श्रमची वाया ॥१॥
तारी या संसारी वेगी । सद्गुरु नाथा ॥ भावे शरण चरणावरी ठेविला माथा ॥धृ॥
जप तपे अवघड काही । न कळे ध्यान ॥ पिंड आणि ब्रह्मांड ब्रह्म । न कळे ज्ञान ॥
निर्गुण निरंजन तुझी । न कळे खून ॥ अनन्यभावे शरण आलो । होऊनिया दीन ॥२॥
भक्ती आणि वैराग्य नाही । सम सर्व भाव ॥ सर्वांघटी जाणुनी एक । पाहता देव ॥
मावळे अज्ञान होय । परब्रह्मी ठाव ॥ ऐशी काही न कळे तुझ्या । स्वरूपाची माव ॥३॥
पतिताहुनि पतित झालो । भूमीशि भार ॥ हसता खेळता गेला । व्यर्थ संसार ॥
सर्वांपरी टाकियला । तुजवरी भार ॥ गणेशनाथा करी स्वामी। जन्म उद्धार॥४॥

५६५

नमो जी रघुनाथा । राजसा मानस मोहना हंसा ॥धृ॥
आत्माराम तु । व्यापक । आणिक सम एक ।
नाही दुसरे हे । कौतुक । पाहताती तिन्ही लोक ॥१॥
जो का प्रतापी । सुख ठेवा । सोडविले देवा ।
शिळा तारिली । सद्भावे । नकळे त्याचा भाव ॥२॥
भक्ता कृपाळ । दयाळ । शरणागत वत्सळ ।

दासा पद देतो । अढळ । धरिता सेवा बळ ॥३॥
गणेशनाथ म्हणे दीनबंधु । तारक । तु भवसिंधु ।
सर्वही तारिशी उद्धारिशी । देऊनी ब्रह्मबोधु ॥४॥

५६६

सखयारे पावे सद्गुरु वेगी । नरदेह जातो विषयसंगी ॥
क्रोध रे जाळी सर्व अंगी । सत्वर पावे मजलागी ॥धृ॥
कोण्ही रे नाही गणगौत्र । संबंधी नाही इष्टमैत्र ॥
मजकडे पाहे उघडूनी नेत्र । तेव्हा मी होईन कृपापात्र ॥१॥
दाही दिशा अवलोकिता । तुजविण गा नाही कृपावंता ॥
दुःख मी सांगू किती आता । प्रेम तु देऊनी हरी चिंता ॥२॥
या जन्माचे बहुत कष्ट । म्हणूनिया धरिली नीट वाट ॥
गणेशनाथ जिवे साट । अंतःकाळी तुझी भेट ॥३॥

५६७

बहुत सायासे । चरणी केलासे वास ॥धृ॥
जन्मोजन्मी । ऐशिया नेयमी । अचरे सदा सद्गुरु धर्मी । वृत्ती परब्रम्ही सखया ॥१॥
माता पिता । बंधू बहिणी । स्त्री सुत धन सांडोनी । समयी नसे कोण्ही सखया ॥२॥
तनु मन पूर्ण । अगणित साधने । शेकला प्राण सखया ॥३॥
आता कोठवरी पाहसिल अंत । सत्वर दर्शने तरिच हित । म्हणे गणेशनाथ सखया ॥४॥

५६८

धन्य सद्गुरु माहेरा । चुकवी जन्माचा फेरा ॥धृ॥
तोडूनी माया कल्पना आधी । कल्प जाळुनी सम करी बुद्धी । निजात्म सुख बोधी ॥१
काम क्रोध मद मत्सर । अहंकार विषय मोह दुर्धर । सत्वर करी दूर ॥२॥
आशा मनसा इच्छा जाळी । प्रकृती विघ्ने प्रपंच टाळी । अमृत नव्हाळी ॥३॥
निरसुनि सर्वही दृष्याकार । पुनरपि नको दुःख संसार । गणेशनाथ हित थोर ॥४॥

५६९

नरदेह पाहुणा पाहुणा । भावे बळ गा नारायणा ॥धृ
श्रवण नयन अवयव पूर्ण । सर्वही जातील सांडुन ॥१॥
चरण कर आणि शरीर । उर्ध्व कापे थरथर ॥२॥
हाड त्वचा मास गोळा। पाहता नरकाचा पुतळा ॥३॥
गणेशनाथ म्हणे गुज । जाणोनी शरण आलो तुज ॥४॥

५७०

नश्वर मातीचा पुतळा । सुख ययाचा सोहळा ॥धृ॥
ऐसे नर देहाचे गुज । जाणोनी शरण आलो तुज ॥१॥

नव द्वारे गळती घाण । यावरी कर्म आचरण ॥२॥
सुखे देवाला विसरे । भोगी दुःखाचे डोंगर ॥३॥
गणेशनाथ म्हणे सेवा । जन्मोजन्मी घडो देवा ॥४॥

५७१

अक्षय गुरुभक्ती । करिता मोक्षाची प्राप्ती ॥धृ॥
न करी भेदाभेद स्तुती । अचरे सदा आत्मस्थिती ॥१॥
अनन्य शरण होउनी दीन । आज्ञालण सेवा पूर्ण ॥२॥
श्रध्दा प्रेम सत्य हे पोटी । चातक जैसा चंद्रामृत घोटी ॥३॥
सर्वार्पण करूनी आधी । गणेशनाथ हे निश्चय बुद्धी ॥४॥

५७२

मन हे सद्गुरु पायी । दुजे नाठवचि काही वो ।
व्यापक जनी वनी । आणिक दुसरा नाही कोण्ही वो ॥धृ॥
देउनी प्रेमभाव ।दावि जो मोक्षाचा ठाव ॥१॥
तोडुनी भ्रांती । अढळ सकळही दृश्य केले मन वो ॥२॥
दाउनि निज स्वरुप । सखिये तन्मय केले मन वो ॥३॥
स्वय ब्रह्मसम ते । पुनरपि नाही येणे जाणे वो ॥४॥
अक्षयपदी ऐक्य केले । निःशब्द निर्गुण वो ॥५॥
गणेशनाथ म्हणे ऐसे । सद्गुरूचे देणे वो ॥६॥

५७३

अरे काय सावध लवकरी होय । धरोनी मुळीची सोय ॥
हरिखे हरिगुण गाय । गुरूपदी दृढ राहे । स्वये ब्रह्मची पाहे ॥
चित्त-वित्त वेचुनी । सुख-दुःख सांडुनी । अनन्य शरण जाय ॥१॥
नश्वर जाणुनी काया । का भुललाशि वाया । मिथ्या प्रपंच माया ॥
भजे श्री गुरु पाया । आणिक साधन वाया । न करी चिंता जाया ॥
विरक्त विदेही । साधुनी सकळही । निजात्म निजसुख ठाया ॥२॥
आता आदि अंती । समभावे दृढ भक्ति । सांडुनि च्यार्‍ही मुक्ती ॥
अक्षय निज गुज चित्ति । निष्काम निवृत्ती । ब्रह्मसुख प्राप्ती ॥
गणेशनाथ म्हणे । सद्गुरु तारक । निशिदीनी वानिन कीर्ती ॥३॥

५७४

अरे आता तोडुनी भ्रमण चिंता। जाळुनिया अहंता । भज या सद्गुरुनाथा ॥
अक्षयपद ये हाता । निजात्म गुण ते गाता ॥
कामिनी कांचन । सांडुनी सुत धन । उन्मन सुख घे पाहता ॥१॥
अरे सुखी व्हावे एका एकी । पूर्ण तिन्ही लोकी । तारक नाम घोकी ॥

तरिच मिळशिल ऐक्यी । अलक्ष लक्ष लेखि ।
निरसुनि दोन्ही । जनी वनी मनी। अंतर सुख हो सुखी ॥२॥
अरे चिंती । सगुण आदिमूर्ती । श्रध्दा प्रेम प्रीती ।
निरसुनि दृश्य भ्रांति। राहे सहज स्थिती । नाही पुनरावृत्ती ।
गणेशनाथ म्हणे निर्भय निर्गुण। अक्षय सद्‌गुरुभक्ती ॥३॥

७७५

धन्य हा सद्‌गुरू । धन्य धन्य साधु-संत ।
रिद्धी सिद्धी मुक्ती माहेर । अक्षय पद देत ॥धृ॥
सद्‌गुरूविण मुक्ती नाही पाहता तिन्ही लोकी ।
अचल अढळ अमर करिता । शरणागता सुखी ॥१॥
देवा देतो देवपण । सद्‌गुरु जिव तो करी ब्रह्म ।
तोडुनी माया शोधूनी काया । दावी मुळीचे वर्म ॥२॥
नवविधा भक्तीचे । पूर्ण लेवविले लेणे ।
आत्मसुखे सुखी केले । जन्मा नाही येणे ॥३॥
सर्वा श्रेष्ठ गुरुपद पाहता । उपमा ज्याला नाही ।
गणेशनाथ म्हणे सत्य मिठी दिल्ही पायी॥४॥

७७६

धन्य तुझे नाम घेता हरली जन्म दुःखे ।
कीर्तन श्रवण स्मरण करिता । पूर्ण जालो सुखी ॥धृ॥
धन्य साधु-संत सेवा । करिता उध्दारागती ।
प्रेमभावे शरण जावे । तारक आदिअंती ॥१॥
धन्य तुझे रूप पाहता । गेली सर्व चिंता ।
विरक्ती मुक्ती पाहता अजन्म । जन्मा न ये आता ॥२॥
धन्य तुझी लीला नकळे । माया भ्रांति जीवा।
व्यापक सर्वाठाई जो का । ब्रह्म सुख ठेवा ॥३॥
अपार तुझे गुण वानी । ब्रह्मा सहस्रमुखे ।
गणेशनाथ म्हणी मी हे । काय तेथे रंक ॥४॥

७७७

धर्म जागो गुरुनाथाचा । बोले अमृतवाचा गा ।
अंतर बाहीर पुर्ण पाहे । तु तरी सोयरा जीवाचा गा ॥धृ॥
प्रपंच हा वृक्ष थोर । झाला सर्वांगी खांकर गा ।
बैसविले तयावरी । काही न कळे मज विचार गा ॥१॥
माता नाही पिता नाही । बंधुवर्ग सखे काही गा ।

परदेशी दीन पतीत झालो । म्हणुनि पडलो तुझे पायी गा ॥२॥
नाही मज हात पाय । नेत्र श्रवण हे दे गा ।
म्हणुनिया शरण आलो । तारि कृपाळू तू माय गा ॥३॥
संत साधू योगी जन । मी तरी तुमचे पोसणे गा।
पूर्व भाक सांभाळावी । द्यावे उच्छिष्टाचे दान गा ॥४॥
अंगी नाही एकही बळ । झालो सर्वांगी पांगुळ गा ।
गणेशनाथ म्हणे तुज । देइ भक्ती करि अढळ गा ॥५॥

५७८

जिवे प्राणे करू साटी । तरी नित्य तुझी भेटी ।
आनंदे सांगू गोष्टी। भावे भक्तीचे दान द्यावे ॥१॥
मोक्षसुख पाहुनि डोळा । जाणोनिया जीवनकळा ।
आसोनिया हो वेगळा । सदा पावशी ब्रह्म पदा ॥२॥
भक्ती आणि वैराग्य दोन्ही । निष्ठा आणि निर्धार मनी ।
कीर्ति करू जनी वनी । तुझी देह वेचू देवकाजी ॥३॥
जन्म मरण चुके जेणे । ऐसे सद्गुरुचे देणे ।
गणेशनाथ विनवी दीन । सांग चरणसेवा ते मागे ॥४॥

५७९

भावे घेता तुझे नाम । यम तेही होती राम ॥१॥
भावे करिता तुझी भक्ती । दैत्य तेही देव होती ॥२॥
भावे करिता तुझे भजन । दुर्जन ते होती सज्जन ॥३॥
गणेशनाथ म्हणे आता । सद्गुरू समर्थ दाता ॥४॥

५८०

ॐ नमो सद्गुरुनाथा जी । चरणावरी माथा जी ।
बोलो मुळीची वार्ता जी । तारक शरणागता जी ॥१॥
आत्मा निष्कळ परब्रम्ह वो । नाही कर्मा कर्म वो ।
सांडुनी सर्वही भ्रम वो । विरळा जाणे वर्म वो ॥२॥
नाही माता पिता वो । कैची कुळकथा वो ।
मिथ्या सर्वही वार्ता रे । कैचा कर्ता हर्ता रे ॥३॥
मुळ जेथे नाही रे । आकार तो कायि रे ।
पाहता आपुले ठाई रे । देही ना विदेही रे ॥४॥
अबीज बीज नाही रे । विस्तार तो काही रे ।
समाप्ती कोणे ठाई रे । कोठे काहीच नाही रे ॥५॥
जन्म ना अजन्म रे । कर्म ना अकर्म रे ।

धर्म ना अधर्म रे । कोण जाणे वर्म रे ॥६॥
जन्म मरण नाही रे । शोक मिथ्या काइ रे ।
सहजी सहज पाही रे । आपण कोण ते काइ रे ॥७॥
देह ना विदेह रे । जाती-कुळ ते काय रे ।
साच कैसे होय रे । बहुरूपियाच्या न्याये रे ॥८॥
नैश्वर हा संसार रे । जाणोनिया नर रे ।
म्हणती हेचि सत्य रे । विसरले मुळीचे घर रे ॥९॥
वेदांत सिद्धांत रे । पाहुनी धादांत रे ।
म्हणती हेचि सत्य रे । म्हणूनी अधोगती रे ॥१०॥
कैचे देह आप रे । कैचे नाव रूप रे।
कैचे पुण्य-पाप रे । पाहता ब्रह्मरूप रे ॥११॥
शास्त्रे आणि पुराणे रे । आणि साही दर्शने रे ।
साधुनि अभिमान रे । न कळे ते गुरूखूण रे ॥१२॥
अचरता षट्कर्म रे । तव चढे अभिमान रे ।
चुकले मुळीचे वर्म रे । पडलासे भव भ्रम रे ॥१३॥
नाही पवन पाणी रे । आकार देव तिन्ही रे ।
कैच्या च्यारी खाणी रे । शिव ना शक्ती दोन्ही रे ॥१४॥
समूळ नाही मरण रे । कैचे पाचही प्राण रे ।
कैचे ज्ञान ध्यान रे । आपण कैचा कोण रे ॥१५॥
नाही सर्वही तीर्थ रे । कैची पाचही भुते रे ।
जप तपे व्रते रे । वायाची हे भ्रांती रे ॥१६॥
निर्गुण निरामय रे । त्याशि वानु काय रे ।
अलक्ष लक्षा न ये रे । व्यापुनि अलिप्त होय रे ॥१७॥
वायु सर्वाघटी रे । असोनि नेदी भेटी रे ।
आत्म प्रभा कोटी रे । न साहे हे गोष्टी रे ॥१८॥
ऐसा सद्गुरुनाथ रे । नकळे त्याचा अंत रे ।
स्वयंभू सदोदित रे । अर्थाचा गुह्यार्थ रे ॥१९॥
विश्वंभर विश्वनाथ रे । व्यापक सर्वातित रे ।
त्रिगुण गुणरहित रे । उपमा नाही जेथे रे ॥२०॥
निर्गुण निराकार रे । श्रध्दा भक्ती थोर रे ।
धरिले ते अवतार रे । उद्धरिले अपार रे ॥२१॥
अपुले महिमेलागी रे । एकचि दोन्ही भागी रे ।
होउनि बहुरूप रंगी रे । लाघव दावी अंगी रे ॥२२॥

अपुले भक्तीसाठी रे । धरोनि रूप दे भेटी रे ।
सांगोनि हे गोष्टी रे । आपणचि पाठी पोटी रे ॥२३॥
आपणचि अवतार रे । आपणचि लहान-थोर रे ।
आपणचि सर्वेश्वर रे । आपणचि निराकार रे ॥२४॥
अपुणचि पुरुष नारी रे । आपणचि ब्रह्मचारी रे ।
ऐसा सूत्रधारी रे । नकळे त्याची खूण रे ॥२५॥
सद्‌गुरु आज्ञा पाळी रे । अहंकृती सर्वही गाळी रे ।
विकास बुद्‌धी जाळी रे । न पडे चिंता मेळी रे ॥२६॥
निर्धारे गुरूभक्ती रे । आणिक साधन व्यर्थ रे ।
ऐसे ज्याचे चित्त रे । तरीच पावल पंथ रे ॥२७॥
दृढ भक्तिभाव रे । निज मोक्षाचा गाव रे ।
आणिक सर्वही वाव रे । नाही या संदेह रे ॥२८॥
सर्वाघटी भक्ति रे । तरीच ब्रह्म प्राप्ती रे ।
सम सेवा वृत्ती रे। पूर्व भाग्य गती रे ॥२९॥
न करी भूत दया रे । त्यांचे साधन वाया रे ।
नरदेह जातो जाया रे । पाहे मुळीच्या ठाया रे ॥३०॥
सर्वा श्रेष्ट गुरुभक्ती रे । करिता शांती निवृत्ती रे ।
अक्षय सुख अव्यक्ती रे । निश्चय ब्रह्म विरक्ती रे ॥३१॥
समर्थ माझा गुरुनाथा रे । आदि अंती दाता रे ।
देखोनी हरली भवचिंता । चुकली जन्म हे व्यथा ॥३२॥
सर्वही जेथे नाही रे । गोरक्ष अवघा पाही रे ।
गणेशनाथ काही रे । दुसरा उरला नाही रे ॥३३॥

५८१

हरिगुण न वदे वाचे । तवरि हित कैचे हित कैचे ।
देहबुद्‌धी घेऊनी नाचे । तवरि हित कैचे हित कैचे ॥१॥
अखंडता लय नाही । तवरि हित कैचे हित कैचे ।
षड्‌ गुण उर्मी देही । तवरि हित कैचे हित कैचे ॥२॥
अह मत मीपण बोले । तवरि हित कैचे हित कैचे ।
प्रपंच मार्गे चाले । तवरि हित कैचे हित कैचे ॥३॥
गुरु गुज नाही कळले । तवरि हित कैचे हित कैचे ।
विषयावरी मन वळले । तवरि हित कैचे हित कैचे ॥४॥
अंतर शोधन नाही । तवरि हित कैचे हित कैचे ।
मन हे न बसे ठाई । तवरि हित कैचे हित कैचे ॥५॥

सर्वही वर्मे नकळे । तवरि हित कैचे हित कैचे ।
जाणुनी झाकी डोळे । तवरि हित कैचे हित कैचे ॥६॥
न करी संत सेवा । तवरि हित कैचे हित कैचे ।
आत्मा न पडे ठावा । तवरि हित कैचे हित कैचे ॥७॥
न सुटे माया ममता । तवरि हित कैचे हित कैचे ।
आवडे कनक कांता । तवरि हित कैचे हित कैचे ॥८॥
समता नव्हे दृष्टी । तवरि हित कैचे हित कैचे ।
स्वरूपी नव्हे भेटी । तवरि हित कैचे हित कैचे ॥९॥
सद्‌गुरू कृपा न घडे । तवरि हित कैचे हित कैचे ।
गणेशनाथ नव्हे अंगे । तवरि हित कैचे हित कैचे ॥१०॥

५८२

सद्‌गुरू कृपा फळली । म्हणुनी हित झाले हित झाले ।
अमृत धेनु वळली । म्हणुनी हित झाले हित झाले ॥१॥
गुरुपदी केला थारा । म्हणुनी हित झाले हित झाले ।
चुकला जन्मफेरा । म्हणुनी हित झाले हित झाले ॥२॥
अनन्य शरण झालो । म्हणुनी हित झाले हित झाले ।
प्रपंच देखोनी भ्यालो । म्हणुनी हित झाले हित झाले ॥३॥
निजात्म गुण ही गाता । म्हणुनी हित झाले हित झाले ।
सर्वभुती हरी पाहता । म्हणुनी हित झाले हित झाले ॥४॥
समता झाली दृष्टी । म्हणुनी हित झाले हित झाले ।
ब्रह्मचि पाहे सृष्टी । म्हणुनी हित झाले हित झाले ॥५॥
भेदाभेद गेला । म्हणुनी हित झाले हित झाले ।
प्रेम सुखानुभव धाला । म्हणुनी हित झाले हित झाले ॥६॥
भ्रांती पडदा तुटला । म्हणुनी हित झाले हित झाले ।
मिथ्या प्रपंच अटला । म्हणुनी हित झाले हित झाले ॥७॥
ज्ञानसिंधू वळला । म्हणुनी हित झाले हित झाले ।
अहंकार वृक्ष ढळला । म्हणुनी हित झाले हित झाले ॥८॥
विरक्तपणे विचरे । म्हणुनी हित झाले हित झाले ।
भक्ति करिता न सरे । म्हणुनी हित झाले हित झाले ॥९॥
अपार पुण्य कोटी । म्हणुनी हित झाले हित झाले ।
गणेशनाथ गुरु भेटी । म्हणुनी हित झाले हित झाले ॥१०॥

५८३

सद्‌गुरु पूर्ण सूर्यप्रकाश । आणिक दुसरा देव नसे ॥धृ॥

माया रजनी । दवडुनी करितो । अद्‌वैत ज्ञान अविनाश ॥१॥
हृदय कमळदळी राहुनि निश्चळ । ब्रह्म करी समूळ ॥२॥
ब्रम्हांड कोटी ग्रासुनि पोटी । गणेशनाथ निज भेटी ॥३॥

५८४

जरी शास्त्रे पाहिली लक्ष कोटी । तरि परमार्थी सत्य नव्हे भेटी ॥१॥
वेद श्रुती अलोट करी आधी । तरी समता नव्हे दृढ बुद्‌धी ॥२॥
शुद्‌ध ब्रह्मकर्म सर्व जाणे । सर्वाभूती एक देव नेणे ॥३॥
संत सेवा आवडे पूर्ण जेव्हा । गणेशनाथ स्वये ब्रह्म तेव्हा ॥४॥

५८५

अनंत ब्रह्मांड कोटी । ज्याचे जन्मली पोटी ॥धृ॥
दशावतार धरि निर्धारे । देऊनी कैसा वेगळा निर्धार । रचिला साकार ॥१॥
प्रकृती पुरुष होऊनी दोन्ही । महीमंडळ त्रिगुण तिन्ही । तुझी ही करणी ॥२॥
ब्रह्मा विष्णू रुद्र माया । नकळे ज्याची छाया-माया । गणेशनाथ मिठी पाया ॥३॥

५८६

आता काश्याने व्हावे संत ॥धृ॥
देही असता प्रबळ क्रोध । तेथे कैचा तो आत्मबोध ॥१॥
देही असता देह वासना । तेणे आलो मी जन्म-मरणा ॥२॥
देही असता सर्वही माया । तेणे अंतरलो मी पाया ॥३॥
गणेशनाथ म्हणे गुरुनाथा । जनी वनी गा तू ची समर्था ॥४॥

५८७

नमो सद्‌गुरु अलक्ष आदीनाथा । आदि अंती तू ची मोक्षदाता ।
तुझ्या नामे चूकती जन्मव्यथा जी जी जी जी ।
तुझ्या चरणी ठेविला दृढ माथा ॥१॥
ब्रह्मा विष्णू नेणती ज्याचा पार । रुद्रे आरण्य सेविले निरंतर ।
तपोनिधी शीणले थोर थोर । जी जी जी जी ।
परि निर्गुण तु निराकार ॥२॥
अनंत ब्रह्मांड जयाचे पोटी । ज्याच्या नखाग्रि सर्वही सृष्टी।
त्याची प्रभा हे भानू दिसे कोटी । जी जी जी जी ।
त्याशी दीन मी काय सांगू गोष्टी ॥३॥
जो का सगुण-निर्गुण सूत्रधारी । करूनी अकर्ता सर्व जीवा तारी ।
नाम मात्रे चुकवी वेरझारी । जी जी जी जी ।
तुझी कीर्ती वानीन महाद्‌वारी ॥४॥
कृपावंत जैसा क्षिरसिंधु । निरुपम उदार दीनबंधू ।

जग जनक जननी नाही भेदु जी जी जी जी ।
गणेशनाथा लागला तुझा छंदु ॥५॥

५८८

खेळा रे खेळा ठाईचे ठाई । निजात्मसुख पाहा देही चे देही ॥धृ॥
दहा जण खेळीये खेळती देही । पाहु जाता त्यास नाव-रूप नाही ॥१॥
पाच जण खेळीये खेळती थोर । ब्रह्मादिका त्यानी आणिली हार ॥२॥
एकचि खेळिया सर्वात बळी । मांडीला खेळ हा सर्व मेळी ॥३॥
अपणचि नाचे अपणचि गाय । अपणचि सर्वही पाहे रे ॥४॥
अपणचि वाजवी अपनणचि साजवि । दुजे जेथे न साहेरे ॥५॥
नाना बुद्धी देह खेळियाचे नाचवी । अपणचि म्हणे मी काय रे ॥६॥
उडवी पडवी दडवी खेळिये । दाऊनि देह सुख सोय रे ॥७॥
परमार्थ प्रपंच अपणचि जाला । देव-दानव हे साच रे ॥८॥
अनंत कळा अनंत रुपे । दावोनि दोहीकडे नाचे रे ॥९॥
ऐसे खेळिये खेळती बहुत । खेळिया नाही अंत रे ॥१०॥
साधू आणि संत देव आणि भक्त । लाउनि नाना मते रे ॥११॥
सर्वही खेळीये गोवुनि गोरक्ष । न कळे त्याची माव रे ॥१२॥
गणेशनाथ म्हणे पूर्वभाग्ये । सापडला मुळीचा ठाव रे ॥१३॥

५८९

जोहार मायबाप जोहार । जन सज्जनाशि जोहार । सभा बैसली थोर । मुळीचा मी महार ।
मिथ्या जाणोनि संसार । शिणलो की जी माय बाप ॥१॥
चाकरीस तो आहे दुरूस । राखोनि पडलो वेस । झाले बहुत दिवस ।
काय झाले या धन्यास । महारास का विसरता माय बाप ॥२॥
धन्याचे नगर आहे थोर । कायापुर म्हणजे शहर । लक्ष चौऱ्यांशी फिरता घर ।
किती करावी येरझार । म्हणोनि कानी घालितो कि जी माय बाप ॥३॥
नगराशी आहेत दहा वेशी । जागत पडलो पायापाशी । कुळे पळती दाही दिशी ।
कोण्ही न मानिती कोण्हाशी । म्हणोनि द्वाही देतो की जी मायबाप ॥४॥
बहुत आहे पसारा । ऐवजदार कुळे अकरा । त्यांनी मांडीला बहुत नखरा ।
ते धन्याच्या न येता द्वारा । ते मज नफराला मानितात काय जी मायबाप ॥५॥
नगरात पाच कारभारी आहेत जाड । त्यांशि तो नाही भीडचाड । एकाहूनि एक वाढ ।
तेथे माझा कोण पाड । अपुलाल्या संसाराकडे वोढीताती की जी माय बाप ॥६॥
बारा बलूते बारा बळी । त्यांची ती वेगळीच फळी । काम सांगता करती राडोळी ।
ते कोणे काळी जवळी न येत की जी माय बाप ॥७॥
आत्माजीबाबा तो भोळा राजा । त्याच्या सतरा जणी भाजा । त्यानी सांडिल्या सर्व लाजा ।

सर्व भुलल्या आपुलाल्या काजा । तेथे समाचार माझा कोण घेते जी माय बाप ॥८॥
आता किती करावा शोक । धन्याचे नाम जपू एक । द्यावी उष्टावळीची भिक ।
त्याहुनी अधिक काय मागतो जी माय बाप ॥९॥
आता आदीनाथाचे द्वारी । झाडणी पाटी घेवोनि करि । केली बहुत दिवस चाकरी ।
काठी कांबळी ठेवोनि पायावरी । तेथे गणेशनाथ उरी उरला नाही की जी माय बाप ॥१०॥

५९०

आम्ही परात्पर भिकारी । विनवित उभे तुझे द्वारी ।
द्यावी भक्तीची भाकरी । बाबा बाळ संतोष ॥१॥
हिंडता चौऱ्यांशीचा फेरा । कष्टी झालो या शरीरा ।
म्हणुनी आलो तुझीया द्वारा बाबा ॥२॥
तुझे अंगीचा उतारा । ते मज दान दे दातारा ।
तेणे न ये मी संसारा बाबा ॥३॥
स्वयंभू स्वरूपाची अंगी । ते तु दान दे मजलागी ।
तेणे किर्ती करिन जगी बाबा ॥४॥
किर्ती ऐकली दुरून । माझा जीव तुज आधिन ।
द्यावे प्रेमाचे दान बाबा ॥५॥
त्राहे त्राहे त्राहे त्राहे । कृपादृष्टी मजकडे पाहे ।
गणेशनाथ जीवी ध्याय बाबा ॥८॥

५९१

यशोदा गुसळी ते काळी । जवळी आले वनमाळी ।
रविते धरुनिया करि । नवनित मुखकवळी ॥धृ॥
मथनी सार विचारे तो । देतो घेतो पाहा तगतो ।
माता कौतुक पाहे । डेऱ्यामधुनि बोलतो ॥१॥
धणिवरि दे का वो माये । म्हणुनि धरियले पाय ।
शिरिचा पालाव वोढीतो । आधी मजकडे तु पाहे ॥२॥
निजगुज कृष्णाकडे पाहता । देहसुख विसरली माता ।
गणेशनाथ तन्मय । जन्म दुःख नाही आता ॥३॥
यशोदा घुसळी ते काळी ॥

५९२

होइक सांगतो बा सर्वदा । जेणे चुकेल तुझी आपदा ।
आता नाव सांग घरच्या धन्याचे । अस्त्री पुत्र कन्याचे ।
येक्या बाइकोच्यानि संगे दादा । तुझे भाग्य फळाशी आले रे ।
षड ऊर्मी अकरा धान्ये रे । परी ती सांडी वोवाळून रे ।

मग गणेशनाथ सर्वदा । चालवि बोलवि या शब्दा ॥

५९३

पाहे मना सद्‌गुरुनाथा । जेणे चुके संसार व्यथा ।
नरदेह जातो भक्तीविन रिता । सावध होये । निज मोक्षदाता पाहे मना ॥धृ॥
भुलू नको संसारसुखा । धन कण पुत्राच्या सुखा ।
सर्व माया करवेना लेखा । अठवी वेगी जीवाचा सखा । पाहे मना ॥१॥
किती घेशी चौऱ्यांशी जन्म । भोगिताची बहु दुःख श्रम ।
म्हणुनि केला सद्‌गुरुशी नेम । तेणे होशी स्वयेचि ब्रम्ह । पाहे मना ॥२॥
जन्मोजन्मी नाहीत दोन्ही । नाव रुप कैचे या जनी ।
अक्षय सुख पाहुनिया नयनी । आत्म भेटी अमृत धणी । पाहे मना ॥३॥
सद्‌गुरूनाथा धन्य कृपावंत । तुज पाहता चुकलीसे भ्रांत ।
गणेशनाथा तु आदि अंत । न कळे काही स्वरूपाचा अंत । पाहे मना ॥४॥

५९४

जोगिया जुगुत जागवी देही । जन्म मरण जेथे नाही ॥१॥
पिंड ब्रह्मांड जाणोनिया आपण । स्वानंद स्वरूप सोयरे ॥२॥
मन मुळी मारी । काम निवारी । सायुज्य सदनी राहे रे ॥३॥
सर्वातित जाणुनि निजहित । स्वये ब्रह्म तु होई रे ॥४॥
श्रीगुरूचे देणे अक्षय अपार । गणेशनाथ तु ही तु ही रे ॥५॥

५९५

आयुष्य मोलाचे । वेचले । सार्थक नाही केले ।
मिथ्या संसार । अघोर । जाणुनि मन गोविले ॥१॥
देह सुखदुःख । अपार । भ्रमे मायेचा डोंगर ।
माझे मीपण । विचार । सर्व दृश्याकार ॥२॥
पळ पळ दीन रजनी । काळ गणी । सोडविना कोण्ही ।
जन्म दुःखाची । सोसणी । थोर होते हाणी ॥३॥
आझुणी तरी । संसारी । सद्‌ विश्वास धरी ।
देव धर्माशी । अंतरि । भक्ति साधी पूरि ॥४॥
तारक विश्वास गुरु पायी । आणिक दुसरा नाही ।
गणेशनाथ म्हणे हृदयी । पूर्ण सुख पाही ॥५॥
आयुष्य मोलाचे..॥

५९६

गुरुपद पाहता मिराशी । झालो निश्चळ सुखवासी ॥१॥
माया जाळुनी निसंग । सहज सुखानुभव निजरंग ॥२॥

अंत होउनी सर्वांशि । नातळे मन बुद्धी चित्ताशि ॥३॥
अपरापर हे न कळे जे । गणेशनाथ म्हणे जाले ते ॥४॥

५९७

गुरुपदाविन सुख नाही । भावे त्याचे गुण गाई ॥१॥
विश्वी ईश्वर जाणुनिया । साष्टांग वंदन केले म्या ॥२॥
आत्मारामी रत जालो । मोक्षपदासि मग आलो ॥३॥
येणे जाणे सरले हे । गणेशनाथ म्हणे पाहता ते ॥४॥

५९८

सर्वसाक्ष होउनिया । मुळीच्या ठाया जाऊनिया ॥१॥
देह सुख अवघे विसरावे । संत परात्पर अचरावे ॥२॥
जाळूनि मीपण अहंकार । पाहता ब्रह्मचि हे सार ॥३॥
शब्दी श्वास निश्चल तो । गणेशनाथ म्हणे पाहता तो ॥४॥

५९९

अचल पदाचा सुखदाता । पाहुनी हरली हे चिंता ॥१॥
विसर न पडे उपकारा । चुकविलासे भवफेरा ॥२॥
जीवे होउ उतराई । जिवपण पाहता मुळि नाही ॥३॥
त्राहे त्राहे गुरुराया । गणेशनाथ म्हणे मिठी पाया ॥४॥

६००

सर्वही भार हा माझा । चालवणे तुज गुरुराजा ॥१॥
अनाथनाथा दीनबंधू । करुणेचा तु क्षिरसिंधू ॥२॥
हरिहर ईश्वर ज्या ध्याय । उपमा काहीच न साहे ॥३॥
तन्मय झालो रुप पाहता । गणेशनाथ म्हणे गुण गाता ॥४॥

६०१

गेले पावन नरदेह । अझुणी पाहशी ते काय ॥१॥
संत समागमे जरि येशी । स्वये ब्रह्मची तु होशी ॥२॥
अळस न करी भजनाचा । अधिकारी निजमोक्षाचा ॥३॥
गुरूकृपेची हे सत्ता । गणेशनाथ म्हणे पाहा आता ॥४॥

६०२

मन हे जव होय उन्मन । साधन न लगे मन अन्य ॥१॥
कृपा फळली श्रीगुरूची । वस्ती जाली ब्रह्मीची ॥२॥
उरले नाही बोलावे । शुद्ध बोलवि गुरुदेव ॥३॥
सहज शब्दब्रह्मीचा । गणेशनाथ म्हणे मी कैचा ॥४॥

६०३

तो संत । सर्वांशी अलिप्त । विदेही विरक्त ।
समभाव दृढभक्त । अनन्य शरणांगत । जाणुनि आदी अंत ।
कळोनि निजगुज ऐक्य पदाते । निश्चये निश्चित ॥१॥
वितरागी उदास । गगनाहुनी अवकाश । निशिदीनी करी ध्यास ।
सांडुनि सर्वही आस । गुरुपायी विश्वास । तोडुनि भ्रांतिपाश ।
शांती सुखासनि बैसुनि अढळ । सर्वही ब्रह्म त्यास ॥२॥
काया अंतर शोधी । मन हे ब्रह्मबोधी । न पडे भेद संधी ।
निरसोनिया उपाधि । त्याजुनि रिद्धी सिद्धी । निश्चळ गुरुपदी ।
गणेशनाथ म्हणे गुरूकृपे । स्वात्मपूर्ण समाधी ॥३॥ तो संत...॥

६०४

बेईमान ठावा संता । काय सांगू त्याची वार्ता ॥१॥
पुण्य कदाचि होउ नेदी । पातक धाडूनि घाली बंदी ॥२॥
तुझे पाय माझ्या गळा । न सुटे चि कदा काळा ॥३॥
बारा वर्षे सेवा घ्यावी । अंती भिक त्याला द्यावी ॥४॥
सुख देऊनि चाळवावे । अंती नरकाला धाडावे ॥५॥
गणेशनाथ म्हणे खोटे । काही मागता नेदिशी भेटे ॥६॥

६०५

ऐसे करी गा तू देवा । जाऊनी पूर्वीचा ठेवा ।
जन्मोजन्मी घे सेवा । वेगी उद्धवरावे जीवा ॥१॥
तोडुनी विषयाची बेडी । लावी भजनी आवडी ।
झाल्या पापाच्या कोडी । उभारी नामाची गोढी ॥२॥
द्यावी सम भावे भक्ती । विकल्प नाठवे चित्ती ।
तोडी सर्वही भ्रांति । वानिन अभिमान कीर्ती ॥३॥
माणुसपण माझे न्यावे । आपुले नीज भजन द्यावे ।
आवडी घेतली जीवे । आहे तुझे तुज ठावे ॥४॥
कृपाळू तू समर्थ । इतुकी ऐकावी मात ।
गणेशनाथ विनवीत । पुरवी मनीचे मनोरथ ॥५॥

६०६

गुरूकृपा हे पूर्ण जयावरी । तो तारक एक संसारी ॥१॥
गुरूकृपा जया होय पूर्ण । तो एक वंश उद्धरण ॥२॥
गुरूविण आणिक देव नेणे । त्याचे चरणी अखंड माझे मन ॥३॥
गुरूकृपा पूर्ण जया ठाई । माझे चित्त अखंड तया पायी ॥४॥
गणेशनाथ म्हणे गुरू सार । तुझ्या नावे उतरू पैलपार ॥५॥

६०७

सद्गुरू वोळला क्षिरसिंधू । मन ब्रह्मबोंधू ।
देउनी निष्कळा परब्रह्म । अत्मवे आभेदु ॥१॥
अनंत ब्रह्माडे उदरी । वर्णिती वेद च्यारी ।
शास्त्रे पुराणे तुज स्तविती । सहस्त्र फणिवरधारी ॥२॥
ब्रह्मा जालासे साकार । विष्णू माया अवतार ।
तापसी वनवासी महेश्वर । परी न कळे तुझा पार ॥३॥
दाही अवतार तुज ध्याती । मुनिजन मन विश्रांती ।
देव-दानव पूजिती । मानव किंकर किती ॥४॥
संत आणि महंत महाभक्त । तुजची शरणागत ।
गणेशनाथ म्हणे निश्चित । तुची आदी-अंत ॥५॥

६०८

मूळ प्रपंच जेथे नाही । तेथे बोलावे ते कायि ॥१॥
मूळ सगुण जेथे नाही । तेथे बोलावे ते कायि ॥२॥
मूळ आकार जेथे नाही । तेथे निराकार बोलो कायि ॥३॥
मूळ असत्य जेथे नाही । तेथे सत्य म्या बोलावे कायि ॥४॥
गणेशनाथ म्हणे मी नाही । तेथे तुवा म्हणावे कायि ॥५॥

६०९

मना सज्जना सार्थक करी । दृढ मानसी धरी तु हरी ॥१॥
हेची पाहे गा भागवतराया । तारक एक गा सद्गुरु दया ॥२॥
गुरुमाऊली पूर्ण वोळली । सायुज्य संपदा दृष्टी दाविली ॥३॥
सर्वसुख हे वाटे बरे । गुरुसुख धन ते खरे ॥४॥
रूप पाहता भेद गळाला । काम क्रोध मोह जळाला ॥५॥
आपि आप तु विरोनी राहे । तेथे नाव ना रुप साहे ॥६॥
गणेशनाथ हा तुज मिळोणी । त्या सुखे उल्हास वाटतो मनी ॥७॥

६१०

ज्याचे संचित त्या सांघाते । मज नवलसे वाटते ॥१॥
जव आलो या संसारी । तव सवेचि शिदोरी ॥२॥
ज्याने घातले संसारा । तो या जिवाचा सोयरा ॥३॥
जाले सद्गुरूचे देणे । त्याशी कदा नाही विघ्न ॥४॥
गणेशनाथ विनवीत । अंती तू माझे संचित ॥५॥

६११

तुजविन जन्म नकोरे देवा ॥धृ॥

काय करावे होम हवन । काय करावे हे साधन ॥१॥
काय करावे हे जन । काय काय करावे हे मन ॥२॥
काय करावे साध्य-साधन । काय करावे ब्रह्मज्ञान ॥३॥
गणेशनाथ म्हणे माझे जिवन । तुजविण मी आणिक नेणे ॥४॥

६१२

ऐसी धरु सोय धरु सोय । भेटल गुरुमाय ॥१॥
ऐसा धरू भाव धरु भाव । घराशी येईल देव ॥२॥
प्रीती तुझी द्‌यावी तुझी द्‌यावी । हेचि माझे जिवी ॥३॥
तुवा भक्तीदान द्‌यावे । सर्वसुखी व्हावे ॥४॥
गणेशनाथ म्हणे ऐसे देणे । जन्मा नाही येणे ॥५॥

६१३

चाल केशवा । तारक भवा । कृपाळू तुवा । उद्‌धरी जीवा ॥१॥
चाल नारायणा तू । पतित पावना । तुझीये नामे उद्‌धरी प्राणा ॥२॥
चाल गोविंदा । आठवी सदा । तुज देखता । चुके आपदा ॥३॥
चाल तु हरी । राहे अंतरी । जन्ममरणा कायशी उरी ॥४॥
चाल विठ्‌ठला । उशीर का तुला । अजुनी न येशी प्राण शोकला ॥५॥
गणेशनाथ हा विनवी तुज । तूची जाणसी जिवीचे गुज ॥६॥

६१४

तुझ्या वचनाची थोर आस केली । माझे कायेची कुरवंडी झाली ॥१॥
आता धरणे घेतले तुझे द्‌वारी । दीनानाथ हे नाव साच करी ॥२॥
आता पाहाशी गुण दोष काय । जीवे भावे धरिले तुझे पाय ॥३॥
आता दुःख झाले बहुत देही । वेगी धाव पाव तू लवलाही ॥४॥
गणेशनाथ म्हणे झाले हित । तुझे पायी बैसले माझे चित्त ॥५॥

६१५

तुजविन परदेशी परदेशी । चित्त तुझेपाशी ।
तू जरी मोकळिशी मोकळिशी । असो कोणापाशी ॥१॥
तुजविन हे काया हे काया । जात असे वाया ।
म्हणोनि मिठी पाया मिठी पाया । कृपादान हे सखया ॥२॥
तुजविण संसार संसार । झाला भूमीभार ।
नामी तत्पर तत्पर । हा माझा निर्धार ॥३॥
तुजविन हे जिणे हे जिणे । जीताची लाजिरवाणे ।
नाही तरी दे मरण दे मरण । जन्मा नाही येणे ॥४॥
गणेशनाथ म्हणे गणेशनाथ म्हणे । तु माझा विश्राम ॥५॥

६१६

शिण बहु वाटतो वाटतो । प्राण हाची जातो ।
बहुत दिन झाले दिन झाले । देह माझा फुटतो ॥धृ॥
दुःख आणि सुख । दाउ नको दृष्टी ।
चित्ती चिंतीता चिंतीता । अखंड तुझी भेटी ॥१॥
तुज मज जे भाक जे भाक । तेची क्रिया राख ।
मागो तुज काय तुज काय । देवा दृष्टी राखे ॥२॥
वचन पूर्वीचे पूर्वीचे । तेची करी साचे ।
क्षण एक नको जाऊ नको जाऊ । तरीच सार्थक याचे ॥३॥
गणेशनाथ म्हणे गुरुमाय । बहुत सांगू काय ।
विनंती हे माझी हे माझी । अखंड हृदयी राहे ॥४॥

६१७

त्राहे गुरुमाये गुरुमाये । चित्ती तुझे पाय ॥धृ॥
बहुत दिवस झाले वो । अजुनी पाहशी काय ॥१॥
त्राहे गुरुदेवा गुरुदेवा । तुची पूर्व ठेवा ।
तुजविण नावडे नावडे। आणिक काही जीवा ॥२॥
त्राहे गुरुराया गुरुराया । थोर तुझी दया ।
रुप पाहता पाहता । कुरवंडीन हे काया ।
गणेशनाथ म्हणे कृपाळा । तु जिवीचा जिव्हाळा ।
क्षण एक न जाशी न जाशी । या प्राणा वेगळा ॥४॥

६१८

कान्हा निवडी आपुल्या गाई । सापडली तुझी सोइ ।
आता तुज पाहणे कायि रे ॥धृ॥
सर्वांघटी तू आससी । आमुचा विश्वास उडउ पाहशी ।
ऐसा नाटकी तु कळलाशी ॥१॥
आम्हा भुलविले थोरपणा । आशा दावोनी गोविले मना ।
का चोरिशी प्रेमाचा पान्हा । कर्ता हर्ता तू नारायणा रे ॥२॥
ऐशा उदंड वळिल्या गाई । तेथे माझा केवा काई ।
आता तुजविन बोलणे नाही ॥३॥
गणेशनाथ म्हणे तुझी गाई । भक्ती वाचोनी मागणे काइ ।
शेखी तुची बाप माय रे ॥४॥ कान्हा ॥

६१९

देव कैलासराणा । उद्धरी तो जाणा । लागतसे चरणा । सांगे भक्तीच्या खुणा ॥१॥

पतित पावना । जिवीच्या जीवना । मनाच्या मोहना । सर्व सुखाच्या निधाना ॥२॥
माझिया सजना निर्गुणा । पतिताचा पाहुणा ।
गणेशनाथ म्हणे ऐक नारायणा । लक्ष तुझ्या चरणा ॥३॥

६२०

जाऊ जाऊ जाऊ । एके वेळे निजसुख ते पाहू ॥धृ॥
जाती चंद्र जाती सूर्य । जाती पवन पाणी ।
आम्ही तुम्ही सकलही जाऊ । न राहे येथे कोणी ॥१॥
जाइ काया जाईल माया । जाईल आपुल्या ठाया ।
आम्ही तुम्ही सकलही जाऊ । मिथ्या मोहमाया ॥२॥
जाऊ राहू मिथ्या गोष्टी । अनुभव घ्यावा पोटी ।
गणेशनाथ म्हणे पूर्ण । चरणी दिल्ही मिठी ॥३॥

६२१

अनामाचे ते नाम काय गावे । अरूपाचे ते रूप काय पहावे ॥१॥
अलक्षासी मी लक्ष कैसा लाउ । अमुळाचे ते मूळ कैसे पाहु ॥२॥
निर्गुणाचे रे गुण काय वानु । अपरोक्षाचा पार काय जाणु ॥३॥
अह मते अडवाट काय जावे । निराकारी आकार काय पाहवे ॥४॥
सर्वा वरिष्ठ न्यून जेथे नाही । गणेशनाथ अखंड तुझे पायी ॥५॥

६२२

सद्‌गुरू कृपे नवल जाले सांगु आता काय ।
तिन्ही लोकी व्यापुनी राहे तिच आमुची माय ।
आपुली बाळे आपणचि खाये ऐसे कौतुक पाहे ॥धृ॥
आपणचि नर आपणचि नारी आपणचि ब्रह्मचारी ।
विश्वरूप आपणच झाला आपणचि निराकारी ।
कन्या पुत्र आपणचि झाला ऐसा सुत्रधारी ॥१॥
पित्यापासुनि कन्या झाली तिचे पोटी रहातो ।
स्त्रीरूप स्वये झाला तीची सेवा घेतो ।
आजी म्हणुनि चरणा लागे शेखी गुप्त होतो ॥२॥
अवघा मिळोनी एक देव ऐसा सत्य भाव ।
दिसते परी न कळे कुण्हा सद्‌गुरूकृपे वाव ।
गणेशनाथ म्हणे तुझे चरणी माझा ठाव ॥३॥

६२३

समस्त जिवासी मरणाचे भय। ते मरण ग्रासूनी राहे ॥१॥
ऐसे करणे या देवाचे । भय नाही जन्म मरणाचे ॥२॥

पाहता चौऱ्यांशी जीव। भजनी अक्षय पद ठाव ॥३॥
जगी ब्रह्मशास्त्र थोर । ते वाचुनि करी अमर ॥४॥
सर्व जना काळ खाये । त्याशी गिळुनी राहे ॥५॥
समस्त काळाचा जो काळ । गणेशनाथाशि कृपाळ॥६॥

६२४

तो जाणावा निजसाधू। अखंड ब्रह्मावे बोधु ।
न धरी भेदा आणि भेदु । खेळे स्वरूपी आनंदु ॥धृ॥
विरक्त विदेही लिला । अखंड प्रेम जिव्हाळा ।
आत्मा लक्षी जो डोळा । ज्ञान वैराग्य आगळा ॥१॥
प्रपंच आहे की नाही । ऐसे नकळे ज्या देही ।
विषय मुळिहुनी नाही । सर्वातीत तो पाही ॥२॥
आपी आप विराला । शब्दी निःशब्द जाला ।
ब्रह्मी ब्रह्मत्वे एक । वेगळीक नाही पै त्याला ॥३॥
अलक्ष लक्षवेना जेथे । काय बोलावे तेथे ।
ते का परेहुनि परते । तेथे लिन गणेशनाथ ॥४॥

६२५

तो जाणावा निजसंत । सर्व विषयी अलिप्त ।
करी समभावे भक्ति । सद्गुरू चरणी मिश्रित ॥धृ॥
दया सर्वाभूती पाही । द्वैत भाव ज्या नाही ।
दया सर्वाचे ठाई । निवांत ठाईचे ठाई ॥१॥
अखंड निसंग निराळा । जाणे सकळ ते कळा ।
द्रष्टा होऊनी सकळा । पाहे स्वरूप सोहळा ॥२॥
न करी आप पर मात । न कळे कोण्हाशी अंत ।
मिळोनी गेला सर्वात । सर्वही पाहे आपणा ते ॥३॥
जैसे तुळशीचे पान । गळोनि जाय आपण ।
गणेशनाथ म्हणे दीन । पुन्हा नाही जन्म-मरण ॥४॥ तो जाणावा निजसंत..०॥

६२६

नरदेह पाहुना साच मानी । उभयता उद्धरी कुळे दोन्ही ॥१॥
स्त्रिया पुत्र धन लोभ माया । शोक संतापे व्यर्थ जाती काया ॥२॥
जगी सार्थक थोर एक आहे। संत सेवा सद्गुरू कृपा पाहे ॥३॥
सावकाश चरणी करी वास । गणेशनाथ अखंड निजध्यास ॥४॥

६२७

गुरुनाम धरूनिया चित्ती । तुम्हा संता करितो विनंती ।

जना मना येतो काकुळती । दृढ घडावी तुमची भक्ती रे ॥धृ॥
हेचि आवडे जिवेभावे । तुमचे पायवणी म्या प्यावे ।
पाय धुतेवेळे मज आठवावे । शरण आल्या दीनाशी तारावे रे ॥१॥
गुरुनाथा केली तुझी आस । नामी ठेवोनिया विश्वास ।
अखंड करितो निजध्यास । दृढ मिठी घातली पायाशी रे ॥२॥
आता जालो तुमची पायरी । गुरुनाम अखंड उच्चारी ।
दृष्टी ठेऊनी चरणावरी । माझी त्रैलोकिची शिदोरी रे ॥३॥
गणेशनाथ म्हणे अनाथ । मी तरी पतिताहुनि पतित ।
तुमचे पायीच माझे चित्त । समर्थ दाता तु सद्‌गुरुनाथ रे ॥४॥

६२८

आता परमार्थ विचारा काही । दया धर्म धरावा जीवी ।
लक्ष ठेवोनि स्वामीचे पायी रे ॥धृ॥
आपुलिया हिताकारणे । आणिकाचा करतील अपमान ।
ते नरकाशि जातील जाणे रे ॥१॥
आम्हा न लगे कोणाचा मान । अखंड चित्ती तुझेचि ध्यान ।
काया ओवाळली चरणावरून रे ॥२॥
आम्हा न लगे कोणाचे कष्ट । सकळा संतात मी एक नष्ट ।
कैशी सापडली तुझी वाट रे ॥३॥
करितो संत जनाची निंदा । अखंड वासना भोगी सदा ।
कैसा कृपाळू झालाशि गोविंदा ॥४॥
गणेशनाथ म्हणे परमार्थ । येणे सकळाचे हित ।
नामे तरले नेणो बहुत रे ॥५॥

६२९

सर्वही सुख विसरावे । निष्कळ ब्रह्म ते पाहावे ॥१॥
काया माया मन वाचा । अर्पुनी संग धरी देवाचा ॥२॥
आत बाहिर पूर्णसुख । हरपुनि गेले जन्म दुःख ॥३॥
सुरूप तन्मय अनुरागे । गणेशनाथ म्हणे गुरुसंगे ॥४॥

६३०

सेवा आम्ही शेत केले । या जन्मीच्या बोले गा ॥
मिराशी म्हणोनिया । तेथे मन विकले गा ॥धृ॥
नाम हा नांगर । अहंकार आडत गा । कृष्ण हा कुळवाडी ॥
आम्ही केली बहुत गा । तारक सद्‌गुरू । तोचि करिल हित गा ॥१॥
प्रेम हा पाडसे । थोरवोली पै जाली गा ॥

भक्ति आणि वैराग्य ज्ञान तिफणी लाविली गा ॥
ओंकार निज बीज । तेचि पेरणी केली गा ॥२॥
स्वरूप पिकले गा । अनंत अपार गा ॥
ब्रम्हसुख सेवितातिं । पाहे सज्ञान नर गा ॥
गणेशनाथ म्हणे । पुन्हा नाही येणे-जाणे गा ॥३॥

६३१

परब्रम्ह अवतार गौळ्याघरी रे । कोण जाणे न कळे त्याची थोरी रे ॥१॥
नंद यशोदा म्हणती गाई चारी रे । अजुनी कैसा खेळशी नानापरी रे ॥२॥
काठी कांबळी घेवोनि शिदोरी रे । पावा मोहरी टाकिली खांद्यावरी रे ॥३॥
कृष्ण पाचारी सवंगड्या गोपाळा रे । गाई चाराया यमुना पाबळी रे ॥४॥
ज्याची त्यासवे बांधिली शिदोरी रे । गाई सोडिल्या आघोर वनांतरी रे ॥५॥
गाई सैरा धावती महा वनी रे । तृण जीवन पाहता न पुरे धणी रे ॥६॥
गाई नावरती गेल्या बहुत दूर रे । म्हणती सावळ्या गोपाळा वळती करि रे ॥७॥
ऐसा मध्यान्हा आला तो भास्कर रे । समस्त गोपाळा बोलिला सारंगधर रे ॥८॥
तेव्हा वेणू वाहीला कलंबातळी रे । नावे पाचारि कृष्ण गाई वळी रे ॥९॥
मायमुंगी ये ये तु आशवंते गे । चापळ धावोनि त्वा यावे कृपावंते गे ॥१०॥
काळे कपिलजे कमळजे कामधेनु गे । गोकुळ मोहन सावळे सांडी रान गे ॥११॥
कान्हे डोळसे हंगे तु रसवंते गे । चपळ धावोनि येइ तु करूणावंते गे॥१२॥
विषय विशाळ येई तु इंद्रजीते गे । चपळ धावोनि येई तु कृपावंते गे ॥१३॥
ऐसा अष्टधा नवविधा वळिल्या गाई वो । तृण चरता सर्वथा हित नाही वो ॥१४॥
कृष्णवाणी ऐकुनी सुखावल्या रे । जीवन पाहुनी वस्तूशी मावळल्या रे ॥१५॥
दया क्षमा सत्य शांती पुढे रे । विरक्ती निवृत्ती न चाले बहु जड रे ॥१६॥
ऐशी नवविधा वोळली अष्टमातारे । तुर्या उन्मनी थोरली सायुज्यता रे ॥१७॥
अर्धमात्रा सतरावी धेनु आली रे । समस्त गोपाळा कृष्ण जेवू घाली रे ॥१८॥
समस्त गोपाळ बैसले अंतरंगे रे । तृप्ती भोजन जेविले कृष्णासंगे रे ॥१९॥
तया संगती सद्‌गुरूच्या प्रसादे रे । गणेशनाथा अक्षय पूर्ण बोध रे ॥२०॥

६३२

रिघोनिया निजमंदिरी । नवनीत करितो चोरी । दिली हो माया मांजरी ।
हा बाळकृष्ण । सखिये वेधिले तनु मन ॥धृ॥
कल्पना हे किली काढी । भ्रांतीचे कवाड मोडी । त्रिगुण शिके हा तोडी ॥२॥
धुंडाळीतो सर्वही घर । न कळे चित्तवृत्ती चोर । धरू जाता न कळे निर्धार ॥३॥
नाठवेची कामधाम । पाहता हा परब्रम्ह । गणेशनाथा हा विश्राम ॥४॥
हा बाळकृष्ण ०॥

६३३

नवल या गुरुनाथे । श्रृंगारिले अपुले हाते ।
जन्मा न येवो मागुते । चालता पंथे ॥१॥
अंजन सूदले डोळा । रूप पाहे वेळो वेळा ।
हृदय साटविले गोपाळा । जो जीवन कळा ॥२॥
भक्ति आणि वैराग्य ज्ञान । सर्वांगी शांतीचे लेणे ।
अविनाशे प्रकाशले मन । सद्‌गुरूचे देणे ॥३॥
सर्वा श्रेष्ठ मुकुटमणी । भक्ति मुक्ति प्राप्ती दोन्ही ।
गणेशनाथ हो गुरुचरणी । अमृतधणी॥४॥

६३४

तारक गुरुराया । शरण लोटांगण पाया ॥धृ॥
चरणापाशी मूळ मिराशी । अढळ होऊनी निज प्रेमाशी।
हे भाग्य आम्हाशी सखया ॥१॥
दृश्य जाळे तोडुनि समुळ । चित्ता चित्त जो न कळे खेळ ।
निजदास करी अढळ सखया ॥२॥
निरसुनि माया ब्रम्ह उपाया । सोडुनि अहंमत समता दया ।
दुर्धर तराया सखया ॥३॥
काढुनि मीपण आभेद पूर्ण । स्वये दावी निजात्म खुण ।
गणेशनाथ हे देणे सखया ॥४॥

६३५

संसार सासुरे थोर । आटिताति काम क्रोध दीर ।
विश्रांती नाही क्षणभर । गर्भवास फेरे ॥१॥
कल्पना आहे सदा सासू । अहंकार सासूरवासू ।
घेऊ नेदीचि ऊमसु । आयुष्याचा नाशु ॥२॥
प्राणेश्वरा नाही प्रीती । शोक हा करावा किती ।
सखये माहेर एकांती । आठवे चित्ती ॥३॥
माहेरची आस मोटी । आर्त हा धरिला पोटी ।
गणेशनाथ हो निजभेटी । विपरीत गोष्टी ॥४॥

६३६

सद्‌गुरु देखिला डोळा ॥धृ॥
सुखमूर्ती मन विश्रांती । वर्णिता कीर्ती ॥१॥
एक वेळा पाहता डोळा । स्वानंदसुख सोहळा ॥२॥
अपार लीला जीवन कळा । प्रेमे पै आगळा ॥३॥

मेखळा माळा भाळी टिळा। मुकुट रत्नकिळा ॥४॥
गणेशनाथ पूर्ण डोळा । अगणित सूर्यकळा ॥५॥

६३७

सद्‌गुरु पाहे दृष्टी ॥धृ॥
सद्‌गुरु भेटी पुण्य कोटी । जन्माचे शेवटी ॥१॥
आटा साटी साधन कोटी । निज मोक्ष लुटी ॥२॥
जीवनासाठी तरीच गाठी। परब्रम्ह भेटी ॥३॥
गणेशनाथ सांगे गोष्टी । सुखे मिळणे पोटी ॥४॥

६३८

सद्‌गुरूनाथ दयाळ । जीवा जीवन कळा वो ॥धृ॥
सहजाचा मेळा प्रेम जिव्हाळा । स्वानंद सुख सोहळा वो ॥१॥
अपार लीला गोरख बाळा । प्रतापे आगळा वो ॥२॥
गणेशनाथ तुज विनवितो । असोनि निराळा वो ॥३॥

६३९

नमो सद्‌गुरू समर्थ । तुमचा नकळे कोणा अंत ।
नाममात्रे उद्‌धरीत । सर्व जीव ॥१॥
सद्‌गुरूचा प्रसाद काही । बोलु ब्रह्मबोध ।
काहीं न मानावा विषाद । श्रोते जनी ॥२॥
कोठुनि ॐकाराचे मूळ । कोठे परब्रह्म केवळ ।
काय पाहुनी होती अढळ । सर्व जीव ॥३॥
कोण आत्म्याचा माता पिता । कोण या जिवाचा जनिता ।
कोण ठाव आहे रिता । देवाविना ॥४॥
कोठुनी सतरावीचे जीवन । कोठुनि अर्ध मात्रा चैतन्य ।
सांग तुर्या हे उन्मनी । कोठुनि जाली ॥५॥
कोठुनी निराकाराचा जन्म। कैसे झाले परब्रम्ह ।
जीव अमर ऐसे वर्म । कोण जाणे ॥६॥
सांडुनी अहंकार अभिमान। संत केले लोटांगण ।
गणेशनाथ म्हणे मी दीन । तु दयाळ ॥७॥

६४०

निमिषे निमिषे काळ मोजी । सगळे करील ग्रास । मग काय उरे रे ॥१॥
माता पिता धन सुत दारा । सांडुनी जाशि पसारा । मग काय उरे रे ॥२॥
देहीचे अवयव सर्वही जाती । काळाग्नि तुज खाय । मग काय उरे रे ॥३॥
गणेशनाथ मिळणी तू ते । प्रपंच जेव्हा सरे । मग काय उरे रे ॥४॥

६४१

गाव आणि ठाव । रूप आणि नाव । देहसुखा भुललाशि । हे काय खरे रे ॥१॥
याती आणि कुळ । आचारशील । पाहता महीमंडळ । हे काय खरे रे ॥२॥
देह आणि गेह । सर्व ही जाय । म्हणशी मी मी काय । हे काय खरे रे ॥३॥
गणेशनाथ अपुला अंत । देवाविन सर्व । हे काय खरे रे ॥४॥

६४२

विषय समूळ न जळे । तव आगम निगम काय कळे ।
वासना स्वरूपी न मिळे । तव मंत्र तंत्र काय फळे ॥१॥
देहबुद्धीचा अंत पुरे । मग संसारसिंधु सहज सरे ।
प्रपंच भान काहीच नुरे । ब्रह्म सुखालागि मन झुरे ॥२॥
वैराग्य अग्नि धडाडी । गुरुमंत्र कडाडी ।
केले कर्म देश धडी । मग सुखे पाव पैलथडी ॥३॥
अक्षय सुखाचा लाभ झाला । तेथे ब्रह्मसुखानुभव धाला ।
गणेशनाथ हरपूनि गेला । सहजी सहज आनंद झाला ॥४॥

६४३

संसारा येवोनि काय केले। मागील पुढील झठ गेले ।
संचित सुख फळा आले । तेणे न चुके काही केले ॥१॥
जन्ममरण जेथे नाही दोन्ही । त्याचेसाटी हिंडतो वनी ।
आत्मा एक पाहता जनी । कर्ता हर्ता तोचि धनी ॥२॥
आत्मारामी भेटी नाही । मग साधन करुनि फळ कायि ।
गणेशनाथ तुज पायी । भेदाभेद मग नाही ॥३॥

६४४

ज्याचे नामे उद्धार होय जीवा । त्याशी वानिता पूर्वदत्त ठेवा ॥१॥
भावे सांगेन त्याचिया गोष्टी । पूर्वपुण्ये होय त्याची भेटी ॥२॥
जन्म जन्मीचा तूची माय बाप । एका जन्मे चुकवी जन्मखेप ॥३॥
भेटी गोष्टी निवाले माझे मन । गणेशनाथ विनवी तुज दीन ॥४॥

६४५

मना माने ते सुखे आम्ही करू । नरदेह आयुष्य अवघे सारू ॥१॥
जना मानवाची काय आम्हा चाड देवकाज ते करू आम्हा गोड ॥२॥
लोकवोक जैसा देईल काय । थिता हातिचा ब्रह्मबोध जाय ॥३॥
अशागाठी संगती नको धरू । गणेशनाथ म्हणे देवकाज करू ॥४॥

६४६

गुरुनाथे नवले कैसे केले । जिवे मारोनी जिवविले ॥१॥

अरूप पाहता रूपाशी आणियले । जन्ममरणाचे दुःख दुराविले ॥२॥
स्वरूप सुखाची दाखविली सोय । विश्व व्यापुनि रूपातीत होय ॥३॥
निजसुख देवोनि निवविले । गणेशनाथ म्हणे भाग्य फळा आले ॥४॥

६४७

सद्‌गुरु वोळला अमृतधारा । नाममात्रे चुकवी जन्मफेरा ॥१॥
पूर्व सुकृते होय तुझी भेटी । तेणे पापे जळती लक्ष कोटी ॥२॥
भव दुःखाचा ठाव पूशीयला । अलभ्य लाभ हा थोर आम्हा झाला ॥३॥
गणेशनाथ म्हणे गुरुराया । निमिष्य न लागता छेदी भवमाया ॥४॥

६४८

भवसुखाशि भुलले मन । दुःख भोगिता सोडवील कोण ॥१॥
क्रोध जाळुनी सांडी देह बळे। अविद्येचे तु छेदी भवमुळ ॥२॥
जन संगती सोडुनि द्यावी । एकाएकी जीवन मुक्ती पहावी ॥३॥
संग सांडोनि निःसंग व्हावे । गणेशनाथा निवांत राहावे ॥४॥

६४९

संत सज्जन ऋषि महानुभव । ज्याचे मते हा संसार वाव ॥१॥
जन्म दुःखापासूनी सोडविती । तेथे दीन मी काय मूढमती ॥२॥
पाय पाहता सर्वही दोष गेले । नाममात्रे अगणित उद्धरिले ॥३॥
गणेशनाथ म्हणे तुमचे पायी । तुम्हा वाचूनि सुख कोठे नाही ॥४॥

६५०

सद्‌गुरु तिर्थी पूर्ण जो धाला । तो तीर्थक्षेत्राशि वंद्य झाला ॥१॥
गुरूनाम जो नित्य जपे वाणी । जो जनी होय शुद्ध रत्नखाणी ॥२॥
गुरूरूप जो नित्य पाहे डोळा । जीवनमुक्त तो ब्रह्मसुख सोहळा ॥३॥
गुरूविण दुसरे अनु नाही । गणेशनाथ अखंड तुझे पायी ॥४॥

६५१

पतित-पावना दीन उध्दारणा । तुझा छंद लागला माझ्या मना ॥१॥
तुझे स्वरूप पाहता मन धाय । केले दोष समूळ सर्व जाय ॥२॥
तुझे नाम गाता सुख वाटे । भेटी गोष्टीने प्रेमसुख दाटे ॥३॥
गणेशनाथ म्हणे गुरुराया । स्तुति करिता शितल झाली काया ॥४॥

६५२

गुरुराया रे पूर्ण करी दया । प्रेम द्यावे गुण तुझे गाया ॥१॥
गुरुराजा तू प्राणसखा माझा । थोर शिणलासी भक्तराज काजा ॥२॥
पूर्ण दाता तू हरी सर्व चिंता । जन्ममरण चुकवी थोर व्यथा ॥३॥
सर्वा तारक श्रेष्ठ गुरुराव । गणेशनाथ चरणी मागे ठाव ॥४॥

६५३

तुझी ब्रिदे गर्जती चराचरी । तेथे रंक मी काय वानु थोरी ॥१॥
चहु वेदाचा पुरे जेथे अंत । श्रुती म्हणती वो जेथे नेत नेत ॥२॥
जेथे शेष शीणला सहस्त्रमुखे । आम्हा दीनाचा कोण करी लेख ॥३॥
कर्ता करविता आहे येथे कोण । गणेशनाथ विनवी तुुज दीन ॥४॥

६५४

सेवा केली नाही मनोभावे । परी आळि घेतली माझ्या जीवे ॥१॥
महापापी जन्मलो पापराशी । कैसा न कळे तू मज उध्दरीशि ॥२॥
थोर शिला पडलो तुझे द्वारी । कृपासिंधू तु दीनाशी तारी ॥३॥
कृपावंता मोकलू नको आता । गणेशनाथ म्हणे गुण गाता ॥४॥

६५५

कर्ता करविता एक जनार्दन । वाया वागवी कोण हा शीण ॥१॥
सगुण निर्गुण सद्गुरुराजा । जीव जीवन तु प्राणसखा माझा ॥२॥
देह भावाची नाही जेथे उरी । पुन्हा येवो नेदी संसारी ॥३॥
गणेशनाथ म्हणे ओवाळणी । जीवे प्राणे केली तुजवरुनी ॥४॥

६५६

नर देहे हा व्यर्थ वाया जाय । वेगी भेटी दे कृपाळू तु माय ॥१॥
आलियाशी सुफळ होय जिणे । दीनानाथ द्यावे दर्शन ॥२॥
अनंत पुण्य ते कोट्यानुकोटी । एक वेळ होता तुझी भेटी ॥३॥
गणेशनाथ म्हणे नरदेही । देवाविण आणिक दुजे नाही ॥४॥

६५७

देवराजा पावला भक्तकाजा । अंगीकार केला सर्व माझा ॥१॥
चित्तवृत्ती वेधली तुझे पायी । तुजविण आणिक दुजा नाही ॥२॥
भावे करिताची गुरुनाम घोक । जीवा तारक एक ब्रह्मसुख ॥३॥
जैसा समर्थ सखा गुरुदेव । गणेशनाथ म्हणे तो आम्हा ठाव ॥४॥

६५८

सुख जाणोनी बहु सुखी व्हावे । पाय पाहोनी चिरंजीव व्हावे ॥१॥
प्रपंचाचा लेश जेथे नाही । सदोदीत ते ब्रह्मरूप पाही ॥२॥
मन निर्मळ निष्कळ झाले । जन्म-मरण हरपुनि गेले ॥३॥
नगर पाहताची अमरावती । गणेशनाथ म्हणे तेची आम्हा गती ॥४॥

६५९

मना सज्जना सांडी दृढ खोडी । नरदेही सोयरा राम जोडी ॥१॥
देह निरसोनि रंजन पाही । सुख देखोनि भुलु नको काही ॥२॥

प्रेम अंजन लेवोनी डोळा । निज स्वरूप पाहे वेळोवेळा ॥३॥
सारासार विचार करी वेगी । गणेशनाथ म्हणे पाहे गुरुसंगी ॥४॥

६६०

सर्वी सर्वत्र ब्रह्म पाही । भेद सांडोनी देव पाही देही ॥१॥
नरदेह जातो हातोहात । करी भजन होये सावचित्त ॥२॥
देव पाहुनी देवची व्हावे । सर्वा देखता मोक्षपदा जावे ॥३॥
मायाजाळे समूळ तोडी वेगी । गणेशनाथ म्हणे सत्य गुरुमार्गी ॥४॥

६६१

अन्याय जाहले बहुत देही । कृपा सागरा पाहू नको काही ॥१॥
तुझा पार अपार कोण जाणे । तुझे स्वरूपी वेधले माझे मन ॥२॥
जीवनकळा विकल सर्व झाल्या । आशा मनसा त्या हारपोनी गेल्या ॥३॥
गणेशनाथ म्हणे भले झाले । कृपादान देवोनि उद्धरिले ॥४॥

६६२

जिवी जीवाशी पडली मिठी । तेंव्हा राहिल्या सर्वही गोष्टी ॥१॥
आपी मिळोनी आपरूप व्हावे । नाव रुप समूळ बुडवावे ॥२॥
काही केल्या आपण उरो नये । ब्रह्म होउनी ब्रह्मसुख पाहे ॥३॥
गणेशनाथ हे नाम जेथे विरे । तेथे सहजची सर्व काही नुरे ॥४॥

६६३

सर्वा श्रेष्ट व्यापक गुरुराजा । तुझे चरणी नमस्कार माझा ॥१॥
ज्याच्या नावे तोडिली सर्व माया । त्याचे लाजो नये गुण गाया ॥२॥
ज्याची कृपा निर्भय सदा करी । त्याची स्तुती बोलती वेद च्यार्ही ॥३॥
संत सज्जन ऋषीश्वर मुनी । गणेशनाथ अखंड ध्याये ध्यानी ॥४॥

६६

संत देव वानिती तुझी कीर्ती । तेथे मानवी ते रंक पाहे किती ॥१॥
जया कारणे ईश्वर जोगी । ब्रह्मा विष्णू ध्याती जयालागी ॥२॥
सर्व जीव पाहता तेथे काय । क्षण न लागता हारपोनी जाय ॥३॥
गणेशनाथ म्हणे त्राहे आता । नकळे पार तुझा कृपावंता ॥४॥

६६५

जीवा जीवन दीनानाथ । ज्याच्या नामे पुरती मनोरथ ॥१॥
तुझे नाम नेता सुख झाले । रूप पाहता मानस माझे धाले ॥२॥
तुझे नामी गुंतले माझे मन । आता वेगी करी उद्धरण ॥३॥
तुझ्या नामाविण आणिक नाही । गणेशनाथ म्हणे तुझे पायी ॥४॥

६६६

परा पश्यंती मध्यमा आणि वैखरी । तुला वानिता शिणल्या च्यारी ॥१॥
स्थूल सूक्ष्म कारण देह । महाकारण पाहुनी होईल काय ॥२॥
च्यारी खाणी वाणी पाहे डोळा । परी जीवा न कळे जीवनकळा ॥३॥
गुरुकृपा हे पूर्ण घडे ज्याशी । गणेशनाथ म्हणे तोची पुण्यराशि ॥४॥

६६७

तिन्ही लोकी दुसरा अन्य नाही । त्याचे रूप आठवी नित्य देही ॥१॥
जीवा जीवन तुची गुरुराया । तुजविण रे व्यर्थ सर्व माया ॥२॥
सत्ताधारी तारक संसारी । तिन्ही लोकी वानिती तुझी थोरी रे ॥३॥
गणेशनाथ म्हणे तुझे पायी । भेदाभेद दोन्ही उरले नाही ॥४॥

६६८

गेला रे गेला जन्म गेला रे । कळोनि अंधार कैसा केला रे ॥धृ॥
करोनिया भावभक्ती । पाविजे ब्रह्मस्थिती । तोडोनिया सर्व भ्रांति पाहे रे ॥१॥
सांडोनिया भेदाभेद । मना करी ब्रह्मबोध । निरसोनि उपाधि सर्व टाकी रे ॥२॥
भक्ती आणि वैराग्य ज्ञान । पाहुनिया निजखूण । अप अपणीया पाहुनी राहे रे ॥३॥
विश्वासेशी संतसेवा । करिता उद्धार जीवा । गणेशनाथ पूर्व ठेवा पाहे रे ॥४॥

६६९

अंडज जारज स्वदेज खाणी । उद्विज चौऱ्यांशी लक्ष योनी ।
एका बीजाची ते लावणी । परी कोणाशी नेणती कोणी ।
सद्गुरू कृपेने अमृतधणी रे ॥१॥
वेगी सावध होई आलिया रे । नाशिवंत हे काया माया ।
शरण आलो तुज सद्गुरुराया । मुळ पाहुनि मुळीच्या ठाया रे ॥धृ॥
स्थूळ सूक्ष्म कारण देह । महाकारण पाहुनी होईल काय ।
भक्ती घडली नाही निश्चये । तवरि कैसे ते निजसुख सोय ।
गुरुकृपेने ब्रह्मरूप पाहे ॥२॥
परा पश्यंती मध्यमा वैखरी । अनुर्वाच्य बोलता नाही उरी ।
जया वर्णिता मोनल्या च्यारी । च्यारी सहा अठरा बोलती ज्याची थोरी ।
देवभक्त एकची नाही उरी ॥३॥
सलोकता समीपता स्वरूपता । सायुज्यताचि मुक्ती जया होता ।
गुरुभक्ती हे श्रेष्ठ तया माथा । करिता जिवची पावती अक्षयता ।
तेथे हरपली दुजेपण वार्ता रे ॥४॥
खेचरि भूचरि चांचरि अगोचरि । अलक्ष पाचवी पाहोनी नाही उरी ।
महायोग्यांची सतरावी शिदोरी । गणेशनाथ म्हणे सद्गुरुचे घरी ।
सर्व सांडोनी सेवा अंगीकारी ॥५॥

वेगी सावध होई आलिया रे ।

६७०

नामे बहु धालो । पावलो पद पायी रंगलो ॥धृ॥
अमृत घेऊनी धायवरि । धालो या संसारी ।
तुजला पाहता अंतरी । ब्रह्मपद थोरी ॥१॥
पाहता मन धाय । ते पाय आपणामाजी आहे ।
सद्‌गुरु प्रसादे गुण गाय । तेची होउनी राहे ॥२॥
जन्म अजन्म हा नेम । अचरे सद्‌गुरु धर्म ।
निश्चय निर्धार हे वर्म । जिव हे होती परब्रम्ह ॥३॥
चिरंजीव हा जो ठाव । देव सद्‌गुरुराव ।
म्हणोनि विनवितसे गणेशनाथ । चरणी मागे ठाव ॥४॥

६७१

सद्‌गुरूनाथा चरणी माथा । ठेवुनी बोलु निजसुख वार्ता ॥१॥
सद्‌गुरूनाथा रे ॥धृ॥
गुरूराजा कृपाळू माझा । पावताहे निज भक्तिकाजा ॥२॥
तुझी सेवा तो पूर्व ठेवा । दावी वेगी उद्‌धारावे जिवा ॥३॥
तुझे नाम मज द्यावे प्रेम । तोचि माझा सर्वही धर्म ॥४॥
तुजशी भाव तो मोक्ष ठाव । झाला आम्हा सोयरा देव ॥५॥
तुझी कथा अमृत घेता । गणेशनाथ म्हणे धालो आता ॥६॥

६७२

मनाचे निश्चलपणे । गाऊ या हरीचे गुण ।
स्वरूपी होवोनिया आपण । खेळतो खेळ ॥१॥
वेधिलेसे संपूर्ण मन । हरीरूप होउन ।
झाले उन्मन पावन । तेज खुणे ॥२॥
हरपले गुणागुण । नाठवेचि मी तू पण ।
वृत्ती गेल्या विरून । ठाईच ठाई ॥३॥
पाहता ते ब्रह्मसुख हरपले जन्मदुःख ।
येकी होउनिया येक । गणेशनाथ ॥४॥

६७३

पाहता त्या गुरुनाथा । हरपली संसार चिंता ।
निजप्रेम द्यावे गुण गाता । मोक्षाशि जाता ॥१॥
वर्णिताची गुणकीर्ती। हृदइ कोंदली मूर्ती ।
जालीसे सुख विश्रांती । पाहता तुज ॥२॥

अमृत घेतल्यावरी । जन्माशि कैची ऊरी ।
ऐसा सद्‌गुरू हा संसारी । जोडला आम्हा ॥३॥
जीव तोचि शिव होय । ऐशि ज्याची कृपा पाहे ।
गणेशनाथ गुण गाय । हरिखे तुझे ॥४॥

६७४

प्रसादिक आराधीक। प्रदायक म्हणती सुख ।
परि ते निजसुख । मोक्षदायक ॥१॥
धीट पाठ संगीत । करिताती महा नृत्य ।
परि तो नव्हे गुरुभक्त । पाहे निजहीत ॥२॥
भक्ती ज्ञान वैराग्य । करितातित साधन संग ।
परि तो नव्हे पावन अंगे । सद्‌गुरूविण ॥३॥
सद्‌गुरूशि मिळणी । दुजे नेणे त्रिभुवनी ।
गणेशनाथ गुरुचरणी । मागतो ठाव ॥४॥

६७५

वेगी स्वहीत तु करी रे आलिया । सांडी संसार संभ्रम सर्व माया ।
तरीच पावशी तु मुळीच्या ठाया रे ॥धृ॥
भक्तीवाचोनी व्यर्थ काय जिणे । जैसे उदकामाजी कोरडे पाषाण ।
दया धर्म न करिता दान पुण्य । तैसे जन्मा आलिया काय जिणे रे ॥१॥
भावे करी का लवलाहे संत सेवा । वेगी पाहोनिया पूर्व पुण्य ठेवा ।
भेदाभेद सांडोनिया सर्व द्यावा । सदोदीत अंतरी देव पहावा रे ॥२॥
सद्‌गुरु सोयरा जोडावा संसारी । तेणे चुकती चौऱ्यांशी वेरझारी ।
श्रुती पुराणे वानिती ज्याची थोरी । जीव अक्षय अमर तो करी रे ॥३॥
भेद सांगोनिया सम करी का दृष्टी । देव सर्वत्री पाहोनी चरणी मिठी ।
गणेशनाथ समावे तुझे पोटी । तेथे हरपली दुजेपण गोष्टी रे ॥४॥

६७६

कान्हा सांग पा याचे नाव । जया देही नाही गाव ठाव ।
जे का मनापुढे घेत धाव रे ॥धृ॥
तया आदि अंत दोन्ही नाही । पाहता यातिकुळ वर्णभेद तेही ।
सर्वव्यापक नातळे देही रे ॥१॥
जे का पवनाहुनी चपळ । मेरू ध्रुवाहुनी ते अढळ ।
शुन्य साकार करोनि वेगळे रे ॥२॥
जे का आत्म्याशी जाणते । चंद्र सूर्यासही उजळीत ।
संत योगीजना भुलवीत रे ॥३॥

पाहे अक्षय अढळ अपार । गणेशनाथ निरंजन सार ।
गुरुमुखे सार विचार रे ॥४॥

६७७

नादेविण वाजते ते काय । दृष्टीविण दिसते ते पाहे ।
तोचि योगी निजसुखी आता राहे ॥१॥
सारासार सम विचार । न म्हणे साने अथवा थोर ।
तोचि योगी तिन्ही लोकी साचार ॥२॥
असोनिया तेथे काहीच नाही । ऐसे कळले त्यास ठाईचे ठाई ।
गणेशनाथ त्या सद्‌गुरुचे पाई ॥३॥

६७८

सद्‌गुरुनाथा कृपावंता चरणी ठेविला माथा ।
तुझीये कृपेने पावन मुक्ती सायुज्यता ॥धृ॥
तुझे भेटीवीण अंती न राहे सर्वथा ।
ज्या कारणे नरदेहा आलो ते करीन आता ।
तुझा तुजशी मिळता नवल नाही सर्वथा रे ॥१॥
नरदेही तुझी भेटी साधुसंत बोलती ।
तुझे भेटीवीण जिणे काय हे विपत्ती ।
मुळीची क्रिया शुद्‌ध तेणे सद्‌गुरुची प्राप्ती ॥२॥
सर्वाभूती आत्माराम सत्य ऐका कानी ।
तरी का पाप-पुण्य पाहता या जीवाशी दोन्ही ।
तुझी कृपा जाल्या होय स्वसुखाची धणी ॥३॥
आपणा मधूनी वेगळे काढूनी नाव ठेविले जीव ।
मुळीचेची एक तेथे कैसा द्‌वैत भाव ।
गणेशनाथ म्हणे तुझे चरणी माझा ठाव ॥४॥

६७९

सद्‌गुरुनाथा कृपावंता चरणी ठेविला माथा । तारि पतिता सखया ॥१॥
सद्‌गुरु माये पाहशील काय हृदयी राहे । तुझ्याने सोय सखया ॥२॥
सद्‌गुरुराया तुझी दया उजळली काया । कृपादान दे सखया ॥३॥
सद्‌गुरु करुणाकर विश्वाधार । तु माझे माहेर सखया ॥४॥
सद्‌गुरु मूर्ती ऐकुनी कीर्ती हृदयी प्रीती । तु माझा सांधाति ॥५॥
गणेशनाथ तुज विनवित अखंड ध्यात । तु माझे हित सखया ॥६॥

६८०

मुळीचे माहेर । सद्‌गुरु माझा उदार ।

तुझ्या येका नामे उतरु भव सिंधूचा पार ॥धृ॥
तुची माता तुची पिता । जिवाचा जनिता ।
तुझी सत्ता कळली चित्ता चरणावरी माथा गा ॥१॥
विश्व व्याला निर्गुण झाला । जीवन जिव्हाळा ।
जिवाचा निजजीव सद्गुरु भाग्ये तो भेटला गा ॥२॥
असोनि नाही बोलो कायि । नामे निजसोय ।
तिन्ही लोकी कृपाळु माझी सद्गुरु माय ॥३॥
मनचि फुल मनचि बेल नवेद तांबूल ।
गणेशनाथ म्हणे मन हे तुजचि वाहिले ॥४॥

६८१

तारक या संसारी । गुरुनाथ नाम उच्चारी । सदभाव धरी अंतरी ।
पाविजे ब्रह्मपद थोरी । जन्माशि कैची उरी । चुकवी वीरझारी ॥धृ॥
उद्धव रुक्मांगद । पाहे ध्रुव आणि प्रल्हाद । पुंडलिक आणि नारद ।
जाणती भक्ति भेद । तेणेचि पंथे सिद्ध । सांडोनिया भेदाभेद पावती ब्रह्मपद ॥१॥
जनक आणि शुक । वैशंपायन वाल्मिक । संत आणि सनकादीक ।
अनेक देव एक । पाहुनी सांडी शोक । देव आणि दानव ऐक्य ।
होउनी दीन रंक । श्री गुरुनाम घोक । पावशी अक्षय सुख ॥२॥
ऐशिया मार्गे जाय । पाहशील आता काय । धरूनिया मुळीची सोय ।
हरिखै हरीगुण गाय । देव पाहुनि देवचि होय । गुरुपदी दृढ राहे ।
सायुज्य पदवी पाहे । नरदेही हाची उपाय ॥३॥
सत्य या मार्गे जाता । भय नाही काही चिंता । सांडुनिया सर्व अहंता ।
शरणागत साधुसंता । अविनाश पद ये हाता । गणेशनाथ म्हणे आता ।
सद्गुरु पूर्ण दाता । चरणावरी ठेविला माथा ॥४॥ तारक ॥

६८२

विनती ऐका नारायणा । गाई गेल्या रे वरल्या राना ॥धृ॥
गाई पवनाहुनी चपळ । तिने घेतला असे पळ ।
गाय का आहे दुर्बळ । त्याची ठाउकी तुजचि कळ रे ॥१॥
गाइशी आघवे रान ठावे । तीचे पाठी कवण धावे ।
तुज सांगतो सत्य भाव । कृपादृष्टी मज दीना पाहावे ॥२॥
गाय धीट बहु मोकट । तिने धरिली नीट वाट ।
तीशि वळिता बहुत कष्ट । सत्य गायक्यास देणे भेट ॥३॥
गणेशनाथ म्हणे गाइ का । गाई वळीता तुझिया सुखा ।
तुझे कृपेने नाही मज धोका । तुचि मुळीचा माझा सखा रे ॥४॥

६८३

कसाला नाही काही । विचारूनी पाही ॥धृ॥

हिरा जैसा ऐरणी ठोकी दोही बाही । तैसा आत्मा देही पाप-पुण्य नाही ॥१॥

तुटला कसाला गुरुकृपा होता । कसाल्याचे नाम घेता हेचि पाप माथा ॥२॥

आत्मा निष्कळ ब्रह्म त्याचि कैचे कर्म । सद्‌गुरुचे कृपे हे सापडले वर्म ॥३॥

सद्‌गुरुच्या पूर्ण बोधे तुटला कसाला । गणेशनाथ म्हणे आम्हा थोर लाभ झाला ॥४॥

६८४

जाग रे तु जाग मना । जागे आपुले ठाई ।
सर्वाघटी एक भाव । गुरुपद ते पाही ॥धृ॥
जाग रे तु जाग मना । आता काय निजलाशि ।
गुरु शब्द सत्य सार । जागवी तयाशी ॥१॥
जाग रे तु जाग मना । काळ लागला पाठी ।
धरोनी एक भाव । दृढ पायी घाली मिठी ॥
यालागि जिवित्व तुझे । सद्‌गुरूच्या देठी ॥२॥
जाग रे तु जाग मना । तुज आयुष्य थोडे ।
करिती येम जाच । पहा कौतुक पुढे ।
यालागि लवलाही । गुरुनामी आवड ॥३॥
जाग रे तु जाग मना । गंगेशि पुर आला ।
येकला पोहणार । कैसा पोहता भ्याला ।
चिंतना सरिसा रे । गुरुनाथ पावला ॥४॥
जाग रे तु जाग मना । काय भुललाशि व्यर्थ ।
आदी-अंत नकळे । कैशी होईल गत ।
गणेशनाथ म्हणे । गुरुनाथा समर्थ ॥५॥

६८५

धन्य धन्य ते संत सज्जन । त्यांच्या नामे होय पावन रे ॥धृ॥

धन्य धन्य ते संत महंत । त्यांचे चरणी अखंड माझे चित्त रे ॥१॥

धन्य धन्य गा सिद्ध साधक । त्यांचे नामे तरले तिन्ही लोक रे ॥२॥

धन्य धन्य योगी मानव । त्यांचे चरणी अखंड माझा भाव ॥३॥

गणेशनाथ म्हणे गुरुराया । तुझे पायी ओवाळिली काया रे ॥४॥

६८६

आदीनाथ समर्थ । शुद्ध करी चित्त ॥धृ॥

एकात्म तत्वे करी निवांत । अक्षय पद देत ॥१॥

एकवीरा देई एकविध भक्ती । विश्वास विश्वनाथ ॥२॥
जय विश्वनाथ विश्वंभरित । स्वरूप सुख शांत ॥३॥
गणेशनाथ तुज विनवीत । काय पाहशी अंत ॥४॥

६८७

कान्हा सांग पाउमान माझे । जे का गुह्यातित निजगुज ।
ते देखता सर्व सिद्ध काज ॥धृ॥
मुळी बीजासी नाही ठाव । तेथे कैचे रूप आणि नाव ।
तेथे कैचा गाव आणि ठाव । ऐशी न कळेचि तुझी माव ॥१॥
मुख्य वराड नाही जाले । तेथे पोर रे काय जन्मले ।
तेथे कवण आले गेले । सांगे आधील की मागील ॥२॥
मुख्य जन्म-मरण जेथे नाही । चहु वर्णा वेगळे पाही ।
तेथे असोनी काहीच नाही । सांग क्षय की अक्षयी ॥३॥
मुळी एकची नाही दोन । तेथे सगुण ना निर्गुण ।
तेथे आत्मा न अनुसंधान । या सर्वांशी साक्षी कोण ॥४॥
मुळी आकार नाही निराकार । तेथे शिव ना शक्ती थोर ।
तेथे क्षर नाही अक्षर । तेथे गणेशनाथ काय किंकर ॥५॥
कान्हा०॥

६८८

सावध होय मना । नरदेह पाहुणा ।
यालागी लवलाही । पाहे मुळीच्या खुणा ॥धृ॥
स्वप्निचा संसार । बहु थोर पै झाला ।
स्त्री आणि पुत्र धन । सुख लाभ जोडला ।
जागृती झालीया गा । हातोहात पै गेला ॥१॥
स्वप्निचा गाव ठाव । बहुरूप पै नाव ।
जनाशि पाहे म्हणे । माझे थोर वैभव ।
जागृती झालीया गा । ते सर्वही वाव ॥२॥
स्वप्नीचे सुनम सेज । वरी निवांत निजे ।
भोगोनिया सर्व भोग । सर्व सुख पै सहज ।
जागृती झालीया गा । पाहे सांगता लाज ॥३॥
गणेशनाथ म्हणे । माझा सद्गुरूनाथ ।
कृपाळू होवोनिया । ठेविला मस्तकी हात ।
सांगुनी वाक्य कानी । निजी केले निवांत ॥४॥

आम्ही झालो गुरूचरणवासी । पुन्हा नाही येणे गर्भवासी ॥१॥
माझा ठाव पाहता तुझे पायी । पुन्हा जन्माशि येणे आता नाही ॥२॥
धन्य जन्माशि आलो देखा । गुरु सारिखा जोडला सखा ॥३॥
माझा नमस्कार संत साधू जना । परब्रम्हीच्या दाविल्या खुणा ॥४॥
गणेशनाथ म्हणे गुरुनाथा । वेळोवेळा चरणी ठेविला माथा ॥५॥

६९०

काम क्रोधे वेढिला माझा देह । तुझे भजन कैसे घडो पाहे ॥१॥
आता अल्पमती कल्पविधा पाहु । माझा राम सखा गुण किती गाऊ ॥२॥
नाम गाता महिमा कळो आली । धन्य भाग्य गा भेटी तुझी झाली ॥३॥
गणेशनाथ म्हणे झाले हित । तुझे नाम ध्यातो हृदयात ॥४॥

६९१

राम राम म्हणता कैलासाशि गेले ।
संत साधूच्या दर्शना परतोनी जन्मा आले ॥१॥
संत साधूच्या दर्शने घडली तुझी सेवा ।
तेणे आवडलो द्वारकेच्या देवा ॥२॥
गणेशनाथ म्हणे तुझे चरणी मी डुलतो ।
आवडीच्या सुखे नाम तुझे गीती गातो ॥३॥

६९२

गुरुराजा कृपाळू स्वामी माझा । तुजवाचोनी आणिक नाही दुजा ॥१॥
गुरुराया रे थोर तुझी माया । तुझे पायी वाहिली सर्व काया ॥२॥
तुझे नाम घेता आवडी वाचे । तिन्ही लोकी रे नाम तुझे साच ॥३॥
नाम गर्जत उभा महाद्वारी । वेळोवेळा लोळेन चरणावरी ॥४॥
गणेशनाथ म्हणे हरली व्यथा । धन्य भेटी तुझी गुरूनाथा ॥५॥

६९३

आता येतो वो दया असू द्यावी । तुम्हा नमस्कार साष्टांग भावी ॥१॥
आता हसावो मना येईल तैसे । आम्हा लागले प्रेमाचे पिसे ॥२॥
आता झाले वो तुमची सून । आठव करिता थोर होय पुण्य ॥३॥
तुम्ही म्हणाल ऐसे कैसे झाले । गुरुनाथे वो मन ठेवियले ॥४॥
गणेशनाथ म्हणे निवालो थोर । कृपा असू द्यावी निरंतर ॥५॥

६९४

धन्य ती भीमरा । जे स्नाने पुंडलिका दर्शना ।
तुळशी वाहून । वाहून । मागो भक्ती दान ॥धृ॥
धन्य तो वेणू नाद । वेणू नाद । अखंड गोविंद ।

नारद तुंबरु विनोदे । तैसा लागो छंद ॥१॥
धन्य ते विष्णुपदे । गोमटी । धावोनि घाली मिठी ।
धन्य ते गोपाळ । लक्ष कोटी । भाग्ये तुझी भेटी ॥२॥
धन्य ते पाऊले । पद्मतीर्थ । वंदीता पुणित ।
पापे हरती । हरती । सर्वही सार्थक तेथे ॥३॥
धन्य ते वृंदावन । दर्शन । आपण नारायण ।
दर्शन जालिया । जालिया । नाही जन्ममरण ॥४॥
धन्य ते पायरी । पायरी । अखंड झालो द्वारी ।
चरण धरिले । अंतरी । जन्मा नाही उरी ॥५॥
गणेशनाथ म्हणे । गुरुनाथा । कृपाळू तु दाता ।
भावे विनवितो । चरणी ठेवुनी माथा ॥६॥

६९५

कान्हा तुज मज गडीपण खरे । दोघे राहु संवाद विचारे ।
एकची दाऊ नको । दुसरे रे ॥धृ॥
कान्हा तुज मज पडली गडी । तैसा संसार झाला देशधडी ।
मज पडली पूर्वीची जोडी । प्राण गेल्या चरण न सोडी ॥१॥
कान्हा तुज मज झाली भेटी । मी तू पणाशी पडली मिठी ।
एक नामची धरिले कंठी रे ॥२॥
कान्हा राहिलो तुझ्या गावा । काही करावे अमुचे हित ।
गणेशनाथ म्हणे पतीत रे ॥३॥

६९६

चरणी माथा । श्री गुरूनाथा । समर्थ दाता ।
कळले चित्ता । लावी निजपंथा ॥१॥
निजरुप पाहता । तन्मय चित्ता । उन्मनी अवस्था ॥२॥
तु आदि अंता । सर्व तुझी सत्ता । हरिखे गुण गाता ॥३॥
गणेशनाथा । तारी अवक्ता । सद्‌गुरु आदीनाथा ॥४॥

६९७

माझा गुरुनाथ । मज दावा । परब्रम्हीचा ठेवा ।
विनंती सकळांसी । सकळांसी । त्याचा आठव द्यावा ॥धृ॥
माझा गुरुनाथ । जिवलग । अखंड त्याशी संग ।
तुझीये संगती । संगती । जालो एक रंग ॥१॥
माझा गुरुनाथ । तारक । मोक्षपद सुखदायक ।
सफल संसार । संसार । तुझे नाम जपतो एक ॥2॥

माझा गुरुनाथ । जननी । कृपाळू त्रिभुवनी ।
व्यापक जनीवनी । जनीवनी । अमृताची धनी ॥३॥
गणेशनाथ म्हणे । गुरुनाथा । धन्य कृपावंता ।
त्वा मज तारीले । तारीले । हस्तक ठेवुनी माथा ॥४॥

६९८

जय त्रैलोक्यनाथा । चरणावरी माथा ॥धृ॥
सत्व रज तम त्रिगुणापरता । अक्षय तु दाता ॥१॥
त्रैलोक्य थोरी । तुझ्या उदरी । सर्वत्र तुझी सत्ता ॥२॥
मनाचा जनिता । सावध करी चित्ता । तारक निजभक्ता ॥३॥
गणेशनाथ म्हणे । विश्वाचा जनिता । प्रसाद गुरुनाथा ॥४॥

६९९

गुरु अलक्ष जागे । सद्गुरुचा संग ॥धृ॥
संत उदार कृपासागर । ऐसा सद्भाव निर्धार ॥१॥
आहे ते सांगावे । संता पै मागावे । भक्तिदान द्यावे ॥२॥
संतचरण रज । तेची निज गुज । मागे सांडुनि लाज ॥३॥
मनिचे सांगतो । काकुलती येतो । प्रेम प्रसाद मागतो ॥४॥
गणेशनाथ म्हणे । सद्गुरु उदार । विश्रांतीचे घर ॥५॥

७००

माझा सद्गुरूनाथ । शिवजोगि समर्थ ॥धृ॥
सद्गुरूनाथ । मस्तकी हात । केले मज सनाथ ॥१॥
ब्रह्मांड कोटी । जयाचे पोटी । भाग्ये तुझी भेटी ॥२॥
तुझिये कृपेने । पावे निजखूण । जन्माशि नाही येणे ॥३॥
गणेशनाथ म्हणे । सद्गुरू समर्थ । अक्षयपद देत ॥४॥

७०१

आता हेचि विनंती पाहे । बहुत मागावे ते काय ।
सुख दुःख दोन्ही नको देई बाबा ॥१॥
गुरू गोरख जागे ॥धृ॥

आम्हा घातले जन्माशि । काय मागावे कोणाशी ।
म्हणुनि आलो तुझा तुजपाशी बाबा ॥२॥ गुरु ०॥
पुराणी ऐकीली हे मात । तिन्ही लोकी तु समर्थ ।
तुजवीण कोण करील हित बाबा ॥३॥ गुरु०॥
मुळीचा तु बाप माय । बहुत सांगावे ते काय ।

अजुनी तुज करूणा न ये बाबा ॥४॥ गुरु०॥
गणेशनाथ विनवी तुज । तुजविण कोण आहे मज ।
आता सांग जिविचे गुज बाबा ॥५॥ गुरू०॥

७०२

येक नवल सांगो काय । आम्हापासुनी आमुची माय ।
तिने सांगितली मुळीची सोय रे ॥धृ०॥
उदकाविण पाहे सागर । त्याशि अंत ना नाही पार ।
कोण्या ठाई त्याचा उतार । तेथे बुडती लहान थोर ।
गुरुकृपेने सारा विचार रे ॥१॥
पाचा तोंडाचा मासा आहे । तो उदकाविण सदा राहे ।
दाताविण तो सदा खाय । आप उगमा आपण जाय ।
गुरुकृपेने सापडली सोय रे ॥२॥
पाहे मातीचे जहाज केले । केणे अमोलिक भरिले ।
काय आहेसे नाही कळले । तुझे सत्तेने सर्वही चाले ।
सर्व अलिप्त योगी झाले रे ॥३॥
अनामाते रे नाव ठेविती । अकुळाला रे कुळ म्हणती ।
काय करू नये ते सांगति । जे अक्षयपद म्हणती ।
तेथे गणेशनाथ नाव किती रे ॥४॥

७०३

चित्ता सावध रे । हरि भजनी । अमृताचि धनी ॥धृ॰॥
माया मोहजाळे । मोहजाळे । गोविले सकळ ।
स्वहित करू नेदी । करू नेदी। तेचि दुःखमूळ ॥१॥
आयुष्य मोलाचे । वेचले । सार्थक नाही झाले ।
हरिपद प्राप्तीशी । नरदेह । व्यर्थ वाया गेले ॥२॥
हिंडता चौऱ्यांशी । लक्ष योनी । न लाजेशी मनी ।
दुःख भोगीता । भोगीता । सोडविना कोण्ही ॥३॥
गणेशनाथा म्हणे । चित्तवृत्त । अवघा सद्‌गुरूनाथ ।
तारक सर्वांशी । सर्वांशी । कृपाळू समर्थ ॥४॥

७०४

दीनदयाळ दयानिधी रामा । न कळे तुझा पार रे ।
अलक्ष अगोचर अपार महिमा । सांगत सार विचार रे ॥१॥
राम अराम सदा सुख मूर्ती । वानी सदा शिवकिर्ती रे ।
मारुनि दशमुख सोडवि देव । भक्ता अक्षय प्राप्ति रे ॥२॥

सत्य सीता तो सोडवी वेगी । दासा चिरंजीव ठाव रे ।
सागरी शिळा तारि लीला । प्रतापे आगळा देव रे ॥३॥
रीस वानर वाल्मिक पावन । पाहे सर्व सृष्टी रे ।
गणेशनाथ पूर्ण कृपा । अखंड तुझी भेटी रे ॥४॥

७०५

पद प्रबंधे छंदे गायन तुझे सार रे ।
प्रेमामृते जिव शिव ध्याती सार विचार रे ॥१॥
नाम गाई नाम ध्याइ । नामे पाहि मोक्ष रे ।
भक्ती मुक्ती पूर्ण प्राप्ती । गुरुपदी सर्व साक्ष रे ॥धृ०॥
मानस मुनिजन मोहन पाहता । सुखाशी नाही पार रे।
पतित हिन आदि अंत । धरुनी उतरी पार रे ॥२॥
व्यास वाल्मिक शुक सनकादिक । उद्धव नारद नाम रे ।
देव दयानिधी तारक सकळा । देतो अक्षय ठाव रे ॥३॥
निगमागम श्रुती शास्त्रे शोधीत । न कळे तुझा पार रे ।
हरिहर विधी नर स्तविती ज्याला । गणेशनाथ सुखसार रे ॥४॥

७०६

तो मज आठवतो । गुरुनाथ । अक्षय निजपद देत ॥धृ॥
लेवुनी कृपेचे । अंजन । चुकवी जन्म-मरण ॥१॥
मस्तकि ठेवूनिया । हस्तक । ब्रह्मचि तिन्ही लोक ॥२॥
प्रणव ॐकार । निजबीज । ठेउनी योगीराज ॥३॥
तीर्थ देउनिया । निजशेष । अचल करी अविनाश ॥४॥
नवल वो भेटले । गुरुदेव । गणेशनाथ मग नाव ॥५॥

७०७

सद्गुरु आठविता । संसारी । देतो ब्रह्मपद थोरी ॥धृ॥
ज्याची वानिता । गुण किर्ती । जिताची जीवन मुक्ती ॥१॥
गुरुपद पाहता । अति श्रेष्ठ । सर्व सुखाची पेठ ॥२॥
ऐसा प्रतापे । आगळा । कैवल्य दावी डोळा ॥३॥
तुझे भक्तीचा । पडीभार । निरसे द्वैत घोर ॥४॥
अनंत जन्मीचे । सुकृत । गणेशनाथ निजहित ॥५॥

७०८

अलक्ष योगिया । योगिया । जाली तनुमन माया ॥धृ॥
निरसुनी वास । सदा उदास । फिरशी जन उद्धराया ॥१॥
ब्रह्म बीज ज्ञान । चेतवी पूर्ण । सर्वही दहन कराया ॥२॥

निरंजन प्याला । घे मतवाला । विरक्त शीतल छाया ॥३॥
गुरु गुज झोळी । नवविध पूर्ण । रिद्धी सिद्धी लागती पाया ॥४॥
आत्मविचार । पाहता थोर । गणेशनाथ मग वाया ॥५॥

७०९

योगी साचार साचार । निरसुनि हा संसार ॥धृ॥
माया मुळिहुनी जाळुनी आधी । तोडी विषय घोर ॥१॥
मारोनी मन्मथ निज निर्धारे । काम क्रोध मग विरे ॥२॥
आशा मनसा कल्पना निर्मुळ । दहन करी अहंकार ॥३॥
अनन्य शरण । विरक्त होउनि । समता ब्रह्मसार ॥४॥
अचल अढळ अलक्ष होउनि । गणेशनाथ मग नुरे ॥५॥

७१०

निरंजन सुख पाहे सुख पाहे । अलक्ष सदनी राहे ॥धृ॥
नरदेह सार करी विचार । निजात्म गुण गाय ॥१॥
प्रेमरस सेवी ध्यान देही । स्वये आत्मा आहे ॥२॥
ब्रह्म चतुर्दश व्यापक निष्कळ । सद्‌गुरुमुखे सोय ॥३॥
अवघा आपण सहज निरंजन । गणेशनाथ पद होय ॥४॥

७११

तारक निर्वाणी । गुरुविण नाही कोण्ही ॥धृ॥
आदि अनाद आत्मबोध । दुसरा नाही कोण्ही ॥१॥
निरसुनि भवभ्रम दावी निजवर्म । व्यापक जनी वनी ॥२॥
सहस्त्र फणी मुख ब्रह्म ख्याती । बोलती वेद वाणी ॥३॥
अगम निगम संत मुनिजन । गणेशनाथ सुख चरणी ॥४॥

७१२

जगत्र जननिये । जननिये । दुर्लभ तुझे पाय ॥धृ॥
प्रणव ब्रह्म बीज ओंकार । वैखरी परात्पर मूळमाये ॥१॥
तु वेदमाता शिवादी पाहता । अर्ध मात्रे अनुशये ॥२॥
भवन चतुर्दश विश्व उदरी । गुरुमुख स्वरूप सोय ॥3॥
अचल अढळ अपार महिमा । गणेशनाथ गुण गाये ॥४॥

७१३

अलक्ष शिवजोगी शिवजोगी । पूर्णपणे निजयोगी ॥धृ॥
त्रिशूळ डमरू गज चर्मावर । विभूती भूषण अंगी ॥१॥
वरिष्ठ साधन शिव हे आपण । व्यापक परी वितरागी ॥२॥
त्रिनयन तु गंगाधरवर । अलिप्त सर्वही अंगी ॥३॥

अचल अढळ अपार महिमा । गणेशनाथ गुरुसंगी ॥४॥

७१४

जनी वनी सवेची राम आहे । गुरुकृपे शोधूनी सर्व पाहे ॥धृ॥
सखा सज्जन सोयरा राम एक । ज्याचे नामे तरले तिन्ही लोक ॥१॥
नामे जळती पातके पुण्यराशी । कपी तरले मानस देवऋषी ॥२॥
गणेशनाथ म्हणे गुरुकृपा पाही । प्रेम कीर्तनी वानिता जन्म नाही ॥३॥

७१५

जगी तारक एक आदि अंती । गुरुवचने स्वये ब्रह्म प्राप्ती ॥१॥
गुरुसेवा अनाथ शरण जाता । रिद्धी सिद्धी तिष्ठती सायुज्यता ॥२॥
सकळ देवाची गुरुदेव पूजा । तिन्ही लोकी आणिक नाही दुजा ॥३॥
संत साधू जाणती सर्व सुख । गणेशनाथ वानी दीन रंक ॥४॥

७१६

देवे मांडीला महा थोर खेळ । खेळो जाणे तो गोपाळ ।
गुरुकृपेविण न कळे रे ॥१॥
आल्या पाहे पा मुळीची सोय । स्वये पाहताचि पूर्ण ब्रम्ह होय ॥धृ॥
तिरी यमुनेचे निर्मळ । कृष्णासहित समस्त गोपाळ ।
खेळ खेळोनि झाले अढळ ॥२॥
दाही अवतार ऋषेश्वर । देव दानव मानव हरिहर ।
सिद्ध साधू जन योगी थोर थोर रे ॥३॥
व्यास वाल्मिक शुक वामदेव ।
उद्धव अर्जुन हनुमंत एक रे ॥४॥
खेळ वरिष्ठ खेळे खेळे थोर । तैसे खेळता संसार नुरे ।
गणेशनाथ गुरुपद सार रे ॥५॥

७१७

वैरागी पुरुषाला काही नाही संसाराची आस ।
विरक्तपणे विचरत सुख-दुःख जाळुनी उदास ।
शून्य निरंजनी ब्रह्मी केला अक्षय सुखवास ॥धृ॥
स्त्रिया धन कण माया मीपण । सांडुनी संसार ।
आशा पाश विकल्प विषय । मारुनि अहंकार ।
गाव नाव ठाव कुळ समस्त चुकवी । चौऱ्यांशी वेरझार ॥१॥
मन बुद्धी चित्त चैतन्य जागे । अलक्ष अविनाशी ।
भक्ती ज्ञान वैराग्य आगळा । साधन पुण्यराशी ।
शरण दीन लीन झाला । आत्मा अविनाशी ॥२॥

माइक मन मोहन धन प्रपंच । जाणुनि निरशीला ।
शोक मोह चिंता क्रोधातीत । सर्वांशी झाला ।
त्रिभुवन जनवन समस्त सकळही । पुरोनिया उरला ॥३॥
सहज स्थिती गती मती कैची मज । बोलो अमृतवाणी ।
अचल अढळ अपार गुरुपद । चिद्रत्न खाणी ।
गणेशनाथ मग पूर्ण घे गुरु । वचनाची धनी ॥४॥ वैरागी०॥

७१८

ॐकार ईश्वर । हरिहर शंकर । पशुपती फणिवर । निळकंठ ॥१॥
शिवा माधवा । सदाशिव महादेवा । वशिष्ठ वसुदेवा । विश्वंभरा ॥२॥
नारायण कान्हा । जग जीवना । निर्गुणा शून्या । निरंजना ॥३॥
गोविंदा गोपाळा । गोरक्षा गोवळा । विष्णू विश्वपाळा । विश्वनाथा ॥४॥
मधुसूदना त्रिनयना । त्रिविक्रमा वामना । त्र्यंबका त्रिपुरानना । महेश्वरा ॥५॥
श्रीधरा सर्वेश्वरा । हृषीकेशा देवा । पद्मनाभ नावा । जनार्दना ॥६॥
दामोदरा उपेंद्रा । नरसिंह नरेंद्रा । संकर्षणा चंद्रा । पूर्ण देवा ॥७॥
अनिरुद्धा अच्युता । आत्मया अविनाशा । प्रतिमान्या जगदीशा । जगन्नाथा ॥८॥
पुरुषोत्तमा कृष्णा । कमलनयना रामा । गोवर्धन विश्रामा । विश्वरूपा ॥९॥
शेष मत्स्य कुर्मा । मकरा मच्छिंद्रा । वराहा महिधरा । मंगल धामा ॥१०॥
परशुरामा रामा । बळरामा जगपाळा । मुरारी घननिळा । मेघश्यामा ॥११॥
अनंता भगवंता । ब्रह्म बीजाक्षरा । रघुवीर निर्विकारा । सच्चिदानंदा ॥१२॥
प्रणवा परमेश्वरा । भगवाना सोह सिद्धा । अभेद आनंदा । सर्वातीता ॥१३॥
मार्तंडा मनोहरा । राउळा ठाकूरा । सावळ्या रणधीरा । चतुर्भुजा ॥१४॥
शिवजोगी जंगमा । श्रीहरी परब्रह्मा । सोमलिंगा अविनाशा । अधोक्षजा ॥१५॥
आपो नारायणा । सूर्य नारायणा । ब्रह्मज्ञान समाना । हुताशना ॥१६॥
विश्वेशा नागेशा । रुद्रा वेंकटेशा । मल्लिकार्जुन सिद्धेशा । बस्वलिंगा ॥१७॥
प्रणव पंचाक्षरा । ज्योतिर्लिंगे बारा । करपुर गौराहरा । स्वामीया ॥१८॥
परमात्मा परेशा । परमा महापुरूषा। भूपती मुक्तेशा । स्वयंज्योती ॥१९॥
विठ्ठला आदित्या । मनु शालग्रामा । प्रभू आत्मारामा । आदिअंता ॥२०॥
नाथा आदीनाथा । सद्गुरु समर्था । नामार्पण माथा । चरणावरी ॥२१॥
भावे नामावळी । ध्यावि प्रातः काळी । देवराज बळी । द्वारपाल ॥२२॥
घडती सर्व धर्म । तीर्थे वृत्ते नेम । सायुज्य निजधाम प्राप्त होय ॥२३॥
भक्ती आणि वैराग्य । ज्ञान सत्य मार्ग । अखंड निजसंग स्वय होय ॥२४॥
गणेशनाथ दीन । चरणिचे रजरेण । संत सेवा पूर्ण । सद्गुरू कृपा ॥२५॥

शिवा ये शंकरा । करपुर गौराहरा । पशुपती ईश्वरा । निळकंठा ॥१॥
त्रिपुरा त्रिनयना । शूळपाणी महेशा । रुद्रा तू विश्वेशा । विश्वनाथा ॥२॥
प्रथम मूळ ॐकार । महाकाळेश्वर । देव त्रिपुरहर । जपावा देव ॥३॥
भस्मासुर केदार । आणि रामेश्वरा जाता । मल्लिकार्जुन पाहता जन्म नाही ॥४॥
सोमनाथ स्वामी । नागनाथ भेटी । वैजनाथ भेटी । कुळ तारी ॥५॥
ईश्वर लिंग बारा । ज्योतिर्लिंगे पाहती । तेणे पाहून येती । गर्भवासा ॥६॥
प्रणव पंचाक्षरी । पाचही लिंगे । आत्मा गुरुसंगे । गणेशनाथ ॥७॥

७२०

तारक गुरुमाये । गुरुमाये । कृपादृष्टी पाहे ॥धृ॥
त्रिभुवन पाळे । निजात्म सोहळे । दावी स्वरूप सोय ॥१॥
अंतर्गत जाण । सर्व ज्ञान । बहू सांगू काय ॥२॥
प्रेम पाना । दे मज दीना । अखंड हृदयी राहे ॥३॥
अभयंकर वर देउनि सारा । गणेशनाथ गुण गाये ॥४॥

७२१

अभय वरदानी । वरदानी । तुजविण नाही कोण्ही ॥धृ॥
पिंड-ब्रह्मांड भेदुनी सकळ । सत्रावी संजीवनी ॥१॥
प्रणव ब्रह्म जाणुनि निश्चित । योगीजन उन्मनी ॥२॥
सत्रावी कळ आत्मज्योती । चिद्रत्नाची खाणी ॥३॥
मुनिवर सुरवर सुखकर वरदा । गणेशनाथ निजध्यानी ॥४॥

७२२

सद्गुरु सुखदाता सुखदाता । अचल कर वर माथा ॥धृ॥
देउनी अक्षय हरितो सर्व । गुज नकळे वेदांता ॥१॥
चतुरानन मनी कीर्ती वानी । धणि न पुरे गुण गाता ॥२॥
सहस्र कमळदळ भेदुनी आकळ । सोह शब्दातीता ॥३॥
सकळिक मुनिजन ध्याती ज्याला । गणेशनाथ सुख चित्ता ॥४॥

७२३

नरदेह जातो रे पाही । सार्थ करी का लवलाही ।
भावे ईश्वर गुण गाई । विश्वी विश्वेश्वर पाही ॥धृ॥
एकनिष्ठा निर्धार । दया करुणा सत्वसार ।
विकल्प विषय जाळुनी । निरसी दुस्तर संसार ॥१॥
न करी आयुष्याचा नाश । सांडी प्रपंचसुख आस ।
धरी गुरु पायी विश्वास । पावशी ब्रह्मपदास ॥२॥
बहुता पुण्याचे शेवटी । नरदेही देवाची भेटी ।

सांडोनी भूलशी शेवटी । पाहे हानी होते मोटी ॥३॥
अजुनी तरी का सावध । गुरुमुखे घे का ब्रह्मबोध ।
गणेशनाथा गुरुपद । ऐक्यरूपे आनंद ॥४॥

७२४

पाहता सद्‌गुरु रूप । हरपला त्रिविध ताप ।
नामे जळती महापापे । सत्य पाहे रे ॥१॥
सद्‌गुरु माझा कृपाळू रे ॥धृ॥
अनंत पुण्याच्या कोटी । तरीच तुझी हे भेटी ।
बैसविले उठाउठी । सायुज्यपदी रे ॥२॥
संसार सार । पतन अघोर । उतरितो पैलपार । शरणागता रे ॥३॥
जन्म-मरणाच्या कोडी । चुकता न लगे घडी ।
गणेशनाथ पूर्ण जोडी । जोडली पाहे ॥४॥

७२५

आम्ही घेतला सदाशिव रस । विसरलो संसार आस ॥धृ॥
आत्मसुखाचा आमल आला । आत-बाहीर देवचि झाला ॥१॥
नाना रूप रे नाना वर्ण । नयनी दिसताती परिपूर्ण ॥२॥
चवदा भुवने भोवते दिसे । वाचे ब्रह्मा बोले भलतैसे ॥३॥
धन्य सद्‌गुरु सद् विश्वास । गणेशनाथ अखंड निज ध्यास ॥४॥

७२६

गुरुनाम आठवी पोटी । माया घोटोनी घटघटा घोटी ॥१॥
ऐसा घे का अमल काही । जेथे जन्म-मरणचि नाही ॥२॥
वेद शास्त्रे श्रुती शोधी । ब्रह्म बोधे मन हे बोधी ॥३॥
डोळे लावोनी उफराटे पाहे । शून्य निरशून्य भेदूनी जाये ॥४॥
लक्ष अलक्ष पहाता ज्योती । गणेशनाथ पारशावृत्ती ॥५॥

## शौरी

७२७

संसार स्वप्न झाले । सद्‌गुरूच्या बोले ॥धृ॥
स्त्री पुत्र धन मैत्र जाती कुळ गोत्र । समुळ देह नाशिवंत सत्य सर्वत्र ॥१॥
जे जे दिसे ते ते नाशे कायशी आश । अचल अक्षय सद्‌गुरु पायी मिरास ॥२॥
नाशिवंत हा संसार । शास्त्रे बोलती । जाणोनि नेणते नर सांगावे ते किती ॥३॥
तिन्ही लोकी तारक एक सत्य गुरुभक्ती । सद्‌गुरूनाथ उच्चारिता । होय निजशांती ॥४॥

गणेशनाथ म्हणे माझ्या सद्‌गुरुनाथा । तुजविण नलगे काही आणिक चित्ता ॥५॥

७२८

पाहे आपुला ठाव । एक म्हणे देव ॥धृ॥

एकाविन दुजे नाही । विचारूनी पाही । एक दोनी बोलता सत्व । जाईल बाई ॥१॥

पतिव्रते बाई गे । एक पतीधर्म । आणिकाकडे पाहता । तेची पाप नेम ॥२॥

अगे जिव्हे बाई गे तु जपे एक नाम । नामेविन बोलता । तेची कर्म नेम ॥३॥

गणेशनाथ म्हणे नाम तुझे सार । नामेविन बोलता तेची पाप थोर ॥४॥

७२९

सद्‌गुरुकडे पाहे । आपी विरोनी जाये ॥धृ॥

धरूनि देह गर्व सत्व । आणिकाचे पाहती । आत्मा समी भेटी नाही । अधोगती जाती ॥१॥

जगी जगन्नाथ । हेचि माझे हित । भक्तिभाव अंतरी नाही । कैसे पावती पंथ ॥२॥

सद्‌गुरुचे घरी निर्वैर आहे । गणेशनाथ म्हणे आता । हेचि सुखे ध्याये ॥३॥

७३०

तेची योगी झाले । मोक्षपदा गेले ॥धृ॥

करूनी भक्ती साधुनि मुक्ती । सदा सावधान ।

सद्‌गुरु पायावाचुनी कोठे । गोविना तो मन ॥१॥

ज्ञान ध्यान पाहुनि खूण । अखंड करी ध्यास ।

दया धर्म पूर्ण करी । सदा सावकाश ॥२॥

समदृष्टी तरीच भेटी होय स्वरूपाशी ।

सर्व एक पाहोनि सुख । दुजे नाही त्याशी ॥३॥

सर्व सरून आपी विरून । उरो नेदी काही ।

गणेशनाथ म्हणे गुरु । तैसे आम्हा देई ॥४॥

७३१

ऐसा होय काही । देहीच देव पाही ॥धृ॥

देहमदे भुलू नको । कळोनिया वाया ।

गेला काळ न येता आता । लाग सद्‌गुरु पाया ॥१॥

सांडी सर्व आस वेगी होय सावकाश ।

तोडुनि मायाजाळ । भक्ती करी का निजध्यास ॥२॥

सांडी भेद शोक जनी वनी देव एक ।

संत सेवा मनोभावे । करी होउनि रंक ॥३॥

सद्‌गुरु सुखे जागुनि मग । मग्न होउनि डोले ।

गणेशनाथ पाहोनिया । ब्रह्मसुख बोले ॥४॥

७३२

तेचि योगी जन । शुद्ध करी मन ॥धृ॥
ब्रह्मसुखे सुखी होउनि । सहज खेळ खेळे ।
अंतर शोधुन तोडुनि बंधन । निराकारी लोळे ॥१॥
सर्व कळा जाणे जिवन्मुक्त जेणे ।
आपण जगी असोनि नाही । जाणोनिया नेणे ॥२॥
माया मारी सर्व हरी । पाहोनी नाही उरी ।
अलख पलख लागेना तो । चढे ब्रह्मगिरी ॥३॥
जिवन्मुक्त पाहोनि आपण । न करी जामात ।
चरण पाहोनि सुखी झालो । म्हणे गणेशनाथ ॥४॥

७३३

तैसे काय जिणे । जिताची लाजिरवाणे ॥धृ॥
बोधी बोधुनि अंतर शोधुनि । मग काही बोले ।
धरूनि भ्रम नकळे वर्म । जन्म झाला फोल ॥१॥
देहबळे सबळ झाला । धनाकडे पाहे ।
पाप पुण्य विचारीना येमलोका जाय ॥२॥
ज्ञान ध्यान अभिमान । न सांडीच कदा ।
जाणुनि सकळ संता छळी । भोगितो आपदा ॥३॥
होउनि रंक पाहोनि एक । सम करी सेवा ।
गणेशनाथ म्हणे आता तोचि पुण्य ठेवा ॥४॥

७३४

विचारी का जीवा । पाहे पूर्व ठेवा ॥धृ॥
भजन पूजन साधन नाही । व्यर्थ जन्म गेला ।
माझे तुझे म्हणोनि व्यर्थ । काय लाभ झाला ॥१॥
विषय सुखा भुलोनिया । झाकू नको डोळे ।
यम अंती करिल जाच । कळल तये वेळे ॥२॥
नरदेही स्वामी भेटी । नको पाडु तुटी ।
संतसेवा मनोभावे । ब्रह्मसुख लुटी ॥३॥
काढुनि पडळ होउनि अढळ । ब्रम्ही केला ठाव ।
गणेशनाथ म्हणे जेथे । रूप नाही नाव ॥४॥

७३५

जेथे संतमेळा । ब्रह्मसुख सोहळा ॥धृ॥
संत भेटी होता गोष्टी । पुण्याच्या कोटी ।
अनुभवसुखे आनंद झाला । जिवा जीवन मिठी ॥१॥

संत सेवा घडे जीवा । तरीच होय हित ।
जिता जीवा जीवन्मुक्ती । ऐसे कृपावंत ॥२॥
तोडुनि भेदाभेद सुखे । करिताति सुखी ।
भ्रांति तोडुनि स्वरूपी जोडूनी । दाविती  येकायेकी ॥३॥
गणेशनाथ सांगे मात । नकळे तुमचा अंत ।
भावे तुम्हा शरण आलो । जाणुनि कृपावंत ॥४॥

७३६

बहुत पुण्य गाठी । तरीच होय भेटी ॥
जयासाठी जपतप । थोर अनुष्ठान ।
असोनि देही आत्माराम । नकळे त्याची खूण ॥१॥
तोडुनि माया शोधन काया । शुद्ध होय मना ।
असोनि नाही सांगु काइ । धरिता न ये कोण्हा ॥२॥
पवन जैसा अंगा लागे । धरू जाता नाही ।
तैसा आहे देहामाजि । विचारोनी पाही ॥३॥
गणेशनाथ ऐक्य होउनि । सहजसुख बोले ।
सद्गुरूच्या पूर्ण बोधे । मग्न होउनि डोले ॥४॥

७३७

तोचि योगीराणा । उद्धरीतो जना ॥धृ॥
विश्व पाहे ब्रह्म डोळा । तया भेद नाही ।
पाहुनि धाउनि सहज राहे । सद्गुरुच्या पायी ॥१॥
जाणुनि नेणे आवरि मन । पाहे आपे आप ।
पाहे येका न कळे लोका । गुरुनाम जप ॥२॥
निःसंग होय शोधूनी पाहे । आत्म्याचे मुळ ।
प्रपंचाचा लेश नाही । जैसी स्फटिकशिळ ॥३॥
सर्व सरे स्वरूपी विरे । जिवन्मुक्त देही ।
गणेशनाथ म्हणे सत्य । मोक्ष त्याचे पायी ॥४॥

७३८

सांडी सर्व लाज । करी देवकाज ॥धृ॥
भिऊ नको आता । उघडा घाली माथा ।
लोक लाजेचे सवले । फेडुनि टाकी गुण गाता ॥१॥

लेऊनि अंजन तोडुनि बंधन । जालीसे मोकळी ।
एकाएकी निःसंग झाले । देखोनी वनमाळी ॥२॥

सांडुनि लुगडी होउनि उघडी । नाच महाद्वारी ।
जाणुनि गुज । सांडुनी दुजे । जाय ब्रह्मपुरी ॥३॥
भुलूनी जनी धरशील दोन्ही । नोळखशी धणी ।
गणेशनाथ म्हणे अंती । कामा न येती कोण्ही ॥४॥

७३९

पाहे तोची धणी । तारक जनी वनी ॥धृ॥
काजळ खोपा । करूनी लोका दाउनिया काय ।
घरधन्याची भेटी नाही । व्यर्थ वाया जाय ॥१॥
सांडुनि एक पाहुनी सुख । भुलू नको काही ।
मुळिच्या धण्यावाचुनि पहाता । थारा कोठे नाही ॥२॥
जाती-कुळ थोर माझे । धणी वरी गोत ।
माता-पिता सांडुनि सर्व । धण्याशी येकांत ॥३॥
सांडुनि आस सोसुन जाच । पायाकडे पाहु ।
गणेशनाथ म्हणे सुखे । नाम तुझे गाउ ॥४॥

७४०

तैसे करुनि काय । व्यर्थ जन्म जाय ॥धृ॥
पोटासाटी सांगे गोष्टी । भाव नाही मनी ।
घर ना देव ऐशेपरी । हारविली दोन्ही ॥१॥
देखिले नाही पाय । तवरी व्यर्थ दंभ काय ।
द्वैत धरूनि भजन करी । तेणे होईल काय ॥२॥
मान गोडी द्रव्य जोडी । तोवरी नाही सुख ।
पाहुनि जना भुले तोवरी । भोगी जन्म दुःख ॥३॥
पावन देह होउनि काय । जरी न घडे सेवा ।
गणेशनाथ म्हणे आता । तैसे नको देवा ॥४॥

७४१

चाल निरंजना । सुख होईल मना ॥धृ॥
देह गेह सांडोनिया । होय का उदास ।
आत्माराम पाहुनि डोळा । करी निजध्यास ॥१॥
स्त्रिया पुत्र धन मैत्र । सुखावरी मन ।
ऐश्यापरी भुलोनिया । गमाविले जिणे ॥२॥
तोडुनि दोन्ही निरंजनी । केला आम्ही ठाव ।
ब्रह्मसुखे सुखी होता । नाही दुजाभाव ॥३॥
पाहुनि धाउनि विरूनी गेलो । सद्गुरुचे पायी ।

गणेशनाथ म्हणे आता । दुसरे उरले नाही ॥४॥

७४२

पाहणे तेची पाहावे । सुखी होउनी राहावे ॥धृ॥
सांडुन सोस नाम घोष । करी प्रेमभावे ।
सांडुनी मुक्ती करूनि भक्ती । देवलोका जावे ॥१॥
दया धर्म जाणुनि वर्म । सदा सावधान ।
धरूनी ध्यान पाहुनि खूण । नाही येणे जाणे ॥२॥
गुरुसेवा तोचि ठेवा । सत्य जाण मना ।
होउनी अढळ जाणुनि सकळ । कळो नदी कोण्हा ॥३॥
संतमार्गे चाल वेगी । न करी आळस ।
गणेशनाथ म्हणे आता । करी निजध्यास ॥४॥

७४३

पाहे नरदेही । देवाविण नाही ॥धृ॥
धरूनी भाव पाहुनि देव । सदोदीत डोळा ।
असोनि देही न कळे तुज । जिवीचा जिव्हाळा ॥१॥
असुनी घरी फिरशी फेरी । चौऱ्यांशीचा जन्म ।
सांडुनि लोक जाणुनि येक । सद्‌गुरूशी नेम ॥२॥
धरूनी माया फिरशी वाया । व्यर्थ जाय काया ।
भक्तिभाव करूनि वेगी । जाय मुळिच्या ठाया ॥३॥
सांडुनि खोटे लाग वाटे । संत जेथे गेले ।
गणेशनाथ म्हणे सर्व । ब्रह्मसुखे धाले ॥४॥

७४४

योगियाते चिन्ह । सदा सावधान ॥धृ॥
लटके-झटके सांडी । वेगी शुद्‌ध सार मांडी ।
सद्‌गुरूच्या कृपे गिळु । अनंत ब्रह्मांडी ॥१॥
सांडी खटपट वेगी । मार्ग धरी नीट ।
पतंग जैसा उडी घाली । तैसा होऊनी धीट ॥२॥
मेरू ध्रुव अढळही । पाहे देवासही ।
तैसा आहे सर्व काही । आपणामध्ये पाही ॥३॥
सम सर्व जाणुनि मन । हरपुनी गेले ।
जन्म-मरण दोन्ही नाही । गणेशनाथ बोले ॥४॥

७४५

हरी गुण गाता । सांडी सर्व चिंता ॥धृ॥

पाहोनी सोय भिशिल काय । निजपंथ जाता ।
निर्भय होउनि चढे वेगी । ब्रह्मगिरी माथा ॥१॥
पाहोनि येका जाणुनी लोका । न करी जो मात ।
आपण जगी असोनी नाही । शेविला येकांत ॥२॥
भक्तिभावे शरण जावे । संत साधू जना ।
अंतरजीवन जाणोनिया । कळो नेदी कोण्हा ॥3॥
साधुसंत नूर जैसा । रणामाजी जाता ।
गणेशनाथ म्हणे देवा । तैसे नको आता ॥४॥

७४६

भुलू नको सुखा । जन्म जातो फुका ॥धृ॥
खाऊनी धावुनी लेवोनी काही । झाले नाही सुख ।
पाहुनि देव न धरी भाव । भोगी जन्म दुःख ॥१॥
दया धर्म थोर वर्म । जाणोनिया नेणे ।
धरूनी तर्क भोगी नर्क । सोडवील कोण ॥२॥
भाव भक्ती जेणे मुक्ती । न करिच कदा ।
प्रपंचाचा शोक वाहे । भोगितो आपदा ॥३॥
सांडुनि माया शोधूनी काया । राहे निजध्याशी ।
गणेशनाथ म्हणे तरिच । मोक्षपदा जाशी ॥४॥

७४७

नाच महाद्वारी । प्रेम सुखे पोरी ॥धृ॥
खेळशी तरी सईच खेळ । परमार्थाचे पारि ।
देहसुखा भुलशी तरी । होइ पाठमोरी ॥१॥
सांडी आस घाली कास । निर्भयचि पहाता ।
दिसे ते ते नाशिवंत । काय पहाशी आता ॥२॥
भाव तारुण्याचे व्यक्ती । दावी हावभाव ।
माझे तुझे करू नको । धण्यासवे माव ॥३॥
आदि अंती जिवासवे । न ये येथे कोण्ही ।
आत्मसुख जाणोनिया । रमे निरंजनी ॥४॥
खेळ तुझा सर्व । जाईल व्यर्थ वाया ।
गणेशनाथ म्हणे पाहे । मुळिचिया ठाया ॥५॥

७४८

दुवा चिंतु दुवा चिंतु । संत सभे दुवा चिंतु ॥
साधु जनाशि दुवा चिंतु । समस्ताशि दुवा चिंतु ॥१॥
माझे नाम प्राण पिंगळा । जाणे सर्वही कळा ॥
शकुन सांगू वेळोवेळा । जो जिव्हाळा जगाचा ॥२॥
अघटीत येके वेळे घडेल हो । पृथ्वी येकेवेळे मोडल हो ॥
आकाश येकेवेळे पडेल हो । मेरू येकेवेळे दडेल हो ॥३॥
ब्रहस्पती शुक्र भेटती दादो । सप्तही सागर आटती दादो ॥
चंद्र सूर्य लपती दादो । तीर्थे गंगा जाती दादो ॥३॥
हरपती वेद क्रिया धर्म रे । सकळही एक होईल ब्रह्म रे ॥
कोणा न कळे निजवर्म रे । निरंजन होईल नेम रे ॥५॥
शब्द पाहे निराकार रे । ब्रह्मा विष्णू जाती रुद्र रे ॥
अमृत जाईल क्षीरसागर रे । तेथे गणेशनाथ काय किंकर रे ॥६॥

७४९

कर्ता हर्ता सर्वेश्वर । तोचि बोलवी क्षर अक्षर ॥
सत्य असत्य हा विचार । निश्चय निर्धार ढळे ना ॥१॥
माता पिता रमती दादो । बहिणी भावा लाजती दादो ॥
ब्राह्मण गाई वधिती दादो । सर्व असत्य करिती दादो ॥२॥
ऐसा वारा सुटेल रे । पर्वत उडोनी जातील रे ॥
ऐसा मेघ वर्षल रे । समुद्र येके वेळे फुटतील रे ॥
देव-दानव बुडतील रे । नक्षत्रे ते झडतील रे ॥३॥
अठरा भार वनस्पती । काळत्रयी तेही जाती ।
सर्व जीव समाप्त होती । अवतार तेही गेले अंती ॥४॥
संत साधू योगीजन । सिद्ध साधक झाले पूर्ण ।
भक्त चिरंजीव जेणे । साधावे सर्व ते साधन ।
गणेशनाथ मागे दान । आपणची नाही घेईल कोण ॥५॥

**हिंदी पदे**

७५०

देखो अजब बनी हय । साचा साहब धनी हय ॥धृ॥
दो बूंदों का मौजी ना जो खासा तख्त बनाया ।
रंग बिरंग ऐसा देखो । अच्छा खेल दिखाया ॥१॥

काया गड हे दस दर्वाजे क्षमा ढाल चढ़ाई ।
अहं सोहं दसनाद बाजे अनुहत नौबत घाइ ॥२॥
गैबी तख्तपर साहेब बैठे दिल उसका प्रधान ।
गणेशनाथ कहे हम तो यहा के दो दीनके मेहमान ॥३॥

७५१

आप हुआ सारा । दुनियासे न्यारा ॥धृ॥
साच धरे खैरे वोच होते पीर । गुस्सा काट सिधी बाट दुनियासे हारे ॥१॥
नसिब खुले साही मिले ऐसा करो भाई । बस नाम एक अल्ला दुजा नहीं कोई ॥२॥
तो मिलेगा यार भाई खतरा करार । गणेशनाथ कहे पाये तेरा दीदार ॥३॥

७५२

गैबी बोले रे । गरुड़ खेले रे ॥धृ॥
अवलका एक साचा कर देख । एक हुवा अनेक ।
एकही खेल सबही दिखाया । अलग हेन न लेख ॥१॥
एकके दो तीन किये । पांचो के पंचतिस ।
पलखमे सब खेल बनाया । साचे साहेब ऐसे ॥२॥
चौदा तबक जमीन आसमान किया । चंद्र सूरज दो तारे ।
पवन पाणी सबही किया । खेल खेलकर न्यारे ॥३॥
अहं सोहं दशनाद बाजे नासगरो सब माया ।
कामिन कांचन प्यारी देखो । सबही जग भुलाया ॥४॥
आशा मनसा पांचो नागन । जहर बुरे कुल्यांया ।
बड़े बड़े मतवाले गुंडे । पलमें मार गिराया ॥५॥
काम क्रोध दो साप ल्याये । मद मत्सर तेजाब ।
बड़े-बड़े से डरते जिनको । हम तो कहे गरीब ॥६॥
मन पवनके पिटारेमे बहुत विद्या लाया ।
रंग बेरंग सबही देखो । ऐसा खेल दिखाया ॥७॥
परदेसी आज गैबी आया । अजब जनावर लाया ।
पावबिना वह चलता है रे । मुखबिन गुरु गुण गाया ॥८॥

मेहर खैरसे ईमान लाया । सब घट देखें साई ।
खतरा करार साचा बोले । गैबी हाक खुदाई ॥९॥
खिदमतबिन तो अजमत नहीं । बाजे झूठ पसारा ।
गणेशनाथ कहे गैबी देखो । सबमे भरपूर न्यारा ॥१०॥

आलम अल्लाका अल्लाका । नाम गुरु पीरों का ॥धृ॥
तन मन धन यह सबही । कोई नहीं किसका ॥१॥
तुमबिन बंदे सबही झूठे । हरदम नाम अल्लाका ॥२॥
इस दुनियासे सच मत माने । साचा नाम धणिका ॥३॥
गणेशनाथ कहे सुने हो साचा । साधु सो साईंका ॥४॥

७५४

सुन हो दिलभाई । यहां नहीं तेरा कोई ॥धृ॥
दुनियासे तु न कर सगाई । साहीसे नहीं कोई ॥१॥
नहीं काया नहीं माया । कहना एक इलाही ॥२॥
कहांसे आया कहां जाएगा । वहां सुरत लाई ॥३॥
तुम हम बासी हुंडदासी । गणेशनाथ लखलाइ ॥४॥

७५५

तुम्हारो भजन दे गोपाल । और कछु न मांगू दयाल ॥धृ॥
उधो नामा नारद गावे गुण । तैसे भजन दे गोपाल ॥१॥
शुकदेव सुदामा हरगुण गावे । नामदेव तुम्हारो दयाल ॥२॥
दास कबीरा रोहिदासा । मीराबाई गुण गावे ॥३॥
धना जाठ परिसा भागवत । जयदेव गुण गावे ॥४॥
दासी कुब्जा गावे विदुर । हरि गुण गावे सुमिर ॥५॥
जनज सावता साइ भाई । गुण गावे सेना नाई ॥६॥
दास हनुमान ध्रुवा गावे । गुण गावे सूरदासा ॥७॥
बलि बिभीषण गावे प्रल्हाद । रुक्मागद गुण गावे ॥८॥
गणेशनाथ कहे श्री गुरु देवा । जैसा पुंडलिक करे सेवा ॥९॥

७५६

भ्रमरा बास लिज्यो रे । बाजी छांड दीजो रे ॥धृ॥
दीन दुनिया दरिया वह परे । कमल लगे हर भात ॥
गुरूमुख उजाला साधु देखो । मुख अंधारी रात ॥१॥
कमल दलके उपर मूल है । उल्टे पातर फूल ॥
साधु हते सो ब्रह्मरस पाये । मूरख गये सब भूल ॥२॥
हिरा लाल पदार्थ पैदा । कंकर मानिक मोती ॥
गणेशनाथ कहे गुरु प्रसादे । पाये निर्मल ज्योति ॥३॥

७५७

पगके घुंघरू रुनझुन बाजे कानो कुंडल माला ।
नंदजी जब बाल खिलावे कोटी सूरज उजाला ॥१॥

जय जय बाला मदन गोपाला ॥धृ॥
उठे बैठे नाचे कूदे । अच्छा ख्याल दिखावे ।
कहत यशोदा पग पर वारू । और न मन को भावे ॥२॥
माता पिता को बंद छुडावे । असुर बहुत मारे ।
गणेशनाथ कहे ऐसा दाता । भगत जननको तारे ॥३॥

७५८

झूठा जग धंदा जग धंदा । भूला दिनका अंधा ॥धृ॥
हाथी घोड़े नौबत बाजे । अस्वार राजा बंदा ॥१॥
मेहरा मेहरी पुंगडेबाले । दिलका मैला गंदा ॥२॥
हक ना बोले हराम खावे । दोजक झूठा फंदा ॥३॥
गणेशनाथ कहे सुन हो यारों । ईमान सबसे ज्यादा ॥४॥

७५९

देखो दिलजामी दिलजाया । आलम अंत न पाया ॥धृ॥
मन हो मैला ज्योति उजारा । पिरबिन जनम गवाया ॥१॥
औजूद मौजूद आपे हजूर । ऐसा ईमान पाया ॥२॥
भिस्त और दोजख भरपूर न्यारा । पावनवाला पाया ॥३॥
गणेशनाथ कहे हुकुम धणिका । कम ज्यादा नहीं किया ॥४॥

## आरत्या

७६०

आजीचा दिवस थोर आनंद झाला ।
उजळूनी पाच ज्योती माझा स्वामी ओवाळीला ॥धृ॥
उजळूनी पाच ज्योती आरती कनकाचे ताटी ।
काया ओवाळणी तुजशी प्रेमाची भेटी ॥१॥
कावल देवोनि कैसे देह पालटी ।
तुजशी भेटता स्वामी स्वानंद गोष्टी ॥२॥
गुजगोष्टी सांगता थोर आनंद चित्ती ।
चरणकमळ हृदय मुखी नामाची स्तुती ॥३॥
गणेशनाथ म्हणे माझी ऐके विनंती ।
तुजविण कोणी नाही मजला आणिक सांघाती ॥४॥

७६१

जय देव जय देव जय जी सद्गुरू ।
जिव शिव आतित तुझा नकळे निर्धारु ॥धृ॥

काया नाही तेथे कैची रे माया । वृक्ष नाही तेथे कैचे मग छाया ॥१॥
आद नाही तेथे कैचा अनाद । भेद नाही तेथे कैचा अभेद ।
गोप्य नाही तेथे कैचे प्रसिद्ध । ऐक्य नाही तेथे कैचा आनंद ॥२॥
शून्य नाही तेथे कैचा साकार । इच्छा नाही तेथे कैचा विस्तार ।
अपार नाही तेथे कैचा पैलपार । विश्व नाही तेथे कैचा ईश्वर ॥३॥
राम नाही तेथे कैचा आराम । ध्यान नाही तेथे कैचे निजधाम ।
गणेशनाथ नाही अवघे परब्रम्ह । सर्वार्थ सद्गुरु आरती निष्काम ॥४॥

७६२

सुंदरा रघुराया आरती ओवाळीन काया ।
स्फूर्ती मला दे अमृतवाणी गुणकीर्ती गाया ॥धृ॥
नवविधा भक्तीचे हाती नवरत्न ताट ।
निरंजनी ज्योती स्वये अंबर कोंदाटे ।
अक्षय आविनाश रूप हे भाविका भेटे ॥१॥
किरीट कुंडल मनोहर साजे पितांबर कासे ।
माळा मेखळा सुगंध अंगी चंदन सुवास ।
गंध अक्षता रूप हे पाहता सूर्यप्रकाश ॥२॥
आत्माराम सहजासनी बैसला देव ।
सत्य सीता जवळी उभा लक्ष्मण भाव ।
बिभीषण भरत हनुमंताशी चिरंजिव ठाव ॥३॥
चतुर्मुखे ब्रह्मा वानी सहस्रमुखे शेष ।
समस्त गर्जती जयजयकारे नामाचा घोष ।
गणेशनाथ पूर्ण केला गुरुचरणी वास ॥४॥

७६३

ओवाळा ओवाळा तारक सद्गुरु आरती ।
वेद शास्त्रे श्रुती वानिती पुराणे कीर्ती ॥धृ॥
प्रथम बिज ओमकार त्रिगुण त्रिविध जन ।
करुनिया अकर्ता सर्व दावी अभिमान ।
शरण दर्शन पूजन करिता मन होय उन्मन ॥१॥
निर्गुण निरंजन आत्मा अविनाश ज्योती ।
प्राण पंचकरणे केली महावाक्ये आरती ।
ब्रह्मा विष्णू रुद्र सकळ नाम गर्जती ॥२॥
देव दानव किन्नर मानव ऋषीगण गंधर्व ।
सिद्ध साधक भक्त योगी ध्याती गुरुदेव ।

करुणाकर वर गुरु हा देतो परब्रम्ही ठाव ॥३॥
सायुज्य मुक्तीचा हा दाता दुसरा पै नाही ।
तनु मन प्राणे मिठी निश्चय पाई ।
गणेशनाथा जन्म-मरण कल्पांती नाही ॥४॥

७६४

जय देव जय देव जय गुरु परब्रम्हा ।
निगमागम वर्णिती तुझ्या नामाचा महिमा ।
तारक तु सर्वांशी न कळेशी आम्हा ।
आरती ओवाळू अक्षय निजधामा ॥धृ॥
आरती भक्ती विरक्ती शांती मग प्राप्ती ।
गती युक्ती नलगे तेथे प्रेमाच्या ज्योती ।
प्रेमभावे प्रीती तोडोनिया भ्रांति।
विरक्ती मुक्ति तेथे देवाची प्राप्ति ॥१॥
अमर अपार तू अक्षय अविनाशी ।
अकुळ अचल अढळ तू न कळशि कोणाशी ।
आत्मा सर्वस्वे स्वयंप्रकाशी ।
तैसा चित्ती ध्याये गुरु हा गोरक्षी ॥२॥
सगुण नाही निर्गुण पूर्णत्वे पूर्ण ।
मन पवन व्यापक तू चैतन्य धन ।
ध्यान साधन पाहे हे तुझे चरण ।
गणेशनाथ म्हणे मी नाही आपण ॥३॥

७६५

जय देव जय देव जय वैद्यनाथा ।
सच्चिदानंदा गहना सानिध्य परमार्था ।
भुक्ती मुक्ती देतो मग सायुज्यता ।
मंगल आरती तुज शिव सुखस्वार्था ॥धृ॥
चित्त स्फूर्ती वैभव संपन्न हरवी ।
विकट निकट प्रकट निजरूप दावी ।
हरिहर वर कर देऊनी ऐक्य सुख पदवी ।
अचल अढळ अक्षय चरणा पै ठेवी ॥१॥
त्रिनयना वर्ष वहना विभूती उटी अंगी ।
चंद्रधर गंगावर दुःख सुख समभागी ।
विषहारी त्रिपुरारी त्रिपुरांतक जगी ।

त्रिशूळ डमरू प्रसन्नवदन निजयोगी ॥२॥
प्राण पंचात्मक ज्योतीच्या ज्योती ।
उजळील्या दस दिशा प्रकाशली दीप्ती ।
प्रभुराजा निजबिजा स्वयंतेजा आरती ।
गणेशनाथ बोले कैची मजमती ॥३॥

७६६

अरे आर्ते आरतिया सद्‌गुरुनाथा ।
आदि अंती तूची दाता । चरणावरी ठेविला माथा ।
शून्य निरशून्याहुनी परता । नांदतो स्वये सुख संता ।
अपरंपार वरदायक स्मरता । मुख्य प्राप्ती सायुज्यता ॥१॥
अरे पाही गुरुविण सार नाही । हरिहर लागती पायी ।
प्रल्हाद नारद तेही । संपूर्ण याची उपायि ।
सिद्‌ध साधक भक्त तेही । कृपेविण तरले नाही ।
विश्वासे हरिगुण गायी । कळीमळ हळहळ नासती जन्म ।
अढळ आत्मा देही ॥२॥
सर्वां वरिष्ठ मोक्षदानी । पाहता तुजविन नाही कोण्ही ।
तारक या जनी वनी । गण गंधर्व ऋषी मुनी ।
देव दानव मानव चरणी । च्यारि खाणी च्यारि वाणी ।
चौऱ्यांशी लक्ष योनी । गणेशनाथ वर कर मस्तकी देऊनी ।
अढळ सुखाची धणी ॥३॥ अरे अर्ते ॥

७६७

गुरुनाथ स्वामी थोर कृपाळू झाला ।
संत समागमे सर्व सुख आम्हाला ॥धृ॥
एकांतीची खूण साधु संत जाणती ।
उजळली काया फिटली माया भ्रांती ॥१॥
तोडुनि भ्रांती पडळ ब्रह्म दाविले दृष्टी ।
ब्रम्हा ब्रम्ह एकरूप हरूष पोटी ॥२॥
एकरूप पाहता तेथे दुसरे पै नाही ।
ब्रह्मादिका अगोचर हे सुख पाही ॥३॥
अंतर बाहीर पाहता आत्माराम तु एक ।
गणेशनाथ म्हणे माझी विनंती आईक ॥४॥

७६८

जय देवी जय देवी जय तुळजे माये ।

आरती ओवाळीतो आनंदमये ।
ज्योतीस ही ज्योती उजळावी काय ।
भावे तुझं विनविती कृपेने पाहे ॥धृ॥
पाहता तुझे पोटी सकळही सृष्टी ।
वेगळे काही नाही पाहता शेवटी ।
तारक तु सर्वांशी ब्रह्मांड कोटी ।
संताची साउली अमृत दृष्टी ॥१॥
चरणी सामुद्रिक पद्म झळाळ ।
तोडर गर्जे ब्रिदे वाकी करिती कल्लोळ ।
चरणी दानव दैत्य मर्दीयले सकळ ।
न कळे तुझी महिमा करणी आकळ ॥२॥
कासे पितांबर शोभे पिवळा ।
नवरत्नाचा दाब हिऱ्याच्या ज्वाला ।
नवरूंड मेखळा शोभे वनमाळा ।
कंठी येकावळी हार मुक्ताफळा ॥३॥
सुरंग वदन मुखी सुरंग तांबुळ ।
बत्तीसही सुढाळ शोभे मुक्ताफळ ।
आरत ते नयन विशाल तेजाळ ।
भाळी चंद्रसूर्य पूर्ण ते कळा ॥४॥
करणी मुद्रा शोभती ईश्वर ।
ब्रह्मादिक देव पूजिती सुरवर ।
त्राहे त्राहे माते दे अभयंकर ।
नकळे तुझा महिमा करणी अपार ॥५॥
शंख चक्र खर्ग खर्पर त्रिशूळ ।
धनुष्य बाणे करी दैत्या निर्मुळ ।
डमरू नादे गर्जे सर्वही मंडळ ।
ऐशी तु प्रतापे भक्ता कृपाळ ॥६॥
अमृत संजीवनी अमृत जिव्हाळा ।
योग्याची सतरावी तु जीवनकळा ।
अर्धमात्रा तु उन्मन सोहळा ।
गणेशनाथ म्हणे सहजाचा मेळा ॥७॥
७६९
जयदेव जयदेव जय ब्रह्मदेवा ।

आरती ओवाळीन तुज पुण्य ठेवा ॥धृ॥
वेद अधिष्ठान श्रुतीचे जीवन ।
पृथ्वी होय जाय करिता उद्धरण ।
संध्या गायत्री आचार पूर्ण ।
तिर्थे पावन होती सर्वही जन ॥१॥
मंत्र क्रिया धर्म सर्वही नियम ।
तुजपासुनी झाले आगम निगम ।
वार नक्षत्रे तिथी कुळधर्म ।
संवत्सर नवग्रह तोडी हा भ्रम ॥२॥
देवाची स्थापना तीर्थाचे मूळ ।
याग होम साधन तुजपासुनी सकळ ।
नाव रुप वर्ण सकळही मंडळ ।
खाणीवाणी मेरू केले अढळ ॥३॥
स्वर्ग मृत्यु पाताळ तुझा विस्तार ।
तुजपासुनी झाला अवघा साकार ।
देव देवपूजा श्रेष्ठ अपार ।
गणेशनाथ हृदयी धरी पद साचार ॥४॥

७७०

जयदेव जयदेव जय सद्गुरुमूर्ती ।
चरणावरी माथा वानिन गुणकीर्ती ॥धृ॥
संत साधुजन योगी ते पूर्ण ।
सिद्ध साधक भक्त ऋषी मुनिजन ।
तारक या सर्वांशी तुम्हाविण कोण ।
भावे शरण आलो द्या भक्तिदान ॥१॥
चरणा शरण पूजन वंदन दर्शन ।
सद्भावे सर्वांशी केले लोटांगण ।
किर्तन श्रवण स्मरण करिता अर्चन ।
आत्मनिवेदन मग कैचे मरण ॥२॥
जन्माचे शेवटी जाल्या या भेटी ।
दर्शनाचा लाभ पुण्याच्या कोटी ।
स्वर्गीच्या सुखाची करूनी पावटी ।
ब्रह्मसुख पाहता आनंद सृष्टी ॥३॥
संताहूनि श्रेष्ठ नाही त्रिभुवनी ।

नाम मात्रे तरती सकळही प्राणी ।
देवा आगोचर जयांची करणी ।
गणेशनाथ म्हणे ठाव द्यावा चरणी ॥४॥

७७१

जयदेव जयदेव जय जी सद्गुरु ।
भावे शरण आलो तु करुणाकरू ॥धृ॥
मोक्षाचा तु दाता जीवा उद्धारिता ।
सर्वांशि तारक तुझीचि सत्ता ।
नाही भिन्नाभिन्न आणिकही वार्ता ।
कृपाळा स्वामिया हरली भवचिंता ॥१॥
देवा देवपूजा मंत्राचे मुळ ।
देवाचे जीवन साक्षी तु सकळ ।
स्मरणे मात्र होती प्राणी अढळ ।
जिवन्मुक्त होती स्वानंद सोहळे ॥२॥
उपमा नाही जेथे निरुपम सख्य ।
पाहता सदोदित मग कैचे दुःख ।
निरसुनि भेदाभेद आत्मा तो एक ।
पाहता पाहणे गेले मग ब्रह्मसुख ॥३॥
सर्वां श्रेष्ठ गुरु प्रभु तो उदार ।
देव-दानव ऋषी पूजिती सुरवर ।
ब्रह्मादिका सकळा होय जयजयकार ।
गणेशनाथ म्हणे मज न कळे पार ॥४॥

७७२

वृंदावन सुंदर रूप मनोहर ।
मूळ शाखा पत्रे तुझा विस्तार ।
त्राहे त्राहे माते दे अभयंकर ।
आरती ओवाळीतो सुफल संसार ॥१॥
जय जयदेवी जय हो श्री तुळशी ।
आरती ओवाळीतो पुण्याच्या राशी ।
अपार महिमा तुझा नकळे कोण्हाशी ।
लक्ष्मी नारायण अखंड तुजपाशी ॥धृ॥
मूळ महेश्वर ब्रह्मा साकार ।
आपण विष्णू अवघा तुळसी निर्धारे ।

तेत्तिस कोटी देव तेथे सर्वत्र ।
दर्शन होता पावती अमरावती नगर ॥२॥
अतुल तुळशीदळ पक्व अढळ ।
तुका न ये देव सर्वही मंडळ ।
विश्वमाता तु तव भक्ता कृपाळ ।
दर्शन होता पावती मोक्ष तात्काळ ॥३॥
नित्य आरती भक्ती करिती जे प्राणी ।
देवाचे समान तीर्थाच्या खाणी ।
हर्षे निर्भर नाचे नामाचा ध्वनी ।
गणेशनाथ स्तुती करी सद्गुरुचरणी ॥४॥
७७३
जयदेव जयदेव जय सदाशिवा ।
आरती ओवाळीतो देवाआधिदेवा ।
जन्मोजन्मी द्यावी चरणाची सेवा ।
शरण आलो दीन उद्धारावे जीवा ॥धृ॥
शिव देव शिव भक्त शिव आदि अंत ।
शिवनाम जपता जिव ते शिव होत ।
साधनाच्या कोटी धर्म अगणित ।
तुझे निजरुप पाहाता पावन पतित ॥१॥
शिव ध्यान शिव साधन शिव जेथे मन ।
वेगळेपण नाही मग कैचे भिन्न ।
उघडोनी नेत्र पाहे शिव अवघा पूर्ण ।
त्याहुनी आणिक नाही दुसरे पै ध्यान ॥२॥
शिव चित्ती शिव ध्याती शिव सर्वही होती ।
ऐसे हे जाणोनी न धरावी भ्रांती ।
निजध्यासे निजवृत्ती करिता शिवभक्ती ।
शिव जोगी चिंतीता मोक्षाची प्राप्ती ॥३॥
शिवभावे शिव व्हावे शिव भवना जावे ।
न करावा आळस शिवनाम घ्यावे ।
गणेशनाथ म्हणे कृपेने त्वा पाहावे ।
आरती ओवाळीतो चित्ती त्वा राहावे ॥४॥
७७४

**प्रेमनाथ विरचित संत गणेशनाथांची आरती**

श्री नाथा जयनाथा जय जय जय नाथा ।
चरणावरी माथा ठेवुनी निजस्वार्था ॥धृ॥
नाना योनी फिरता बहु कष्टी झालो ।
नेणो कणवा पुण्ये मनुजन्मा आलो ।
माया ममता म्हणुनि मायाजाळि पडिलो ।
सहज संत समागमे तव नामी भरलो ॥१॥
नाम स्मरणमुळे गुरुपद पाहिलो।
पायी तटस्थ होऊनी निजपदी राहिलो ।
मी मी म्हणूनी बोली हे तव विसरलो ।
तुझे चरणी तल्लीन होऊनिया ठेलो ॥२॥
प्राण पंचक आरती घेऊनिया करी ।
अष्टसिद्धी नवनिधी तिष्ठती द्वारी ।
तेतीस कोटी देव जय जयकारी ।
नारद तुंबर गायन गर्जती अवसरी ॥३॥
सारस-उजनी निवासा श्रीगुरु परब्रह्मा ।
दर्शन स्पर्शन स्फुरण अखंड निजधामा ।
प्रेमनाथ आरती घेऊनिया प्रेमा ।
आनंद ओवाळीत निजसुख निजधामा ॥४॥

७७५

**रामाची आरती**

संसार सिंधू काया ही लंका ।
अहंकार रावण मारुनी देखा ।
निजमोक्षे राक्षस वदिली ताटीका ।
राम राज्य झाले सणसण के देखा ॥१॥
जय देव जय देव जय जय श्री रामा ।
चरणावरी माथा तारक तू आम्हा ॥धृ॥
आत्मा हा रघुराज सत्य ही सिता ।
बंधू लक्ष्मन कौशल्या माता ।
भरत शत्रुघ्न दशरथ पिता ।
सेवक हनुमंत विनवी रघुनाथा ॥२॥
मारुनी राक्षस सोडविले देव ।
शिळा उद्धारिल्या प्रताप बहावो ।

सदा सुखी केले सर्व ही देव ।
एक छत्री राज्य नाही संदेह ॥३॥
सर्वाघटी व्यापक तू आत्माराम ।
सद्गुरू कृपेने दाखविले वर्म ।
तारक नाम घेता हरला भवश्रम ।
गणेशनाथ म्हणे द्यावा निज प्रेम ॥४॥

७७६

**मारुतीची आरती**

वज्र देह पाहता वज्र कासोटा ।
वज्र पथे उटे चळचळ सुवाटा ।
सतरावी ती सीता प्रणव पराटा ।
लई लक्ष्ये लई लक्ष्ये प्रथम चौहाटा ॥१॥
जयदेव जयदेव जय जय हनुमंता ।
आरती ओवाळू श्रीराम दूता ॥धृ॥
तोडून अशोक वन करी समाधान ।
मुद्रिका देऊन सांगती खून ।
मारुनी आखिया माळी राक्षस सैन्य ।
जाळून काम लंका करी ब्रह्म यज्ञ ॥२॥
लागे लक्ष्मणा शक्ती शरीरि ।
परमार्थ पर्वत आणी द्रोणागिरी ।
आत्मसुख औषध घेऊन या करी ।
इतरापाड कोण संसारी ॥३॥
पवनसुत हनुमंत श्रेष्ठ भक्तास ।
देवाशी तारक झाला साक्षात ।
गणेशनाथ म्हणे घेऊनिया प्रित ।
निर्भय करी देवा हे मनोरथ ॥४॥

७७७

**आरती तुळशीची**

वृंदावनी सुंदर रूप मनोहर ।
मुळ व्यास पालव तुझा विस्तार ।
त्राहे त्राहे माते जोडोनिया कर ।
आरती ओवाळीता सुफल संसार ॥१॥
जय देवी जय देवी जय माय तुळशी ।

आरती ओवाळीता पुण्याच्या राशी ।
अपार महिमा तुझा न कळे कोण्हाशी ।
लक्ष्मी-नारायण अखंड तुजपाशी ॥धृ॥
मूळ महेश्वर ब्रह्मा साकार ।
व्यापक विष्णू अवघा तुझा विस्तार ।
तेहतीस कोटी देव प्राणी सर्वत्र ।
दर्शन होता पावती अमरावती नगर ॥२॥
आकळ तुळशीदळ पकवा अढळ ।
तुका नोहे देव सर्व ही मंडळ ।
दर्शन होता पावेल मोक्ष तात्काळ ॥३॥
नित्य आरती करितो भक्त जे प्राणी ।
देवा समान तीर्थाची खाणी ।
हर्षले गुरू भजनी नामाची ध्वनी ।
गणेशनाथ म्हणे सद्गुरूची करणी ॥४॥

७७८

**नवनाथाची आरती**

कळीमध्ये अवतार नव नारायणाचा ।
केलासे उद्धार अवघ्या जनाचा ।
दाविला मूळ मार्ग साबरी विद्येचा ।
अघटीत महिमा नकळे सिद्धाचा ॥
जय देव जय देव जय नवनाथा ।
आरती ओवाळू भावार्थी ओवाळू श्री गुरु दत्ता । जय नवनाथा ॥
मच्छा पासून झाले मच्छिंद्रनाथ ।
गोरक्ष जन्मले गौवरी भस्मात ।
जलींदर उत्पत्ति यज्ञ कुंडात ।
कानिफ पैदा गजकरणात ॥१॥ जय नवनाथा ॥
भिक्षेच्या पात्रात झाले भरतरी ।
रेवन तिरीचे रेवनाथ भारी ।
कृष्णाच्या ओंजळी कृष्णाच्या तरी ।
वडसिद्धी नागनाथ सर्पिन उदरी ॥२॥ जय नवनाथा ॥
चरणापासून झाले चरपटीनाथ ।
ग्रहाची उत्पत्ती श्री भागीरीत ।
गहिनी गोपीचंद अडबंगीनाथ ।

यापुढे चौऱ्यांशी सिद्धांच्या गती ॥३॥ जय नवनाथा ॥
कलि मध्ये नवनाथ प्रगट झाले ।
साबरी विद्या देऊन जग उद्धरिले ।
विद्याच्या प्रतापे सर्व जिंकले ।
गणेशनाथ म्हणे तुम्हा शरण आले ॥४॥

७७९

**सद्गुरूनाथाची आरती**

पंचप्राणाची उजळूनी आरती ।
ओवाळूनी आरती भावे ओवाळीता ।
प्रेमे ओवाळीता सुख झाले विश्रांती ॥१॥
ओवाळू आरती नाथा दयाळा ।
सद्गुरु नाथा दयाळा ।
गुरुमाय माऊली । गुरुमाय माऊली ।
सकळ जिविचा जिव्हाळा ॥धृ॥
करी घेऊन आरती । ओवाळीती नरनारी ।
पुष्पांचा वर्षाव नामाचा वर्षाव देव करिती अंबरी ।
तेहतीस कोटी जयजयकार बोलती । जयजयकार बोलती ।
तयांच्या दर्शना साधूच्या दर्शना । जन्म नाही मागुती ॥2॥
ओवाळू आरती तुझिया चरणा । देवा तुझीया चरणा ।
धन्य सद्गुरुराया नाथा । सद्गुरु नाथा दयाळा ।
विठ्ठल रखुमाई सावळचा विठ्ठल रखुमाई ॥३॥
गणेशनाथ म्हणे थोर आनंद झाला ।
दयाळांचा मेळा । कृपाळांचा मेळा ।
माझा सांभाळ केला ॥४॥

७८०

**श्री संत सद्गुरू गणेशनाथ महाराजांची आरती**

पांडुरंग धनी केला काळ देशो धडी नेला ।
वैकुंठी बैसोनिया । तोही ब्रह्माहूनी ठेला ।
आरती गणेशनाथा ॥
संता देखता हनुमंता । बोधराज पंढरीसी ।
बांधे बाशिंग माथा । आरती गणेशनाथा ॥धृ॥
उजनी पासोनिया । असे सारसे गाव ।
बांधीला मठ ऐसा । त्याचे सृष्टीवरी नाव ॥१॥

आरती गणेशनाथा ॥
संसार सारष्याचा । आवडली लिंग वाचा ।
बांधोनिया सर्व स्वेच्छा । ओवाळीती प्रेमपाशा ॥२॥
आरती गणेशनाथा ॥
संता देखता हनुमंता । बोधराज पंढरीसी ॥
बांधे बाशिंग माथा । आरती गणेशनाथा ॥
पावन देश भूमी तेथे वसती संत ।
विठ्ठलनाथ पुरे काही लागेना अंत ॥३॥
आरती गणेशनाथा ॥